# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : इतिहास

सत्र ५ : पेपर ९

# आधुनिक जगाचा इतिहास (१८ ते १९ वे शतक)

History of Modern World (18th to 19th Century)

सत्र–६ : पेपर १४

# आधुनिक जगाचा इतिहास (२० वे शतक)

History of Modern World (20th Century)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
बी. ए. भाग – ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-94-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिति ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष - **प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **प्रोफेसर (डॉ.) चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन गर्गे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी ॲण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **प्रोफेसर (डॉ.) निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. सुप्रिया खोले**<br>राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड, कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. अभय पाटील**<br>सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, ता. कराड, जि. सातारा | २ | – |
| **डॉ. मुफिद मुजावर**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाई शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३, ४ | – |
| **डॉ. शशिकांत मोहिते**<br>आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली | – | १ |
| **डॉ. उर्मिला क्षीरसागर**<br>श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली. | – | २ |
| **डॉ. धीरज शिंदे**<br>श्रीमती आक्काताई रामगौडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | – | ३ |
| **डॉ. जनार्दन जाधव**<br>एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | – | ४ |

**■ संपादक ■**

**प्रोफेसर (डॉ.) सुप्रिया खोले**
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या इतिहास विषयाच्या पेपर क्रमांक ९ सत्र पाच साठी 'आधुनिक जगाचा इतिहास' (१८ ते १९ वे शतक) आणि पेपर क्रमांक १४ सत्र सहा साठी 'आधुनिक जगाचा इतिहास' (२० वे शतक) हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ९ 'आधुनिक जगाचा इतिहास' (१८ ते १९ वे शतक) यामध्ये अमेरिकन राज्यक्रांती (१७७६), फ्रेंच राज्यक्रांती (१७८९), इटलीचे एकीकरण (१८७१), जर्मनीचे एकीकरण (१८७१) तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १४ 'आधुनिक जगाचा इतिहास' (२० वे शतक) यामध्ये पहिले महायुद्ध (१९१४), रशियन राज्यक्रांती (१९१७), दुसरे जागतिक महायुद्ध (१९३९), संयुक्त राष्ट्र संघटना (१९४५) या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण केंद्राच्या अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रोफेसर (डॉ.) सुप्रिया खोले**

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड,

कोल्हापूर, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–९**<br>**आधुनिक जगाचा इतिहास (१८ व १९ वे शतक)** | |
| १. | अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) | १ |
| २. | फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) | २४ |
| ३. | इटलीचे एकीकरण (१८७१) | ५१ |
| ४. | जर्मनीचे एकीकरण (१८७१) | ८३ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१४**<br>**आधुनिक जगाचा इतिहास (२० वे शतक)** | |
| १. | पहिले महायुद्ध (१९१४) | १०५ |
| २. | रशियन राज्यक्रांती (१९१७) | १२७ |
| ३. | दुसरे जागतिक महायुद्ध (१९३९) | १४२ |
| ४. | संयुक्त राष्ट्र संघटना (१९४५) | १६५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १

# अमेरिकन राज्यक्रांती (१७७६)

## (American Revolution-1776)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

    १.२.१ अ) कारणे

    १.२.२ ब) महत्त्वाच्या घटना

    १.२.३ क) परिणाम

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर खालील गोष्टींचे विद्यार्थ्यांना आकलन होईल.

१) प्रबोधन काळानंतर नव्या खंडाच्या शोधासाठी प्रयत्न, अमेरिका या नव्या खंडाचा शोध.

२) उत्तर अमेरिका खंडात ब्रिटिश वसाहतीची स्थापना.

३) ब्रिटिशांचे वसाहतींवरील अधिसत्तेचे स्वरूप.

४) ब्रिटिशांनी वसाहतींमध्ये राबवलेली आर्थिक धोरणे आणि ब्रिटिशांचा वसाहतींकडे बघण्याचा दृष्टिकोन.

५) वसाहतींची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय प्रगती आणि उदारमतवादाचा विकास.

६) अमेरिका वसाहती आणि ब्रिटीश यांचे बिघडत गेलेले संबंध.

७) वसाहतींची क्रांतीच्या दिशेने झालेली वाटचाल.

८) राज्यक्रांतीच्या काळातील घटनांचे स्वरूप.

९) ब्रिटीशांच्या पराभवाची आणि वसाहतीच्या विजयाची कारणे.

१०) अमेरिकन राज्यक्रांतीचे विविध परिणाम.

All men are created equal, that they are endowed by their Creator with certain unalienable Rights that among these are Life, Liberty and the pursuit of Happiness. That to secure these rights, Governments are instituted among Men, deriving their just powers from the consent of the governed, —That whenever any Form of Government becomes destructive of these ends, it is the Right of the People to alter or to abolish it, and to institute new Government.

Thomas Jefferson in the Declaration of Independence, July 4, 1776

‘निसर्गतः मानव स्वतंत्र असून मुक्त आहे. सर्व मानव जन्मतः समान असून प्रत्यक्ष विधात्यानेच सर्वांना स्वातंत्र्य व सुख संपादन करण्याचा हक्क दिला आहे. या हक्काच्या संरक्षणासाठी प्रजा शासनसंस्था निर्माण करत असते. जेंव्हा ही शासन संस्था प्रजेचे मुलभूत हक्क डावलते तेंव्हा ती बदलण्याचा, बरखास्त करण्याचा आणि नवी शासनसंस्था स्थापन करण्याचा पूर्ण हक्क प्रजेस आहे.’

थॉमस जेफरसन, स्वातंत्र्याचा जाहीरनामा, ४ जुलै १७७६

## १.१ प्रास्ताविक :

अमेरिकेच्या राज्यक्रांतीचा इतिहास म्हणजे अमेरिकन वसाहतीने ब्रिटनच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी केलेल्या मोठ्या संघर्षाची कहाणी आहे. हा संघर्ष आर्थिक कारणांमुळे सुरू झाला असला तरी त्याचे परिणाम राजकीय, सामाजिक इत्यादी सर्वच क्षेत्रावर पडले. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (USA) या जगातल्या पहिल्या लोकशाही राष्ट्राचा या क्रांतीनंतर जन्म झाला. ब्रिटनच्या वसाहतवादाला जोरदार धक्का देण्याचे कार्य या राज्यक्रांतीने केले. खरेतर जबाबदार शासनपद्धती, नियंत्रित राजेशाही, पार्लमेंट म्हणजेच लोकप्रतिनिधीगृह या सर्व लोकशाहीला बळ देणाऱ्या संकल्पनांचा विकास ब्रिटनमध्ये खूप अगोदर झाला होता. मात्र हेच ब्रिटन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पक्के वसाहतवादी बनले होते. विविध देशातून त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. १४९२ मध्ये शोधलेल्या अमेरिका खंडातही ब्रिटनच्या राजघराण्याच्या पाठिंब्याने वसाहती स्थापन झाल्या. या वसाहतींचा ब्रिटनने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पुरेपूर वापर केला. अखेरीस वसाहतींनी एकत्र येऊन ब्रिटनचे हे जोखड उधळून लावले. यानंतर जगातील पहिली लिखित राज्यघटना असलेले लोकशाही राष्ट्र अमेरिका अस्तित्वात आले. जागतिक पातळीवर लोकशाहीचा प्रसार यानंतर झाला.

लोकशाही, व्यक्ती स्वातंत्र्याला चालना देतांनाच या क्रांतीने धर्मसंस्थांचा राजकीय जीवनावरचा प्रभाव कमी करून सामान्य लोकांचा राजकारणातील सहभाग वाढवला. वैचारिक क्षेत्रातही मोठे बदल होत गेले. आधुनिक जगातील लिखित राज्यघटनेनुसार चालणारे पहिले प्रजासत्ताक राष्ट्र अमेरिकेच्या रूपाने जन्माला आले. थोडक्यात अमेरिकन राज्यक्रांतीचा प्रभाव जागतिक राजकारणावरही पडला त्यामुळेच जागतिक इतिहासात अमेरिकन राज्यक्रांतीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.

### १.१.१ ख्रिस्तोफर कोलंबस आणि अमेरिकेचा शोध :

युरोपमधील प्रबोधनाचा कालखंड हा अनेक नव्या शोधांना जन्म देणारा ठरला. या कालखंडात युरोपातील धाडसी दर्यावर्दींनी आशिया आणि इतर खंडाकडे जाणारे जलमार्ग शोधून काढले. हे जलमार्ग पुढे व्यापार वृद्धीसाठी उपयुक्त ठरले. प्राचीन काळापासून युरोपचा संपर्क प्रामुख्याने आशियायी राष्ट्रांबरोबर होता. पश्चिमेकडे दुर्लक्ष झाले होते. ख्रिस्तोफर कोलंबस हा एक धाडसी दर्यावर्दी होता. जन्माने इटालियन असलेल्या ख्रिस्तोफरला स्पेनचा राजा फर्डिनांड आणि राणी इसाबेलाने प्रोत्साहन आणि आर्थिक मदत दिली. पृथ्वी गोल आहे हे मत यावेळी मान्य झाले होते. या गृहीततत्वाच्या आधारे भारताकडे जाणारा जलमार्ग शोधण्याच्या उद्देशाने कोलंबसने ऑगस्ट १४९२ मध्ये युरोपमधून पश्चिम दिशेने जलप्रवास सुरु केला. सोबत नीना, पिंटा आणि सांता ही तीन जहाजे आणि अठ्ठ्याऐंशी खलाशी होते. सत्तर दिवसाच्या खडतर प्रवासानंतर अमेरिका खंडानजीकच्या पूर्व दिशेस असलेल्या बहामा बेटावर ऑक्टोबर १४९२ मध्ये पोहोचला. आपण भारताच्या भूमीत पोहोचलो आहोत असे वाटून त्याने तिथल्या ताम्रवर्णीय निवासींना रेड इंडियन्स (Red Indians) असे नाव दिले. हे नाव आजही प्रचलित आहे. अमेरिका खंडाच्या रूपाने नव्या भूमीचा शोध लागला. कोलंबसने आणखी तीन सफरी काढून क्युबा, कॅरेबियन बेटे शोधत दक्षिण अमेरिकेची भूमीही गाठली. याच दरम्यान अमेरिगो वेस्पुची याने स्पेनतर्फे पश्चिमेच्या दिशेने पहिली मोहीम काढली. उत्तर अमेरिका खंडात पोहोचलेल्या अमेरिगोने सध्याचे व्हेनेझुएला हे ठिकाण शोधले. ॲमेझॉन नदीचा उगमही त्याने शोधून काढला. १५०१ मध्ये दुसरी मोहीम काढून त्याने आणखी काही ठिकाणे शोधली. या भूभागाची त्याने आपल्या मित्राला कळवलेली सविस्तर वर्णने युरोपात प्रकाशित झाली. या वर्णनातून अमेरिकेची माहिती युरोपियन लोकांना कळली. युरोपमधील मार्टिन व्हाल्टझेम्युलर याने १५०७ मध्ये आपल्या ग्रंथात या नव्या भूभागास अमेरिगोच्या नावावरून अमेरिका हे नाव दिले. ते प्रचलित झाले. तोपर्यंत त्याला कोलंबसच्या प्रवासाविषयी माहिती नव्हती. अमेरिकेचा प्रथम शोध लावणारा कोलंबस मात्र उपेक्षित राहिला. अमेरिकन खंडाच्या शोधाने युरोपियन राष्ट्रांच्या व्यापारास चालना मिळाली. युरोपियनांनी अमेरिका खंडातील संसाधनांची अक्षरश: लूट केली.

### १.१.२ अमेरिका खंडात युरोपियन वसाहतींची स्थापना :

नव्याने शोध लागलेल्या अमेरिका खंडात वसाहती स्थापन करण्यासाठी सर्वप्रथम स्पेन आणि पोर्तुगाल यांच्यात स्पर्धा सुरू झाली. कोलंबसने सेंटो डोमिंगो येथे वसाहत स्थापन करून तेथे उसाचे उत्पादन घ्यायला सुरवात केली. या दोन राष्ट्रातील संघर्ष टाळण्यासाठी पोप अलेक्झांडर सहावा याने मध्यस्थी केली आणि प्रदेशांचे वाटप केले. या दोन्ही राष्ट्रांची दक्षिण अमेरिकेत मक्तेदारी निर्माण झाली. या दोन्ही राष्ट्रांनी तेथून अमाप फायदा मिळवायला सुरवात केली. तेथील मुळच्या रहिवासी असलेल्या इन्का, ॲझटेक, माया अशा संस्कृती युरोपियनांचे आक्रमण थोपवू शकल्या नाहीत. या भागात लॅटीन भाषेचा प्रसार झाला त्यामुळे हा भाग लॅटीन अमेरिका नावाने प्रसिद्ध झाला. या भागातून दोन्ही राष्ट्रांनी प्रचंड संपत्ती मिळविली हे पाहून ब्रिटन, फ्रान्स, हॉलंड या राष्ट्रांनाही या भागात आपल्या वसाहती असाव्यात असे वाटू लागले. अखेरीस

ब्रिटनचा राजा सातवा हेन्री याने पोपचे आदेश धुडकावून लावत या भूमीकडे आपल्या जॉन कॅबेट या खलाशास सन १४९६ मध्ये पाठविले. त्याने अमेरिकेपर्यंत प्रवास करून तेथे वसाहती स्थापन करण्याच्या हक्काचा पाया रचला. मात्र त्याच्यानंतर जवळ जवळ शंभर वर्षानंतर अमेरिकन भूमीत वसाहत स्थापन करण्यासाठी ब्रिटीशांनी प्रत्यक्ष प्रयत्न सुरु केले. १५८४ मध्ये सर वॉल्टर रॅले याने राणी एलिझाबेथकडून परवाना मिळवून उत्तर कॅरोलिना शेजारच्या बेटात व्हर्जिनिया ही वसाहत स्थापन करण्याचा प्रयत्न केला मात्र तो अयशस्वी ठरला यातून धडा घेत ब्रिटीश व्यापारी एकत्र आले आणि उत्तर अमेरिका खंडातील जेम्स नदीच्या काठावर जेम्स टाऊन या नावाने शहर स्थापन केले. पुढे याचेच रुपांतर वसाहतीत झाले आणि या वसाहतीस 'व्हर्जिनिया' हे नाव दिले गेले.

**ब्रिटिश वसाहतींची स्थापना :**

अमेरिका खंडात स्थलांतर करणे ही त्यावेळी कठीण गोष्ट होती. अटलांटिक महासागरातून करावयाचा अत्यंत अवघड असा सुमारे पाच हजार मैलाचा प्रवास, अमेरिकन मूळनिवासी रेड इंडियन यांचा विरोध, घनदाट जंगले, वास्तव्य व शेतीसाठी जमिनीची अनउपलब्धता, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक गोष्टींना तोंड देत अनेक युरोपियन लोक अमेरिका खंडात कायमचे स्थलांतरित झाले. यामागे अनेक गोष्टी कारणीभूत होत्या. ब्रिटिश व्यापार्यांना आपला उद्योग व्यवसाय वाढविण्यासाठी नवा प्रदेश योग्य वाटत होता. तेथून कच्चा माल मुबलक प्रमाणात मिळेल आणि ब्रिटनमध्ये तयार झालेल्या मालाला बाजारपेठ मिळेल असा त्यांचा अंदाज होता. या काळात ब्रिटनमध्ये बेरोजगारी वाढून चोऱ्या, लूटमाऱ्या होऊ लागल्या होत्या. बेरोजगारांचा प्रश्न नव्या वसाहतींमुळे सुटेल आणि वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न प्रश्न सोडविता येईल असे मत काही मंडळींनी व्यक्त केले. कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट पंथातील मतभेद वाढत चाललेले होते. प्रोटेस्टंट आणि प्युरिटीन्सना धार्मिक छळाला सामोरे जावे लागत होते. अशा अनेकांना देश सोडून दुसरीकडे जावे असे वाटत होते. एकुणच अमेरिका खंडात नव्या वसाहती स्थापन व्हाव्यात असे अनेकांना वाटत होते. अशा वसाहती स्थापन करण्यास ब्रिटनने परवानगी दिली पण त्याचबरोबर त्यावर ब्रिटनच्या राजाचा अधिकार राहिला असेही स्पष्ट केले. ब्रिटिश सरकार बरोबरच व्यापारी आणि इतरांनीही पुढाकार घेऊन वसाहती स्थापन केल्या. या वसाहतींमधील वातावरण युरोपियन लोकांना सहन होण्यासारखे होते यामुळेही युरोपीयन लोक मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाले.

१६०७ ते १७३२ या कालखंडात उत्तर अमेरिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यावर तेरा वसाहती स्थापन झाल्या. या वसाहती पुढीलप्रमाणे

१) व्हर्जिनिया (Virginia) – ब्रिटीश व्यापार्यांनी १६०७ मध्ये या वसाहतीची स्थापना केली.

२) मॅसॅच्युसेट्स (Massachusetts)– प्युरिटीन्सनी केपकॉन्ड येथे वसाहत स्थापन केली. ती नंतर प्लायमाऊथ या नावाने ओळखली जाऊ लागली. १६३० मध्ये मॅसॅच्युसेट्स बे नावाची कंपनी स्थापन करून आणखी काही प्यूरीटीन्स येथे आले आणि ही वसाहत मॅसॅच्युसेट्स या नावाने ओळखली जाऊ लागली.

३) मेरिलँड (Maryland) पहिल्या चार्लस कडून रीतसर सनद घेऊन ब्रिटीशांनी ही वसाहत १६३२ मध्ये स्थापन केली.

४) न्यूयॉर्क (New York) – डचांनी १६०९ मध्ये स्थापन केलेली ही वसाहत ब्रिटीशांनी १६६४ मध्ये जिंकून घेतली. या परिसरास न्यूयॉर्क हे नाव दिले.

५) डेलावेअर (Delaware)- १६४० मध्ये स्वीडिश लोकांनी स्थापन केलेली ही वसाहत प्रथम डचांनी जिंकून घेतली. नंतर डचांकडून ब्रिटीशांनी याचा ताबा मिळविला.

६) कनेक्टीकट (Connecticut) – १६६२ मध्ये ब्रिटिश राजाकडून सनद घेऊन प्यूरीटीन्सनी अधिकृतरीत्या या वसाहतीचा विकास घडवून आणला.

७) न्यू जर्सी (New Jersey) - डचांनी स्थापन केलेली ही वसाहत १६६४ मध्ये ब्रिटीशांनी जिंकून घेतली.

८) न्यू हॅम्पशायर (New Hampshire) – प्युरिटीन्सनी स्थापन केलेल्या न्यू इंग्लंड राज्य संघातील न्यू हॅम्पशायर १६७९ मध्ये स्वतंत्र वसाहत म्हणून विकसित झाले.

९) पेनसिल्व्हानिया (Pennsylvania) – विचारवंत विल्यम पेन याला ही वसाहत स्थापन करण्यासाठी दूसरा चार्ल्स याने सनद दिली होती. त्याच्या नावावरून १६८२ मध्ये ही वसाहत विकसित झाली.

१०) ऱ्होड आयलंड (Rhode Island) - न्यू इंग्लंड संघातील या वसाहतीला ब्रिटिश राजाने १६८५ मध्ये सनद दिली आणि याचे स्वतंत्र वसाहतीत रूपांतर झाले.

११) दक्षिण कॅरोलिना (South Carolina)– या भागातील स्पॅनिश वर्चस्वाला शह देण्यासाठी दुसर्या चार्ल्सने १६७० मध्ये लॉर्ड शॅफ्टबरी आणि इतर ब्रिटिश जमीनदारांना हा भाग विकला. हाच प्रदेश दक्षिण कॅरोलिना वसाहत म्हणून विकसित झाला.

१२) उत्तर कॅरोलिना (North Carolina) व्हर्जिनीया वसाहतीत असलेला हा प्रदेश १७२९ साली स्वतंत्र करण्यात आला आणि उत्तर कॅरोलिना या नावाने ओळखला जाऊ लागला.

१३) जॉर्जिया (Georgia) – जेम्स एडवर्ड ओगलथार्पने १७३२ मध्ये स्वतच्या मालकीच्या जमिनीवर ही वसाहत स्थापन केली. किंग जॉर्जच्या स्मरणार्थ याला जॉर्जिया असे नाव दिले. ब्रिटीशांनी सनद दिलेली ही शेवटची वसाहत ठरली.

यातील काही वसाहती ब्रिटीशसत्तेने, काही खाजगी व्यापारी कंपन्यांनी, शेतकर्यांनी, काही स्थलांतरित व्यक्तींनी पुढाकार घेऊन तर काही वसाहती विशिष्ट गटाच्या लोकांनी एकत्र येऊन स्थापन केल्या होत्या. या वसाहतीवर नंतर ब्रिटनचे प्रशासन प्रस्थापित झाले. या वसाहतीमध्ये ब्रिटन बरोबरच युरोपमधील इतर राष्ट्रातले लोक एकत्र येऊन स्थायिक झाले. येथे ब्रिटिश लोकांचे प्रमाण जास्त होते त्यामुळे वसाहतींवर ब्रिटिश विचारांचा प्रभाव अधिक होता. येथील लोक विविध वर्णाचे आणि वंशाचे होते. युरोपमधून विविध भागातून आलेले ख्रिश्चन धर्मातील क्वेकर (Quakar), इव्हॅनजेलिकल (Evangellical), प्रोटेस्टंट (Protestant), कॅथॉलिक (Catholic), प्युरिटीन्स ( Puritans) इ. पंथाचे लोक राहू लागले. आर्थिक

हलाखी, धार्मिक छळ याला कंटाळून येथे आलेल्या लोकांना प्रगतीची संधी मिळाली. परस्पर सहकार्य आणि कष्टाच्या जोरावर या लोकांनी प्रगती केली. नव्या विचाराच्या समाजाची यामुळे निर्मिती झाली. उत्तर अमेरिका खंडात स्पेन - फ्रेंच इ. युरोपियन राष्ट्रांच्या वसाहतीही स्थापन झाल्या. मात्र ब्रिटीश वसाहती इतकी त्यांची प्रगती होऊ शकली नाही.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ अ) अमेरिकन राज्यक्रांतीची कारणे :

अमेरिकेत स्थापन झालेल्या वसाहतींचा उपयोग मातृदेश ब्रिटनच्या आर्थिक भरभराटीसाठी व्हावा यासाठी ब्रिटीशांनी सर्व प्रकारे प्रयत्न केले. अनेक नियम केले. बंधने घातली. ब्रिटीशांच्या परवानगीने स्थापन झालेल्या, ब्रिटीशांचे अधिपत्य मान्य केलेल्या वसाहतींनी हे अधिपत्य झुगारून देण्यासाठी प्रयत्न सुरु केले आणि राज्यक्रांती घडून आली अर्थात ही अचानक घडून आलेली घटना नव्हती अनेक गोष्टी त्यासाठी कारणीभूत होत्या त्या पुढीलप्रमाणे

**१) ब्रिटीशांचा वसाहतीकडे बघण्याचा दृष्टीकोन :**

व्यापारवादी ब्रिटीशांच्या पुढाकाराने तेरा अमेरिकन वसाहतींची स्थापना झाली होती. या वसाहतीबाबत ब्रिटीशांनी एक विशिष्ट धोरण ठरविले ते म्हणजे ब्रिटनची भरभराट घडवून आणण्यासाठी वसाहतींचा पुरेपूर वापर करणे किंबहुना  मायभूमीची भरभराट हेच वसाहतींचे एकमेव उद्दीष्ट असले पाहिजे असे ब्रिटीशांचे ठाम मत होते. यातून ब्रिटीशांना फायद्याचे ठरतील अशीच धोरणे आणि कायदे तेथे राबविले गेले. त्यांच्या गरजेच्या वस्तु उत्पादन करण्याचे परवाने दिले. कॅलिफोर्नियाने फक्त तिळाचे उत्पादन घ्यायचे तर व्हर्जिनियाने फक्त तंबाखूचे उत्पादन करावे असे बंधन घातले गेले. ब्रिटिश उद्योगधंद्याशी स्पर्धा करतील असे लोखंडी सामान, कपडे इ. उद्योगांना परवानगी नाकारली. आयात निर्यातीबाबतसुद्धा अनेक बंधने घातली गेली. थोडक्यात वसाहतीकडे बघण्याचा ब्रिटनचा दृष्टीकोन हा पूर्णपणे साम्राज्यवादी होता. लोकशाही तत्वाचा उदो उदो करणारे ब्रिटन हे वसाहतीबाबत मात्र खूपच भेदभाव करत होते. आर्थिक फायद्यासाठी त्यांनी वसाहतीवर मजबूत पकड बसविली. या सर्व गोष्टीमुळे वसाहतींचे खूपच आर्थिक नुकसान होऊ लागले. यातूनच वसाहतीतला असंतोष निर्माण होत गेला.

**२) अमेरिकन समाजाची जडणघडण :**

वसाहतींवर जरी ब्रिटनची मालकी असली तरी ब्रिटन बरोबरच युरोपातील विविध राष्ट्रातून विभिन्न वंशाचे लोक तेथे येवून कायमस्वरूपी स्थायिक झाले. मूळ निवासी रेड इंडियन, ब्रिटिश, आयरीश, जर्मन, डच, स्पॅनिश, पोर्तुगीज तसेच शेतात राबण्यासाठी आणलेले निग्रो गुलाम इ. लोकांच्या वर्ण संकरातून नवसमाजाची निर्मिती झाली. सुरुवातीच्या टप्प्यात तेथे आलेल्या लोकांची जन्मभूमी अमेरिका नव्हती पण ती त्यांची कर्मभूमी ठरली. नंतरची पिढी मात्र अमेरिकेत जन्माला आली आणि वाढली ती त्यांची मातृभूमी ठरली. अमेरिकेत स्थलांतरीत झालेले लोक अत्यंत उद्योगी आणि कष्टाळू होते. असंख्य अडचणींना तोंड देत

त्यांनी कमी काळात प्रगती केली होती. नंतरच्या काळात युरोपातील धनिक वर्गही अधिक नफ्याच्या उद्देशाने इकडे आला. त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरणारे राजसत्तेचे किंवा धर्मसत्तेचे वर्चस्व त्यांना नको होते. ब्रिटीशांनी त्यांच्या या भावनेकडे दुर्लक्ष केले होते. वसाहतीतील नवविचारांच्या समाजाला ब्रिटिशांचे अतिरेकी वर्चस्व नको वाटू लागले. त्यांच्या मनातील स्वातंत्र्याची भावना वाढत गेली त्याचेच रुपांतर क्रांतीत झाले.

**३) वसाहतींनी केलेली शैक्षणिक सांस्कृतिक प्रगती :**

आर्थिक प्रगतीबरोबरच वसाहतींनी शैक्षणिक, सांस्कृतिक प्रगती घडवून आणली त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. युरोपप्रमाणे वसाहतीमधील शिक्षणावर धर्माचा पगडा नव्हता. वसाहतींनी प्राथमिक शिक्षण धोरण राबविताना त्याच्या बरोबर सार्वजनिक वाचनालये, ग्रंथालये सुरू केली. मॅसॅच्युसेट्स या वसाहतीमध्ये १६४२ मध्ये सरकारी खर्चाने शिक्षण संस्था सुरु केल्या. छापखान्यामूळे वृत्तपत्रांची सुरुवात झाली. दर्जेदार साहित्य – वाङ्ममय समाजापर्यंत पोहचू लागले. उच्च शिक्षणासाठी हॉवर्ड, कोलंबिया, पेनसिल्व्हानिया यासारखी विद्यापीठे सुरू करण्यात आली. विद्यापीठातून गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, अर्थशास्त्र यासारखे विषय शिकवले जाऊ लागले. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य यासारखी मूल्ये तरुणपिढीत रुजविण्यात या शिक्षणव्यवस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. उत्तम दर्जाचे शिक्षक, वकील, विचारवंत निर्माण झाले. त्यांनी समाजाला बुद्धिवादी बनविण्यात मोठी भूमिका बजावली. नव्या विचारांच्या येथील समाजाला ब्रिटिशांची अतिरेकी बंधने अधिक जाचक वाटू लागली. ही बंधने झुगारून देण्याकडे वाटचाल सुरू झाली. वसाहतींचा सांस्कृतिक आणि नैतिक विकास घडवून आणण्यात येथे स्थलांतरित झालेल्या प्युरीटिन धर्मगुरूंचे योगदान मोठे होते. त्यांनी नव अमेरिकन समाजात नीतिमूल्ये रुजवली. नवा विज्ञानवादी समाज येथे निर्माण झाला.

**४) प्रशासकीय ज्ञान :**

वसाहतींचा विकास होत गेला. त्याचबरोबर तेथील प्रशासन व्यवस्थाही विकसित होत गेली. राज्यकारभार चालविण्यासाठी लोकनियुक्त प्रतिनिधींची प्रतिनिधींची कायदेमंडळे स्थापन केली होती. तर ब्रिटिशांमार्फत प्रत्येक वसाहतीमध्ये गव्हर्नरची नियुक्ती केलेली होती. राज्यकारभाराचे उत्तम ज्ञान वसाहतवाल्यांनी यातून मिळवले होते. वसाहतींची लोकनियुक्त सभा वसाहतीसाठी कायदे करणे, कर आकारणे, वसुली करणे, न्यायालय स्थापन करणे इत्यादी कार्य पार पाडत होती. मॅसॅच्युसेट्स वसाहतीने लोकशाहीचा यशस्वी प्रयोग केला. ब्रिटिश प्रतिनिधी शिवाय आपण राज्यकारभार चालू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झालेला होता. हा आत्मविश्वास वसाहतकारांना राज्यक्रांतीसाठी प्रेरणा देणारा ठरला. ब्रिटिशांतर्फे नेमलेल्या गव्हर्नरने स्थानिक शासन संस्थेचा आदर करत योग्य कारभार करावा असे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात ते साम्राज्यवादी ब्रिटिशांचे प्रतिनिधी बनले. जास्तीत जास्त आर्थिक फायदा मिळविण्यासाठी ब्रिटनने राजकीय सत्तेची पकड घट्ट करत त्यांनी कारभार सुरू केला. जो वसाहतवाल्यांना जाचक वाटू लागला.

**५) सप्तवार्षिक युद्धोत्तर परिस्थिती :**

उत्तर अमेरिका खंडात ब्रिटिश वसाहतींच्या उत्तरेला आणि पश्चिमेला फ्रेंचांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. ब्रिटिश वसाहतींना फ्रेंचाच्या आक्रमणाची सतत भीती वाटत असे. वसाहतींना स्वसंरक्षणासाठी ब्रिटीश सैन्याची आवश्यकता होती आणि त्यामुळेच वसाहती ब्रिटनने घातलेली अनेक अन्यायी राजकीय, आर्थिक बंधनेही निमूटपणे मान्य करत होती. १७५६-१७६३ या काळात ब्रिटन आणि फ्रान्स यांच्यात सप्तवार्षिक युद्ध झाले. यामध्ये ब्रिटनने फ्रान्सचा पराभव केला. या युद्धानंतर झालेल्या पॅरिस करारान्वये ब्रिटिश वसाहतींना लागून असलेला फ्रेंचांचा प्रदेश ब्रिटिशांना मिळाला. फ्रेंचांना आपल्या वसाहती सोडाव्या लागल्या. ब्रिटीश वसाहतीवरचे फ्रेंचांचे दडपण नाहीसे झाले. फ्रेंच आक्रमणाची सतत वाटणारी भीती कायमची दूर झाली. ब्रिटिशांच्या संरक्षणछत्राची त्यांना आता गरज उरली नाही. सप्तवार्षिक युद्धांनंतर वसाहतींच्या पश्चिमेकडील भाग ब्रिटनच्या ताब्यात आला. हा प्रदेश अत्यंत सुपीक होता. वसाहतकारांना येथे विस्तार करण्यास मज्जाव करण्यात आला. यामुळे वसाहतकारांच्यात असंतोष निर्माण झाला. ब्रिटिशांची सर्व धोरणे वसाहतींवर निर्बंध घालणारी होती. या युद्धाच्या वेळी वसाहतीतले तरुण ब्रिटिश सैन्यात भरती झाले होते. त्यांना आधुनिक युद्धतंत्राची माहिती झाली. त्याचा उपयोग पुढे राज्यक्रांतीच्या वेळी झाला. एकूणच सप्तवार्षिक युद्धाचा वसाहतींना दुहेरी फायदा झाला आणि त्यांच्यातील ब्रिटिश विरोध वाढत गेला.

**६) वसाहतींवर निर्बंध घालणारे धोरण :**

वसाहतींमध्ये आलेले लोक वेगवेगळ्या कारणांमुळे स्थलांतरित झाले होते. प्रत्येकाचे हितसंबंध जरी वेगवेगळे असले तरी आर्थिक घटक सर्वांशी निगडीत होता. सर्वांनाच स्वतःची आर्थिक भरभराट करून घ्यायची होती. त्यासाठी कष्ट घेण्याची त्यांची तयारी होती परंतु ब्रिटीशांनी अनेक निर्बंध घातले त्यामुळे त्यांना ते शक्य झाले नाही. ब्रिटनच्या गरजेच्या वस्तु उत्पादन करणार्यांना सहाय्य करणे, ब्रिटिश उत्पादित मालाशी स्पर्धा करणाऱ्या अमेरिकन मालावर जबर आयात कर बसविणे, अमेरिकन मालाची ने आण करण्यासाठी केवळ ब्रिटिश जहाजांचाच वापर करणे असे अनेक निर्णय वसाहतींवर लादण्यात आले. यामध्ये ब्रिटिश मालाची मक्तेदारी राहील याची पुरेपूर काळजी त्यांनी घेतली. वसाहती या ब्रिटीशांच्या व्यापारी स्पर्धक बनू नयेत तसेच फ्रान्स आणि इतर युरोपियन राष्ट्रांना वसाहतींचा फायदा मिळू नये या दृष्टीनेही ब्रिटीशांनी पावले उचलली. यातूनच त्यांनी वसाहतींचे नियमन करण्यासाठी विविध कायदे केले. प्रगती करू इच्छिणार्या वसाहतीतील अनेकांसाठी ब्रिटीशांनी घातलेले निर्बंध अडथळा ठरत होते. यामुळे त्यांच्यातील असंतोष वाढत गेला.

**७) लोकशाही विचारांचा वारसा :**

वसाहतीतले बरेच लोक हे मुळचे ब्रिटनचे रहिवासी होते. ब्रिटनला लोकशाहीची जननी मानले जात होते. मॅग्नाकार्टा, पिटिशन ऑफ राईट्स, बिल ऑफ राईट्स इ. लोकशाहीचे मूलभूत हक्क त्यांनी संघर्ष करून मिळविले होते. १६८९ मध्ये हुकूमशहा राजा दुसरा जेम्स याला तेथील जनतेने सत्तेवरून खाली खेचले आणि पार्लमेंटचे महत्व अबाधित ठेवले होते. ब्रिटिश लोकांप्रमाणेच लोकशाही तत्वांबद्दल वसाहतकारांच्यात प्रचंड

आदर होता. त्यामुळे त्यांनी लोकशाही प्रशासन व्यवस्था स्वीकारली होती. वसाहतीतले लोक आपल्या हक्काबाबत जागरूक होते. नव्या पिढीने लॉक, रुसो सारख्या अनेक विचारवंतांच्या ग्रंथाचे वाचन केले होते. त्यामुळे ब्रिटनकडून वसाहतींची होणारी गळचेपी त्यांना नको वाटू लागली. पार्लमेंटमध्ये आमचे प्रतिनिधी नाहीत तर त्यांना आमच्यासाठी कायदे करण्याचा अधिकार नाही असा विचार यातूनच पुढे आला. स्वातंत्र्य मिळविण्याकडे वसाहतींची वाटचाल सुरू झाली.

**८) वसाहतीवर आर्थिक निर्बंध घालणारे कायदे :**

व्यापारवादी ब्रिटीशांनी वसाहतींचे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी प्रचंड शोषण केले. यासाठी विविध कायदे त्यांनी वसाहतींवर लादले. १६२१ मध्ये वसाहतींना भरपूर आर्थिक फायदा देणाऱ्या व्हर्जिनियातील तंबाखूच्या खाजगी उत्पादनावर बंदी घालणारा कायदा पास केला. १६५१ मध्ये ऑलिव्हर क्रॉमवेलने 'नौकानयनाचे कायदे' (Navigation Act) पास केला. या ॲक्टनुसार वसाहतीतून निर्यात केला जाणारा माल ब्रिटीशांच्या मालकीच्या जहाजातून पाठवणे बंधनकारक केले. यामुळे डचांची या वाहतुकीवर असलेली मक्तेदारी संपुष्टात आली. १६६० मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने कायदा करून वसाहतीतून निर्यात होणार्या साखर, कापूस, लोकर, नीळ अशा अनेक वस्तूंवर बंधने घातली. बोर्ड ऑफ ट्रेड ॲन्ड प्लॅटेशन (Board of Trade and Plantation) नावाचे व्यापारी मंडळ स्थापन करून वसाहतीतील व्यापारावर लक्ष ठेवायला सुरवात केली. ब्रिटनने १६७४ मध्ये लॉर्डस ऑफ ट्रेड (Lords of Trade) समिती स्थापन केली. या समिती मार्फत वसाहतींचा राज्यकारभार अधिक कार्यक्षम करणे, वसाहतीच्या आयात-निर्यात व्यवहारावर बंधन ठेवणे, वसाहतीच्या गव्हर्नरला आदेश देणे अशी कामे केली जाऊ लागली. या समितीचा वसाहतीतल्या कारभारातला हस्तक्षेप तेथील लोकांना त्रासदायक वाटू लागला.

ब्रिटनमध्ये उत्पादित होणाऱ्या लोकरी कापडाच्या उत्पादनास अमेरिकेत उत्पादित होणाऱ्या लोकरी कपड्याशी स्पर्धा करावी लागू नये म्हणून १६९९ मध्ये वुलन गुड्स मॅन्युफक्चरर रिस्ट्रीक्शन ॲक्ट (Woolen Goods Manufacturer Restriction Act) पास केला. वसाहतींवर गरजेपुरतेच लोकरी कापड उत्पादित करण्याचे बंधन घातले गेले. १७३२ मध्ये हॅट्स ॲक्ट (Hats Act) द्वारे वसाहतीतील जनतेने इंग्लंडमध्ये उत्पादित होणाऱ्या हॅटचाच वापर करावा असा आदेश दिला. खरे तर अमेरिकेत बिव्हर या प्राण्याच्या कातड्यापासून हॅट तयार करण्याचा उद्योग विकसित होऊन खूप फायदाही मिळत होता पण केवळ स्वतःच्या फायद्याचा विचार करणाऱ्या ब्रिटीशांची जास्तीत जास्त लाभ मिळविण्याची वृत्ती वाढत होती. विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर यात भरच पडली.

१७६४ च्या शुगर ॲक्टने वसाहतीतील ब्रिटीश विरोधातील भावना अधिकच वाढली. या ॲक्टमुळे वसाहतीना जवळच्याच क्युबा बेटात तयार होणारी साखर थेट विकत घेता येत नव्हती. ब्रिटिशांमार्फतच विकत घ्यावी लागे. त्यामुळे साखर महाग झाली होती. याशिवाय ब्रिटीशांना १७६३ च्या सप्तवार्षिक युद्धात आलेला अफाट खर्च वसूल करण्यासाठी त्यांनी आणखी निर्बंध वाढवले. विदेशी दारू, रेशीम आणि

कापडावरचा कर वाढविण्यात आला. कातड्याची निर्यात केवळ ब्रिटीशांनाच करण्याचे बंधन घालण्यात आले. या सर्व गोष्टीमुळे वसाहतींचे खूप आर्थिक नुकसान होत असे.

वसाहतींनी या सर्वांचा निषेध केला मात्र याकडे दुर्लक्ष करत १७६५ मध्ये 'स्टँप अॅक्ट' (Stamp Act) पास केला. या अॅक्टनंतर वसाहती ब्रिटीशांविरोधात प्रत्यक्ष कृती करू लागल्या. स्टँम्प अॅक्टनुसार वसाहतीतील वृतपत्रे, विविध प्रकारची करारपत्रे, परवाने, परीक्षांची गुणपत्रके खरेदी विक्रीची कागदपत्रे इ. कागदपत्रावर अर्ध्या पेनी पासून दहा पौंडापर्यंतचे स्टँप लावणे बंधनकारक करण्यात आले. सामान्य लोकांनाही याची आर्थिक झळ बसू लागली. वसाहतीतील अर्थव्यवहारांवर याचा वाईट परिणाम झाला. वसाहतीतील लोकांनी याला कडाडून विरोध केला. सर्वच वसाहतीत आंदोलने होऊ लागली. व्यापार्यांनी ब्रिटीश मालावर बहिष्कार टाकला. न्यूयॉर्क येथे सर्व वसाहतींची परिषद बोलावण्यात आली. या परिषदेत हा जाचक स्टँप अॅक्ट न भरण्याचा निर्णय घेण्यात आला. व्हर्जिनिया विधानसभेत पेट्रिक हेन्रीने घोषित केले की वसाहतींनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी शिवाय इतर कोणालाही कर बसविण्याचा अधिकार नाही. वाढता विरोध पाहून अखेरीस ब्रिटीश पार्लमेंटने हा अॅक्ट रद्द केला. अशाप्रकारे क्रांतीसाठीचे वातावरण यावेळी तयार झाले.

या प्रसंगातून काहीच बोध न घेता १७६७ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने **'टाऊनशेंड अॅक्ट'** (Townshend Act) पास केला. ब्रिटनचा अर्थमंत्री चार्लस टाऊनशेड याने या कायद्याद्वारे वसाहतीवर अप्रत्यक्ष करांचा बोजा टाकला. वसाहतीत आयात होणाऱ्या अनेक वस्तूवर जबर जकात बसवली. जकातीच्या वसुलीसाठी जकात खात्याची पुनर्रचना करण्यात आली. या विरोधात वसाहतीत उठाव होऊ लागले. पुढे १७६९ मध्ये हा कायदा रद्द करण्यात आला असला तरी वसाहतीतील वातावरण मात्र प्रक्षुब्ध झाले.

**९) अमेरिकन वसाहती आणि ब्रिटनमधील अंतर :**

हे भौगोलिक कारणही क्रांतीस पोषक ठरले. ब्रिटन आणि अमेरिकन वसाहतीमध्ये सुमारे ३००० मैलाचे अंतर होते. या काळात जलवाहतुक हे एकच संपर्काचे माध्यम होते. वसाहतींवर कडक नियंत्रण ठेवणे ब्रिटीशांना शक्य होत नसे. गव्हर्नरला वसाहतींबरोबर मिळते जुळते घ्यावे लागे. या भौगोलिक परिस्थितीचा फायदा हा अमेरिकन वसाहतींना झाला.

**१०) विचारवंतांचे कार्य :**

महत्वाच्या जागतिक क्रांत्यांचा आढावा घेतला तर त्यामागे विचारवंतांनी प्रमुख भूमिका पार पडलेली दिसते. लोकांच्या मनात क्रांतीची बीजे पेरण्याचे कार्य त्यांनी केले. अमेरिकन वसाहतीमध्ये राष्ट्रवादी विचार पेरण्याचे कार्यही विचारवंतांनी केले. थॉमस पेनने लिहीलेल्या 'कॉमन सेन्स या ग्रंथाच्या लाखो प्रती वसाहतीमध्ये खपल्या. स्वातंत्र्य संकल्पना खूप लोकप्रिय बनली. सॅम्युल अॅड्म्सने प्रक्षोभक लेखन करत वसाहतकारांना चेतवण्याचे काम केले. जेफरसनने अन्यायी सत्तेविरुद्ध सशस्त्र उठावाचे समर्थन केले. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आमचे प्रतिंनिधी नाहीत तर कर ही नाही 'ना प्रतिंनिधी ना कर' ही घोषणा अत्यंत लोकप्रिय

झाली. बेंजामिन फ्रँकलिनने १७५४ मध्ये अमेरिकन राज्याची कल्पना मांडत वसाहतवादी ब्रिटीशांना धक्का दिला होता. एकूणच तत्ववेत्ते विचारवंतांनी वसाहतीतल्या लोकांच्या मनात क्रांतीची ज्योत प्रज्वलित केली. अमेरिकन वसाहतींची क्रांतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

१) दक्षिण अमेरिका हा .........अमेरिका म्हणूनही ओळखला जाऊ लागला.

अ) लॅटीन ब) इंग्लिश क) स्पॅनिश ड) कांगो

२) कोलंबस सर्वप्रथम ........... या बेटावर पोहोचला.

अ) लक्षद्वीप ब) ईस्ट इंडिज क) फिलिपाईन्स ड) बहामा

३) कोलंबसने ...........येथे वसाहत स्थापना केली.

अ) क्युबा ब) जॉर्जिया क) कोलंबिया ड) हिसपनिपोलात

४) ही ब्रिटिशांची अमेरिकन खंडात स्थापन झालेली शेवटची वसाहत होय.

अ) जॉर्जिया ब) डेलावेअर क) मॅसॅच्युसेटस ड) व्हर्जिनिया

५) सप्तवार्षिक युद्ध ब्रिटन व.......... यांच्यात झाले.

अ) फ्रान्स ब) स्पेन क) रशिया ड) पोर्तुगाल

६) कॉमन सेन्स या ग्रंथाचे लेखन.......... यांनी केले.

अ) जॉन लॉक ब) जॉर्ज वॉशिंग्टन क) मिल्टन ड) थॉमस पेन

७) .......... या कारणामुळे वसाहतींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला.

अ) स्टॅम्प ॲक्ट ब) टाऊन ॲक्ट क) टी ॲक्ट ड) रेग्युलेटिंग ॲक्ट

८) अमेरिका खंडातील मूळ रहिवाशांना........... असे म्हटले जाऊ लागले.

अ) रेड इंडियन ब) इंडियन क) मंगोलियन ड) अमेरिकन

९) ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली एकूण ........... वसाहती अमेरिका खंडात स्थापन झाल्या.

अ) ११ ब) १२ क) १३ ड) १४

१०) बेंजामिन फ्रॅंकलीनने १७५४ मध्ये ........ राज्याची कल्पना मांडली.

अ) संयुक्त ब) स्वतंत्र क) अमेरिकन ड) ब्रिटीश

### १.२.२ ब) राज्यक्रांती काळातील महत्त्वाच्या घटना :

वसाहती या मातृभूमीच्या कल्याणासाठीच असतात हा विचार मानणाऱ्या ब्रिटीशांनी वसाहतींचे विविध मार्गांनी आर्थिक शोषण केले. विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर हे प्रमाण वाढतच गेले. ब्रिटनच्या या धोरणाविरुद्धचा वसाहतीतील असंतोष वाढत गेला आणि अखेरीस त्याचे रुपांतर सशस्त्र राज्यक्रांतीत झाले. या क्रांतीतील महत्वाच्या घटना पुढीलप्रमाणे–

**१. स्टँप ॲक्ट विरोधात परिषद :**

१७६५ मध्ये ब्रिटीशांनी पास केलेल्या स्टँप ॲक्ट विरोधात सर्वच वसाहतीत असंतोष उसळला. व्हर्जिनियातील पॅट्रीक हेन्रीने या ॲक्टचा निषेध करत वसाहतीतील लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीशिवाय कोणालाही कर लादण्याचा अधिकार नाही हे जाहीर केले. मॅसॅच्युसेट्स वसाहतीने पुढाकार घेवून या ॲक्ट विरोधात वसाहतीची परिषद १७६५ मध्ये आयोजित केली. ज्याला नऊ वसाहतीचे प्रतिनिधी हजर होते. वसाहती यानिमित्ताने एकत्र आल्या. सर्वजण अमेरिकन आहोत ही भूमिका मान्य झाली. ब्रिटीशांनी वसाहतीच्या संमतीशिवाय कोणतेही कर लादू नयेत हा ठराव पास करण्यात आला. वसाहती आणि ब्रिटीशांच्यातील संघर्ष तीव्र होत गेला. वाढता विरोध पाहून अखेरीस ब्रिटीशांनी हा कर १७६६ मध्ये रद्द केला.

**२. ना प्रतिनिधी ना कर :**

ब्रिटीश पार्लमेंटमध्ये वसाहतींचा एकही प्रतिनिधी नाही तेंव्हा त्यांना वसाहतीवर कर लादण्याचा नैसर्गिक किंवा नैतिक अधिकार नाही. 'ना प्रतिनिधी ना कर' (No Taxation Without Representation) अशी घोषणा वसाहतींनी केली. 'Sons of Liberty and Daughters of Liberty' नावाची वसाहतीतील तरूण तरुणींची लढाऊ पथके स्थापन झाली. त्यांनी ब्रिटीशांना सशस्त्र विरोध सुरू केला.

**३. बोस्टन टी पार्टी :**

मॅसॅच्युसेट्स वसाहतीतील बोस्टन हे बंदर ब्रिटीश विरोधी आंदोलनाचे प्रमुख केंद्र बनले. ब्रिटीशांनी स्टँप ॲक्ट रद्द केला मात्र १७६७ मध्ये टाऊनशेड ॲक्टनुसार वसाहतीत आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर प्रचंड कर बसविला. तर टी ॲक्ट लादून वसाहतींनी ब्रिटिशांकडून चहा खरेदीची सक्ती केली. वातावरण पुन्हा प्रक्षुब्ध बनले. बोस्टन येथे जकात समितीची स्थापना केली. सॅम्युअल ॲडम्ससारख्या कट्टर राष्ट्रवादी नेत्यांनी आंदोलने सुरू केली. त्याच्या प्रक्षोभक भाषणामुळे लोक आणखी चिडले. बहिष्कार आंदोलन सुरू झाले. हे आंदोलन वाढत गेले. ५ मार्च १७७० रोजी बोस्टन येथे आंदोलक आणि ब्रिटीश सैनिक यांच्यात चकमक झाली. यामध्ये चार नागरिक मारले गेले. या घटनेचे वर्णन 'बोस्टनचे हत्याकांड' असे केले जाऊ लागले. ब्रिटीश विरोध खूप वाढला. अखेरीस १७७० मध्ये चहा व्यतिरिक्त इतर पदार्थावरची जकात रद्द केली. मात्र वसाहतकारांचा त्यालाही विरोध होता. १७७० ते १७७२ हा काळ काहीसा शांततेत गेला नंतर पुन्हा संघर्षास सुरुवात झाली.

१७७३ मध्ये ब्रिटीश पार्लमेंटने टी ॲक्टची अंमलबजावणी सुरू केली. ईस्ट इंडिया कंपनीस वसाहतीत चहा विकण्याची मक्तेदारी मिळाली. अमेरिकेतील कट्टर नेत्यांनी चहावर बहिष्काराचे आवाहन केले. ईस्ट इंडिया कंपनीची चहा घेवून आलेली जहाजे बोस्टन बंदरात नांगरली गेली होती. त्याच्यावरचा माल बंदरात उतरवला जाणार आहे अशी बातमी वसाहतवाल्यांना कळली. १९ डिसेंबर १७७३ रोजी सॅम्युअल ॲडम्स आणि त्याचे सहकारी रेड इंडियन्सचा वेश धारण करून या जहाजावर चढले आणि त्यांनी जहाजावरील चहाच्या ३४२ पेट्या समुद्रात फेकल्या. ही घटना अमेरिकेच्या इतिहासात 'बोस्टन टी पार्टी' (बोस्टन चहा

पार्टी) या नावाने प्रसिद्ध झाली. या घटनेनंतर ब्रिटीश अधिकच संतापले. ब्रिटीश सत्तेविरुद्ध केलेली ही बंडखोरी आहे असे जाहीर करून वसाहतवाल्यांना वठणीवर आणण्यासाठी आणखी कायदे पास केले. बोस्टन बंदरातील व्यापार बंद करून मॅसॅच्युसेट्स वसाहतीत नवीन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जनरल गेज याला सैन्यासह पाठविण्यात आले. वसाहती विरुद्ध ब्रिटीश यांच्यातील संघर्षाने उग्र रूप धारण केले.

बोस्टन टी पार्टी प्रकरणातील गुन्हेगारांवरील खटले ब्रिटनमध्ये चालविले जावेत यासाठी ब्रिटीशांनी ठराव केले. कडक धोरणांमुळे वसाहती दबतील असा ब्रिटीशांचा अंदाज पूर्णपणे फोल ठरला. उलट इतर वसाहतींनी मॅसॅच्युसेट्सला पाठिंबा देत एकत्र येऊन परिषदेचे आयोजन केले.

**४. पहिली फिलाडेल्फिया परिषद (५ सप्टेंबर १७७४)**

निर्माण झालेल्या परिस्थितीवर विचार करण्यासाठी व्हर्जिनिया वसाहतीने पुढाकार घेवून फिलाडेल्फिया येथे परिषदेचे आयोजन केले. जॉर्जिया वगळून इतर बारा वसाहतींचे प्रतिनिधी हजर होते. बेंजामिन फ्रॅंकलीन हा या परिषदेचा अध्यक्ष होता. या परिषदेस 'कॉन्टिनेन्टल काँग्रेस' (Continental Congress ) असे नाव दिले गेले यावेळी ब्रिटनच्या राजाकडे साम्राज्यातंर्गत स्वायत्ततेची मागणी करण्यात आली. अन्यायी कायदे रद्द करावेत अन्यथा बहिष्कार आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. वसाहतीच्या आंदोलनास मार्गदर्शन करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. वसाहती आणि ब्रिटीश यांच्यात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न बेंजामिन फ्रॅंकलीन, एडमंड फ्रॅंक इ. नी केला मात्र त्यास यश आले नाही. ब्रिटनचा राजा तिसरा जॉर्जने आक्रमक धोरण स्वीकारले. वसाहती या ब्रिटीश अधिसतेच्या अंकित आहेत, त्यांची बंडखोरी सहज दडपता येईल असे त्याला वाटत होते. त्याने वसाहतीत ब्रिटीश फौजा पाठविण्याचे आदेश दिले. वसाहतीनीही स्वसंरक्षणासाठी क्रांतीकारकांची सशस्त्र दले उभारायला सुरूवात केली.

**५. लेक्झिंग्टनची चकमक आणि स्वातंत्र्य युद्धाची सुरवात :**

कंकार्ड शहरात क्रांतिकारकांनी लष्करी शस्त्रास्त्राचा साठा केला आहे अशी बातमी ब्रिटीश सेनानी थॉमस गेजला समजली. त्याने लगेचच आपली एक लष्करी तुकडी पाठवली. मात्र वाटेत लेक्झिंग्टन नावाच्या एका खेडेगावाजवळ १९ एप्रिल १७७५ मध्ये ब्रिटीश सैन्य आणि क्रांतीकारकांच्यात चकमक होऊन आठ क्रांतीकारक मारले गेले. हीच राज्यक्रांतीची सुरवात ठरली. क्रांतिकारकांनी याला प्रत्युत्तर देत गेजच्या अडीचशे सैनिकांना ठार मारले.

**६. दुसरी फिलाडेल्फिया परिषद/कॉन्टिनेन्टल काँग्रेस (८ मे १७७५) :**

प्रत्यक्ष चकमकीना सुरवात झाल्यावर पुढचा कार्यक्रम ठरविण्यासाठी दुसरी फिलाडेल्फिया परिषद बोलविण्यात आली. जॉन हॅन्कॉक हा श्रीमंत उद्योजक या परिषदेचा अध्यक्ष होता. जॉर्ज वॉशिंग्टनकडे वसाहतीच्या सैन्याचे नेतृत्व अधिकृतरित्या सोपविण्यात आले. त्याने पुन्हा एकदा ब्रिटनच्या राजाकडे अर्ज पाठवून शांततेने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु राजाने याला प्रतिसाद दिला नाही आणि वसाहती ब्रिटन विरोधात बंडखोरी करताहेत असे २२ डिसेंबर १७७५ रोजी जाहीर करून बंडाळी मोडून काढण्याचे आदेश दिले. या परिषदेच्या वेळी वसाहतीच्यावतीने कामकाज पाहण्याचा अधिकार कॉन्टिनेन्टल काँग्रेसला

देण्यात आला. पुढे १७८९ पर्यंत या काँग्रेसने सर्व वसाहतींच्या वतीने कामकाज पाहीले. प्रत्यक्ष युद्धाच्या दृष्टीने अनेक महत्वाचे निर्णय या परिषदेत घेण्यात आले.

**७. अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा :**

फिलाडेल्फिया परिषदेत वसाहतींनी ब्रिटिशां विरोधातील लढ्यास मान्यता दिली. व्हर्जिनीयाच्या रिचर्ड हेन्री ली याने ७ जून १७७६ रोजी वसाहतीच्या स्वातंत्र्याचा प्रस्ताव मांडला. याचवेळी वसाहतींच्या स्वातंत्र्यलढ्यास नैतिक बळ देणाऱ्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार करण्यासाठी थॉमस जेफरसनच्या नेतृत्वाखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. बेंजामिन फ्रॅंकलीन, रॉबर्ट लिव्हिंगस्टन, जॉन अ‍ॅडम्स आणि रॉजर शेरमन हे या समितीचे सदस्य होते. स्वातंत्र्यप्राप्ती हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेल्या या जाहीरनाम्याच्या अंतिम मसुद्यास कॉन्टिनेन्टल काँग्रेसने मान्यता दिली. हा जाहीरनामा इतिहासात 'अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा' (Declaration of Independence) या नावाने प्रसिद्ध झाला. ४ जुलै १७७६ रोजी थॉमस जेफरसनने तो सादर केला. हा दिवसअमेरिकेचा स्वातंत्र्यदिन ठरला. या जाहीरनाम्यामुळेच वसाहतींच्या लढ्यास असलेले बंडाचे स्वरूप नाहीसे करून त्याला स्वातंत्र्य युद्धाचे स्वरूप प्राप्त करून दिले. मानवी स्वातंत्र्याची ही सनद ठरली. यात 'निसर्गतः मानव स्वतंत्र असून मुक्त आहे. सर्व मानव जन्मतः समान असून प्रत्यक्ष विधात्यानेच सर्वांना स्वातंत्र्य व सुख संपादन करण्याचा हक्क दिला आहे. या हक्काच्या संरक्षणासाठी प्रजा शासनसंस्था निर्माण करत असते. जेंव्हा ही शासन संस्था प्रजेचे मुलभूत हक्क डावलते तेंव्हा ती बदलण्याचा, बरखास्त करण्याचा आणि नवी शासनसंस्था स्थापन करण्याचा पूर्ण हक्क प्रजेस आहे' असे प्रतिपादित करण्यात आले.

प्रजेचे सार्वभौमत्व अधोरेखित करणाऱ्या या जाहीरनाम्याच्या पहिल्या भागात मानवाच्या निसर्गदत्त अधिकारांची, दुसऱ्या भागात ब्रिटिशांकडून वसाहतीवर केलेल्या अत्याचाराची तर तिसऱ्या भागात शासन व प्रजा यांच्यातील संबंधाची चर्चा केलेली आहे. थॉमस जेफरसनने यात जनतेलाही सांगितले की देशभक्तांचे आणि हुकुमशहांचे रक्तसिंचन केल्याशिवाय स्वातंत्र्याचा वृक्ष टवटवीत रहात नाही. यासाठी वसाहतीतील सर्व जनतेला लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले. या जाहीरनाम्यावर विचारवंत लॉक, रुसो, थॉमस पेन इ. च्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला होता. या जाहीरनाम्याच्या स्वीकृतीमुळे ब्रिटनशी तडजोड अशक्य आहे याची सर्वांनाच जाणीव झाली. वसाहतींना अन्य देशाची मदत मिळणे यामुळे शक्य झाले. अन्यायी राजसत्तेविरुद्धच्या संघर्षात सामान्य लोकांच्या प्रयत्नांना या जाहीरनाम्यामुळे तात्त्विक बैठक मिळवून दिली. अमेरिकेबरोबरच अनेक राष्ट्रांच्या संविधानात मानवाच्या मुलभूत अधिकारांची चर्चा केलेली आहे. त्याचा आधार हा स्वातंत्र्याचा जाहीरनामाच आहे. मानवी इतिहासाला वेगळे वळण देण्याचे कार्य या जाहीरनाम्याने केले.

**८. सैन्य बळ :**

वसाहतवाल्यांना युद्ध जिंकणे इतके सोपे नव्हते कारण सैन्यबळ, आर्थिकबळ, लष्करी साधनसामुग्री, युद्ध शास्त्राचे ज्ञान आणि अनुभव, आरमार या सर्व बाबतीत ब्रिटिश हे वरचढ होते. त्याचबरोबर वसाहतीतले काही लोक हे ब्रिटिश सत्तेबरोबर प्रामाणिक होते. त्यांनी स्वत:चे गट तयार केले होते.

अनेकजण ब्रिटिश सैन्यात भरती झाले होते. मूळ अमेरिकन निवासींना भविष्यात होणार्या अमेरिकन वसाहतींच्या विस्ताराची भीती वाटत होती. त्यामुळे त्यांच्यातील अनेकांनी ब्रिटिश सैन्यास मदत केली. आफ्रिकेतून गुलाम म्हणून आणल्या गेलेल्या अनेक काळ्या लोकांचीही तीच परिस्थिती होती. युद्धांनंतर स्वतंत्र होण्याची लालूच त्यांना दाखवली गेली त्यामुळे अनेकांनी ब्रिटिशसेनेत प्रवेश केला होता. स्वत: ब्रिटीशांना अनेक युद्धांचा शेकडो वर्षाचा अनुभव होता. तुलनेत वसाहतीचे सैन्य नवखे होते. वसाहतीतले काहीजण सप्तवार्षिक युद्धाच्यावेळी ब्रिटिश सेनेत सहभागी झाले होते. त्यांनी त्यावेळी वसाहतींची सेना निर्माण करताना महत्वाची भूमिका बजावली. युद्धाचा कोणताही अनुभव नसलेले सामान्य लोकसुद्धा यामध्ये सहभागी झाले होते.

स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर खऱ्या अर्थाने वसाहतीच्या लढ्यास बळ आले. सुरुवातीच्या काळात ब्रिटिशांचे पारडे जड होते कारण त्यांचे लष्करी बळ अधिक होते. थॉमस गेज हा त्यांचा प्रमुख सेनानी होता. त्याच्या मदतीला उत्तमोत्तम सहायक होते. तुलनेने वसाहतींचे बळ कमी होते. सर्वसामान्य लोकांनीच शस्त्र हाती घेतले होते. वसाहतीच्या सैन्यास जॉर्ज वॉशिंग्टनच्या रूपाने अत्यंत देशभक्त, चारित्र्यवान आणि समतोलबुद्धीचा नेता मिळाला होता. त्याने आपल्या सैन्यात शिस्त आणि जिद्द निर्माण केली.

### ८. अमेरिकन स्त्रियांचे योगदान :

अमेरिकन स्त्रिया या प्रत्यक्ष राजकारणात सक्रिय नव्हत्या मात्र स्वातंत्र्य आंदोलनाच्या एकूण घटनाक्रमात त्यांचे योगदान मोलाचे राहिले. ज्यावेळी अमेरिकन पुरुष स्वातंत्र्य लढ्यासाठी घराबाहेर पडले त्यावेळी स्त्रियांनी घर सांभाळण्याबरोबरच शेती कामे व इतर कामे सांभाळत आर्थिक आघाडी सांभाळण्याचे काम केले. ब्रिटिश वस्तूंवर वसाहतींनी टाकलेला बहिष्कार यशस्वी करण्यात त्यांचा हातभार महत्वाचा होता. अनेक स्त्रियांनी स्वतः वस्त्र विणून त्याचा पुरवठा केला. युद्ध भूमीवर जखमी सैनिकांसाठी नर्सिंगचे काम करणे, आवश्यक गोष्टी पोहचविणे, प्रसंगी गुप्त संदेश पोहोचविणे इ. कार्य पार पाडली. काही स्त्रियांनी सैनिकांसाठी अन्न, पैसा, कपडे इ. गरजेच्या वस्तू गोळा केल्या. थोडक्यात जेंव्हा अमेरिकन पुरुष युद्धावर होते तेंव्हा घरची आणि समाजाची आघाडी सांभाळण्याचे कार्य त्यांनी केले.

### ९. वसाहतीचे स्वातंत्र्ययुद्ध :

ब्रिटीश सैनिक आणि वसाहती यांच्यातील चकमकीना १७७५ पासूनच सुरवात झाली होती. जून १७७५ मध्ये बंकर हिल या भागात झालेल्या संघर्षात ब्रिटीशांचा विजय झाला होता मात्र त्यांना आपले एक हजार चोपन्न सैनिक गमवावे लागले होते. यामुळे ब्रिटीश सेनापती गेजच्या जागेवर जनरल हॉवेची नियुक्ती करण्यात आली होती. इ.स. १७७६ मध्ये वसाहतींच्या सैनिकांना न्यूयॉर्क आणि न्यूजर्सी येथेही माघार घ्यावी लागली. ब्रिटीशांनी प्रसंगी भाडोत्री सैनिक आणले होते. एकूणच सुरुवातीच्या टप्यात वसाहतवाल्यांना ठिकठिकाणी मार खावा लागला. मात्र जॉर्ज वॉशिंग्टन आपल्या सैन्याचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यात यशस्वी झाला.

१७७७ च्या सॅराटोगाच्या लढाईने मात्र युद्धाचे एकूण चित्र पालटले. अमेरिकन सेनानी गेट्स याने जनरल बरगोइनच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश फौजांचा धुव्वा उडवला. त्याला पूर्ण शरणागती पत्करावी लागली. दरम्यान बेंजामिन फ्रँकलीनने फ्रान्सची मदत मिळविण्याचा बराच प्रयत्न केला होता. सॅराटोगाच्या विजयानंतर फ्रान्सने १७७७ मध्ये वसाहतींना मदत करण्याचे मान्य केले. फ्रान्स आणि वसाहती यांच्यात दोन करार होऊन फ्रान्सने वसाहतींच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली आणि त्यांच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. युध्द अधिक व्यापक झाले. सप्तवार्षिक युद्धात झालेल्या पराभवाचे पराभवाचे उट्टे फ्रान्सने अशाप्रकारे काढले. १७७९ मध्ये स्पेनही वसाहतीच्या बाजूने युद्धात उतरले. विशेषतः स्पेनने दिलेली आरमारी मदत वसाहतींना उपयुक्त ठरली. फ्रान्सच्या लाफायत या सेनानीच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य अमेरिकन भूमीत ब्रिटिशां विरोधात लढू लागले तर डेन्मार्क, स्वीडन, रशिया या राष्ट्रांनी सशस्त्र तटस्थतेचे धोरण स्वीकारले. फ्रँकलीनच्या मुत्सद्देगिरीचा हा विजय होता.

युद्धातील निर्णायक लढाया दक्षिणेकडे झाल्या. ब्रिटीश सेनानी क्लिंटन आणि कॉर्नवालीस हे या भागात वसाहती विरुद्ध लढत होते. ऑक्टोबर १७८१ मध्ये यॉर्कटाऊन येथे कॉर्नवालीसला वॉशिंग्टनच्या सैन्याने पूर्णपणे घेरले. अखेरीस १९ ऑक्टोबर १७८१ या दिवशी त्याने आपल्या सेनेसह शरणागती पत्करली. ही बातमी ब्रिटनला पोहोचताच नॉर्थ मंत्रिमंडळाने राजीनामा दिला. यानंतर सत्तेवर आलेल्या व्हिग पक्षाच्या मंत्रीमंडळाने १७८३ मध्ये वसाहतींच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली.

**१०. पॅरीस तह ३ सप्टेंबर १७८३ :**

प्रत्यक्ष युद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटन आणि वसाहती यांच्यात तह होण्यासाठी जवळपास दोन वर्षाचा कालावधी गेला. पॅरीस येथे उभय पक्षात वाटाघाटी झाल्या. तहाच्या वाटाघाटीच्या वेळी बेंजामिन फ्रँकलीन आणि जॉन ॲडम्स यांनी अमेरिकन राष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्यान्वये युद्धाचा अधिकृतरीत्या शेवट झाला आणि ब्रिटीशांनी तेराही वसाहतींचे स्वातंत्र्य मान्य केले शिवाय सप्तवार्षिक युद्धानंतर फ्रान्सकडून मिळालेला प्रदेशही वसाहतींच्या ताब्यात दिला. वसाहती फ्रान्सच्या वर्चस्वाखाली जाऊ नयेत तसेच व्यापारासाठी वसाहतीकडून ब्रिटीशांना अधिक सवलती मिळाव्यात या हेतूने ब्रिटीशांनी यावेळी तह स्वीकारला. ब्रिटीशांनी आपल्या फौजा काढून घेण्याचे मान्य केले. वसाहती यानंतर अधिकृतरित्या स्वतंत्र झाल्या. अटलांटिक महासागरापासून ते मिसिसिपीपर्यंतचा तर उत्तरेस सेंट लॉरेन्स नदीपासून ते फ्लोरिडाच्या उत्तर सीमेपर्यंतचा प्रदेश हा वसाहतींकडे आला तर स्पेनने केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून फ्लोरिडाचा भाग त्यांना दिला गेला. अशारीतीने अमेरिकन वसाहतींच्या नव्या वाटचालीस सुरवात झाली.

नंतर वसाहती एकत्र येऊन अमेरिकेचे संघराज्य अस्तित्वात आले. नवी लिखित राज्यघटना तयार केली गेली. या नव्याने जन्माला आलेल्या राष्ट्राने अध्यक्षीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याकडे संघराज्याचे अध्यक्षपद दिले गेले.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

१) १७७४ मध्ये वसाहतींची पहिली परिषद............ येथे भरली.

अ) फिलाडेल्फिया ब) वॉशिंग्टन क) डेलावेअर ड) न्यूयॉर्क

२) पहिल्या फिलाडेल्फिया परिषदेचे अध्यक्षपद............ यांनी भूषविले.

अ) जॉर्ज वॉशिंग्टन ब) बेंजामिन फ्रँकलिन

क) थॉमस पेन ड) तिसरा जॉर्ज

३) अमेरिकन क्रांतीच्या वेळी ..........हा ब्रिटनचा राजा होता.

अ) प्रिन्स चार्ल्स ब) लुई फिलिप क) आठवा हेन्नरी ड) तिसरा जॉर्ज

४) ..........या बंदराच्या ठिकाणी अमेरिकन क्रांतिकारकांनी ब्रिटिश जहाजातील चहा समुद्रात ओतला.

अ) प्लायमाऊथ ब) हयुस्ट क) बोस्टन ड) न्यूयॉर्क

५) अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनामा .......... साली घोषित करण्यात आला.

अ) १७७५ ब) १७८९ क) १७७९ ड) १७७६

६) .......... च्या तहाने ब्रिटनने वसाहतींच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.

अ) पॅरिस ब) वॉशिंग्टन क) बोस्टन ड) न्यूयॉर्क

७) स्वातंत्र्यानंतर अमेरिकेच्या अध्यक्षपदी......... यांची नियुक्ती झाली.

अ) रिचर्ड ली ब) थॉमस पेन क) जॉर्ज वॉशिंग्टन ड) तिसरा जॉर्ज

८) स्वातंत्र्यानंतर अमेरिकेने ........शासन पद्धतीचा स्वीकार केला.

अ) नियंत्रित राजेशाही ब) लोकशाही क) साम्यवादी ड) समाजवादी

९) अमेरिकेचा स्वातंत्र्य दिन.............. या दिवशी साजरा केला जातो.

अ) ४ जुलै ब) १४ जुलै क) २४ जुलै ड) ३१ जुलै

१०) अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा ............ ने सादर केला.

अ) जॉर्ज वॉशिंग्टन ब) रुसो क) थॉमस पेन ड) थॉमस जेफरसन

**वसाहतींच्या विजयाची आणि ब्रिटीशांच्या पराभवाची कारणे :**

ब्रिटन हे त्यावेळचे राजकीय आणि लष्करीदृष्ट्या एक बलाढ्य राष्ट्र होते. नवख्या अमेरिकन वसाहतींनी ब्रिटनचा पराभव करणे ही त्या काळातील राजकीयदृष्ट्या सर्वात आश्चर्यकारक गोष्ट ठरली. त्यामागची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. भौगोलिक परिस्थिती :**

ब्रिटन आणि अमेरिकन वसाहतीत जवळपास तीन हजार मैलाचे अंतर आहे. याकाळात दळणवळणासाठी केवळ जलमार्गच उपलब्ध होता. अशा या अधिक अंतरावरून युद्ध साहित्य, अन्नधान्याचा पुरवठा करणे आणि युद्ध नियंत्रण करणे ही तशी कठीण गोष्ट होती. ब्रिटीशांचे सैन्य हे अनोळखी प्रदेशात जाऊन लढत होते तर वसाहतींचे सैन्य त्यांच्याच प्रदेशात लढत होते. त्यांना स्वतःच्या भौगोलिक परिस्थितीची संपूर्ण माहिती असल्याने सैन्य संख्येने कमी असूनही वेगवान हालचाली करत प्रसंगी गनिमी युद्धाचा वापर करत त्यांनी ब्रिटीश सैन्यास अनेक आघाड्यांवर त्यांनी पराभूत केले.

**२. अमेरिकनांनी स्वीकारलेले युद्धतंत्र :**

वसाहतीच्या सैन्यास स्वतःच्या भौगोलिक वैशिष्ट्यांची माहिती होती. डोंगरदऱ्यात लपून शत्रूवर अचानक आक्रमण करण्याच्या गनिमी काव्याच्या तंत्राचा अत्यंत परिणामकारक वापर अमेरिकन सैन्याने केला. या तंत्राचा वेगवेगळ्या आघाड्यांवर वापर केला. झटपट हालचाली करत त्यांनी ब्रिटिशांना खूप दमवले. याला तोंड देणे ब्रिटीश सैन्याला अवघड गेले.

**३. स्वातंत्र्यासाठी वसाहतींची तीव्र आकांक्षा :**

युरोपातून वसाहतीत स्थलांतरीत झालेले लोक स्वस्वातंत्र्यावर प्रेम करणारे होते. ब्रिटीशांची वाढत चाललेली बंधने अधिक काळ सहन करणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळेच वसाहतीतील सामान्य लोकही ब्रिटिशांविरोधी लढ्यात सहभागी झाले. वसाहती स्वातंत्र्याच्या उदात्त हेतूने आणि सर्व शक्तीनिशी लढत होत्या तर ब्रिटीश अत्यंत संकुचित भावनेने लढत होते. त्यामुळे वसाहतींना विजय मिळविता आला.

**४) जॉर्ज वॉशिंग्टनचे खंबीर नेतृत्व :**

वॉशिग्टनच्या रूपाने वसाहतीच्या सैन्याला अगदी योग्य आणि खंबीर नेतृत्व मिळाले. देशभक्त – निस्वार्थी – समतोल बुद्धीच्या या नेत्याने आपल्या संख्येने अपुऱ्या आणि अप्रशिक्षित सैन्याच्या सहायाने ब्रिटीश सैन्याला तोंड दिले. काही वेळा त्यांचा पराभव झाला मात्र त्याने आपल्या सैन्याचे मनोधैर्य खचू दिले नाही. प्रसंगी माघार घेत अचानक हल्ला करणे, गनिमी काव्याचा वापर करणे अशा युद्ध तंत्राचा वापर चांगल्या रीतीने केला. याउलट ब्रिटीश सेनापती थॉमस गेज, कॉर्नवालीस इतकी प्रभावी कामगिरी करू शकले नाहीत.

**५. युरोपियन राष्ट्राकडून मिळालेली मदत :**

वसाहतीच्या लढ्यास काही युरोपियन राष्ट्रांनीही मदत केली त्यामुळे वसाहतींच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. फ्रान्सने १७७८ मध्ये लष्करी आणि आरमारी मदत केली. स्पेननेही वसाहतींना आरमारी मदत केली. यामुळे ब्रिटीशांच्या आरमाराला रोखणे, त्यांचे युद्ध साहित्य ब्रिटीश सैन्यापर्यंत पोहचू न देणे इ. गोष्टी करता आल्या. डेन्मार्क, स्वीडन, रशिया यांनी तटस्थेचे धोरण स्वीकारत वसाहतींना अप्रत्यक्षपणे मदतच

केली. थोडक्यात वसाहतींना जागतिक पातळीवर स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रत्यक्ष मदत आणि नैतिक पाठिंबा मिळाला.

**५. विचारवंताचे कार्य :**

थॉमस पेन, थॉमस जेफरसन, बेंजामिन फ्रँकलिन, सॅम्युअल ॲडम्स, जॉर्ज वॉशिंग्टन इ. नेत्यांनी – विचारवंतानी वसाहतीतल्या लोकांना स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले. वसाहतीतल्या असंतोषाचे रूपांतर त्यांनी क्रांतीमध्ये केले. त्यांच्यामुळे वसाहतीतील व्यापारी, शेतकरी, व्यावसायीक, कामगार अशा सर्व थरातले लोक ब्रिटिशांविरुद्धच्या लढ्यात सहभागी झाले आणि ते स्वातंत्र्याच्या उद्दिष्टाने लढले. त्यामुळे वसाहती विजयापर्यंत पोहोचल्या याउलट ब्रिटीशांच्या साम्राज्यवादावर खुद्द त्याच्याच देशातून टीका झाली.

## १.२.३ क) अमेरिकन राज्यक्रांतीचे परिणाम :

अमेरिकन राज्यक्रांतीने नव्या राष्ट्रास जन्म दिला तर ब्रिटीशांना त्यांच्या साम्राज्याचा मोठा भाग गमवावा लागला. या राज्यक्रांतीचे परिणाम अमेरिकन वसाहती व ब्रिटनबरोबर इतर राष्ट्रांवरही झाले. हे परिणाम केवळ राजकीयच नव्हते तर आर्थिक, सामाजिक आणि तात्विकही होते.

**१. स्वतंत्र राष्ट्र म्हणून अमेरिकेचा (USA) उदय :**

राज्यक्रांतीनंतर सर्व तेरा वसाहती एकत्र आल्या आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने (United States of America) या स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचा उदय झाला. क्रांतीपूर्व काळातील तेरा वसाहती म्हणजे जणू तेरा स्वतंत्र विचारांची राष्ट्रेच होती. स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने या वसाहती एकत्र आल्या. समान उद्दीष्ट समोर ठेवून त्यांनी लढा दिलाआणि विजय मिळविला. प्रगती करावयाची असेल तर एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव त्यांना झाली. यातूनच एक राष्ट्र जन्माला आले. लिखित राज्यघटना आणि प्रजासत्ताक पद्धती हे या राष्ट्राचे वैशिष्ट्य होते. अल्पावधीत या राष्ट्राने जागतिक राजकारणात आपला प्रभाव निर्माण केला. राज्यक्रांतीमुळे हे होऊ शकले.

**२. प्रादेशिक विस्तार :**

तेरा वसाहती पूर्वेस अटलांटिक समुद्राच्या किनाऱ्यावर स्थित होत्या. पॅरीसच्या तहानंतर पश्चिमेकडे वसाहतींचा विस्तार होत गेला. नव्या सरकारने पश्चिमेकडे वसाहती निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. तेरा वसाहतींच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेल्या या राष्ट्रात पुढे एकावन्न राज्ये निर्माण झाली आणि बलशाली राष्ट्राची निर्मिती झाली.

**३. जगातल्या पहिल्या लिखित राज्यघटनेची निर्मिती आणि लोकशाहीचा प्रत्यक्ष आविष्कार :**

स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात येत असताना सर्व राज्यांना एकत्र बांधणारी लिखित राज्यघटना १७८९ मध्ये अमेरिकेतील विचारवंतानी निर्माण केली. घटनेद्वारे लोकशाही पद्धतीचा अंगीकार अमेरिकेने केला. जगाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले होते. अध्यक्षीय लोकशाही, द्विगृही कायदे मंडळ, सर्वोच्च

न्यायालय, सत्तेचे विकेंद्रीकरण अशा अनेक लोकशाही पूरक गोष्टींची निर्मिती या राज्यघटनेद्वारे अमेरिकेत केली गेली. या राज्यघटनेचा आदर्श जगातील अनेक राष्ट्रांनीही ठेवला आणि लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार करत आपल्या राज्यघटना याप्रमाणे तयार केल्या. भारताच्या राज्यघटनेवर ही या राज्यघटनेचा प्रभाव पडला आहे .

**४. जगभरात अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळींना प्रेरणा :**

मानवी स्वातंत्र्यासाठी अन्यायी राजसत्तेविरुद्ध लढा दिलेल्या अमेरिकन राज्यक्रांतीने जगभरातल्या अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळीना प्रेरणा दिली. विशेषतः १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीवर या राज्यक्रांतीचा खूप प्रभाव पडला. अमेरिकन स्वातंत्र्य सैनिकांना मदत करणाऱ्या लाफाएत या फ्रेंच सेनानीने नंतर अमेरिकन स्वातंत्र्य चळवळीने प्रेरित होऊन फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी खूप महत्वाची भूमिका बजावली. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात वसाहतीच्या बाजूने सहभागी झालेले फ्रेंच सैनिक 'स्वातंत्र्याचा' विचार घेवूनच फ्रान्समध्ये परतले. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांचा प्रसार करणाऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीसमोर अमेरिकन राज्यक्रांतीचाच आदर्श होता. दोन्ही राष्ट्रातील मैत्रीचे प्रतिक म्हणून फ्रान्सने अमेरिकेला स्वातंत्र्य देवतेचा पुतळा (Statue of Liberty) भेट दिला. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात झालेल्या जगभरातील अनेक क्रांत्यावरही या राज्यक्रांतीचा प्रभाव पडला होता.

**५. जगभरात अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र्य चळवळींना प्रेरणा :**

ब्रिटीशांना वसाहती बरोबरच्या लढ्यासाठी प्रचंड खर्च करावा लागला. त्यांच्या राष्ट्रीय कर्जाचे प्रमाण त्यामुळे खूपच वाढले. आर्थिक मंदीचा त्यांना सामना करावा लागला. ब्रिटनच्या युरोपमधील शत्रूंनी परिस्थितीचा फायदा घेत त्यांच्या नाविक दलावर त्याचप्रमाणे व्यापारी जहाजावरही हल्ले केले. अनेक व्यापारी जहाजे शत्रूंच्या ताब्यात गेली यामुळे ब्रिटीशांच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम झाला.

**६. अमेरिकेची आर्थिक प्रगती :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अमेरिकेची वेगाने आर्थिक प्रगती झाली. शेती, व्यापार व उद्योगधंदे या सर्वच क्षेत्रात विकास झाला झाला. पश्चिमेकडे भौगोलिक विस्तार होऊन सुपीक भूमी, संसाधन मुबलक प्रमाणात मिळाली. ब्रिटीशांच्या जाचक आर्थिक निर्बंधनातून सुटका झाल्यामुळे व्यापार आणि उद्योगधंदा विस्तारत गेला. अमेरिकन मालाची मागणी वाढली. आर्थिक महासत्ता बनण्याकडे अमेरिकेची वाटचाल सुरू झाली. अमेरिकन वसाहतीमधील बंदरे जागतिक व्यापारासाठी खुली झाली. आयात निर्यातीचे प्रमाण वाढत गेले. अनेक खाजगी कंपन्यांनी जहाज वाहतुकीस चालना दिली. यामुळे आर्थिक उलाढाली वाढल्या.

**७. ब्रिटनच्या वसाहतविषयक धोरणात बदल :**

अमेरिकन वसाहतीतून ब्रिटिशांना खूप आर्थिक फायदा मिळत होता जो या क्रांतीनंतर पूर्ण बंद झाला. या वसाहतीबाबतचे त्यांचे अन्यायी आर्थिक धोरण हे राज्यक्रांतीचे प्रमुख कारण ठरले होते. यामुळे क्रांतीनंतर ब्रिटिशांनी आपल्या धोरणात बदल केला. ऑस्ट्रेलिया-कॅनडा इत्यादी ठिकाणच्या वसाहतीतील

कडक व्यापारी बंधने त्यांनी दूर केली. वसाहतींना अंतर्गत कारभाराच्या बाबतीत काही प्रमाणात स्वायत्तता द्यायला सुरुवात केली. यानंतरच्या काळात वसाहती स्थापन करण्यासाठी त्यांचे लक्ष हे आशिया – आफ्रिका खंडावर केंद्रित झाले. येथील अनेक राष्ट्रे नंतर ब्रिटीश साम्राज्यवादास बळी पडली.

**८. राष्ट्रवाद व लोकशाहीचा प्रसार :**

अमेरिकन राज्यक्रांतीने राष्ट्रवाद व लोकशाही या दोन महत्वाच्या तत्वांच्या जगभरात प्रसार केला. ब्रिटनच्या साम्राज्यवादाला जोरदार धक्का देत अमेरिकेच्या रूपाने लोकांचे राज्य अस्तित्वात आले. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याने जगाला मार्गदर्शन करण्याचे काम केले. मानवी स्वातंत्र्याची जाणीव यामुळे लोकांना झाली. राजेशाही – सरंजामशाहीला धक्का देणाऱ्या या राज्यक्रांतीने आधुनिक युगाला चालना दिली.

**९. अमेरिका खंडाचे नेतृत्व अमेरिकेकडे :**

स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आल्यावर अमेरिकेने अत्यंत वेगाने प्रगती केली. उत्तर अमेरिका खंड आणि दक्षिण अमेरिका खंडातील सर्व राष्ट्रांचे नेतृत्व आपसूकच अमेरिकेच्या हातात आले. युरोपियन साम्राज्यवाद्यांना अमेरिकन भूमीवरुन घालवून देण्यात अमेरिकन संघराज्याची भूमिका महत्वाची ठरली. या क्रांतीने यूरोपियन वसाहत वादाला धक्का देण्याचे कार्य केले. यामुळेच नंतर ब्रिटनने आशिया आफ्रिकेत वसाहती स्थापन करण्याकडे लक्ष दिले.

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तेरा वसाहती एकत्र आल्या आणि बलाढ्य ब्रिटिशांविरुद्ध त्यांनी मोठा संघर्ष केला. त्यात त्यांना यश आले. हा संघर्ष साम्राज्यवादाला बळी पडलेल्या इतरांसाठीही प्रेरणादायी ठरला. त्यांनीही स्वस्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले

**अमेरिकन राज्यक्रांतीचे महत्त्व :**

आधुनिक जगाच्या इतिहासाला वळण लावणारी घटना, साम्राज्यवादाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणारी घटना म्हणून या राज्यक्रांतीचे वर्णन करावे लागते. ही घटना अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध म्हणूनही ओळखली जाते. या राज्यक्रांतीचे अमेरिकन इतिहासावर परिणाम झालेच त्याचबरोबर जागतिक इतिहासावरही परिणाम झाले. वसाहतींवरचा ब्रिटीशांच्या वसाहती हा शिक्का पुसला गेला. त्यांचे अमेरिकीकरण झाले. स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात येण्याकडे त्यांची वाटचाल सुरू झाली. एका बलाढ्य राष्ट्राची पायाभरणी या क्रांतीने झाली. राज्यक्रांती दरम्यान वसाहतींनी प्रसिद्ध केलेला मानवी हक्काचा जाहीरनामा हा आजही संपूर्ण जगाचा मार्गदर्शक ठरतो आहे. राजसत्ता–सरंजामी सत्ता–धार्मिक सत्तेस जोरदार धक्का देत लोकशाहीची प्रस्थापना या क्रांतीने केली. वसाहतवादाखाली दबलेल्या जगभरातील जनतेला स्व–स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा आणि बळ यामुळे मिळाले, म्हणजेच असे म्हणता येईल की विविध देशांच्या स्वातंत्र्यलढ्यामागे अमेरिकन राज्यक्रांती कारणीभूत ठरली आहे. मानवाच्या मूलभूत हक्कांची जोपासना केली पाहीजे, राजसत्तेकडून अन्याय झाल्यास त्याविरुद्ध आवाज उठवला पाहीजे ही प्रेरणा या क्रांतीने सगळ्यांना दिली.

## १.३ पारिभाषिक शब्द

१) रेड इंडियन - अमेरिका खंडातील मूळ निवासी, कोलंबसने यांचा उल्लेख रेड इंडियन असा केला.

२) पेनी, पौंड - ब्रिटिश चलन

३) कॉन्टिनेन्टल काँग्रेस-फिलाडेल्फिया परिषदेच्यावेळी अमेरिकन वसाहतींच्या प्रतिनिधींची तयार केलेली समिती, ही समिती वसाहतींच्यावतीने सर्व निर्णय घेणार होती.

४) वसाहतवाद - नव्या जलमार्गाच्या शोधांनंतर वसाहतवादाला चालना मिळाली. वसाहतवाद म्हणजे बलिष्ठ किंवा शक्तीशाली सत्तेने दुसर्या कमकुवत राष्ट्रावर राजकीय वर्चस्व स्थापन करत त्या राष्ट्राचा वापर स्वतच्या आर्थिक भरभराटीसाठी करणे. हाच वसाहतवाद साम्राज्यवादाला जन्म देणारा ठरला. अमेरिका, आशिया आणि आफ्रिकेतील अनेक राष्ट्रे युरोपियन वसाहतवादाला बळी पडली.

## १.४ स्वयं अध्ययन १ ची उत्तरे

१) अ) लॅटीन २) ड) बहामा ३) ड) हिसपनिपोलात

४) अ) जॉर्जिया ५) अ) फ्रान्स ६) ड) थॉमस पेन

७) अ) स्टॅम्प ॲक्ट ८) अ) रेड इंडियन ९) क) १३

१०) क) अमेरिकन

स्वयं अध्ययन २ ची उत्तरे

१) अ) फिलाडेल्फिया २) ब) बेंजामिन फ्रँकलिन ३) ड) तिसरा जॉर्ज

४) क) बोस्टन ५) ड) १७७६ ६) अ) पॅरिस

७) क) जॉर्ज वॉशिंग्टन ८) ब) लोकशाही ९) अ) ४ जुलै

१०) ड) थॉमस जेफरसन

## १.५ सारांश :

विज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक प्रगती, लष्करी बळ या सर्व बाबतीत आज आघाडीवर असलेल्या अमेरिका (USA) या राष्ट्राचा जन्म ज्या क्रांतीमुळे झाला ती अमेरिकन राज्यक्रांती ही जगाच्या इतिहासातील मैलाचा दगड मानली जाते. अठराव्या शतकात झालेल्या या क्रांतीचे परिणाम फक्त अमेरिका किंवा ब्रिटनपूरते मर्यादित राहिले नाहीत तर ते जागतिक होते. अन्याय करणारी शासन संस्था बदलण्याचा अधिकार सामान्य जनतेला आहे हे सांगणार्या या क्रांतीने लोकशाही, व्यक्ती स्वातंत्र्य या अत्यंत महत्त्वाच्या तत्वांची पायाभरणी केली. सतराव्या शतकात ब्रिटीशांच्या परवानगीने स्थापन झालेल्या उत्तर अमेरिका खंडातील तेरा वसाहतींनी ब्रिटिश साम्राज्यवादा विरोधात एकत्र येऊन लढा दिला आणि बलाढ्य ब्रिटीशसत्तेला पराभूत करून स्वातंत्र्य मिळवले. मानवाचे मुलभूत हक्क नाकारणार्या सरकार विरोधात लढण्याची प्रेरणा या क्रांतीने जगाला दिली. मानवाच्या मूलभूत हक्कांचा जाहीरनामा, लिखित राज्यघटना या अमेरिकन लोकांद्वारे निर्मित दोन्ही गोष्टी

जगाच्या इतिहासातील मैलाच्या दगड ठरल्या आहेत. जगातील अनेक राष्ट्रांना स्वातंत्र्यलढ्यासाठी नैतिक बळ देण्याचे काम या क्रांतीने केले. वसाहतवादाच्या विरोधातील पहिली क्रांती त्याचबरोबर राजेशाही नाकारून लोकशाही राज्य आणि जनतेचे सार्वभौमत्व ही संकल्पना रुजविण्याचे कार्य करणारी क्रांती म्हणून या क्रांतीचे इतिहासात खूपच महत्त्व आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) सविस्तर उत्तरे लिहा

१) अमेरिकन राज्यक्रांतीच्या कारणांची चर्चा करा.

२) अमेरिकन राज्यक्रांतीचे परिणाम स्पष्ट करा.

३) अमेरिकन राज्यक्रांतीत वसाहतींच्या विजयाची तसेच ब्रिटिशांच्या पराभवाची कारणे स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा

१) बोस्टन टी पार्टी

२) अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनामा

३) जॉर्ज वॉशिंग्टन

४) अमेरिकन क्रांतीचे महत्व

## १.७ संदर्भ ग्रंथ :

१. कोठेकर शांता, अमेरिकेच्या संघराज्याचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९९

२. मोरवंचीकर रा. श्री., अमेरिकेन संघराज्याचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

३. के. सागर, आधुनिक जगाचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २०१७

४. कदम य. ना., आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २०१०

५. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, विश्वकोश खंड-१

६. गर्गे स. मा. (संपा.) समाजविज्ञान कोश भाग १

७. आचार्य धनंजय, अमेरिकन फ्रेंच आणि रशियन राज्यक्रांती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००९

८. जैन हुकूमचंद, माथुर कृष्णचंद्र, आधुनिक जगाचा इतिहास १५०० ते २०००, मराठी अनुवाद काळे अनिल, के सागर पब्लिकेशन, २०२२

९. ≤https://vpmthane.org/jbcapp/upload/m6/123.pdf≥

❑❑❑

# घटक २

# फ्रेंच राज्यक्रांती (१७८९)

## (French Revolution-1789)

**अनुक्रमणिका :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ कारणे

    २.२.२ महत्त्वाच्या घटना आणि नेते

    २.२.३ परिणाम

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.५ स्वंय-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ संदर्भ ग्रंथ यादी

## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास.....

- फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे अभ्यासता येतील.
- बुरबाँ घराण्यातील लुई राज्यकर्त्याविषयी माहिती घेता येईल.
- फ्रेंच राज्यक्रांतीसाठी वैचारीक जागृती विचारवंतानी कशी केली याची माहिती देता येईल.
- फ्रेंच राज्यक्रांती काळातील घटनांची सविस्तर माहिती घेता येईल.
- राष्ट्रीय सभेच्या कार्याचा सविस्तर आढावा घेता येईल.
- पहिल्या फ्रेंच विधीमंडळाची माहिती घेता येईल.
- दहशतवादी कालखंडाचा  आढावा घेता येईल.
- संचालक मंडळाचे कार्य स्पष्ट करता येईल.
- फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम सांगता येतील.

## २.१ प्रास्ताविक :

सन १६८८ च्या इंग्लडमधील गौरवशाली राज्यक्रांतीनंतर जागतिक इतिहासामध्ये १७८९ च्या फ्रेंच राजक्रांतीचे खूप महत्व आहे. फ्रेंच राज्यक्रांती ही जगाच्या इतिहासातील मोठी परिवर्तनवादी घटना होय. फ्रान्समध्ये परंपरागत चालत आलेली बुरबाँ राजघराण्याची जुनी राजवट, शासनातील गोंधळ, तत्कालीन राजा सोळावा लुई याची अकार्यक्षमता व त्याची पत्नी राणी मेरी अॅटोईनेट हिचा उद्दामपणा यामुळे फ्रान्सची राजकीय स्थिती बिघडली अशामध्येच फ्रान्समधील सामाजिक विषमता, दिवाळखोरीवर आलेले राष्ट्र, सर्व सामान्य लोकांची गरिबी, प्रचंड हलाकी या सर्व घटकांनी राज्यक्रांतीस वातावरण निर्माण केले. अशामध्येच युरोपात वैचारिक प्रबोधनाचे वारे जोरात वाहू लागले. रूसो, मॉटेस्क्यू, व्हॉल्टेअर, फ्रॅने, डिडेरॉ इत्यादी विचारवंतानी फ्रेंच लोकामध्ये क्रांतीप्रवण विचार रूजवले. या सर्वांचा परिणाम म्हणून सन १७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली.

फ्रान्समध्ये लोकांनी राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून क्रांतीच्या वाटचालीस सुरूवात केली. अनेक शतके जुलमी राजेशाहीचे प्रतिक असणारे बॅस्टील या छोट्या किल्ल्याचा पाडाव करून त्या ठिकाणी कैदेत असणाऱ्या लोकांना मुक्त करून पुढे मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिध्द करून स्वातंत्र्य, समता, बंधुता या महान तीन तत्वाचा जयघोष केला. ऐनभरात चालु असणाऱ्या क्रांतीला राजा, राणी व त्यांच्या पाठीराख्यानी चिरडण्याचा प्रयत्न केला. क्रांतीकारकांनी राजा-राणीला पकडून गिलोटिनवर चढवून त्यांचा शिरच्छेद केला. पुढे फ्रान्समध्ये दहशतीचा कालखंड निर्माण करणाऱ्या रॉबेस्पीअर ला लोकांनीच गिलोटिनवर चढविले आणि दहशतीचा कालखंड संपवला.

फ्रेंच लोकांनी क्रांती करून परंपरागत चालत आलेली जुलूमी व भ्रष्ट राजेशाही शासन व्यवस्था उलटून टाकली. फ्रेंच लोकांनी राजकीय, धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील सनातनी विचार गाढून टाकले. आणि फ्रेंच समाज पुरोगामी प्रगत लोकशाही विचारांकडे वळला. अनियंत्रित राजेशाही, वर्ग कलह, सरंजामशाही पध्दत, श्रेष्ठ -कनिष्ट विचार व्यवस्थेला मुठमाती दिली.

फ्रेंच लोकांनी केलेल्या या क्रांतीचे दुरगामी परिणाम फ्रान्सबरोबर संपूर्ण जगावर झाले. परंपरागत चालत आलेला राजवंश हा ईश्वराचा अंश नसून तो जनतेचा सेवक आहे, आपले कर्तव्य पार पाडण्यात राजा अपयशी ठरत असेल तर त्यास सिंहासनांवरून खाली खेचण्याचा अधिकार जनतेचा आहे हे सिध्द करून दाखविले. म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीचे फार मोठे महत्व आहे. जनता प्रतिनिधींच्या माध्यमातून राज्य चालवू शकते हा नवीन संदेश जगाला दिला.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ कारणे

**अ) फ्रान्सची भौगोलिक स्थिती :**

युरोप खंडातील फ्रान्स हा देश अगदी प्राचीन कालखंडापासून आपले अस्तित्व टिकवून आहे. हे राष्ट्र व तेथील लोक अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू आहेत. या देशामध्ये पश्चिम बाजूस अटलांटिक महासागर, इंग्लंडची खाडी ही महत्वाची ठिकाणी आहेत. फ्रान्सच्या भूभागात सेंट, लुआर, गॅरोन, आणि ऱ्होन या महत्वाच्या नद्या आहेत. फ्रान्समध्ये दोन विशाल पठारे आढळतात. दक्षिणेस आल्प्स् आणि पिरनिज या मोठया डोंगर रांगा आढळतात. उत्तरेकडून फ्रान्सचा भूभाग सपाट आढळतो येथील हवामान सौम्य अत्यंत उत्साहवर्धक आहे. त्यावेळी येथील लोंकाचा मुख्य व्यवसाय शेती हाच होता. या देशामध्ये विपूल प्रमाणात फळ बागा आढळतात. शेतीमुळे हा देश पूर्वी स्वयंपूर्ण होता. असे असले तरी या देशात परंपरागत चालत आलेल्या बुरबाँ घराण्याच्या राजे लोकांनी येथे अनियंत्रित राजसत्ता चालविली व फ्रान्सची मोठया प्रमाणात अर्थिक दिवाळखोरी केली. परिणामी फ्रेंच जनतेने क्रांती करून बुरबाँ राजघराण्याची सत्ता नष्ट केली.

**ब) राजकीय कारणे :**

कोणतीही क्रांती एकाएक होत नसते. तिची कारण परंपरा ही कित्येक वर्ष चालत राहते. लोकांना अनियंत्रित राजसत्तेविरोधात शासन निर्णय असहय ठरू लागल्यास स्थिती स्फोटक बनते. त्यातुनच क्रांती होते. फ्रेंच राजक्रांतीबाबत हीच स्थिती दिसून येते. राज्यक्रांतीची विविध कारणे आहेत. ती याप्रमाणे–

- **अनियंत्रित राजेशाही :**

फ्रान्समध्ये वंशपरंपरागत बुरबाँ राजघराण्याची सत्ता चालत आलेली होती. ही सत्ता अनियंत्रित होती. या राजेशाहीवर कोणाचेच निर्बंध अथवा अंकूश नव्हता. राजाने प्रजेच्या कल्याणकरिता राज्य करणे हे कर्तव्य. परंतू बुरबाँ वंशज फ्रेंच जनतेसाठी लोककल्याणार्थ राज्यकारभार करीत नव्हते. ते सर्व बुरबाँ वंशज जुलमी, अत्याचारी, पक्षपात करणारे, अन्यायी स्वरूपाचे कायदे करणारे, वर्ग भेद करणारे राजे होते. फ्रांन्समधील वरिष्ठ वर्ग सुखविलासात दंग होता तर सर्व सामान्य प्रजा अत्यंत हलाखीत जीवन जगत होती. त्यांना कोणत्याही सोयीसुविधा नव्हत्या, त्यांना कर भरावे लागत. या जनतेला भाषण स्वातंत्र्य नव्हते. ही जनता अन्यायाखाली पिचली होती. त्यामुळे फ्रेंच लोकांत बुरबाँ घराण्याविषयी असंतोष पसरला होता.

- **सोळावा लुई :– (१७७४ ते १७९३)**

सोळावा लुई हा १७७४ ते १७९३ या काळात फ्रंान्सचा राजा होता. त्याची सर्व शासन व्यवस्था विस्कळीत व लाचलुचपतीने बरबटलेली होती. हा राजा प्रजेवर जुलूम करणारा होता. या राजाच्या अंगी धडाडीचे नेतृत्व नव्हते. तो भित्रा आणि आळशी होता. राज्यकारभार करण्याचे सखोल ज्ञान त्याच्या जवळ नव्हते. हा सोळावा लुई आपल्या राणीच्या वर्चस्वाखाली होता. राणी आणि तिच्या सल्लागारांनी सोळावा लुईस चुकीचे सल्ले दिले त्यामुळे त्याला राज्यकारभारात कोणत्याही नवीन सुधारणा करता आल्या नाहीत. हा राजा नको त्या गोष्टीत अडकून पडला. या राजाने फ्रेंच जनतेची सहानुभूती गमावली.

- **राणी मेरी ॲटोईनेट :**

सोळाव्या लुईची पत्नी राणी मेरी ॲटोईनेट ही होती. ही ऑस्ट्रियाची होती. ही अत्यंत सुंदर असून, ती उधळया स्वभावाची होती. ती आपल्या पतीवर प्रभुत्व गाजवत असे कोणत्याही गोष्टीची खात्री न करता योग्य अयोग्य न पहाता, ती राजाकडून आपणांस हवी असणारी बाब साध्य करून घेत असे. राज्यकारभारात तिने अत्यंत गोंधळ घातला होता. तसेच ती उधळया स्वभावाची असल्यामुळे राजतिजोरीवर मोठा खर्च पडला जाई. फ्रान्स राष्ट्र दिवाळखोरीच्या उंबरठयावर असतानाही तिने आपला उधळेपणा कमी केला नाही. ही राणी फ्रान्सच्या लोकांमध्ये समरस झाली नाही. त्यामुळे फ्रेंच जनता तिचा तिरस्कार करू लागली. तुटीची राणी (Madam Deficit) असा तिचा उल्लेख केला जात होता.

- **सत्तेचे केंद्रीकरण :**

राज्यामध्ये सर्व सत्ता केंद्राच्या ठिकाणी केद्रिंत असेल. आणि जनतेला स्थानिक स्वराज्याचे अधिकार नसतील तर राज्यकारभाराची कार्यक्षमता कमी होते. सतराव्या आणि अठराव्या शतकात फ्रान्समध्ये फार मोठे सत्तेचे केंद्रीकरण झाले. व्हर्सांय येथील राजवाडयातून अनेक चुकीचे निर्णय घेतले जात असत. एखाद्या गोष्टीचा निर्णय लागेपर्यंत त्या निर्णयातील हवा निघून जात असे. फ्रेंच जनतेची कोणतिही कामे यामुळे होत नसत.

- **सदोष राज्यकारभार :**

सोळाव्या लुईची राज्यव्यवस्था विस्कळीत व सदोष होती. प्रशासनातील महत्वाच्या जागा सरदार, उमराव, व त्यांचे वारसदार यांना परंपरागतरित्या मिळत असत. चुकीचे सल्ले देणारी मंडळी राज्यकारभारात हस्तक्षेप करीत. लोकशाही मार्गाने कोणतीही निर्णय प्रक्रिया होत नसे. फ्रान्समधील विविध प्रांतात वेगवेगळया प्रकारचे कायदे असत. राजाची न्यायदान प्रक्रियासुध्दा अत्यंत वाईट व अन्यायी स्वरूपाची होती. त्यामुळे प्रशासनात कमालीचा गोंधळ निर्माण झाला होता. चौदाव्या लुई नंतर फ्रान्समध्ये कर्तबगार राजा निर्माण झाला नाही. पंधरावा लुई सुध्दा अकार्यक्षम होता. पंधराव्या लुईच्या काळात फ्रान्सला आपल्या अनेक वसाहती गमवाव्या लागल्या. १७५६ ते १७६३ या काळात इंग्लंड आणि फ्रान्स या देशात 'सप्तवार्षिक युध्द' झाले या युध्दात इंग्लंडकडून फ्रांन्सचा मोठा पराभव झाला.

फ्रान्समधील प्रशासनाने आपल्या अधिकाऱ्यांचे अधिकार स्पष्ट केलेले नव्हते. त्यामुळे हे प्रशासकिय अधिकारी एकमेकांमध्ये विविध स्तरावर निर्णय प्रक्रियेत हस्तक्षेप करीत परिणामी सर्व सामान्य जनतेवर जुलूम, अन्याय व अत्याचार होत असे. या अत्यांचारापासून सरकारी अधिकाऱ्यांना कोणीही परावृत्त करीत नव्हते.

क्रांतीपूर्व काळात फ्रान्समध्ये अनेक न्यायालये होती. परंतू या न्यायालयामध्ये लिखित कायदयाची पुस्तके नव्हती. राजा, उमराव, संरजामदार, सरदार, धर्मगुरू देतील तो न्याय अशी अवस्था प्रत्येक प्रांतात होती. न्यायाधिशाच्या जागा राजाच्या मर्जीनुसार भरल्या जात. एवढेच नव्हे, तर प्रत्येक वर्गाची वेगवेगळी न्यायालये, तुरूंग असत त्यामुळे सर्वसामान्य फ्रेंच जनतेला न्याय मिळणे अत्यंत अवघड होवून बसले होते.

- **फ्रांन्समध्ये लोकशाही शासन संस्थांचा अभाव :**

फ्रांन्समध्ये अनियत्रिंत राजेशाही कार्यान्वींत असल्याने इंग्लंडच्या पार्लमेंटसारखी लोकशाही शासन संस्था फ्रांन्समध्ये कार्यरत नव्हती. त्यामुळे फ्रांन्सच्या राजकर्त्यांना गरीब फ्रेंच जनतेच्या वेदना कळल्या नाहीत. फ्रांन्समध्ये मध्ययुगापासून 'स्टेटस् जनरल' नावाची संस्था होती. पण या संस्थेची शेवटची सभा १६१४ मध्ये झाली होती. त्यांनतर या सभेला राजाने कधीच बोलविले नव्हते. या सभेला कोणतेही अधिकार नव्हते. परकिय आक्रमणाच्यावेळी राजा कधीतरी या सभेचा सल्ला घेई. ही सभा राजाला विरोध करीत नसे. स्टेटस् जनरलची तीन प्रमुख सभागृहे होती. त्यामध्ये 'सरदारसभागृह', 'धर्मगुरूसभागृह' व 'सामान्य प्रजेचे सभागृह' हे तिन्ही वर्गातील प्रतिनिधी आपआपल्या सभा वेगवेगळया घेत असत. धर्मगुरू व सरदार सभागृहे एकत्र येत असत. त्यामुळे 'सामान्य सभागृहाचे' चालत नसे. धर्मगुरू आणि सरदार सभागृहाच्या वर्चस्वामुळे फ्रांन्ससमोर असणारे विविध प्रश्न सोडविण्यासाठी 'स्टेटस् जनरल' सभा काहीही करू शकत नव्हती.

## क) सामाजिक कारणे :

फ्रेंच लोकांचे राज्यक्रांतीपूर्व सामाजिक जीवन अन्याय, विषमता, वर्ग कलहांने भरून गेलेले होते. फ्रेंच समाजात प्रमुख तीन वर्ग होते पहिला वर्ग - उमराव, दुसरा वर्ग- धर्मगुरू, तिसरा वर्ग- सामान्य जनता (थर्ड इस्ट्रेट) या शिवाय यामध्ये भूदास व गुलांमाचा वर्ग वेगळा होता.

पहिल्या दोन वर्गाना समाजात विशेष अधिकार, सवलती होत्या. हा वर्ग कोणताही कर भरत नव्हता. सामान्य जनतेवर (थर्ड इस्टेट) करांचे सर्व ओझे लादले जाई. या लोकांची एकूण लोकसंख्या ९९ टक्के होती. उमराव, संरजामदार सरदार, धर्मगुरू यांची मिळून लोकसंख्या ही १ टक्के होती. असे असून सुध्दा १ टक्के लोक, ९९ टक्के असणाऱ्या बहुसंख्य जनतेवर अन्याय अत्याचार व जुलूम करीत.

फ्रांन्सची समाजरचना ही त्यावेळी पूर्णपणे शोषणावर आधारेलेली होती. फ्रांन्सच्या समाजातील अनेक लोकांचे मृत्यू अजीर्णामुळे, उपासमारीने होत असत. क्रांतीपूर्व फ्रांन्समध्ये ही विषमता अत्यंत पराकोटीला गेली होती.

- **सरंजामदार वर्ग :**

हा फ्रान्समधील प्रस्थापित वर्ग होता. राजनिष्ठा ठेवणे, सामान्य लोकांचे शोषण करणे, हा यांचा जन्मसिद्ध हक्क होता. या वर्गाला राजाने खास अधिकार दिले होते. या अधिकाराचा वापर करून हा वर्ग अत्यंत चैनीत व विलासात राहत असे. 'राजाशी बोलणारा राजाच्या मंत्र्याची मैत्री करणारा, कर्ज काढणारा पगार घेणारा, पेन्शन घेणारा, वारसाहक्क मिळवणारा हा सरंजामदार वर्ग होता.' या वर्गाकडे संपूर्ण फ्रांन्समधील ६०% हून अधिक जमीन होती. खंड वसूल करणे, बळजबरीने धान्य घरी आणणे. लोकांकडून नजराणा घेणे तसेच भूदास, वेठबिगार व गुलामांना आपल्या शेतावर सक्तीने राबवून घेणे इ. कामे करून घेत असत. राज्यप्रशासन व्यवस्थेमधील वरिष्ठ जागा, सैन्यातील जागा, न्यायदान क्षेत्रातील जागा यांना मिळत असत. या परंपरागत अधिकारामुळे सरंजामदार वर्ग फ्रेंच लोकावर प्रभुत्व ठेवून होता.

- **धर्मगुरू वर्ग :**

सरंजामदार वर्गा प्रमाणे धर्मगुरू वर्गसुध्दा प्रस्थापित होता. या वर्गाकडे सुध्दा वंशपरंपरागत अधिकार होते. फ्रेंच लोकांची अध्यात्मिक उन्नती करणे, त्यांना सद्मार्ग दाखविणे, हे यांचे काम होते. समाजात यांना अत्यंत मानाचे स्थान होते. असे असले तरी सरंजामदार वर्गाप्रमाणे हा वर्ग श्रीमंती, चैन, विलास याबाबतीत मागे नव्हता. या वर्गाकडे वंशपरंपरागत अधिकार होते. हा वर्ग सुध्दा फ्रांन्समधील एकूण जमीनीच्या हिस्स्यापैकी पाचव्या हिस्स्यावर अधिकार मिळवून बसला होता. या वर्गाचे चर्चचे राज्य, 'राज्यांतर्गत राज्य' होते. विविध धर्मसंस्था अधिकारात असल्यामुळे प्रचंड पैसा या वर्गाकडे उपलब्ध होत असे.

फ्रांन्समधील चर्च ही धर्मसंस्था कॅथॉलिक होती. त्यामूळे जुने बुरसटलेले विचार, भोंदूगिरी, वाममार्ग, अनैतिकता यामध्ये हे सर्व धर्मगुरू गुंतलेले होते. यामुळे सर्वसामान्य फ्रेंच जनतेचा 'चर्च' या धर्म संस्थेवरील विश्वास उडून गेलेला होता. या धर्मगुरूंना धार्मिक कर, इतर उत्सव कर वसूल करणेचा अधिकार होता. हे कर गोळा करताना सर्वसामान्य लोकांवर सक्ती केली जाई. या वर्गाचा हा अत्याचार फ्रेंच राज्यक्रांतीसाठी कारणीभूत ठरला.

- **सर्व सामान्यवर्ग (थर्ड इस्टेट):–**

संरजामदार व धर्मगुरू व्यतिरिक्त राहीलेले बहुसंख्याक लोक तिसऱ्या वर्गाचे लोक (थर्ड इस्टेट) म्हणून ओळखले जात. यामध्ये ही अनेक पोटभेद होते तिसऱ्या वर्गामध्ये सुध्दा श्रींमत, गरीब, सामान्य, अतिसामान्य, शेतकरी, बुध्दीनिष्ठ व भिकारी यांचा समावेश होता. या सर्वाचे अर्थिक दृष्टिकोनातून तीन प्रकार समजले जात.

१. श्रीमंत जमीनदार (बुर्ज्वा)

२. मजूर व कारागीर

३. सामान्य / गरीब/ शेतकरी

पहिल्या वर्गामध्ये वकील, डॉक्टर, शिक्षक, लेखक, शेती कसणारे शेतकरी येत असत. यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असे. हे बुध्दीवादी व वैचारिक असत. हा वर्गच अनियंत्रित राजसत्तेचा खरा विरोधक होता. म्हणून धर्मगुरू, सरदार व उमराव हे या वर्गाचा द्वेष करीत असत. क्रांतीपूर्व व क्रांती काळात जो असंतोष निर्माण झाला त्यास योग्य वळण देण्याचे काम या वर्गाने केले. प्रचलित राजसत्ता, सामाजिक विषमता खऱ्या अर्थाने या वर्गाने नष्ट केली असे म्हणता येईल.

मजूर व कारागिर या वर्गातील लोक दुय्यम दर्जाचे असत. यामध्ये हमाल, मजूर, किरकोळ काम करणारे, छोटे मोठे कारागिर येत असत. त्या काळात फ्रांन्स उद्योग प्रधान देश नसल्याने यांची संख्या फ्रेंच समाजात कमी होती.

तिसऱ्या वर्गातील लोक म्हणजेच बहुसंख्य शेतकरी होत. हे लोक म्हणजेच फ्रेंच राष्ट्र होय. या वर्गाने क्रांतीमध्ये महत्वपूर्ण कामगिरी केली. या वर्गावर प्रस्थापितांनी अनन्वीत अत्याचार केले. हा वर्ग सर्व कर

भरत असे. अतिशय मोठा हिस्सा कर रूपाने हा वर्ग राजाकडे भरत असे. कर भरण्यासाठी सक्ती केली जाई. करांच्या ओझ्याखाली हा संपूर्ण वर्ग पिचला गेलेला होता. मात्र राजसत्तेकडून यांना कोणत्याही सोई व सुविधा उपलब्ध होत नसत.

फ्रेंच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती यामुळे अतिशय वाईट झाली होती. या वर्गाला फ्रान्समध्ये कोणतेही अधिकार अथवा स्थान नव्हते. अन्याय, अत्याचार, जुलूम यास हा वर्ग बळी पडला होता. माणूस म्हणून असणारे निसर्गदत्त अधिकार या वर्गाला उपभोगता येत नव्हते. या लोकांची व्यक्तिगत स्वायत्ता पायदळी तुडवली गेली होती. परिणामी या वर्गात बुरबाँ राजसत्ते विरोधात प्रचंड चिड, असंतोष, निर्माण झालेला होता. त्याचे पर्यावसन फ्रेंच क्रांतीत झाले.

**ड) आर्थिक कारणे :**

सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे प्रमुख कारण म्हणजे फ्रान्सची ढासळत चाललेली आर्थिक परिस्थिती होय. या देशामध्ये आर्थिक विषमता, उत्पादनाची साधने राजा-राणी, उमराव, सरदार, संरजामदार व धर्मगुरू यांच्या हाती होती. या लोकांनी केलेल्या भष्टाचारामुळे फ्रान्समध्ये विषमतेने थैमान घातले. ढासळती अर्थव्यवस्था सावरता आली नाही. परिणामी राज्यक्रांती अटळ ठरली.

- **चौदाव्या लुईची दिवाळखोरी :**

चौदाव्या लुईच्या कारर्किदीमध्ये फ्रान्सने अनेक लढाया केल्या. युध्दावर प्रचंड खर्च केला. तिजोरीची उधळपट्टी झाली. चौदाव्या लुईचे डोळे उघडले तेव्हा वेळ निघून गेलेली होती. या काळात राष्ट्रीय कर्जाने उच्चांक केला. चौदाव्या लुईला फ्रांन्सला आर्थिक दृष्टिकोनातून सावरता आले नाही.

- **पंधरावा लुई :**

पंधराव्या लुईने आपल्या काळात फ्रान्समध्ये विविध ठिकाणी मोठ मोठी बांधकामे केली. या बांधकामावर अमाप पैसा उधळला तसेच त्याने ही युध्दांवर प्रचंड पैसा खर्च केला. पोलंड बरोबरील 'वारसाहक्क युध्द' आणि इंग्लंड बरोबरील 'सप्तवार्षिक युध्दे' यावर प्रचंड पैसा खर्च झाला. या युध्दातील पराभवामुळे फ्रांन्सची प्रतिष्ठा लयास गेली.

- **सोळावा लुई आणि अमेरिकन स्वातंत्र्य युध्द :**

सोळावा लुई फ्रान्सचा राजा झाला तेंव्हा फ्रान्सची आर्थिक परिस्थितीत अतिशय बिकट वळणावर होती. असे असताना ही सोळाव्या लुईने केवळ इंग्लंडला विरोध म्हणून अमेरिकन वसाहतींना प्रचंड मोठी लष्करी मदत केली. या घटनेमुळे फ्रान्सचे आर्थिक कंबरडे मोडले. मात्र अमेरिकेत गेलेल्या फ्रेंच सैनिकांना त्याठिकाणी स्वातंत्र्याचा नवीन अविष्कार पहावयास मिळाला. वसाहतींचे स्वातंत्र्य तेथील लोकांचे देशप्रेम, उद्योगीपणा, विविध अधिकाराचा उपभोग, याचा प्रभाव फ्रेंच सैनिकावर पडला. याचा उपयोग क्रांतीसाठी झाला.

- **असमाधानकारक महसूल करपध्दती :**

या काळात दिवाळखोरीमुळे फ्रान्सवरील कर्जाचा बोजा वाढत गेला. हा बोजा कमी करणेसाठी सोळाव्या लुईने प्रजेवर कर बसविण्यास सुरूवात केली. उमराव, सरदार, धर्मगुरू वर्ग करमुक्त होता तर फ्रेंच गरीब जनतेवर विविध प्रकारचे असंख्य कर लादण्यात आले. या आर्थिक पिळवणूकीमुळे फ्रेंच जनता उपाशी राहीली. या कर पध्दतीतून गरीब, भूमीहीन, मजूर, कारागिर सुटले नाहीत. मीठ कर, धार्मिक कर, मिरासदारी कर, दळणवळण कर, पाणीपट्टी, दिवाबत्ती, शेतसारा कर, इत्यादी करामुळे आणि वेठबिगारीमुळे फ्रेंच सामान्य जनतेला जीव नकोसा झाला. राज्यकर्ता या नात्याने सोळाव्या लुईने गरीब जनतेकडे दुर्लक्ष केले. परिणामी क्रांती अटळ ठरली.

### इ) धार्मिक कारणे :

फ्रान्समध्ये 'कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट्' असे दोन पंथ होते. फ्रान्समध्ये कॅथॉलिक पंथांचे वर्चस्व होते. कॅथॉलिक व प्रोटेस्टंट् पंथात संघर्ष होते. चर्च या धर्मसत्तेवर प्रभाव राखणेसाठी हे दोन्ही पंथ धडपडत असत. राजसत्ता ही धर्मसत्तेच्या वर्चस्वाखाली असल्याने धर्म सत्तेला हक्क, सवलती, मिळत असत. त्यामुळे चर्चला सुबत्ता प्राप्त झाली होती. धर्म सत्तेकडून राजाला मान्यता घ्यावी लागे. त्यामुळेच धर्म सत्ता राजावर आपला प्रभाव पाडत असे. विविध संस्कार, धर्मअनुष्ठाने, केली नाही. तर नरक यातना भोगाव्या लागतात. असा समज धर्म सत्तेने निर्माण केलेला होता. या अंधश्रध्देपायी सर्व सामान्य जनता अर्थिक दृष्टीकोनातून नागविली जाई. सर्व सामान्य जनतेवर धर्म संस्थेकडून 'टाईथ' नावाचा धार्मिक कर सक्तीने वसुल केला जाई. धर्म संस्थेच्या या अन्यायामुळेच फ्रेंच जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला. व यातून क्रांतीसाठी वातावरण निर्माण झाले.

### ई) वैचारिक कारणे :

शस्त्रापेक्षा अनेक वेळा लेखणी प्रभावी ठरलेली आढळते. याचे सर्वात श्रेष्ठ उदाहरण म्हणजे फ्रेंच तत्ववेत्यांनी लोकांची मने क्रांतीसाठी तयार केली. प्रत्यक्ष फ्रेंच क्रांती या तत्वज्ञांनी घडविली नसेल परंतू फ्रेंच लोकांची दु:खे अत्यंत प्रभावीपणे मांडणेचे काम यांनी केले. गलितगात्र झालेल्या फ्रेंच लोकांचा स्वाभीमान जागृत करण्याचे व नेतृत्व निर्माण करणेचे आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे अत्यंत भरीव कार्य या विचारवंतांनी केले. संपूर्ण फ्रान्स देशामधील मध्य युगापासून चालत आलेल्या संस्था कशा सडलेल्या आहेत. त्यांना अधोगती प्राप्त झाली आहे. हे आपल्या लिखाणाद्वारे त्यांनी मांडले. हे मांडत असताना उपरोध, तुलना, शास्त्रीय मांडणी, दृष्टांत, युक्तीवाद, दोषनिरूपण आणि प्रखर टिकेच्या माध्यमातून फ्रान्सच्या सार्वजनीक जीवनातील दोष स्पष्ट केले. या लोकांच्या लिखाणामुळे फ्रेंच जनतेत जागृतीची भावना निर्माण झाली.

भ्रष्टाचारी राजव्यवस्थेला उलथून टाकण्याची पार्श्वभूमी तयार केली. फ्रेंच राज्यक्रांतीला आवश्यक असणाऱ्या सर्व घोषणा या लोकांनीच तयार केल्या होत्या. फ्रान्समध्ये क्रांती होण्यापूर्वी माँटेस्क्यू (१६८९ ते १७५५), व्हॉल्टेअर (१६९४ ते १७७८), फ्रेने (१६९४ ते १७७४), रूसो (१८१२ ते १७७८) व डिडेरॉ

(१७१३ ते १७८४) या सारख्या विचारवंतानी समाज जागृतीचे कार्य केले. या समाज जागृतीमुळे फ्रान्सच्या जनतेत वैचारिक क्रांती घडून आली.

- **मॉंटेस्क्यू (१६८९ ते १७५५) :**

मॉटेस्क्यू तज्ञ कायदेपंडित होता. याने जगातील अनेक राज्य घटनांचा व विविध शासन संस्थाचा मोठा अभ्यास केला होता. 'स्पिरीट ऑफ लॉज' या आपल्या राज्यशास्त्रावरील प्रसिध्द ग्रंथात त्याने राजेशाहीच्या गुणदोषांचे स्वरूप स्पष्ट केले आहे. ब्रिटनची घटनात्मक शासन पध्दती त्यास योग्य वाटे. कारण राजेशाही, लोकशाही व हूकुमशाही या तिन्हीचे गुण एकत्र आलेले आहेत. असे त्याला वाटत असे. मॉन्टेंस्क्यूला फ्रांन्समध्ये राजसत्ता हवी होती पण निरंकुष, अनियंत्रित राजसत्तेचा तो विरोधक होता.

राजसत्तेकडून लोककल्याण होण्यासाठी राजाच्या शासन पध्दतीवर निर्बध असायला पाहीजेत हे निर्बध आणण्यासाठी त्याने सत्ताविभाजनाचा सिध्दांत मांडला कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ या तीन सत्ता त्याला वेगळया हव्या होत्या. एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता राहील्यास ती व्यक्ती व्यभिचारी, भ्रष्ट बनते या त्याच्या विचारामुळे फ्रान्समधील दैवी राजसत्तेच्या सिध्दांतावर मोठा प्रहार झाला. फ्रेंच लोकांना त्याच्या या विचारामुळे फ्रान्समधील प्रचलित अनियंत्रित राजव्यवस्था हीच फ्रान्समधील भष्टाचाराचे, जुलूम अन्यायाचे प्रतीक आहे ते समजून आले. मॉटेस्क्यूने 'सत्ता विभाजनाचा' पुरस्कार केला. मॉटेस्क्यूने फ्रेंच राज्यक्रांती पूर्व काळात जागृतीची भावना निर्माण करून लोकांना क्रांती करण्यास प्रेरित केले.

- **व्हॉल्टेअर (१६९४ ते १७७८) :**

हा नाटककार, इतिहासकार, कवी, शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होता. त्याने आपल्या लिखानात विनोद व उपहास या माध्यमातून फ्रेंच सार्वजनिक जीवनातील सदोष शासन व्यवस्था, बुरबाँ घराण्याची अनियंत्रित राजेशाही, चर्च, धर्मगुरू यांची लबाडी फ्रेंच समाज जीवनातील वर्ग, दांभिकता इ. दोषांवर टिका केली. तो श्रध्दाळू होता. तरीसुध्दा त्याने चर्च, धर्मगुरू, त्यांचे धर्मपीठ त्यातील अनाचार, अनैतिकता, सकुंचीत विचार यावर जोरदार हल्ले केले. व्हॉल्टेअरने प्रचलीत राजव्यवस्थेवर फार मोठी टिका केली. याला लोककल्याणकारी राजसत्ता अभिप्रेत होती. त्याने व्यक्ती स्वातंत्र्यांचा पुरस्कार केला. लोकमताप्रमाणे राज्य चालावे, तसे चालत नसेल तर लोकांनी ते चालवावे, लोकमत सार्वभौम आहे, लोकच सर्वश्रेष्ठ आहेत. राज्य नव्हे, सर्वांचे कल्याण व हित थोड्यांच्या हाती न देता सर्वाच्या हाती द्यावे या मताचा त्याने पुरस्कार केला. त्याने आपल्या लिखाण्याचा माध्यमातून राजसत्तेचे वाभाडे काढले. धर्मसत्ता व राजसत्ता मिळून सामान्यं लोकांवर कसा अन्याय करता हे आपल्या लिखाणाद्वारे दाखविले. व्हॉल्टेअरने 'कॅडिड' नावाचा अत्यंत महत्वपूर्ण ग्रंथ लिहिला.

- **फ्रेने (१६९४ ते १७७४) :**

हा डॉक्टर होता त्याने फ्रांन्समध्ये वैद्यकीय व्यवसाय केला होता. त्यामुळे त्याचा गोरगरीब जनतेशी संबंध आलेला होता. या लोकांची दु:खे त्याला समजली होती. याने फ्रान्समधील आर्थिक परिस्थितीचा

मोठा अभ्यास केला होता. फ्रान्सची अर्थव्यवस्था सुधरायची असेल तर उद्योग, व्यापार, शेती याकडे लक्ष दिले पाहीजे. फ्रान्सला आर्थिक दृष्ट्या सबल करणारी ही क्षेत्रे स्वायत ठेवली पाहिजेत. असे फ्रेनेने अर्थविषयक मोठे विचार मांडले. फ्रान्स आर्थिकदृष्ट्या बलवान असला पाहीजे असे प्रतिपादन केले. क्रांतीनंतरच्या काळात फ्रेंच नेत्यानी फ्रेंनेचे विचार प्रत्यक्षात उतरविले.

- **रूसो (१७१२ ते १७७८) :**

'रूसो झाला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती झाली नसती' असे म्हणतात याने फ्रेंच जनतेमध्ये क्रांतीची ज्योत पेटविण्याचे महान काम केले त्याने 'द सोशल कॉन्ट्रॅक्ट' म्हणजे 'सामाजीक करार' हा सुप्रसिध्द ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीचे बायबल समजतात. या ग्रंथाच्याद्वारे त्याने आपले विचार मांडून क्रांतीला जोरदार चालना दिली. याशिवाय 'माय कन्फेशन्स' नावाचे आत्मचरित्र लिहीले. तसेच एमिल नावाचा दुसरा ग्रंथ ही लिहिला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या उदात्त तत्वांचा पाठपुरावा केला. रूसोने राजसत्तेच्या दैवीसिंध्दातांला प्रचंड मोठा विरोध केला. जनता अथवा लोकांच्या इच्छेवरच किंवा संमतीवरच राजाचे स्थान अवलंबून आहे. राजा सार्वभौम नसून फ्रेंच लोकमत सार्वभौम आहे. लोककल्याण करण्याच्या अटीवर राजाचे स्थान अवलंबून आहे लोक कल्याण जर राजाकडून होत नसेल किंबहूना हे कर्तव्य त्याच्याकडून जर पार पाडले जात नसेल तर त्या राजास सिंहासनावरून खाली खेचण्याचा नैतिक अधिकार फ्रेंच जनतेला आहे.

पण कोणतीही व्यक्ती सिंहासनावर बसली व तिला एकदा अधिकार प्राप्त झाले की ती प्रजेचे कल्याण करू शकणार नाही ती व्यक्ती सत्तेचा गैरवापर करणार हे इतिहासाने सिध्द केले असून फ्रान्समध्ये लोकशाहीच असली पाहीजे असे परखड विचार रूसोने मांडले. सामाजिक समता आणणे आर्थिक विषमता नष्ट करणे यावर त्याने मोठा भर दिला. देशामध्ये लोकशाही पद्धतीची शासन व्यवस्था असली पाहीजे, लोक कल्याणासाठी स्वातंत्र्य पाहीजे सर्वाना समतेची वागणूक मिळाली पाहीजे, कोणीही उच्च, निच नाही. हे त्याचे विचार अत्यंत प्रभावी ठरले. सार्वभौमत्व आणि राजकीय समता या त्याच्या दोन तत्वाचा फ्रेंच जनतेत फार मोठा प्रसार झाला. त्यामूळे लोकशाहीची भावना फ्रेंचांच्या मनात रूजली व ते क्रांतीसाठी तयार झाले.

- **डिडेरॉं (१७१३ ते १७८४) :**

याने लिहिलेल्या विश्वकोषांच्या माध्यमातून फ्रान्सचा राजकिय, सामाजिक व धार्मिक जीवनपट लोकांपूढे मांडला. व याच माध्यमातून सामाजीक गुलमगिरी, आर्थिक गुलामगिरी, विषमता, धार्मीकता चर्चमधील अनागोंदी यावर प्रखर टिका केली. राष्ट्राच्या प्रगतीसाठी कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत हे स्पष्ट केले. डिडेरॉने लेखनी व वाणीच्या माध्यमातून आपली विचार-सरणी फ्रेंच समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला. डिडेरॉच्या विचाराचा प्रभाव फ्रेंच मध्यवर्गावर पडला व या वर्गानेच क्रांतीचे नेतृत्व केले.

वरील विचारवंताशिवाय अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार यांनीही याच काळात जहाल लिखाण केले. हेलेवेटियस, हॉलबाँच, क्विस्ने, व कॅने यांनी आपल्या लिखाणात कर पद्धतीतील दोष, युध्दांवर होणारे खर्च,

गरीब वर्गाचे चाललेले शोषण, गुलामगिरी, वेठबिगारी, चर्च मधील अनैतिकता इत्यादी विषयावर जहाल लिखाण केले. त्यांच्या लिखाणामूळे फ्रेंच गरीब व पिचलेल्या वर्गात मोठी जागृती झाली. या सर्व बुध्दीवादी मंडळीचा प्रभाव फ्रेंच राज्यक्रांतीवर पडलेला दिसतो.

- **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. फ्रान्समध्ये ................. या घराण्याची सत्ता होती.

अ) बुरबाँ  ब) ऑरेंज  क) व्हॅनेवर  ड) जेम्स्

२. फ्रान्समधील सर्वसामान्य जनतेला ............. असे म्हणतात.

अ) थर्ड ईस्टेट  ब) सेकंड क्लास  क) प्रोटेस्टंट  ड) रॉईस टॅग

३. सामाजिक करार हा ग्रंथ .................. याने लिहीला.

अ) व्हाल्टेअर  ब) रूसो  क) मिराबो  ड) रॉबेस्पिअर

४. स्पिरीट ऑफ लॉज हा ग्रंथ ............ याने लिहिला.

अ) माँन्टेस्क्यू  ब) रूसो  क) व्हॉल्टेअर  ड) कॅने

५. फ्रान्समध्ये ............. व्या शतकात मोठी सामाजिक विषमता होती.

अ) १६  ब) १७  क) १८  ड) १९

**२.२.२ महत्त्वाच्या घटना आणि नेते :**

**अ) राज्यक्रांतीतील महत्त्वाच्या घटना :**

- **फ्रान्सची ढासळती अर्थव्यवस्था :**

१४ व १५ व्या लुईपासून फ्रान्सवरील कर्जाचा बोजा वाढत गेला. आणि १६ व्या लुईच्या काळापर्यंत फ्रान्स आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यांवर येऊन पोहोचला. संरजामदार, उमराव धर्मगुरू, करमुक्त होते. तर गरीब फ्रेंच जनता करदाती होती त्यामुळे सामाजिक जीवनात प्रचंड कटूता निर्माण झाली. फ्रान्स जेव्हां दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आला १६ व्या लुईने दिवाळखोरीतून फ्रान्सला वाचविणेसाठी 'टरगॉट' या अर्थमंत्र्याची नेमणूक केली. टरगॉटने अर्थमंत्रीपद स्विकारलेनंतर त्याला अंदाजपत्रका मध्ये तुट जाणवू लागली. प्रत्येक वर्षी अशीच तुट राहीली तर फ्रान्सचे नक्की दिवाळे वाजेल, याची खात्री टरगॉटला झाली. म्हणून त्याने दिवाळखोरपणा नको, कर वाढ नको, असे धोरण जाहीर केले. आणि राजा-राणी, सरंजामदार व सरदार यांची उधळपट्टी कमी करणेचा प्रयत्न केला परिणामी उमराव, सरदार भडकले. त्यानी राणीच्या माध्यमातून टरगॉटला अर्थ मंत्रीपदावरून हाकलले.

टरगॉटच्या हकालपट्टी नंतर 'नेकर' हा नवा अर्थमंत्री झाला. त्याच्या काळात विविध युध्दावरील खर्च वाढत गेल्याने फ्रान्सवरील कर्ज वाढत गेले. अशा परस्थितीमध्ये नेकरने खर्च व उत्पन्न दाखविणारा एक अहवाल प्रसिध्द केला. या अहवालात दरबारातील लोक, वरिष्ठ 'प्रस्थापित वर्ग, राष्ट्राची कोणतीही सेवा न करता तिजोरी कशी रिकामी करतात याचे स्पष्ट चित्र दाखविण्यात आले. या अहवालामूळे नेकरवर दरबारी मंडळीचा रोष वाढत गेला. व त्यामुळे त्यालाही आपले अर्थमंत्रीपद गमवावे लागले. त्यानंतर 'क्लोन' अर्थमंत्री झाला याच्या काळात तिन वर्षामध्ये फ्रान्सवर ३०० कोटी फ्रँक्स् डॉलरचे कर्ज झाले. त्याने कर्ज काढण्यास प्रतिबंध केला नाही. पुढे त्याने सर्वसाधारण कर बसविणेचा प्रयत्न केला. यास मोठा विरोध होवून त्यासही आपले मंत्रीपद गमवावे लागले.

- **स्टेटस् जनरलची सभा :**

फ्रांन्सचे अर्थव्यवस्था सावरण्याचे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर राजाला मृतप्राय झालेली स्टेटस् जनरल सभा बोलवावी लागली. उमराव, धर्मगुरू, व सामान्य प्रजा अशी तीन गृहे होती. ही तिन्हीं सभागृहे स्वतंत्र असत. उमराव व धर्मगुरू यांचे बहुमत होई व सामान्य प्रजेचे एक मत होत असे. त्यामुळे स्टेटस् जनरलमध्ये सामान्य प्रजेच्या मताला त्याज्य ठरविले जाई.

- **स्टेटस् जनरलचे तीन वर्ग :**

फ्रान्सची आर्थिक दिवाळखोरी लक्षात घेवून राजाने पुन्हा एकदा नेकरला अर्थमंत्रीपद दिले. व स्टेटस् जनरलची सभा मे १७८९ ला 'व्हसार्य' येथे बोलविण्यात आली. फ्रान्समधील सामान्य जनतेला विश्वासात घेतल्या शिवाय आपणाला कांही करता येणार नाही याची खात्री सोळाव्या लुईला झाली होती. या सभेला एकूण बाराशे हून अधिक प्रतिनिधी हजर होते. यामध्ये ६२१ प्रतिनिधी थर्ड इंस्टेट, २८५ उमरावांचे प्रतिनिधी आणि ३०८ धर्मगुरूंचे प्रतिनिधी एकत्र येवून बैठक झाली. ही बैठक फ्रान्सच्या इतिहासात अविस्मरणीय मानली जाते.

- **फ्रेंच जनतेची गाऱ्हाणी :**

स्टेटस् जनरलेच्या सभेस आलेल्या प्रतिनिधीनी जनतेची गाऱ्हाणी, जनतेची दुःखे, अडचणी, नविन सुधारणा याबाबतीत राजाकडे आपल्या मागण्या सादर केल्या. त्या याप्रमाणे होत्या.

- केवळ लहरीवर जे शासन चालू आहे ते बंद करण्यात यावे.
- प्रत्येकास स्वातंत्र्य देणारी राजघटना तयार करण्यात यावी.
- स्टेटस् जनरलची सभा नियमित बोलविण्यात यावी.
- स्टेटस् जनरलला कायदे करण्याचे अधिकार असावेत.
- प्रजेवर कर बसविताना स्टेटस् जनरलची परवानगी घ्यावी.
- शेतकऱ्यावर बसविलेले कर रद्द करण्यात यावे.

स्टेटस् जनरलच्या कोणत्याही प्रतिनिधीने क्रांतीचा उल्लेख केला नव्हता. या उलट राजाने आम्हांला बोलविले या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कारण नवीन सुधारणाबाबत त्यांना अशा निर्माण झाली होती.

- **स्टेटस् जनरलचे राष्ट्रीय सभेमध्ये रूपांतर :**

अर्थमंत्री नेकरने स्टेटस् जनरल सभा बोलविली खरी परंतू महत्वाचा प्रश्न लोंबकळत ठेवला. स्टेटस् जनरलचे प्रतिनिधी एकाच सभागृहात बसले नाहीत. ते आपआपल्या सभागृहात बसले. हे तिन्ही सभागृहाचे प्रतिनिधी एकत्र बसले असते तर या सभेस पार्लेमेंटचे स्वरूप मिळाले असते परंतू तसे घडले नाही. परिणामी तिसऱ्या वर्गाने १७ जून १७८९ ला आमचे सभागृह म्हणजेच 'राष्ट्रीय सभा' आहे. असे जाहीर केले.

- **टेनिस कोर्टावरील शपथ :**

२० जून १७८९ ला थर्ड इस्टेटचे प्रतिनिधी सभेसाठी आपल्या सभागृहाच्या जागी गेले तेव्हां सभागृह राजाच्या सैनिकांनी ताब्यात घेतल्याचे आढळले. यामुळे राष्ट्रीय सभेची गळचेपी करण्याचा उद्देश आहे. असा समज सामान्य वर्गाचा झाला. यामुळे राजा, उमराव, धर्मगुरू हे एका बाजूला व थर्ड इस्टेट दुसऱ्या बाजूला अशी स्थिती निर्माण झाली. अशा गोंधळाच्या वातावरणात सामान्य जनतेने सभागृहाजवळच असलेल्या टेनिस कोर्टाकडे मोर्चा वळविला व त्या मैदानवर राष्ट्रीय सभेचे अधिवेशन घेण्यात आले. त्या ठिकाणीच राज्यघटना तयार करण्याची शपथ घेण्यात आली. यास फ्रांन्सच्या इतिहासात 'टेनिस कोर्टवरील शपथ' असे म्हणतात.

- **संयुक्त बैठक :**

उमराव, धर्मगुरू, संरजामदार वर्गाने राजावर दडपण आणले. व राष्ट्रीय सभेला मोडून काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यांनी राजाचा पाठिंबा मिळवून २३ जुन १७८९ ला तिंन्ही सभागृहाची बैठक भरविली या बैठकीमध्ये थर्ड इस्टेटनें केलेली कृती अवैध आहे असे जाहीर केले, आणि उमराव, धर्मगुरू वर्गासह राजा सभागृहातून निघून गेला. मात्र थर्ड इस्टेटचे सभासद त्याच ठिकाणी बसून राहीले. हे पाहताच राजाचा अधिकारी थर्ड इस्टेटच्या सभासदाना म्हणाला राजाचा हूकूम तुम्ही ऐकला नाही का? आपण येथून निघून जावे अशी माझी विनंती आहे. त्याच वेळी सभागृहाच्या बाहेर राजाचे सैनिक दिसू लागले. थर्ड इस्टेटच्या सभासदाना आपण येथून निघून गेल्यास आतापर्यंत केलेल्या कामावर पाणी फिरेल. आणि बाहेर पडल्यास राजाचे सैनिक मारतील. असे वाटू लागले दरम्यान थर्ड इस्टेट सभागृहाचा नेता 'मिरँबो' याने उभे राहून आम्ही येथून हलणार नाही असे स्पष्ट सांगितले व जो कोणी उपस्थितीत सदस्यांवर शस्त्र उगारेल त्यास देशद्रोही समजण्यात येईल. असे सांगून तसा ठराव राष्ट्रीय सभेने पास केला. सभागृहामध्ये झालेला हा गोंधळ सेवकाने राजास सांगितला. थर्ड इस्टेटच्या लोकांचा हा उघड राजांज्ञा भंगाचाच प्रकार होता. सोळाव्या लुईला काय करावे हे सूचेना झाले दोन दिवसानंतर अनेक धर्मगुरू उमराव, राष्ट्रीय सभेस येवून मिळाले. २७ जून १७८९ ला सोळाव्या लुईने खास वटहूकुम काढून तिंन्ही सभागृहाने या पुढील काळात एकत्रच बैठकी घ्याव्यात असे जाहीर केले.

- **अर्थमंत्री नेकरची पुन्हा एकदा हाकलपट्टी :**

सोळावा लुई आणि सामान्य वर्ग यांच्यात संघर्ष चालुच राहीला. राजा आणि त्याच्या दरबाराच्या लोकांनी राष्ट्रीय सभेला चिरडण्याचे प्रयत्न केले. अर्थमंत्री नेकरने राज्यकारभार सुधारणा सुचविल्या होत्या. पण त्या मान्य झाल्या नाहीत. उलट नेकरची पुन्हा हाकलपट्टी करण्यात आली. राजाने व्हसार्य आणि पॅरीस जवळ लष्कर जमा केले व राष्ट्रीय सभा व फ्रेंच जनतेच्या चळवळीवर प्रहार करण्याचे ठरविले. हे कळताच राष्ट्रीय सभेने लोकांना सैन्य स्थापन करण्याचे आदेश दिले या घटनेला फ्रान्सच्या इतिहासात 'सिव्हीक्स् गार्डस्' असे नाव मिळाले. पुढे हीच संघटना फ्रान्सची 'नॅशनल गार्डस्' बनली. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेला फ्रेंच लष्कराचा सेनापती लाफायत हा या संघटनेचा प्रमुख बनला.

- **बॅस्टिलचा पाडाव :**

नेकरच्या हकालपट्टीमुळे राजाच्या प्रतिगामी धोरणाबाबत फ्रेंच जनतेला खात्री झाली. त्यामुळे पॅरीस, व्हसार्यसह अनेक शहरात असंतोष उसळला. जनतेनेच राष्ट्रीय सभेला मोठे संरक्षण दिले. लोकांनी हाती सापडतील ती शस्त्रे घेवून बॅस्टिल या गढीवजा किल्ल्यावर हल्ला चढविला. बॅस्टिलचा किल्ला जुलूम व अन्यायाचे प्रतिक होता या ठिकाणी हजारो निरपराध लोकांना डांबून ठेवले होते. या ठिकाणी जो संघर्ष झाला त्यामध्ये २०० लोक मारले गेले, शेकडो लोक जखमी झाले. बॅस्टिल येथील तुरूंग प्रमुख डी. लुने मारला गेल्यानंतर लोकांनी कैदी असणाऱ्या लोकांना मुक्त केले विजयी मिरवणूक काढली. १४ जुलै १७८९ हा दिवस 'राष्ट्रीय दिन' म्हणून जाहीर करण्यात आला. म्हणून हा दिवस फ्रान्समध्ये स्वातंत्र्याचा विजय दिवस म्हणून ओळखला जातो. बॅस्टिलवरील हल्ला फ्रान्सच्या क्रांती घटनांची नांदी ठरला.

- **चार ऑगस्टची सामाजिक क्रांती :**

फ्रान्सच्या क्रांतीकाळात राजाच्या विरोधात सामान्य जनता विजयी होत गेली. हे लोन संपूर्ण फ्रान्समध्ये सुरू झाले. अत्याचारी लोकांवर सुड घेण्यात आले. फ्रान्समधील उमराव, धर्मगुरू, राजनिष्ठ लोक यांच्यावर मोठे हल्ले करण्यात आले. जमिनदारांचे वाडे लुटण्यात आले. त्यांच्याकडे असणारी जमीन, गहाण खतपत्रे जाळण्यात आली. अनेक ठिकाणी जमीनदाराचे खून पाडण्यात आले. धान्यसाठे लुटण्यात आले. या घटनेने फ्रान्समध्ये संरजामशाही मोडकळीस आली.

४ ऑगस्ट १७८९ या दिवशी 'नोआलिस्' या उमरावाने आपले परंपरागत सर्व अधिकार त्याग करून सर्वसामान्य प्रजेबरोबर आहोत हे दाखवून दिले. या घटनेमुळे अनेक उमरावांनी आपले वंशपरागत अधिकार त्यागले. या ठिकाणी झालेल्या सभेत अत्यंत महत्वपूर्ण ठराव पास करण्यात आले. या ठरावांना ४ ऑगस्टचे वटहूकूम म्हणून ओळखले जातात ते या प्रमाणे :

१) फ्रान्समध्ये वेठबिगारी पद्धत रद्द करण्यात आली.

२) उमरावांचे वंशपरंपरागत अधिकार रद्द करण्यात आले.

३) या पुढे कोणताही भेदभाव करण्यात येवू नये.

४) निष्पक्षपातीपणे न्याय देण्यात यावा.

५) सर्व फ्रेंच लोक समान मानले जातील.

६) सामाजिक भेद व विषमता नष्ट करण्यात येईल.

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही आधारभूत तत्वे राहतील असे जाहीर करण्यात आले. म्हणून ४ ऑगस्ट हा दिवस फ्रेंच राज्यक्रांतीत मोठा मानला जातो. या घटनेने फ्रान्समध्ये परंपरागत चालत आलेली सामाजिक विषमता मोडून पडली.

- **व्हर्सायच्या राजवाड्यावर फ्रेंच स्त्रियांचा मोर्चा :**

राजा सोळावा लुई हा धरसोड वृत्तीचा होता. राणी आपल्या राजनिष्ठ सेवकांच्या व आपल्या भावाच्या पाठिंब्याच्या मदतीने क्रांती दडपण्याचा प्रयत्न करीत होती. ऑगस्टच्या सामाजीक क्रांतीच्या ठरावांना संमती- दर्शक सही नाकारून राजाने राष्ट्रीय सभेच्या ध्वजाचा अपमान केला. ही बातमी कळताच हजारो स्त्रियांनी पुढाकार घेवू पॅरिसहून व्हर्सायच्या राजवाडयावर मोर्चा काढला. हा मोर्चा संप्तत व भुकेल्या स्त्री-पुरूषांचा होता. राजाच्या सैनिकानी या लोकांना विरोध केला नाही. खवळलेल्या लोकांनी राजा-राणी यांना पकडून अत्यंत अपमानास्पद रितीने पॅरीस येथे आणले. मिरवणूकीतील स्त्रीयांनी 'आम्ही बेकरीवाला आणि त्यांची पत्नी पकडून आणली आहे हे आता आम्हांस भरपूर ब्रेड खावयास देणार आहेत.' अशा प्रकारच्या घोषणा दिल्या. 'ब्रेड मिळत नसेल तर केक खा' म्हणणाऱ्या राणीला लोकांनी चांगलीच अद्दल घडवली. राजा व राणीला पॅरिस जवळ कैदत ठेवण्यात आले. या घटनेने व्हर्सायच्या राजवाड्याचे महत्व लोप पावून फ्रान्सचा राजकारभार पॅरिस या ठिकाणाहून सुरू झाला व राष्ट्रीय सभेचे कार्य सुरू झाले.

- **राष्ट्रीय सभेचे कार्य :**

**अ) विषमता व जमीनदारी पध्दत नष्ट :**

फ्रान्सच्या क्रांतीकाळात उदयास आलेल्या राष्ट्रीय सभेने १७८९ ते १७९१ या काळात महत्वपूर्ण कार्य केले. राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये राज्यघटना करण्याचे मोठे काम केले. या राष्ट्रीय सभेने उमरावशाही, संरजामशाही व विषमता नष्ट करून मोठे कार्य केले

**ब) मानवी हक्काचा जाहीरनामा :**

राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये मानवी हक्काचा जाहीरनामा घोषीत केला. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याच्या धर्तीवर तो आधारीत होता. त्यात सतरा महत्वपूर्ण कलमे होती. यामधील अधिकारी हे कोणत्याही शासनाच्या मर्जीवर अवलंबून नव्हते, म्हणून मानवी हक्काचा जाहीरनामा फ्रेंच राजक्रांतीचा पाया मानला जातो. ही कलमे या-प्रमाणे होती.

१) मानव हा जन्मत: स्वतंत्र आहे. तो स्वंतत्रच राहतो. त्याला समान हक्कप्राप्त होतात.

२) सामाजिक जीवनात व्यक्ती, व्यक्तींमध्ये भेदभाव करता येणार नाही.

३) मानवाच्या नैसर्गिक अविनाशी हक्काचे रक्षण करणे हे प्रत्येक राजकीय संस्थेचे ध्येय असले पाहिजे ते म्हणजे स्वातंत्र्य, मालमत्ता संपादन, सुरक्षितता, अन्यायांचा प्रतिकार ही होत.

४) दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधाला न दुखवणे. स्वइच्छेनुसार वागण्याचे स्वातंत्र्य हे प्रत्येक व्यक्तीला असलेच पाहिजे.

५) आचार, विचार, उच्चार मतप्रदर्शन करणे इत्यादी हक्क असतील .

६) कायद्याचे विहीत राहून आरोप निश्चित करणे.

७) विना चौकशी कोणासही तुरूंगात ठेवता येणार नाही.

८) आरोप सिध्द झालेशिवाय शिक्षा देण्यात येवू नये. कायद्याद्वारे सामाजिक समता प्रस्थापित करणे.

९) सार्वभौमत्व हा राष्ट्राचा अधिकार आहे. तो व्यक्ती अथवा संस्थेला घेता येणार नाही.

१०) फ्रेंच लोकच अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवतील.

११) सर्व देशात जनकल्याणकारी कायदे निर्माण केले जातील.

राष्ट्रीय सभेने केलेल्या या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यामध्ये व्यक्तीस्वांतत्र्य, नागरीहक्क, नागरी मताधिकार, कायदा व न्याय, शिक्षा पध्दती, खाजगी मालमत्तेचा अधिकार स्पष्ट केलेला आढळतो. या जाहीरनाम्यामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तीन तत्वांचा जोरदार प्रसार झाला.

**क) एकसमान राज्य व्यवस्था स्थापन :**

राष्ट्रीय सभेने फ्रान्समध्ये एकसमान राज्यव्यवस्था निर्माण केली. ८३ प्रांत, विभाग, कॅटंन्स, कम्युन्स निर्माण केली व ग्रामीण भागात स्थानिक कौन्सिलची तरतुद केली. न्यायाधिशांची निवड लोकामार्फत सुरू केली. कायदे जास्तीजास्त सुटसुटीत केले.

**ड) अर्थव्यवस्थेची पुर्नरचना :**

फ्रान्स आर्थिकदृष्ट्या दुबळा होता. तो सशक्त बनविणेसाठी राष्ट्रीय सभेने प्रयत्न केले. चर्च या धर्मसत्तेची सर्व मालमत्ता जप्त केली व फ्रान्समध्ये कागदी चलन सुरू केले. चर्च संबंधी अत्यंत कडक उपाय करून फ्रान्समध्ये धार्मिक संहिष्णुता जाहीर केली. जुलै १७९० मध्ये चर्चला मुलकी राजघटना लागू केली. बिशप, आर्चबिशप यांची नियुक्ती अधिकार लोकांना दिले. त्यांना रोख पगार सुरू केला. यामुळे पोपची धार्मिक सत्ता नाराज झाली.

**इ) नवीन राज्यघटना निर्माण :**

सन १७८९ ते १७९१ पर्यंत राष्ट्रीय सभेने जे वेळोवेळी हूकूम, जाहीरनामे, कायदे केले होते ते एकत्र करून राष्ट्रीय सभेने फ्रेंच लोकांना घटना दिली. व राजाने त्यास संमती दिली. ही फ्रान्सची लिखीत राज्यघटना होय. नविन राज्यघटनेनुसार फ्रान्समध्ये मर्यादीत घटनात्मक राजेशाही अस्तित्वात आली. राजाच्या

अमर्याद सत्तेवर अंकूश लावण्यात आला. मर्यादित राजेशाही व सत्ताविभाजन ही दोन्ही वैशिष्ट्ये या राज्यघटनेमध्ये होती. या राज्यघटनेमध्ये कायदेमंडळ निर्माण करण्यात आले. या कायदे मंडळाचे सदस्य निवडणूकीने निवडून घेण्यात आले. लोकांना मतदानाचे अधिकार दिले. न्याय शाखा पुर्नजिवीत करण्यात आली. न्यायाधिशांची निवड निवडणूका घेवून करण्यात आली. यांचा कार्यकाळ चार वर्ष ठेवण्यात आला. पंच पध्दती सुरू करण्यात आली. फ्रान्समधील राज्यकारभार विक्रेंद्रित केला अधिकारी, कारकून, यांची योग्य पध्दतीने निवड केली. प्रशासनातील गोंधळ कमी केला. राष्ट्रीय सभेने आपल्या काळात असे भरीव कामकाज केले. राष्ट्रीय सभेने जे कार्य केले त्यामुळे फ्रान्सच्या राजकारणाला विशिष्ट अशी दिशा मिळाली. अनियंत्रित राजेशाहीचे जोखड फेकून देवून जनतेला राज्यकारभारात सहभाग मिळून देणेसाठी राष्ट्रीय सभेने केलेले कार्य महत्वाचे मानले जाते.

- **राष्ट्रीय सभेच्या कार्याचे मुल्यमापन :**

राष्ट्रीय सभेने १७८९ ते १७९१ या काळात महत्वपूर्ण कार्य केले. जुनी राज्यव्यवस्था, सरंजामदार वर्ग, जुनी अर्थव्यवस्था, बदलून टाकून चर्चच्या संस्थेत बदल घडविले. प्रशासन सोपे करण्याचा प्रयत्न केला. कांही इतिहासकारांच्या मतानुसार राष्ट्रीय सभेने घेतलेल्या निर्णयामुळे फ्रान्समध्ये झुंडशाहीस प्रारंभ झाला. धार्मिक प्रश्नामुळे फ्रान्सच्या समाजात दरी निर्माण झाली. कायदे मंडळ आणि कार्यकारी मंडळ वेगळे झाल्याने त्यांची कार्यक्षमता नष्ट झाली. जुन्या जाणकार लोकांना डावलले गेले. नवीन तरूणांना वाव दिला. या गोष्टींचा फायदा होण्या ऐवजी नुकसान झाले असे म्हणतात. तरी राष्ट्रीय सभेने केलेले कार्य पुढे टिकले फ्रेंच जनतेला प्रेरणा व स्फूर्ती मिळाली. ही गोष्ट कमी महत्वाची नाही.

**ब) राज्यक्रांतीतील महत्त्वाचे नेते :**

- **माक्सीमील्यँ फ्रांस्वा रोब्झपिअर (१७५८–१७९४) :** Maximilien Robespierre

फ्रान्समधील एक जहाल क्रांतिकारक आणि तत्कालीन जॅकबिन्झ गटाचा एक पुढारी. त्याचा जन्म ॲरास येथे मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील वकील होते. आईच्या मृत्यूनंतर वडील घर सोडून गेले; म्हणून आजोबांनी त्याचा सांभाळ केला. त्याचे प्रारंभीचे शिक्षण जन्मगावीच झाल. पुढे त्याने पॅरिसच्या लूई ले-ग्रां या जेझुइट कॉलेजमधून वकिलीची पदवी घेतली. या काळात त्याच्या मनावर रूसो व व्हॉल्तेअर यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्याने ॲरास येथे वकिली व्यवसायास प्रारंभ केला (१७८१); तथापि त्याची साहित्यविषयक उर्मी जाज्वल्य होती. 'रोझाती' या वाङ्मय मंडळाचा तो सभासद झाला. रूसोच्या आदर्शन समाजाविषयी त्याला आकर्षण होते. क्रांतीनंतर तो लोकसत्ताक गणराज्याच्या पुरस्कनर्ता आणि प्रभावी वक्ता म्हणून पुढे आला. तो गरीबांचा कैवारी होता. राष्ट्रीय सभेत तो ॲरासचा उदारमतवादी प्रतिनिधी म्हणून निवडून गेला. त्याने राष्ट्रीय सभेत एका याचिकेद्वारे सोळाव्या लूईला पदच्युत करण्याची मागणी केली (१७९१). पुढे नॅशनल कन्व्हेन्शन निवडणकीत पॅरिसमधून तो सर्वात जास्त मते मिळवून निवडून आला. जानेवारी १७९३ मध्ये सोळाव्या लूईचा शिरच्छेद करण्यात आला व जहालांचे वर्चस्व वाढू लागले. ३१ मे १७९३ रोजी मवाळ जिरॉंडिस्टांचा प्रभाव झाला व राजसत्तेवर जहाल जॅकबिन्झांचे वर्चस्व

प्रस्थापित झाले. ४ जून १७९३ रोजी तो सुरक्षासमितीचा सभासद झाला. सत्ता हातात आल्यानंतर रोब्झपिअरने आपल्या विरोधकांचा अतिशय क्रूरपणे नि:पात करावयास सुरुवात केली. त्यात अनेक क्रांतिकारकांचा बळी गेला.

तत्कालीन राजकारणात त्याने गरीबी निवारण यांसारखे प्रयोग केले; कायद्यात बदल घडवून आणले. त्याने प्रज्ञादेवीची उपासना रद्द करून स्वत:च्या अशा धर्मपंथाचे प्रवर्तन केले. परमेश्वराचे अस्तित्व व आत्म्याचे अमरत्व हे मानवजातीचे स्वप्न आहे, असे त्याचे मत होते. त्याने मानवी अधिकारांचा व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्याला फ्रान्समध्ये सद्‌गुणांचे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वत्रयींवर आधारीत राज्य स्थापन करावयाचे होते; कारण विश्वात्मक मानवी बंधुभावावर त्याचा विश्वास होता; तथापि त्याच्या दहशतवादामुळे राष्ट्रीय समितीतील सदस्य त्याच्या विरोधात जाऊ लागले. देशसंरक्षण समितीत रोब्झापिअर विरुद्ध बहुमत सिद्ध झाले. त्याच्यावर अनेक आरोप लादण्यात आले. त्यामुळे त्याच्याविरुद्ध उठाव झाला व त्याला पकडण्यात आले. २६ जुलै १७९४ रोजी त्याच्यावर खटला भरून फाशीची शिक्षा फर्माविण्यात आली व त्याला ठार मारण्यात आले.

रोब्झपिअर हा यूरोपातील सतराव्या व अठराव्या शतकांतील वैचारिक चळवळींनी प्रभावित झालेला एक मानवतावादी विचारवंत होता. अविवाहित राहून त्याने विवेकनिष्ठ नागरी सद्‌गुणांची जोपासना केली. प्रजासत्ताक लोकशाही, मानवी अधिकार व स्वातंत्र्य या तत्त्वांवर त्याचा विश्वास होता. गरिबांविषयी त्यास कणव होती; पण या उच्च मूल्यांना प्रस्तापित करण्याच्या प्रयत्नात त्याने दहशतवादी हुकूमशाही शासनाचा अवलंब केला.

- **झॉर्झ झाक दांताँ (१७५९ – १७९४) :**

फ्रेंच राज्यक्रांतीतील एक प्रभावी वक्ता व मुत्सद्दी. त्याचा जन्म आर्सीस्यूरोब ऑबे (शँपेन) येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील एक झाक व सामान्य वकील होते. त्यांच्या मारी मादलेन काम्यू या दुसऱ्या पत्नीचा झॉर्झ हा मुलगा. रीम्झ या विद्यापीठातून कायद्याची पदवी घेऊन (१७८५) तो नोकरीसाठी पॅरिस येथे आला आणि अल्पावधीतच त्याने अर्थसंचय करून अधिवक्त्याचे कार्यालय विकत घेतले. हळूहळू तो फ्रेंच राज्यक्रांतीत सहभागी झाला.

१७८९ मध्ये प्रत्यक्ष क्रांतीस सुरूवात होताच कॉर्देल्येच्या नागरी फौजेत तो सामील झाला आणि लवकरच जिल्ह्याचा अध्यक्ष झाला. त्याने 'कॉर्देल्ये क्लब' या राजकीय संस्थेची स्थापना केली. यामुळे त्याची लोकप्रियता वाढली. त्याची पॅरिस येथे विभागशासक म्हणून निवड झाली (१७९१). या वेळी जॉकबिन्झ आणि जिराँदिस्त या दुसऱ्या दोन राजकीय संस्थाही फ्रान्समध्ये राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या खटपटीत होत्या. संविधानात्मक राजेशाही नष्ट करण्यात व १७९२ मध्ये झालेल्या राजघराण्यातील व्यक्ती व सरदार यांच्या कत्तलीस (सप्टेंबर कत्तल) त्याला इच्छा असूनही विरोध करता आला नाही, म्हणून लोकमतासाठी त्याने संमती दर्शविली, यानंतर फ्रान्सवर ऑस्ट्रिया व प्रशिया यांनी स्वारी केली, त्यावेळी त्याने जे भाषण केले ते संस्मरणीय ठरले. त्याचे म्हणणे असे होते की, क्रांतिकारकांनी प्रथम फ्रान्सच्या

नैसर्गिक सीमा ठरवून राष्ट्राची उभारणी करावी. साहजिकच क्रांतीनंतरच्या हंगामी सरकारात त्याची मंत्री म्हणून निवड झाली आणि कार्यकारी समितीचा तो सर्वाधिकारी झाला. सुमारे एक वर्ष दांताँ हा जवळजवळ हुकूमशाह होता. १७९३ मध्ये त्याने त्याची संरक्षण समिती आणि क्रांतिकारी लवाद यांचा अध्यक्ष म्हणून निवड झाली; पण त्याच वर्षी झाक रने एबेअरचे वर्चस्व कॉर्दल्ये क्लबमध्ये वाढले. अंतर्गत कलह कमी करण्यासाठी त्याने प्रयत्न केले. लोक जॅकबिन्झकडे नव्या नेतृत्वासाठी आशेने पाहू लागले. यावेळी रोब्झपीअर व त्याचे अनुयायी यांचे महत्त्व वाढले होते. यामुळे १० जुलै १७९३ रोजी त्याची फेरनिवड झाली नाही. क्रांतीची सर्व सूत्रे ओघानेच रोब्झपीअरच्या हातात गेली. दांताँने राजकारणातून निवृत्त होण्याचा मार्गही हाताळऊन पाहिला; पण मित्रांच्या आग्रहाने तो पुन्हा राजकारणात खेचला गेला. रोब्झपीअरने प्रथम एबेअरच्या अनुभागांचे खच्चीकरण केले आणि रोब्झपीअरच्या धोरणास दांताँ पाठिंबा देऊनही अखेर रोब्झपीअरने त्याच्या अनुयायांसह त्याला पकडले आणि पॅरिस येथे फाशी दिले.

दांताँच्या चरित्र आणि चारित्र्य यांबद्दल मतभेद आहेत. काहींच्या मते तो एक संधिसाधू राजकारणी होता आणि धनसंचयासाठी त्याने खऱ्याखोट्याची कधीही तमा बाळगली नाही, तर इतर त्याच निष्ठावान देशभक्त मानतात. कसेही असले, तरी फ्रेंच राज्यक्रांतीनंतर काही वर्षे तो फ्रान्सचा अनभिषिक्त राजा होता.

- **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र.२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दिवाळखोरपणा नको, कर वाढ नको,.......... असे धोरण कोणत्या अर्थमंत्र्याने जाहीर केले.

अ) नेकर ब) कॅलोन क) टरगॉट ड) ब्रियान

२. ................ या अर्थमंत्र्याच्या काळात फ्रांन्सवर तीनशे कोटी डॉलरचे कर्ज झाले.

अ) नेकर ब) कॅलोन क) टरगॉट ड) ब्रियान

३. ............ या वर्गाने आम्हींच राष्ट्रीय सभा आहोत असे जाहीर केले.

अ) संरजामदार ब) धर्मगुरू क) थर्ड इस्टेट ड) बुर्ज्वा

४. .............. हा थर्ड इस्टेटचा नेता होता.

अ) डिलुने ब) कॅने क) फॅने ड) मिरॅबो

५. .......... हे ठिकाण फ्रेंच जनतेवरील जुलमाचे प्रतिक होते.

अ) पॅरिस ब) व्हर्साय क) बॅस्टिल ड) सेंट

**क्रांतिनंतरच्या प्रमुख घटना**

- **पहिले फ्रेंच विधिमंडळ :**

राजा व राणी नजर कैदेत होते. फ्रान्समध्ये राष्ट्रीय सभा कार्य करीत होती. तेंव्हा राजा व राणीने फ्रान्समधून पळून गेलेले राजनिष्ठ लोक, स्वत:चा बंधू व इतरांच्या मदतीने क्रांती दडपण्याचा विचार केला व २० जुन १७९१ रोजी पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांचा प्रयत्न असफल ठरला. त्यांना पकडून आणून परत नजर कैदेत ठेवण्यात आले. यांनतर राष्ट्रीय सभेत राजाच्या अधिकाराबाबत सखोल चर्चा झाली. परंतू शेवटी राजालाच घटना प्रमुख म्हणून ठेवण्यात आले. त्यावर राजाच्या सही घेवून घटना मंजूर होवून नविन कायदे मंडळ अस्तित्वात येण्यापूर्वी राष्ट्रीय सभा बरखास्त करण्यात आली. पुढे कायदे मंडळाच्या निवडणूका घेण्यात येवून ७४५ जणांचे एक कायदेमंडळ तयार झाले. यात जुने अनुभवी सभासद नव्हते. त्यामुळे पुन्हा फ्रान्स संकटाच्या गर्तेत अडकला. या काळात फ्रान्समध्ये अनेक पक्ष निर्माण झाले. फ्रान्सच्या जिराँड या भागातून आलेल्या सदस्यांना जिराँडिन्स् म्हणून ओळखले जाई. तर पॅरिस परिसरातील प्रतिनिधीच्या गटास जँकोबिन्स् म्हणत असत. या जहाल गटाचे नेतृत्व मिरॅबो व लाफायते यांच्याकडे होते. यामधील कॉर्डेलियर हा गट अति जहाल होता. डाँटन हा या गटाचा प्रमुख होता. ग्रामीण भागातून आलेल्या प्रतिनिधींना नियंत्रित राजेशाही मान्य होती. जिराँडिन्स हे संयमी व मवाळवादी होते. त्यांना फ्रांन्समध्ये प्रजाकसत्ताक राजवट हवी होती. तर जँकोबिन्स् प्रतीनिधींना राजेशाही पूर्णपणे नष्ट करावयाचे होती. नवीन कायदे मंडळाने धर्मगुरूवर पहिल्यांदा निर्बंध लादले व क्रांतीकाळात पळून गेलेल्यांची मालमत्ता जप्त करण्याचे निर्णय घेतले. सोळाव्या लुईने याला विरोध केला. त्यामुळे या नव्या विधीमंडळाने सोळाव्या लुईचे राजपद नष्ट करून हंगामी सरकार स्थापन केले.

फ्रेंच राजक्रांतीमुळे युरोपातील राजेशाहीला धोका निर्माण झाला अनेक देश फ्रान्सचे शत्रू बनले. अशा परिस्थितीत कायदे मंडळाने २० एप्रिल १७९२ रोजी ऑस्ट्रिया-विरूद्ध युद्ध पुकारले. परंतू युध्द आघाड्यावर फ्रान्सचा पराभव होवू लागला. या काळात सोळावा लुई आणि राणीने क्रांती विरोधी मदत करण्याचे आव्हान युरोपीयन देशांना केले. ऑस्ट्रिया व प्रशिया या देशानी राजेशाही संरक्षणासाठी लुईला पाठींबा दिला. व फ्रान्समध्ये पुन्हा बुरबाँ राजघराण्यांची सत्ता निर्माण केली जाईल अशी घोषणा केली. त्यामुळे लोकांनी राज्यघटना रद्द करून कायदेमंडळ (विधिमंडळ) बरखास्त केले नवीन निवडणूका घेतल्या. आणि २० सप्टेंबर १७९२ रोजी नॅशनल कन्व्हेन्शन सरकार सत्तेवर आले.

- **नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारचे – कार्य :**

२१ सप्टेंबर १७९२ ते २६ ऑक्टोंबर १७९५ या काळात फ्रान्समध्ये नॅशनल कन्व्हेंन्शन कार्य केले. या नॅशनल कन्व्हेंन्शन सकारला अनेक गुंतागुतीचे प्रश्न व समस्या सोडवाव्या लागल्या उदा. सोळाव्या लुईच्या बाबतचा प्रश्न, राजेशाही समर्थन करणाऱ्या देशांबाबत संघर्षचे प्रश्न, अंतर्गत उठाव व बंडाळाचे प्रश्न, फ्रांन्समध्ये समाजसुधारण्याचा प्रश्न व फ्रांन्सची अर्थिक प्रगती करणे इ. गुंतागुतीच्या समस्या या सरकारपुढे होत्या.

राष्ट्रीय सभेच्या बरखास्तनंतर फ्रान्सची नवीन असेब्ली अस्तीत्वात आली यामध्ये विविध पक्षांचे सदस्य होते. या सरकारात जँकोबिन्स् लोकांचा मोठा प्रभाव होता.

**१) सोळाव्या लुईस फासावर चढविले :**

या सरकारने राजपद नष्ट केले. सोळाव्या लुईवर देशद्रोहाचा आरोप ठेवून खटला चालविला या मध्ये राजा सोळावा लुई याला फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. २१ जानेवारी १७९३ रोजी त्याला फाशी देण्यात आली. पुढे १६ ऑक्टोंबर १७९३ रोजी राणी मेरी अॅटोईनेट हीला सुद्धा फासावर लटकवले. नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारने राजेशाही सर्व जुने अवशेष नष्ट केले.

**२) विदेश निती :**

नॅशनल कन्व्हेंन्शन सरकार सत्तेवर आल्यानंतर राजा सोळावा लुईस जो कोणी मदत करील तो फ्रांन्सचा शत्रू राहील असे जाहीर केले. पुढे सोळावा लुईस फासावर लटकविल्यानंतर युरोपातील राजेशाही राष्ट्रे फ्रांन्सची शत्रू राष्ट्रे झाली. या मध्ये ऑस्ट्रिया, रशिया, इंग्लंड, हॉलंड, स्पेन, सार्डीनिया या राष्ट्रानी फ्रांन्सवर आक्रमण केले.

नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारने कॅरनाट या सेनापतीच्या नेतृत्वाखाली युद्धाची तयारी केली. नविन सैन्य उभे करण्यात आले. राज्यक्रांतीचे रक्षण करणे या ध्येयाने लष्कराने मोठा पराक्रम केला. रशियाने फ्रांन्स बरोबर तह केला. तर हॉलंडने मैत्री केली. मात्र ऑस्ट्रिया, इंग्लंड व सारर्डानिया या देशाबरोबरच फ्रांन्स संघर्ष करीत राहीला.

**३) अंतर्गत धोरण :**

नॅशनल कन्व्हेन्शन सरकारला अंतर्गत धोरण राबविताना कठिण परस्थितीला तोंड दयावे लागले. या सरकारने या परस्थितीला तोंड देण्यासाठी 'सार्वजनिक सुरक्षा समिती' व 'सर्वसाधारण सुरक्षा समिती' या दोन कमिट्या स्थापन करून देशात दहशतीचे वातावरण निर्माण केले. या समित्याबरोबरच क्रांतीकारी न्यायालये स्थापन करून अंतर्गत बंडाळया मोडून काढण्यासाठी उपाय योजना करण्यात आली.

राष्ट्रविरोधी चळवळी करणाऱ्यावर दहशत बसविण्यात आली. संशयावरून हजारो लोकांना ठार मारण्यात आले. हजारोंना तुरूंगात डांबण्यात आले व अंतर्गत शांतता प्रस्तापीत करण्याचा प्रयत्न केला.

- **दहशतीचे राज्य :- १७९३ ते १७९४ :**

फ्रान्समध्ये दहशतीचे राज्य १ वर्ष ४ महिने चालले. क्रांतीकारी न्यायालये स्थापन करण्यात आली. त्याच दिवसापासून फ्रान्समध्ये दहशतीच्या राज्यास प्रारंभ झाला. २९ जुलै १७९४ रॉबेस्पिअर या जहाल नेत्याच्या फाशीनंतर दहशतीच्या राज्याचा शेवट झाला. जिरॉडिन्सच्या अकार्यक्षम प्रशासनामुळे देशात गोंधळ निर्माण झाला अशा मध्येच परकिय राष्ट्राचे आक्रमण चालूच होते. क्रांती वाचविणे आवश्यक होते. म्हणून

जँकोबिन्स् पक्षांच्या जहाल नेत्यांनी फ्रान्समध्ये दहशत निर्माण केली. यामध्ये रॉबेस्पिअर, डॉन्टन, कॅरनॉट, सेंटजॅस्ट इत्यादी नेते आघाडीवर होते.

या सरकारने सार्वजनिक सुरक्षा समितीला पोलिसी अधिकार दिले. क्रांतीकारी न्यायालयाने कायदा आणि सुव्यवस्थेबाबत लोकांच्या मनात दहशत निर्माण केली. राष्ट्रद्रोह करणाऱ्यांना फासावर लटकविण्यात आले. या लोकांना फाशी देणेसाठी 'गिलोटीन' नावाचे यंत्र निर्माण केले. या यंत्राने अनेक मवाळ कार्यकर्ते, क्रांतीविरोधक आणि क्रांतीसमर्थक याना फाशी दिले. दहशतीच्या राज्यांचा पुरस्कर्ता रॉबेस्पिअरने या काळात अमर्याद हुकूमशाही चालविली. भयानक अत्याचार पाहून डॉन्टन याने हा रक्तपात व अत्याचार न्यायोचित नाही असे विचार बोलून दाखविल्यानंतर त्यालाही फाशी देण्यात आले. डॉन्टनच्या फाशीनंतर कन्व्हेन्शन सरकारमधील सदस्य अस्वस्थ झाले, उद्या ही वेळ आपल्यावर येईल या भितीने त्यांचा थरकाप उडाला रॉबेस्पिअर हाच फ्रेंच स्वातंत्र्य पायदळी तुडवीत आहे. यावर कन्व्हेन्शन सरकारची बैठक होवून सरकारनेच रॉबेस्पिअरलाच पकडण्याची आज्ञा केली. २८जुलै १७९४ ला रॉबेस्पिअरला पकडण्यात आले व त्याला गिलोटीनवर चढविण्यात आले. त्याच्या मृत्यूबरोबरच फ्रान्समधील मानवी हत्यांकांडाची शृखंला थांबली. ही दहशहतीची कारकिर्द फ्रान्सच्या इतिहासाला काळींमा लावलाणारी ठरली. यामध्ये अंदाजे चाळीस हजार लोकांचा गिलोटीनवर शिरच्छेद करण्यात आला. दोन लाख लोकांना तुरूंगात डांबण्यात आले. दहशतीच्या राज्यानंतर नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारने फ्रान्समध्ये खालील महत्वपूर्ण कार्य केले.

त्यामध्ये – शिक्षणाचे माध्यम म्हणून फ्रेंच भाषेचा वापर सुरू केला. कायद्यांचे एकसूत्रीकरण केले. शेती संदर्भात समाजवादी प्रयोग सुरू केले.जमिनीचे समान वाटप केले. धर्मविषयक क्षेत्रात विज्ञानावर विश्वास दाखविला. राष्ट्रीयत्वाला उत्तेजन दिले.कालगणनामध्ये बदल केले. राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना केली. नॉर्मल स्कूल व तंत्रमहाविद्यालये सुरू केली. फ्रान्समध्ये वस्तूसंग्रहालयाची निर्मिती केली. फ्रान्समध्ये नवीन घटना निर्माण करून द्विगृही कायदे मंडळ तयार केले.

- **नॅशनल कन्व्हेंन्शनचे मुल्यमापन :**

नॅशनल कन्व्हेन्शन सरकारचे फ्रान्समधील कार्य 'मेट्रीक पध्दती' सारखे होते कन्व्हेन्शन सरकारने फ्रान्सला वजनामापाची पध्दती दिली. देशप्रेम, राष्ट्रीयत्व याला महत्व देवून कायदयाचे सुसूत्रीकरणे केले. भाकरी इतकेच शिक्षणाला महत्व दिले. मुले ही आई–बापा पेक्षा राष्ट्राची संपत्ती असतात हे दाखवून दिले. दहशतीच्या राज्यामुळे बदनाम झालेल्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या सरकारने कामकाज केले. मिरॉबो, मॅरट, रॉबेस्पिअर, कॅरनॉट, सेन्टजंस्ट, डॉन्टन यांनी फ्रान्सच्या याकाळात कार्य केले. त्यांनी फ्रेंच राज्यक्रांती यशस्वी करणे तसेच फ्रान्सचे संरक्षण करून लोकाशाही स्थिर करणेसाठी फार मोठे योगदान दिले. पुढे १७९५ च्या नवीन राजघटनेनुसार संचालक मंडळ अधिकारावर आले. या मंडळाने १७९५ ते १७९९ या काळात फ्रान्सचा कारभार चार वर्ष केला. या काळात मात्र फ्रान्समध्ये गोंधळ, भ्रष्ट्राचार झालेने नेपोलियन बोनापार्टने योग्य संधीचा फायदा घेवून कँन्सुलेटची सत्ता आपल्या हातात घेतली.

### २.२.३ फ्रेंच राज्यक्रांतीचे फ्रान्सवरील परिणाम :

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम सर्वात प्रथम फ्रान्स राष्ट्रावर झाले. ते याप्रमाणे –

**१) अनियंत्रित सत्ता संपली :**

फ्रान्समध्ये कित्येक शतके चालू असणारी बुरबाँ वंशाची अनियंत्रित व जुलमी राजसत्तेचा शेवट क्रांतीमुळे झाला. या क्रांतीनंतर फ्रान्समध्ये नेपोलियन बोनापार्ट, अठरावा लुई, लुई फिलीपी आणि तिसरा नेपालियन यांनी राजसत्ता भोगली. परंतू त्यांच्या राजसत्तेवर मर्यादा होत्या. जुने राजसत्तेचे वैभव नाहीसे झाले. फ्रांन्समध्ये कांही अंशी घटनात्मक राजेशाही आणि नंतर लोकसत्ताक राज्यपद्धती वापरली गेली.

**२) सामाजिक विषमतेचा अंत :**

या क्रांतीने फ्रान्समधील सामाजिक विषमतेचा अंत केला. क्रांतीपूर्व कालखंडामध्ये तेथे सरदार, उमराव, संरजामदार, धर्मगुरू, राजाचे नातेवाईक, इ. विषेश अधिकार होते. फ्रान्समध्ये उच्च, निच भेदभाव होते. गरीब, मध्यम वर्गाचे प्रचंड हाल होते. या क्रांतीने देशात वरिष्ठ वर्गाचे विशेष अधिकार मोडून पडले. सामाजिक समता प्रस्थापित करण्यात आली. लायक लोकांमधूनच प्रशासनातील सर्व पदे भरली जावू लागली.

**३) गुलामगिरी संपली :**

फ्रांन्समध्ये चालत आलेली वेटबिगारी, भुदास पद्धत आणि गुलामगिरी या पद्धती विषमतेचे प्रतीक होत्या. या क्रांतीमुळे या सर्व पद्धती नष्ट झाल्या. क्रांतीमुळे सर्व लोक स्वतंत्र व समान झाले. अन्याय, पिळवणूक बंद झाली. स्वातंत्र, समता, बंधुत्व यावर आधारित नवसमाज निर्मिती होवू लागली.

**४) प्रशासनात सुधारणा :**

या क्रांतीमुळे देशातील राज्यकारभार सुधारला. विविध ठिकाणीच चालणारी बेशिस्त, वशिलेबाजी, पक्षपात, विविध पातळीवर लोकांवर होणारा अन्याय या क्रांतीने गाढून टाकला. सर्व देशात समान कायदेपद्धत अंमलात आली. कायद्याचे सुसूत्रीकरण झाले क्षेत्रात सुधारणा झाली. कायद्यापुढे सर्व फ्रेंच समान ठरले.

**५) नेपोलियन बोनापार्टचा उदय :**

नेपोलियन बोनापार्टला फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य मानले जाते. क्रांतिनंतरच्या अराजकातून आणि अपयशातून त्याचा उदय झाला. दुबळ्या संचालक मंडळाकडून त्याने १७९९ मध्ये सत्ता स्वतःच्या हातात घेतली आणि तो फ्रान्सचा सत्ताधिश बनला.

**ब) फ्रेंच राज्यक्रांतीचे जगावरील परिणाम :**

१७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे दूरगामी परिणाम जगावर झाले ते या प्रमाणे –

१)  **जागतिक राजसत्तेवर प्रहार झाला :**

१७८९ च्या फ्रेंच राजक्रांतीने युरोपातील व जगातील अनियत्रित राजेशाहीवर मर्यादा आणल्या. राजा हा ईश्वराचा अंश आहे हा सिद्धांत मोडून पडला. राजा आपल्या लहरी प्रमाणे अथवा मर्जीप्रमाणे राज्य करू शकत नाही. यामध्ये लोकांची अंतिम सार्वभौम इच्छा महत्वाची असते. हा विचार फ्रेंच राज्यक्रांतीने जागतिक स्तरावर नेला.

२)  **वर्ग पद्धती नष्ट झाली :**

जागतिक अनेक देशामध्ये चालत आलेली परंपरागत वर्ग पद्धती संपुष्ठात आली. सर्व लोक समान आहेत, ही कल्पना या क्रांतीने जोरात प्रसारीत केली. यातुनच पुढील काळात गुलामगिरी, वेठबिगारी, भूदास यांच्या विरोधी चळवळी जागतिक स्तरावर सुरू झाल्या. हा या क्रांतीचा मोठा जागतिक परिणाम होय.

३)  **जनता– लोक सार्वभौम :**

फ्रांन्समधील विविध बुद्धीवादी लोकांनी मांडलेले सिद्धांत हे राजेशाहीविरोधी होत. प्रजा ही सार्वभौम असून राजा सार्वभौम नाही, राजा हा प्रजेचा सेवक आहे, त्यामुळे जनता अथवा लोकच आपल्या इच्छेनुसार राज्यकर्ते व शासन पद्धत ठरवू शकतात. अन्यायी राजसत्ते विरोधात उठाव अथवा बंड करण्याचा अधिकार जनतेस आहे. हे या क्रांतीने सिद्ध केले.

४)  **स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधूत्व :**

फ्रेंच राजक्रांतीने जागतिक स्तरावर स्वांतत्र्य, समता, विश्वबंधूत्व या तीन अमूल्य तत्वांचा जगामध्ये जोरदार प्रसार केला. या तत्वासाठीच फ्रेंच लोकांनी आपली प्राणांची आहूती दिली. व त्यामध्ये ते यशस्वी झाले. पारतंत्र्यांत असणाऱ्या राष्ट्रामध्ये ही तीन तत्वे वेगाने प्रसारित झाली. या राष्ट्रामध्ये स्वांतंत्र्यचळवळी सुरू झाल्या.

५)  **राष्ट्रीयत्व भावना वाढीस लागली :**

लोकांनी आपल्या देशावर निसीम्म प्रेम, भक्ती केली पाहीजे. हे तत्व या क्रांतीने दिले. एकजूट असल्यास शत्रूचा पराभव होवू शकतो. हे फ्रान्सने जगाला दाखविले. त्यामुळे जागतिक स्तरावर राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. या घटनेचे परिणाम पुढील काळात दिसून आले. युरोप खंड, आशिया खंड आणि मध्य पूर्वेत राष्ट्रीयत्वाच्या चळवळीने जोर धरला. थोडक्यात फ्रेंच राज्यक्रांती ही दुरगामी परिणाम करणारी घटना मानली जाते.

## ४.३ सारांश :

१७८९ च्या फ्रेंच राजक्रांतीने जागतिक इतिहासावर दूरगामी परिणाम केले. बूरबाँ घराण्याची जुलमी राजवट, फ्रान्समधील सामाजिक विषमता, अनैतिक वागणारे धर्मगुरू, राजा सोळाव्या लुईचा नाकर्तेपणा, राणीचा उधळा स्वाभाव, बदसल्ला देणारे अधिकारी, संपूर्ण देशाची डगमगणारी अर्थव्यवस्था चुकीचे अर्थमंत्री

व त्यांचे निर्णय, या सर्व परिस्थितीमुळे क्रांती स्थिती निर्माण झाली. अशा मध्येच राजाने बोलविलेले जाणकार लोकांचे मंडळ इंस्टेट जनरल चे अधिवेशन, त्यामध्ये झालेला गोंधळ त्यामुळे निर्माण झालेली राष्ट्रीय सभा, आणि राजा व जनता यांच्यातील कटुता, राजाने राष्ट्रीय सभेला दडपण्याचा केलेला प्रकार त्यातुन निर्माण झालेले बॅस्टिल प्रकरण, मानवी हक्काचा जाहिरनामा, नवीन राज्यघटना, राजा-राणीने पळून जाणेचा केलेला प्रयत्न, परकिय राष्ट्राच्या मदतीने क्रांती दडपण्याचा झालेला प्रयत्न या सर्वाचा परिणाम म्हणजे दहशतीची राजवट, या मधून राजा-राणीस दिलेली फाशी नॅशनल कन्व्हेन्शन सरकारने केलेले कामकाज, संचालक मंडळाचे अपयश आणि नेपोलियन बोनापार्टचा उदय या अत्यंत महत्वपूर्ण घटना आहेत.

फ्रेंच राज्यक्रांतीचे युरोप आणि जगावर दुरगामी परिणाम झाले. या क्रांतीने युरोपातील लोकांना जुलमी राजसत्तेच्या विरोधात, सामाजिक विषमते विरोधात लढण्याची प्रेरणा दिली. फ्रान्सच्या प्रशासनास सुधारणा झाल्या युरोप आणि जगातील असणाऱ्या राजसत्तेवर या क्रांतीने मर्यादा पडल्या. जागतिक स्तरावर वर्ग पद्धती हळूहळू नष्ट झाली. प्रजा सार्वभौम आहे, राजा नव्हे. हे सिद्ध केले. जागतिक स्तरावर राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. 'स्वांतत्र्य, समता आणि विश्वबधूत्व' ही तीन सर्वश्रेष्ठ तत्वे जगाला दिली. म्हणून फ्रेंच राज्यक्रांती अतिशय महत्वाची घटना आहे.

- **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र. - ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............... च्या धरसोड वृत्तीने फ्रान्समध्ये आर्थिक परिस्थितीत बिकट झाली.

अ) चौदावा लुई ब) पंधरावा लुई क) सोळावा लुई ड) राणी मेरी अॅटोईनेट

२. .............. या अर्थमंत्र्याने अंदाजपत्रक सादर केल्याने त्यास बडतर्फ व्हावे लागले.

अ) कॅलोन ब) नेकर क) ब्रियन ड) टरगॉट

३. फ्रान्समधील .................. ही संस्था इंग्लंडच्या पार्लमेंटसारखी लोक प्रतिनिधींची सभा होती.

अ) स्टेटस् जनरल ब) इस्टेट जनरल क) लायन डी कोर्ट ड) नॅशनल गार्डस्

४. ............... या संघटनेचा मिरॉबो हा प्रमुख होता.

अ) नॅशनल गार्डस् ब) स्टेटस् गार्डस् क) कोर्ट गार्डस् ड) इंस्टेट गार्डस्

५. ................. या दिवशी सामाजिक क्रांती झाली.

अ) १ ऑगस्ट ब) २ ऑगस्ट क) ३ ऑगस्ट ड) ४ ऑगस्ट

## २.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ :

१. दैवी अधिकाराचा सिद्धांत : राजा म्हणजे साक्षात परमेश्वराचा अंश होय. परमेश्वरानेच राज्यकारभारासाठी राजांस निर्माण केले आहे. हा परांपरागत चालत आलेला सिद्धांत होय.

२. टाईथ : धार्मिक कर

३. टॅली : सामान्य जनतेवरील मालमत्तेचा कर

४. सामाजिक करार : रूसोचा ग्रंथ

५. राष्ट्रीय सभा : सामान्य लोकांच्या प्रतिनिधींची झालेली एकजूट

६. राष्ट्रीय दिवस : १४ जुलै १७८९ रोजी राजेशाहीच्या अन्यायाचे प्रतिक बॅस्टिलचा पाडाव घटनेचा दिवस.

७. गिलोटीन : फाशी देण्याचे यंत्र.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १**

१) अ) बुरबाँ २) अ) थर्ड ईस्टेट ३) ब) रूसो

४) अ) माँन्टेस्क्यू ५) क) १८

- **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २**

१) क) टरगॉट २) ब) कॅलोन ३) क) थर्ड इस्टेट

४) ड) मिरॅबो ५) क) बॅस्टिल

- **स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र.३**

१) क) सोळावा लुई २) ब) नेकर ३) अ) स्टेटस् जनरल

४) अ) नॅशनल गार्डस् ५) ड) ४ ऑगस्ट

## २.६ सरावासाठी प्रश्न :

### अ) दिर्घोत्तरी प्रश्न :

१. सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या कारणांची सविस्तर चर्चा करा.

२. राष्ट्रीय सभेने केलेल्या कामाचा आढावा घ्या.

३. फ्रान्सच्या क्रांतीकाळातील महत्वपूर्ण घटनांचा आढावा दया.

४. युरोप आणि जगावर फ्रेंच राज्यक्रांतीचे कोणते परिणाम झाले ते सांगा.

५. नॅशनल कन्व्हेंन्शन सरकारचे कार्य लिहा.

**ब) टिपा लिहा.**

१. १६ वा लुई

२. राष्ट्रीयसभा.

३. रूसो

४. पहिले विधीमंडळ

५. नॅशनल कन्व्हेंन्शन

६. दहशतीची राजवट

## २.७ संदर्भ ग्रंथ यादी :


१, केळकर न.ची. 'फ्रेंच क्रांती' व्हीनस बुक स्टॉल पुणे.

२. वैद्य सूमन 'आधुनिक जग' मंगेश प्रकाशन, नागपुर १९७५.

३. कुलकर्णी अ.रा. / फडके श्री. रा. 'आधुनिक युरोप' देशमुख आणि कंपनी पुणे. १९७६.

४. Ketelbey, C.D.M. A short History of Modern Eueope, Surjeet Publication, Delhi 1978.

5. Gooh G. P. History of Modern Europe.1878-1919.

6. Mahajan V.D. History of Modern Europe Since 1789.

7. Hazew C.D. Modern Europe up to 1945.

8. Hayes Cariton J.H Contemporary EuropeSine 1870, Macmillion Co'Newyork 1958.

9. Rao B.V. History of Modern Europe Since 1789. S. Chand & Co.New Delhi. 1963.


❑❑❑

## घटक ३
# इटलीचे एकीकरण (१८७१)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ पार्श्वभूमी

३.२.२ मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि काव्हूर

३.२.३ व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय आणि इटलीचे एकीकरण

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- राष्ट्रवादाची संकल्पना, राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार याची कारणमीमांसा करता येईल.
- इटलीचे व जर्मनीचे एकीकरण यांचा राष्ट्रवादाशी असलेला सहसंबंध लक्षात येईल.
- इटलीच्या एकीकरणामधील मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि काव्हूर यांची भूमिका समजून घेता येईल.
- व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याची इटलीच्या एकीकरणातील भूमिका लक्षात येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, बी.ए. भाग ३ सत्र ५ मध्ये आपण १८ व्या व १९ व्या शतकामध्ये आधुनिक जगाच्या जडणघडणीचा अभ्यास करत आहोत. प्रस्तुत घटकात इटलीचे एकीकरण आणि घटक ४ मध्ये जर्मनीचे एकीकरण कसे झाले? हे आपण जाणून घेणार आहोत. या दोन्ही ऐतिहासिक प्रक्रिया घडून येण्यामागे राष्ट्रवादाचा उदय हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. सबब, इटली आणि जर्मनीचे एकीकरण जाणून घेण्यासाठी एकूणच आधुनिक जगाच्या जडणघडणीचे आकलन करून घेण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून

राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार याचा देखील अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक दशके चाललेल्या इटलीच्या एकीकरणाच्या आंदोलनामध्ये मॅझिनी, गॅरिबाल्डी, काव्हूर आणि व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांची महत्त्वाची भूमिका होती. इटलीचे एकीकरण हे युरोपमधील सत्ता समतोल बदलणारे आणि युरोपवर दीर्घकाळासाठी मुलभूत बदल घडवून आणणारा ऐतिहासीक टप्पा आहे. जर्मनीचे एकीकरण आणि जगातील अनेक देशामध्ये राष्ट्रवादाच्या उदयाला प्रेरणा देणारी घटना म्हणून देखील इटलीच्या एकीकरणाकडे इतिहासकार पाहतात. इटलीच्या एकीकरणाची ही संपूर्ण प्रक्रिया देखील आपण या घटकात समजून घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ पार्श्वभूमी

१८ व्या व १९ व्या शतकात झालेल्या जगाच्या जडणघडणीत विशेषतः युरोपची जी जडणघडण झाली त्यामागे युरोपात उदयाला आलेल्या आधुनिकतेच्या संकल्पनेचा मोठा वाटा आहे. 'आधुनिकता' या संकल्पनेचे महत्त्वाचे तत्व 'स्वातंत्र्य', 'समता' आणि 'बंधुता' ही मुल्ये मानली जातात. युरोपमध्ये सन १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांती पासून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुल्ये आधुनिकतेची मुल्ये म्हणून समोर आली. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपात जी मोठी घुसळण झाली त्यामध्ये 'राष्ट्रवाद' आणि त्याच्याशी संलग्न 'राष्ट्र-राज्य' यांचा विकास ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण प्रक्रिया घडून आली. 'राष्ट्रवाद' ही एक आधुनिक संकल्पना आहे. आधुनिक युरोपात राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासामुळे जगावर दूरगामी परिणाम झाले. राष्ट्रवादामुळे झालेले हे परिणाम जसे आपल्या आजच्या वर्तमानावर आहेत तसेच ते येणाऱ्या भविष्यकाळातील आणखी काही दशके तरी कायम राहतील असे खात्रीलायकरित्या म्हणता येते. म्हणून राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार याची प्रक्रिया जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

- **राष्ट्रवादाच्या उदयाची आणि प्रसाराची कारणे**

'धर्म, जात, कुटुंब, नातेसंबंध यांच्यापेक्षा राष्ट्र महत्त्वाचे', 'राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करायला हवे', 'राष्ट्रासाठी केलेले बलिदान सर्वोच्च असते', 'राष्ट्राइतके महत्त्वाचे काहीच नाही', 'आपले महान राष्ट्र अगदी प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे', 'राष्ट्राचा अपमान सहन केला जाणार नाही' इत्यादी प्रकारची वाक्ये आपण राजरोसपणे वेळोवेळी ऐकत असतो-उच्चारत असतो. आपल्या मनामध्ये देखील आपल्या देशाबद्दल-राष्ट्राबद्दल अशाच प्रकारच्या भावना असतात. 'राष्ट्राचे अस्तित्व ही एक नैसर्गिक बाब आहे' असे मानण्या इतका राष्ट्रवादाचा आपल्यावर प्रभाव असतो. पण खरचं 'राष्ट्र' आणि 'राष्ट्रवाद' या संकल्पना पुरातन आणि नैसर्गिक आहेत का? प्राचीन काळी एखाद्या विशिष्ट समूहासाठी राष्ट्र ही संकल्पना वापरली जायची उदा. बायबल आणि तत्सम प्राचिन ग्रंथामध्ये ज्यू किंवा इतर समुदायांसाठी राष्ट्र (Nation) या अर्थाच्या शब्दांचा उपयोग करण्यात आल्याचे आढळते. मात्र, इतिहासकारांच्या मते राष्ट्रवाद (Nationalism) ही एक आधुनिक संकल्पना/विचारसरणी आहे.

आधुनिक राष्ट्रवादाचा उदय हा अठराव्या शतकात पश्चिम युरोपात झाला. पश्चिम युरोपातून १९ व्या आणि २० व्या शतकात त्याचा प्रसार जगभर झाला. आधुनिक राज्यव्यवस्थेसोबत राष्ट्रवादाची संकल्पना जोडल्यामुळे राष्ट्रराज्यांचा उदय झाला. काहीवेळा आधुनिक राज्यांनी आपल्या जनतेच्या मनात राष्ट्रवादी भावना चेतवून आपल्या राज्याच्या सीमांतर्गत राहणाऱ्या लोकांमध्ये राष्ट्रवादी विचारांचा प्रसार केला. तर काहीवेळा बहुभाषिक, बहुवांशिक साम्राज्याविरोधात समान वांशिक अथवा भाषिकदृष्ट्या एक असणाऱ्या लोकांच्या समूहामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. अशा विविध प्रक्रियांच्या माध्यमातून पश्चिम युरोपात राष्ट्रवादाने मुळे धरण्यास सुरवात केली.

- **राष्ट्रवाद म्हणजे काय?**

फ्रेंच इतिहासकार अर्नेस्ट रेनन यांनी सन १८८२ मध्ये 'What is Nation?' (राष्ट्र म्हणजे काय?) या विषयावर व्याख्यान देताना राष्ट्राची व्याख्या केली. अर्नेस्ट रेनन यांच्या मते, 'राष्ट्र' हा एक आध्यात्मिक समुदाय आहे. जो आपल्या दैनंदिन जीवनातील विश्वासाच्या आधारे स्वत:मध्ये ऐक्य प्रस्थापित करतो. राष्ट्रीय ऐक्याचा मुख्य आधार उज्ज्वल भूतकाळाच्या सामुदायिक स्मृती आणि भविष्यकाळा संदर्भात समान महत्त्वाकांक्षा हे असतात.

रशियन मार्क्सवादी नेता जोसेफ स्टॅलिन यांनी आपल्या 'Marxism and the National Question' (मार्क्सवाद आणि राष्ट्रीय प्रश्न) या सन १९१३ मधील गाजलेल्या लेखात राष्ट्रीयतेच्या स्वरूपाबद्दल भाष्य केले आहे. जोसेफ स्टॅलिन यांच्या मते, एखादे 'राष्ट्र' हे ऐतिहासिक दृष्ट्या निर्माण होते. यामध्ये एक कायमचा निवासी समुदाय असतो आणि त्याची निर्मिती समान भाषा, प्रदेश, आर्थिक जीवन आणि मानसिकता इत्यादी मिळून म्हणजे एका समान संस्कृतीच्या आधारावर होते.

आपल्या लक्षात आले असेलच की अर्नेस्ट रेनन यांची राष्ट्राची व्याख्या ही आदर्शवादी आहे तर जोसेफ स्टॅलिन यांची व्याख्या ही भौतिकवादी आहे. मात्र, या दोन्ही व्याख्यांमधून एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे आपल्या लक्षात येते की, 'राष्ट्र' हे कधीही अनादि (ज्याची सुरवातच नाही) किंवा अनंत (ज्याला अंत नाही) असे नसते यावर अर्नेस्ट रेनन आणि जोसेफ स्टॅलिन या दोघांचे ही एकमत आहे. म्हणजेच राष्ट्रांचा आरंभ आणि अंत देखील असतो. थोडक्यात, 'राष्ट्र' हे नैसर्गिक नसून मानवी समुदायांच्या द्वारे निर्मित असते.

प्राचीन काळापासून राष्ट्राचा विचार अस्तित्वात होता आणि सोळाव्या शतकात तर त्याचे काही पुरावे देखील मिळतात. उदाहरणार्थ, जर्मन भाषेतील शब्द 'Volks' (English- "Folks') (फोक्स) हा विशिष्ट लोकांच्या समुदायासाठी किंवा जनतेसाठी वापरला जायचा. प्राचीन काळापासून राष्ट्राचा विचार अथवा संकल्पना अस्तित्वात होते अशी मांडणी होत असली तरी देखील 'राष्ट्रवाद' ही एक आधुनिक संकल्पना आहे यावर बहुतांश इतिहासकारांचे एकमत आहे. राष्ट्रवादासंबधी इतर अनेक मुद्द्यांवर असहमती असून देखील बेनेडीक्ट ॲन्डरसन, अर्नेस्ट गेलनेर आणि एरिक हॉब्सबॉम हे अलीकडच्या काळातील इतिहासकार एकमताने मानतात की, राष्ट्रवादाचा उदय १८ व्या शतकात पश्चिम युरोपात झाला आणि त्यानंतर १९ व्या

आणि २० व्या शतकांमध्ये जगाच्या इतर भागात राष्ट्रवादाचा प्रसार झाला. बहुतांश विद्वानांचे मत आहे की, आधुनिक राष्ट्रवादाचा उदय औद्योगिक भांडवलवाद आणि छपाई भांडवलवाद याच्या सोबत झाला. भाषा, वंश किंवा धर्म यांच्यावर आधारित समुदाय इत्यादी तसेच राज्यामधील किंवा कल्पित समुदायामधील परस्पर प्रतिस्पर्धा, चढाओढ, परस्पर शत्रुत्व इत्यादी अनेक गोष्टींनी आधुनिक राष्ट्रवादाच्या उदय आणि विकासाच्या या प्रक्रियेत हातभार लावला असे इतिहासकार मानतात.

मार्क्सवादी परंपरेतील राष्ट्रवादाची मीमांसा ही कार्ल मार्क्स, फेडरिक एंजेल्स, लेनिन आणि स्टॅलिन यांच्या पासून एरिक हॉब्सबॉम पर्यंत पोहचते. मार्क्सवादी परंपरेमध्ये राष्ट्राला एक ऐतिहासिक स्वरूपात निर्मित घटक मानले जाते, ज्याचा उदय सामंतवादाचे पतन आणि भांडवलवादाच्या उदया सोबत झाला. जनजाती, कुळ, वंश आणि लोक हे भांडवलवादाच्या उदयाच्या पूर्वीपासून अस्तित्वात होते. पण भांडवलशाही उत्पादन पद्धतीमुळे नवीन आर्थिक संबंध विकसित झाले आणि त्याच्या परिणाम स्वरूप राष्ट्राचा जन्म झाला. राष्ट्रवादाला एका अशा वैचारिक आधाराच्या स्वरुपात पहिले जाते की ज्याने संपूर्ण समाजाच्या हिताच्या परीपेक्ष्यात 'बुर्जूवा' वर्गाला एक 'वर्ग' म्हणून आपल्या हितसंबधाला ओळखण्यास मदत केली. एरिक हॉब्सबॉम यांनी जोर देऊन म्हटले की, औद्योगिक आणि आर्थिक विकास यांच्या विशिष्ट टप्प्याच्या संदर्भात राष्ट्र आणि राष्ट्रवादी आकांक्षा यांचे मुल्यांकन करावयास हवे. ते पुढे असे ही म्हणतात की, जरी राष्ट्रवाद वरून खाली प्रक्षेपित केला गेला असला तरी जनतेच्या भावना, आकांक्षा, आशा, विचार, आवश्यकता आणि हितसंबधांचे विश्लेषण केल्याशिवाय राष्ट्रवादाला समजून घेता येत नाही. या उल्लेखित बाबी अनिवार्य स्वरूपात राष्ट्रीय नसतात आणि अजूनदेखील कमी राष्ट्रवादी आहेत.

राष्ट्रवादासंबधी उपरोक्त मीमांसा समजून घेतल्यानंतर राष्ट्रवादाची एक ढोबळ व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते

'राष्ट्रवाद' म्हणजे एक विचारसरणी आहे. या विचारसरणीचा दावा असतो की, 'समान ओळख, भाषा, इतिहास आणि परंपरा असलेल्या लोकांच्या समूहाद्वारे राष्ट्राची निर्मिती होते. राष्ट्रवाद्यांचा असा आग्रह असतो की, राष्ट्रावरील निष्ठा ही अत्यंत महत्त्वाची असते. आपल्या राष्ट्राच्या हितासाठी, त्याच्या संरक्षणासाठी, त्याच्या सीमांच्या आणि संस्कृतीच्या विस्तारासाठी व राष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी त्या राष्ट्राच्या जनतेने एकत्रित येऊन कटीबद्ध होणे आवश्यक असते. राष्ट्रवाद्यांच्या मते, 'राष्ट्र' हे स्वतंत्रच असले पाहिजे आणि राष्ट्रावर त्याच्या नागरिकांचीच सत्ता असायला हवी. राष्ट्राचे नागरिक आपल्या राष्ट्रा प्रति आपली राष्ट्रनिष्ठा / देशभक्ती जाहीर करण्यासाठी आणि राष्ट्रहितासाठी राष्ट्रध्वज आणि इतर राष्ट्रीय प्रतीकांच्या आधारे संघटीत व्हायला हवेत, अशी राष्ट्रवाद्यांची अपेक्षा असते.

राष्ट्रवादाची संकल्पना समजून घेतल्यानंतर एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार होण्यामागे कोणती कारणे होती जाणून घेणे आवश्यक आहे.

- **राष्ट्र–राज्य आणि राष्ट्रवादाचा विचार :**

मध्ययुगीन युरोपमध्ये सामंतवादी (Feudalism) व्यवस्था अस्तित्वात होती. सामंतवादी व्यवस्थेमध्ये जमिनीचा ताबा हा छोट्या छोट्या प्रदेशाचे वंशपरंपरागत अधिकाऱ्यांच्या म्हणजेच सामंतांचा असे. सामंतशाही व्यवस्था ही उतरंडीची व्यवस्था असे, ज्याचे अनेक स्तर असत. राजा हा सर्वोच्च स्थानी असे आणि राज्यातील सर्व जमीन ही राजाच्या मालकीची असे. राजाच्या नंतर अनेक स्तरात श्रेष्ठतेनुसार सामंतांची विभागणी असे. सामंतीव्यवस्थेच्या तळाशी शेती कसणारी कुळे असत. सामंत आपल्या राजाशी एकनिष्ठ राहत, राजाला युद्धात सैन्याच्या स्वरुपात मदत करत. सामंतांच्या या सेवेच्या बदल्यात सामंतांना जमीन मिळे. सामंताला मिळालेल्या जमिनीवर शेतकऱ्यांची कुळे राबत असत. मध्ययुगीन युरोपात धर्मसंस्थेचा देखील मोठा वरचष्मा होता. ख्रिस्ती धर्माच्या चर्च या संस्थेचा मोठा प्रभाव या छोट्या छोट्या राज्यांवर आणि जनतेवर होता. मध्ययुगीन युरोपात अशी सामंतवादी व्यवस्था असलेली अनेक राजांची छोटी छोटी राज्ये अस्तित्वात होती. इ.स. सोळाव्या शतकापासून इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन इत्यादी राज्ये शक्तिशाली बनली आणि त्यांचा प्रादेशिक विस्तार झाला. या शक्तिशाली राज्यांनी आपल्या प्रदेशातील भाषा आणि साहित्य विकासाला हातभार लावला. परिणामी या राज्यांच्या सीमारेषांच्या आत राहणाऱ्या लोकांमध्ये आपण एकाच राज्याचे रहिवासी असल्याची भावना निर्माण झाली. सरंजामशाही व्यवस्थेचा ऱ्हास, प्रबोधन काळातील वैचारिक प्रगती, औद्योगिक क्रांती, भांडवलशाही व्यवस्थेचा उदय, मध्यम वर्गाचा उदय अशा विविध कारणांनी राष्ट्र–राज्यांच्या निर्मितीस हातभार लावला.

युरोपात पहिल्यांदा इंग्लंड आणि फ्रान्स ही पहिली राष्ट्र–राज्ये म्हणून उदयाला आली आणि पुढे स्पेन, रशिया आणि प्रशिया यांचा देखील राष्ट्र राज्याच्या स्वरूपात विकास झाला. विशिष्ट राष्ट्र आणि त्यातील राज्यसत्ता यांच्यात एकसंघपणा आल्यामुळे तयार झालेली राजकीय संस्था म्हणजे 'राष्ट्र–राज्य' मानले जाते. राष्ट्र राज्यांच्या उदयामुळे सामंतवादी व्यवस्थेचा ऱ्हास सुरु झाला. सामंतांचे महत्त्व कमी होऊन राजा आणि प्रजा हे राज्याचे मुख्य अंग बनले. सामंतांचे महत्त्व कमी झाल्याने मध्यवर्ती शासन शक्तिशाली झाले. मध्यवर्ती शासनाने व्यावसायिक, व्यापारी यांना संरक्षण दिले. राष्ट्र–राज्यांच्या उदयामुळे जनतेमध्ये एकोप्याची भावना निर्माण झाली. एका राष्ट्र–राज्यात राहणाऱ्या जनतेचे आर्थिक हितसंबध आणि सांस्कृतिक परंपरा एक सारखी असल्याने हा एकोपा वाढीस लागला.

युरोपातील राष्ट्र–राज्यांमध्ये अनेक कारणांमुळे सतत युद्ध होत असे. इंग्लंड विरुद्ध फ्रान्स, इंग्लंड विरुद्ध स्पेन, फ्रान्स विरुद्ध स्पेन, स्पेन विरुद्ध पोर्तुगाल इत्यादी राष्ट्र–राज्यांत सतत लढाया होत. इंग्लंड आणि फ्रान्स मध्ये तर अनेक वर्ष चालणारी युद्धे झाली. युरोपातील राष्ट्र–राज्यांच्या शासकांनी या विध्वंसक युद्धांना अधिष्ठान देण्याकरता लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करून तिची वाढ होण्यास हातभार लावला. जेथे राष्ट्रीय भावना नव्हती तिथे ती निर्माण केली गेली तर जिथे ती अस्तित्वात होती तिथे तिची प्रखरता वाढवली गेली. राष्ट्र–राज्यातील युद्धांनी राजकीय शक्तीचे केंद्रीकरण केले. राजाला अनियंत्रित अधिकार प्राप्त झाले. राष्ट्र–राज्यात होणाऱ्या युद्धात जिंकणाऱ्या राज्याची आर्थिक शक्ती वाढत असे. अनियंत्रित राजा साम्राज्य विस्तारासाठी आणि व्यापारी हितसंबंधासाठी सतत युद्ध करत असत. सतराव्या शतकात युद्धांवर

होणाऱ्या सततच्या खर्चामुळे युरोपातील बहुतांश देशात आर्थिक ताण निर्माण झाला. आर्थिक टंचाईवर मात करण्यासाठी राज्यसंस्थांनी करांमध्ये भरमसाठ वाढ केली. या करवाढीला जनतेतून, व्यापाऱ्यांतून, मध्यम वर्गातून प्रचंड विरोध सुरु झाला. अनियंत्रित राजेशाहीला अंकुश लावण्यासाठी, जनतेच्या आर्थिक आणि राजकीय हितसंबधांच्या रक्षणासाठी युरोपातील विविध राष्ट्र-राज्यातील जनतेत राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. राष्ट्र-राज्यातील जनतेने राजकीय अधिकारांसाठी आंदोलने, जनतेतून उदयाला आलेले नेते, जनतेत झालेली वैचारिक घुसळण, जनतेतील एकत्वाची भावना आणि राष्ट्रीय जागृती यांच्यामुळे युरोपात राष्ट्रवादाचा प्रसार झपाट्याने झाला. त्यामुळे राष्ट्र-राज्यांचा उदय हा युरोपमध्ये राष्ट्रवादाच्या उदयामागील एक महत्त्वाचे कारण आहे.

- **फ्रेंच राज्यक्रांती आणि राष्ट्रवाद :**

इतिहासात आधुनिक राष्ट्रवादाची पहिली अभिव्यक्ती ही इ.सन. १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वरूपात दिसून येते. फ्रेंच राज्यक्रांती पूर्वी फ्रान्स हे एक निरंकुश राजेशाहीची सत्ता असलेले राष्ट्र-राज्य होते. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे झालेल्या राजकीय आणि घटनात्मक बदलांमुळे फ्रान्सची सत्ता ही अनियंत्रित राजाच्या हातून निघून फ्रेंच नागरिकांच्या हाती आली. पूर्वी राज्याचा मूलाधार हा राजा असायचा. मात्र, फ्रेंच राज्यक्रांतीने घोषणा केली की आता जनतेद्वारे राष्ट्राची स्थापना होईल आणि राष्ट्राचे भविष्य हे जनताच निश्चित करेल.

फ्रेंच राज्यक्रांतीच्या आरंभापासूनच फ्रेंच जनतेत एक सामुहिक ओळख (Common Identity) निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु होती. पितृभूमी (Fatherland) आणि नागरिक (Citizen) यांच्या सारख्या विचारांनी एकत्व असलेल्या जनसमुदायाच्या संकल्पनेवर भर दिला. या जनसमुदायातील प्रत्येक व्यक्तीला एका घटनात्मक चौकटीत समान अधिकार असतील असा विचार देखील पुढे आला. फ्रान्स या राष्ट्राच्या प्रतीकाच्या स्वरूपात राष्ट्रीय ध्वज म्हणून निळा, पांढरा आणि लाल असे तीन रंग असलेला ध्वज निवडला गेला. फ्रान्स राष्ट्राची 'मेरीॲन' या स्त्रीरूपात कल्पना केली गेली. 'स्वातंत्र्य' आणि 'लोकशाही'ची चिन्हे धारण करणारी 'मेरीॲन' हे फ्रान्सच्या जन-राष्ट्राचे (French Republic) प्रतिक म्हणून अत्यंत लोकप्रिय झाली आणि फ्रान्सच्या जनतेत राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरली. (आपल्या भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात अशाच प्रकारे भारताचे 'भारत माता' च्या स्वरूपात प्रस्तुतीकरण करण्यात आले. हे प्रस्तुतीकरण खूप लोकप्रिय झाले आणि लोकांमध्ये राष्ट्रीय भावना निर्माण होण्यास उपयुक्त ठरले.) पूर्वीच्या 'इस्टेट जनरल' चे नामांतर 'नॅशनल असेंब्ली' म्हणजे 'राष्ट्रीय सभा' असे करण्यात आले व त्यातील प्रतिनिधी हे थेट लोकांद्वारे निवडले जाऊ लागले. नवीन प्रतिज्ञा, नवीन राष्ट्रगीत, नवीन देशभक्तीवरील गाणी रचली गेली. एक केंद्रीय प्रशासन व्यवस्था स्थापित करून फ्रान्सच्या सर्व नागरिकांसाठी एक समान कायद्यांची रचना करण्यात आली. फ्रान्समधील अंतर्गत व्यापारावरील आयात-निर्यात कर रद्दबातल करण्यात आला. एक समान वजन आणि मापे यांची व्यवस्था संपूर्ण फ्रान्स मध्ये लागू केली. संपूर्ण फ्रान्समध्ये पॅरीस येथे बोलल्या जाणाऱ्या फ्रेंच भाषेलाच प्रमाणभाषा मानले जाऊ लागले आणि तिला संपूर्ण फ्रान्स राष्ट्रासाठी समान भाषेचा दर्जा प्राप्त झाला. फ्रान्स मधील हे सर्व बदल हे 'राष्ट्र' या संकल्पनेला अनुलक्षून झाले होते

आणि म्हणुनच इतिहासातील राष्ट्रवादाची पहिली स्पष्ट अभिव्यक्ती म्हणून फ्रेंच राज्यक्रांतीला ओळखले जाते.

युरोपातील सर्व जनतेला अनियंत्रित सत्ताधाऱ्यांच्या जोखडातून मुक्त करणे हे 'फ्रान्स' या राष्ट्राचे लक्ष्य असल्याची घोषणा फ्रेंच राज्यक्रांतीतील क्रांतीकारींनी केली. अर्थात, युरोपातील इतर जनतेला त्यांचे राष्ट्र स्थापन करण्याच्या कार्यात फ्रान्स मदत करेल. फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती युरोपात पसरताच युरोपच्या विविध शहरांत विद्यार्थी आणि सुशिक्षित मध्यम वर्गातील व्यक्तींनी जॅकोबीन क्लब स्थापन करण्यास सुरवात केली. जॅकोबीन क्लबमधील सदस्यांनी केलेल्या कार्यामुळे इ.स. १७९० च्या दशकात हॉलंड, बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि इटली मध्ये विजय प्राप्त करण्याचा फ्रेंच सैन्याचा मार्ग प्रशस्त झाला.

फ्रेंच राज्यक्रांतीतील फ्रान्स राष्ट्राची अभिव्यक्ती, फ्रेंच राज्यक्रांतीतील विचार आणि फ्रेंच सैन्याचा युरोपातील विजय यांच्या परिणाम स्वरूप युरोपात मोठ्याप्रमाणात राष्ट्रवादाचा प्रसार झाला.

- **नेपोलियनची विधीसंहिता आणि जनतेचे ऐक्य :**

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रान्समध्ये घडून आलेल्या घडामोडींनंतर फ्रान्सच्या शासकाच्या रुपात नेपोलियनचा उदय झाला. नेपोलियनने फ्रेंच सैन्याच्या सहाय्याने फ्रान्सचा साम्राज्य विस्तार करून हॉलंड, बेल्जियम, स्वित्झर्लंड आणि इटली इत्यादी प्रदेशांवर वर्चस्व प्रस्थापित केले. नेपोलियनच्या या साम्राज्यविस्तारामुळे त्याच्या नियंत्रणात खूप मोठा भूप्रदेश आला. या प्रदेशांमध्ये नेपोलियनने अनेक सुधारणा घडवून आणल्या ज्या त्याने पूर्वी फ्रान्समध्ये घडवून आणल्या होत्या.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर स्थापन झालेली लोकशाही व्यवस्था नष्ट करून नेपोलियनने फ्रान्स मध्ये स्वत:ची राजेशाही व्यवस्था स्थापन केली. प्रशासनात मात्र नेपोलियनने क्रांतिकारी मुल्यांचा समावेश करून संपूर्ण व्यवस्था ही अधिक सुयोग्य आणि कुशल होईल अशा सुधारणा केल्या. नेपोलियनने सन १८०४ मध्ये फ्रेंच नागरी संहितेत (French Civil Code) सुधारणा केल्या ज्याला नेपोलियनची विधीसंहिता (Napoleon Code) म्हणून ओळखले जाते. नेपोलियनच्या विधीसंहितेने जन्माच्या आधारे मिळणाऱ्या विशेषाधिकारांना नष्ट केले. म्हणजेच उमराव वर्ग आणि सर्वसामान्य यांच्यातील भेदभाव नष्ट केला. नेपोलियनने कायद्यासमोर सर्वांना समान वागणूक, समान न्याय आणि सर्वांना संपत्तीचा अधिकार मिळेल याची तरतूद केली. मुळात क्रांतिकारी मुल्यांवर आधारित असलेल्या नेपोलियन विधीसंहितेस फ्रान्स सोबतच फ्रान्सच्या आधिपत्याखालील प्रदेशात देखील लागू करण्यात आले. डच प्रजासत्ताक, स्वित्झर्लंड, इटली आणि जर्मनी मध्ये नेपोलियनने प्रशासनाची योग्य, सुटसुटीत आणि कार्यक्षम विभागणी लागू केली. नेपोलियन ने या प्रदेशातील सामंतवादी व्यवस्था नष्ट करून शेतकऱ्यांना (सामंतांच्या शेतावर कसणाऱ्या कुळांना) भूदासत्वातून आणि सामंतशाही करातून मुक्ती मिळवून दिली. शहरांमधील कारागीरांवर असणाऱ्या कारागीरांच्या श्रेणी अथवा संघाचे नियंत्रण काढून टाकले. दळणवळण आणि संपर्क साधनात खूप सुधारणा करण्यात आल्या.

नेपोलियनद्वारे केल्या गेलेल्या या सुधारणांमुळे शेतकरी, कारागीर, कामगार आणि नवउद्योजक यांना मोठ्याप्रमाणात स्वातंत्र्य मिळाले. उद्योगपती विशेषतः विविध प्रकारचे समान बनवणारे लघुउद्योजक यांना वाटू लागले की एकच प्रकारचे कायदे, एकच वजन आणि मापे आणि एकच राष्ट्रीय चलन यांच्यामुळे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात वस्तूंचे आणि भांडवलाचे आदान-प्रदान सोपे होऊन जाईल. नेपोलियनच्या या सुधारणांची माहिती युरोपात सर्वदूर पसरली होती. त्यामुळे युरोपमधील हॉलंड आणि स्वित्झर्लंड इत्यादी प्रदेशात आणि ब्रसेल्स, मेंज, मिलान आणि वार्सा इत्यादी शहरांमध्ये फ्रेंच सैन्याचे आणि शासनाचे स्वातंत्र्याची भेट देणाऱ्यांप्रमाणे स्वागत करण्यात आले. मात्र, हा सुरवातीचा उत्साह फार काळ टिकला नाही. फ्रेंच वर्चस्वाखालील प्रदेशातील लोकांच्या हे लक्षात येऊ लागले की या नवीन प्रशासकीय सुधारणा काही बाबतीत चांगल्या वाटत असल्या तरी राजकीय स्वातंत्र्यांवर मर्यादाच आणणाऱ्या होत्या. फ्रान्सचे इतर राष्ट्रांशी सतत होत असलेली युद्धे, त्यासाठी फ्रेंच वर्चस्वाखालील युरोपच्या इतर प्रदेशातून केली जाणारी सक्तीची सैन्य भरती, वाढता करांचा बोजा आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर घातल्या जाणाऱ्या मर्यादा इत्यादी कारणांमुळे होणारे नुकसान लोकांना मोठे वाटू लागले. परिणामी, फ्रान्स पासून मुक्ती मिळवण्यासाठी तेथील जनता फ्रान्सच्या विरोधात गेली. मात्र, राजकीय स्वातंत्र्यचा मुद्दा अधोरेखित झाल्याने युरोपातील जनतेने आपल्या निरंकुश राजेशाही विरोधात वारंवार उठाव केले. 'जनतेचे स्वातंत्र्य' हेच 'राष्ट्राचे स्वातंत्र्य' हा मुद्दा यानिमित्ताने महत्त्वपूर्ण बनला.

- **औद्योगिक क्रांती आणि नवीन वर्गांचा उदय :**

युरोपमधील उमराव (Nobility) वर्ग हा सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या जमिनीचा मालकी असलेला सर्वात शक्तिशाली होता. संपूर्ण युरोपच्या उमराव वर्गातील सदस्य हे जवळपास एकाच पद्धतीचे उच्चकुलीन राहणीमान आणि जीवनशैली जोपासणारे होते. उमराव वर्गातील लोकांची मालमत्ता, वाडे हे ग्रामीण भागात आणि शहरात देखील असत. युरोप मधील हे सर्व राजेरजवाडे, उमराव एकमेकांशी वैवाहिक संबधांमुळे जोडलेले होते. हा शक्तिशाली उमराव वर्ग संख्यात्मक दृष्ट्या अत्यंत छोटा समूह होता. युरोपच्या लोकसंख्येचा अधिकांश भाग हा शेतकऱ्यांचा होता. पश्चिम युरोपात अधिकांश जमीन ही खंडकरी कसत किंवा भाडेतत्त्वावर कसली जात असे. तर पूर्व आणि मध्य युरोपातील जमिनी या मोठ्या मोठ्या जहागिरीच्या स्वरुपात असत ज्यावर 'भुदास' राबत होते. युरोपात झालेल्या औद्योगिक क्रांतीने ही वर्ग रचना बदलून टाकली आणि त्याचा परिणाम राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार यांच्यावर झाला.

पश्चिम आणि मध्य युरोपच्या काही भागात औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात वाढ होऊन व्यापारात वृद्धी झाली. परिणामी, या भागात शहरांचा आणि बाजारपेठांचा विकास झाला. शहरांच्या आणि बाजारपेठांच्या विकासाबरोबर त्यावर अवलंबून असलेल्या व्यापारी, सावकार इत्यादींच्या वर्गाचा देखील उदय झाला. इंग्लंड मध्ये औद्योगिकीकरण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात झाले. मात्र, फ्रान्स आणि जर्मनीच्या काही भागात हे औद्योगिकीकरण एकोणिसाव्या शतकात झाले. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेच्या परिणामस्वरूप नवीन सामाजिक वर्ग अस्तित्वात आले. औद्योगिक क्षेत्रात काम करणारा 'कामगार वर्ग' आणि जो उद्योजक, व्यापारी व सेवा पुरवणारे व्यावसायिक यांचा 'मध्यम वर्ग' असे दोन नवीन सामाजिक

वर्ग अस्तित्वात आले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत मध्य आणि पूर्व युरोपात हे नवीन सामाजिक वर्ग संख्येने मर्यादित होते. मात्र, नंतर त्यांची संख्या वाढत गेली. उमराव वर्गाचे विशेषाधिकार नष्ट झाल्यानंतर सुशिक्षित आणि उदारमतवादी मध्यमवर्गातच राष्ट्रीय एकतेचा विचार लोकप्रिय झाला. युरोपात राष्ट्रवादाच्या विचाराने प्रेरित होऊन जी आंदोलने झाली त्यात मध्यमवर्गाचा मोठ्याप्रमाणात सहभाग होता आणि मध्यमवर्गानेच या आंदोलनांचे नेतृत्व केले.

- **उदारमतवादी राष्ट्रवाद :**

युरोपात एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या दशकात राष्ट्रीय एकतेशी संबधित विचार हे उदारमतवादी विचारप्रणालीशी जोडलेले होते. 'Liberalism' (लिबरलीजम) म्हणजे 'उदारमतवाद' हा शब्द 'Liber' (लिबर) या मूळ लॅटिन शब्दापासून बनलेला आहे, ज्याचा अर्थ 'स्वातंत्र्य' असा होतो. युरोपात उदयाला आलेल्या मध्यमवर्गासाठी 'उदारमतवाद' म्हणजे 'व्यक्तीला मिळणारे स्वातंत्र्य' आणि 'कायद्यासमोर सर्वांना समान दर्जा' असा होता. राजकीयदृष्ट्या उदारमतवाद हा सर्वसहमतीच्या सरकारवर भर देत होता. म्हणजेच लोकांद्वारे निवडून आलेल्या सरकारचा आग्रह उदारमतवाद धरत असतो. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदारमतवाद हा निरंकुश शासकांचे आणि धर्मगुरूंचे विशेषाधिकार नष्ट करावेत आणि घटनात्मक संसदीय प्रतिनिधित्व असलेल्या सरकार असावे अशी उदारमतवाद्यांची मागणी असायची. उच्च किंवा नीच कुळातील असा भेदभाव न करता उदारमतवाद्यांनी संपत्तीधारण करणाऱ्या सर्व प्रौढ पुरुषांना मताधिकार द्यावा अशी मागणी लावून धरली. उदारमतवाद्यांनी जरी संपत्तीविहीन पुरुष आणि स्त्रियांसहित सर्वांना मताधिकार म्हणजेच 'सार्वत्रिक मताधिकार' (Universal Adult Suffrage) पुरस्कार केला नसला, तरी उदारमतवाद्यांनी केलेल्या मताधिकाराच्या मागणीचा पुढचा टप्प्याच्या स्वरूपात क्रांतिवादींनी आणि स्त्रीवाद्यांनी पुढील काळात 'सार्वत्रिक मताधिकर' ची मागणी जोरदारपणे मांडली. 'व्यक्तीचे स्वातंत्र्य-अधिकार' हेच 'राष्ट्राचे स्वातंत्र्य' असा विचार उदारमतवादी विचारांद्वारे युरोप आणि जगभर पसरला, जो अंतिमत: अनेक देशांत आणि युरोपियन वसाहतींमध्ये राष्ट्रवादाच्या उदयास आणि प्रसारास कारणीभूत ठरला.

- **आर्थिक राष्ट्रवाद :**

इतिहासकार एरिक हॉब्सबॉम यांनी, 'आर्थिक विकासाच्या आणि लोकांच्या आर्थिक हितसंबंधांच्या दृष्टीकोनातून राष्ट्रवादाला समजून घ्यायला हवे', असे मत मांडल्याचा उल्लेख याच घटकात आधी येऊन गेला आहे. उदारमतवादींनी बाजारपेठांना नियंत्रणापासून मुक्त करण्याची मागणी केली. वस्तू आणि भांडवल यांच्यावर राज्यव्यवस्थेचे नियंत्रण नष्ट करून त्यांचे आवागमन मोकळेपणाने व्हावे अशी भूमिका उदारमतवादींची होती. एकोणिसाव्या शतकात उदयाला आलेल्या मध्यमवर्गाने ही मागणी जोरदारपणे केली. छोट्या छोट्या राज्यातून व्यापार करताना एकाच मालावर अनेक ठिकाणी जकात, सीमाशुल्क अथवा कर द्यावा लागे. त्यामुळे व्यापाऱ्यांचा नफा कमी होई आणि लोकांना वस्तू महागड्या किंमतीने खरेदी कराव्या लागत. एक प्रकारचे चलन, वजन आणि मापे नसल्याने व्यवहार करताना विनाकारण जास्त वेळ खर्ची पडत असे. नव्याने उदयाला आलेला व्यापारी, दुकानदार यांच्या वर्गाला ही परिस्थिती आर्थिक व्यवहार, व्यापार

आणि विकासाला खुंटीत करणारी वाटत होती. या वर्गामध्ये एकच कर, एकसारखीच वजन, मापे, चलन इत्यादी असलेल्या आणि लोक, वस्तू व भांडवलाचे अवरोधरहित आवागमन शक्य असलेल्या एकीकृत आर्थिक क्षेत्राची निर्मिती करण्याची मागणी जोर धरू लागली. एकीकृत आर्थिक क्षेत्राच्या मागणीच्या आणि आवश्यकतेच्या परिणामस्वरूप इ.स. १८३४ मध्ये प्रशियाच्या पुढाकाराने पहिल्यांदा 'Zollverein' (जॉलवेराईन) ची स्थापना झाली. जर्मन शब्द 'जॉलवेराईन' म्हणजे 'Customs Union' (कस्टमस युनियन) म्हणजेच 'सीमाशुल्क संघ' अथवा 'जकात संघ' होय. प्रशियाने पुढाकार घेऊन जॉलवेराईन स्थापन केला ज्यातील अधिकांश राज्ये ही जर्मन होती. जॉलवेराईनने विभिन्न कर प्रणाली असल्यामुळे येणाऱ्या अडचणींची सोडवणूक केली. जॉलवेराईन मध्ये सामील झालेल्या राज्यांमध्ये पूर्वी जवळपास तीस वेगवेगळ्या चलनव्यवस्था अस्तित्वात होत्या, त्यांची संख्या दोन केली गेली. त्यामुळे चलन विनिमयात सुसुत्रता आली. अशा प्रकारे एकीकृत आर्थिक क्षेत्राची गरज आणि उपयुक्तता सिद्ध झाली ज्याने राष्ट्रीय एकीकरणाला खतपाणी घातले. रेल्वेचे जाळे जसजसे विस्तारत गेले तसतसे मालाच्या आवागमनात, लोकांचे येण्याजाण्यात गतिशीलता आली आणि त्यामुळे राष्ट्रीय एकीकरणास हातभार लागला. लोकांमध्ये उदयाला येत असलेल्या राष्ट्रवादी भावनेला आर्थिक राष्ट्रवादाच्या लाटेने आणखी मजबूत केले.

- **नवीन रूढीवादी प्रतिक्रिया :**

फ्रेंच राज्यक्रांती आणि नेपोलियनच्या राज्यविस्तारामुळे युरोपमधील जुन्या रूढीवादी शक्तींना मोठा हादरा बसला होता. फ्रेंच राज्यक्रांतीने प्रस्थापित समाज आणि राज्यव्यवस्था उलथून टाकली त्यामुळे रूढीवादी शक्ती फ्रान्सच्या आणि क्रांतीच्या तत्वांचा युरोपात प्रसार करणाऱ्या नेपोलियनच्या विरोधात होत्या. "Conservative' (कॉन्जर्व्हेटीव्ह) म्हणजे 'रूढीवादी' ही एक विचारसरणी होती ज्यात परंपरा, रूढी, प्रस्थापित संस्था इत्यादींना महत्त्व दिले जाते. तातडीने केल्या जाणाऱ्या बदलांच्या ऐवजी क्रमाक्रमाने आणि हळूहळू होणाऱ्या बदलांना/विकासाला रूढीवादी विचारसरणी प्राथमिकता देते.

इ. स. १८१५ च्या जून महिन्यात वॉटर्लूच्या लढाईत फ्रान्स विरुद्ध एकवटलेल्या ब्रिटन, रशिया, प्रशिया आणि ऑस्ट्रिया या युरोपीय शक्तींनी नेपोलियनचा पराभव करून त्याची सेंट हेलेना बेटावर विजनवासात रवानगी केली. इ. स. १८१५ मध्ये नेपोलियन युगाच्या समाप्तीनंतर युरोपातील बहुतांश सत्ता या रूढीवादी विचारसरणीच्या होत्या. रूढीवादी सत्ताधारी वर्ग मानत होता की, राज्याच्या आणि समाजाच्या प्रस्थापित पारंपारिक संस्था उदा. राज्यव्यवस्था (राजतंत्र), चर्च (धर्मसंस्था), सामाजिक उच्च-नीचतेची व्यवस्था (सामाजिक भेदभाव), संपत्तीचा अधिकार आणि कुटुंबाचे स्वरूप हे जसे होते तसेच राहायला हवेत. नेपोलियनद्वारे सुरु केल्या गेलेल्या बदलांच्या अनुभवातून युरोपातील रूढीवादी सत्ताधारींच्या लक्षात आले की, 'आधुनिकीकरण' हे पारंपारिक राजतंत्राला (निरंकुश राज्यसत्ता) आणखी मजबूत बनवू शकते. राज्यव्यवस्थेच्या शक्तीस अधिक कार्यक्षम आणि मजबूत बनवण्यासाठी 'आधुनिकीकरण' करण्याचा सपाटा युरोपातील रूढीवादी सत्ताधाऱ्यांनी सुरु केला. सैन्याचे, नोकरशाहीचे, अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यास सुरवात झाली. सामंतवाद आणि भुदासत्व समाप्त केल्यास जनतेचा पाठींबा मिळवून निरंकुश राजेशाही मजबुतीने टिकवून ठेवण्याचा प्रयत्न युरोपातील नव्या रूढीवादींनी केला.

इ. स. १८१५ मध्ये ब्रिटन, रशिया, प्रशिया आणि ऑस्ट्रिया सारख्या नेपोलियनला पराभूत करणाऱ्या युरोपियन शक्तींचे प्रतिनिधी युरोपचे भवितव्य निश्चित करण्यासाठी ऑस्ट्रियातील व्हिएन्ना येथील संमेलनात जमले, या संमेलनास "Vienna Congress' (व्हिएन्ना कॉंग्रेस) म्हणजेच 'व्हिएन्ना परिषद' म्हणून ओळखले जाते. ऑस्ट्रियाचा चान्सलर ड्युक मेटरनिक हा रूढीवादी नेता आणि मुत्सद्दी होता. मेटरनिकने व्हिएन्ना परिषद आयोजित करण्यात पुढाकार घेतला होता. व्हिएन्ना परिषदेमध्ये सहभागी युरोपियन शक्तींमध्ये समझोता झाला ज्याला "Treaty of Vienna' (ट्रीटी ऑफ व्हिएन्ना) म्हणजेच 'व्हिएन्ना करार' म्हणून ओळखले जाते. व्हिएन्ना कराराद्वारे युरोपमधील रूढीवादी शक्तींनी नेपोलियनच्या काळात झालेले युरोपातील अनेक बदल नष्ट करण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान सत्तेतून दूर करण्यात आलेल्या बुर्बॉन घराण्याला पुन्हा फ्रान्सचे राजपद देण्यात आले. त्याचबरोबर नेपोलियनद्वारा फ्रान्सने जिंकलेला प्रदेश फ्रान्सकडून काढून घेण्यात आला. फ्रान्सद्वारे पुन्हा साम्राज्यविस्ताराचा प्रयत्न होऊ नये म्हणून फ्रान्सच्या सीमेवर काही नवी राज्ये निर्माण केली गेली. एकमेकांच्या हितसंबंधाना केंद्रात ठेऊन नव रूढीवादी शक्तींनी जिंकलेल्या भूभागाची वाटणी करून टाकली. नेपोलियनने नष्ट केलेल्या राजेशाहींना पुनर्प्रस्थापित करणे आणि संपूर्ण युरोपात नवरूढीवादी व्यवस्था प्रस्थापित करणे हे व्हिएन्ना परिषदेचे प्रमुख उद्देश होते. इ. स. १८१५ नंतर युरोपात स्थापन झालेल्या सत्ता या निरंकुश होत्या. आपली सत्ता टिकवण्यासाठी त्यांनी दमन तंत्राचा वापर केला. नव रूढीवादी निरंकुश सत्तांच्या विरोधात जनमत एकवटले गेले ज्याचा परिणाम क्रांतिकारी राष्ट्रवादाच्या वाढीच्या स्वरूपात झाला.

- **क्रांतिकारी राष्ट्रवाद आणि क्रांत्यांचे युग :**

इ.स. १८१५ नंतर स्थापित झालेल्या नव रूढीवादी सत्ता या कोणत्याही प्रकारची असहमती, विरोध अथवा टीका सहन करणाऱ्या नव्हत्या. सत्ता विरोधी असणाऱ्या सर्वप्रकारच्या हालचालींवर नजर ठेवणे आणि त्यांना पायबंद घालण्यासाठी दमन तंत्राचा वापर करण्यास या सत्ता मागेपुढे पाहत नसत. नवरूढीवादी निरंकुश सत्ताधाऱ्यांचे दमन जसे वाढत गेले तसे उदारवादी राष्ट्रवादाच्या प्रतिकाराचे स्वरूपदेखील तीव्र होत गेले. इ.स. १८१५ नंतर निरंकुश सत्ताधाऱ्यांद्वारे होणाऱ्या दमनाचा रेटा जसा वाढत गेला, तसे उदारमतवादी-राष्ट्रवादी भूमिगत झाले. अनेक युरोपियन राज्यात क्रांतिकारींना प्रशिक्षण देण्यासाठी आणि विचारांचा प्रसार करण्यासाठी गुप्त संघटनांची स्थापना झाली. त्याकाळी व्हिएन्ना परिषदेनंतर स्थापना झालेल्या राजेशाही व्यवस्थांना विरोध करणे हीच 'क्रांतिकारी' असण्याचे लक्षण मानले जायचे. त्यासोबतच स्वातंत्र्य आणि मुक्ती मिळवण्यासठी प्रतिबद्ध होऊन संघर्ष करणे हे क्रांतिकारी होण्यासाठी आवश्यक होते. बहुतांश क्रांतिकारी राष्ट्र-राज्यांची स्थापना होण्यास स्वातंत्र्याच्या संघर्षाची पूर्वअट मानत होते. युरोपातील क्रांतिकारींनी अनेक भूमिगत अथवा गुप्त संघटनांची स्थापना केली. यंग इटली, यंग युरोप, कार्बोनारी इत्यादी गुप्त संघटनांमध्ये पोलंड, फ्रान्स, इटली आणि जर्मनी इत्यादी प्रदेशातील समविचारी युवक एकत्र येत असत. क्रांतीकारींच्या गतीविधींमुळे आणि त्यांनी केलेल्या विचारांच्या प्रसारामुळे राष्ट्रवादाचा प्रसार युरोपभर होत गेला.

रूढीवादी सरकारांनी दमनतंत्र जसं जसं वाढत नेले तस तसे बहुतांश युरोपात उदारमतवाद आणि राष्ट्रवाद यांना क्रांतीशी जोडून पहिले जाऊ लागले. इटली आणि जर्मनीचा प्रदेश, ऑटोमन साम्राज्यातील

काही प्रदेश, आयर्लंड, पोलंड इत्यादी क्षेत्रात हा विचार बळावू लागला. सदर प्रदेशातील क्रांतींचे नेतृत्त्व उदारमतवादी–राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित शिक्षित मध्यमवर्गीय लोकांमधील काही विशिष्ट लोकांनी केला. यामध्ये प्राध्यापक, शाळेतील शिक्षक, कारकून आणि व्यापारात गुंतलेले मध्यमवर्गीय लोक प्रामुख्याने सहभागी होते. परिणामी सन १८३० ते १८४८ या काळात युरोपात अनेक प्रदेशात क्रांती आणि क्रांतीचे प्रयत्न घडून आले म्हणून या काळाला 'क्रांत्यांचे युग' म्हणून ओळखले जाते.

पहिल्यांदा जुलै, १८३० मध्ये फ्रान्स मध्ये उठाव होऊन सन १८१५ मध्ये रूढीवादी शक्तींनी पुर्नस्थापित केलेली बुर्बबॉन घराण्याची राजेशाही उलथून टाकण्यात आली. राजेशाही उलथून टाकणाऱ्या उदारमतवादी क्रांतिकारींनी घटनात्मक राजेशाहीची स्थापना करून लुई फिलीप याला फ्रान्सच्या राजपदावर बसवले. फ्रान्समधील या घडामोडींनी प्रेरणा घेऊन ऑगस्ट १८३० ते जुलै १८३१ याकाळात घडलेल्या घटनाक्रमाने ब्रुसेल्स मध्ये 'बेल्जियन क्रांती' झाली. युनायटेड किंगडम ऑफ नेदरलँड्स मधून दक्षिणेकडील भाग वेगळा होऊन स्वतंत्र 'बेल्जियम' राष्ट्राची स्थापना झाली. सन १८२१ पासून ग्रीसच्या स्वातंत्र्यासाठी ऑटोमन साम्राज्याविरुद्ध चालेल्या ग्रीक राष्ट्रवादींच्या संघर्षाला यश येऊन सन १८३१ मध्ये झालेल्या कॉन्स्टेटीनोपलच्या कराराने 'ग्रीस'ला 'स्वतंत्र राष्ट्र' म्हणून मान्यता मिळाली. ग्रीसच्या संघर्षाने संपूर्ण युरोपातील शिक्षित अभिजन वर्गात राष्ट्रीय भावनेचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला.

१८३० चे दशक हे युरोपसाठी मोठी संकटे घेऊन आले होते. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या दशकात संपूर्ण युरोपच्या लोकसंख्येत मोठी वाढ झाली. उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संख्येपेक्षाही अधिक लोक कामाच्या शोधात भटकत होते. ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या शोधात शहरात येऊन झोपडपट्टी सारख्या भागात राहू लागले. शहरातील लघु उत्पादकांना औद्योगिक क्रांती झालेल्या इंग्लंडमधील उत्पादकांशी विषम पातळीवरील स्पर्धा करावी लागत होती. उमराव वर्ग अथवा सामंतांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशात शेतकरी हे जमीनदारी कर आणि कामाच्या ओझ्याखाली दबलेले होते. अन्नधान्यांचे भाव वाढणे किंवा एखाद्या वर्षी पिकांचे नुकसान झाल्यास शहरे आणि गावांमध्ये व्यापक स्वरूपात दारिद्र्य फैलावत असे.

सन १८४८ मध्ये देखील अन्नधान्याची टंचाई आणि व्यापक स्वरूपात पसरलेली बेरोजगारीने त्रस्त झालेले फ्रान्सची राजधानी असलेल्या पॅरीस शहरात रस्त्यावर आले. रस्त्यावर ठीकठिकाणी अडथळे उभे करून सरकार विरुद्ध आंदोलन केले. सन १८४८ च्या या फ्रेंच क्रांतीमुळे फ्रान्सचा राजा लुई फिलीपला राजपदावरून पायउतार व्हावे लागले आणि फ्रान्समध्ये प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाली. फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेने प्रजासत्ताकाच्या घोषणेबरोबरच २१ वर्ष पेक्षा जास्त वय असणाऱ्या सर्व पुरुषांना मताधिकार आणि रोजगाराची गॅरंटी देण्यात आली. लोकांना रोजगार उपलब्ध करून देता यावा म्हणून राष्ट्रीय कारखान्यांची स्थापना करण्यात आली. सन १८४८ मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या घटनांप्रमाणे युरोपात अनेक ठिकाणी उठाव झाले. एकीकडे दारिद्र्य, बेरोजगारी आणि भुकेने व्याकूळ शेतकरी–कामगार उठाव करत होते तेंव्हा त्याच्या समांतर पातळीवर मध्यमवर्गीय लोक देखील क्रांती करत होते. युरोपातील त्या भागात जिथे अजून स्वतंत्र राष्ट्र–राज्य अस्तित्वात आले नव्हते तिथे म्हणजेच जर्मनी, इटली, पोलंड, ऑस्ट्रो–हंगेरियन

साम्राज्य इत्यादी मधील उदारमतवादी मध्यम वर्गातील स्त्री-पुरुषांनी घटनात्मक व्यवस्थेच्या मागणीला राष्ट्रीय एकीकरणाच्या मागणीशी जोडून दिले. जनतेमध्ये वाढत्या असंतोषाचा फायदा उचलून एका राष्ट्र-राज्याच्या मागणीवर जोर दिला. राष्ट्र-राज्य हे घटना/संविधान, वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य आणि संघटना उभारणीचे स्वातंत्र्य सारख्या संसदीय सिद्धांतावर आधारलेले असावे असा उदारमतवादी विचार होता.

- **छपाई कलेचा विकास आणि राष्ट्राची अभिव्यक्ती :**

बहुतांश नव रूढीवादी निरंकुश सत्तांनी फ्रेंच राज्यक्रांतीच्या स्वातंत्र्य आणि मुक्तीच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या वृत्तपत्रांवर, पुस्तकांवर, नाटकांवर आणि गीतांवर सेन्सोरशीप लागू केली. सरकारी दमन सुरु असून देखील फ्रेंच राज्यक्रांतीचे विचार युरोपमधील उदारमतवादींना प्रेरणा देत राहिले. नवरूढीवादी व्यवस्थेच्या टीकाकार असलेल्या उदारवादी राष्ट्रवादींनी प्रेसच्या स्वातंत्र्याचा मुद्दा देखील उचलून धरला. युरोपात छपाई कलेचा विकास झाला होता आणि मोठ्याप्रमाणात वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, पत्रके छापणे आणि प्रसारित करणे सोपे झाले होते. ख्यातनाम इतिहासकार बेनेडीक्ट ॲन्डरसन यांनी आपल्या 'Imagined Communities' (१९८३) इमॅजीन्ड कम्युनिटीज(१९८३) म्हणजे ‘परिकल्पित समुदाय’ या सुप्रसिद्ध ग्रंथात राष्ट्रवाद आणि छपाई कलेचा विकास यांसंबंधी मुलभूत मांडणी केली आहे. बेनेडीक्ट ॲन्डरसन यांच्या मते, छपाई कलेचा वापर करून प्रादेशिक/स्थानिक भाषेतून वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, पत्रके इत्यादी प्रकाशित होऊ लागल्याने राष्ट्रीय जागृतीस खतपाणी घातले गेले. व्यावसायिक पद्धतीने होणाऱ्या छपाई तंत्राने मानवी इतिहासात प्रथमच लोकांना असे माध्यम पुरवले की, ज्या आधारे स्वत: एकमेंकांस कधीही प्रत्यक्षात न भेटलेले किंवा भेटणार नाहीत असे वाचक हे एकमेकांशी राष्ट्रीयत्वाच्या नात्याने जोडले गेले. छपाई तंत्राचा वापर करून मुख्यत: अगदी भिन्न-भिन्न प्रदेशातील लोकांना देखील एखाद्या घटनेचा अनुभव प्रामुख्याने वृत्तपत्रांच्या माध्यमातून पोहचत होता. वृत्तपत्रांच्या माध्यमातून मिळणारा घटनेचा अनुभव प्रत्यक्ष घटना कितीही दूर घटली असली तरी वाचकाला अनुभवता येत होती. घटनांबद्दल, त्यात भाग घेणाऱ्या अथवा संबधित व्यक्तींबद्दल वृत्तपत्रे ही वाचकांना अवगत करत असत. सतत अशा घटनांविषयी, व्यक्तींविषयी वाचत असताना या बाबी वाचकाच्या सामाजिक अवकाशाचा भाग बनत आणि वाचक स्वत:ला घटनेशी संबधित समुदायाशी जोडून घेत असे. बेनेडीक्ट ॲन्डरसन आपण एकाद्या समुदायाचा भाग आहोत ही भावना प्रत्यक्ष एकमेकांस कधी ही न भेटलेल्या लोकांच्या मनात हळूहळू निर्माण झाली. एकाच समुदायाचा भाग असल्याची भावना राष्ट्रवादाच्या प्रसारामागील मागील महत्त्वपूर्ण शक्ती होती आणि छपाई तंत्राचा मोठ्याप्रमाणात झालेला वापर हे त्यामागील महत्त्वपूर्ण कारण होते.

राष्ट्रवादाचा प्रसार फक्त युद्धे, वैचारिक चर्चा किंवा कुटनीती एवढ्यामुळेच झाला नाही. राष्ट्र म्हणून विचार निर्माण होण्यामागे सांस्कृतिक घटकांनी देखील महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. चित्रकला, मूर्तीकला, कविता, साहित्य, नाटक, कथा आणि संगीत इत्यादींनी राष्ट्रवादी भावनांना रुजविण्यात आणि अभिव्यक्त करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. एक सामुहिक ऐतिहासिक वारश्याची जाणीव आणि एक सांस्कृतिक भूतकाळ असल्याची भावना हेच राष्ट्राचा आधार बनतील अशी तत्कालीन राष्ट्रवादी विचारकांची भावना होती. जर्मन विचारवंत योहान गॉटफ्रीड यांच्या मते, राष्ट्राचा मूळ आत्मा हा लोकगीते, लोक साहित्य आणि

लोकनृत्यात प्रकट होत असल्याने लोकसंस्कृतीच्या या रूपांना एकत्रित करणे आणि ठासवणे हे राष्ट्र निर्मितीच्या उद्देशपूर्तीसाठी अत्यंत आवश्यक आहे. लोकसंस्कृतीच्या माध्यमातून शिक्षित तसेच अशिक्षित जनतेपर्यंत आधुनिक राष्ट्राचा संदेश पोहोचवता येणे शक्य होते. भाषेने राष्ट्रवादाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एक भाषीय म्हणून एकत्र येण्याची प्रक्रिया गतिमान होत असे. आपल्यावर दुसरी एखादी परकीय भाषा लादली जात आहे म्हणून होणाऱ्या जनआक्रोशातून देखील राष्ट्रवादी भावनेच्या उदयाला हातभार लागला.

युरोपातील तत्कालीन चित्रकारांनी राष्ट्राला अभिव्यक्त करण्याकरिता स्त्रीच्या रूपकाचा वापर केला. राष्ट्राच्या मुळात अमूर्त असलेल्या विचाराला ठोस आधार देण्याच्या हेतूने विविध प्रतीकांचा आणि स्त्रीच्या रूपकांचा वापर केला. ज्याप्रमाणे स्वातंत्र्य पूर्व काळातील 'भारत माता' ही साखळदंडांनी जखडलेली दाखवली जात होती त्या प्रकारची राष्ट्राला प्रस्तुत करण्यासाठी स्त्रीच्या रूपकांचा वापर युरोपात करण्यात आला. फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान स्वातंत्र्य, न्याय आणि प्रजासत्ताक या विचारांना स्त्री रुपात दाखवण्यात आले. उदा. डोळ्यावर पट्टी बांधलेली आणि हातात तराजू घेतलेल्या स्त्रीचे रूपक हे 'न्याय' या विचारला अभिव्यक्त करते. फ्रेंच प्रजासत्ताकाला अभिव्यक्त करण्यासाठी 'मेरीॲन' नावाने स्त्री रूपकाचा वापर करण्यात आला. अशा प्रकारे जर्मन राष्ट्राचे प्रतिक म्हणून 'जर्मेनिया', पोलंड राष्ट्राचे प्रतिक म्हणून 'पोलोनिया' अशा स्त्री रुपकांचा वापर युरोपात राष्ट्रवादाचा प्रसार होत असताना केला गेला जो लोकांवर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडण्यास सहाय्यभूत ठरला. उपरोक्तप्रमाणे चर्चिले गेलेल्या अनेक कारणांच्या आणि ऐतिहासिक प्रक्रियांच्या परिणामस्वरूप एकोणिसाव्या शतकात युरोपात राष्ट्रवादाचा उदय आणि प्रसार झाला. राष्ट्रवादाच्या प्रसारामुळे काही राज्यांमध्ये ही निरंकुश राजेशाही कडून राष्ट्राच्या स्वरूपात घटनात्मक प्रजासत्ताक व्यवस्थेकडे होणारे स्थित्यंतर झाले. तर काही राज्ये ही परकीय सत्तेपासून वेगळी होऊन स्वतंत्र 'राष्ट्र' बनली. विविध राज्यात विभागलेले प्रदेशांचे एकीकरण होऊन इटली आणि जर्मनी ही राष्ट्रे उदयाला आली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१**

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा**.**

(१) 'आधुनिकता' या संकल्पनेचे महत्त्वाचे तत्व म्हणून मानली जाणारी मुल्ये कोणती आहेत?

(२) युरोपात पहिल्यांदा ही कोणती राष्ट्र-राज्ये उदयाला आली?

(३) १९ व्या शतकाच्या आरंभीच्या दशकात राष्ट्रीय एकतेशी संबधित विचार हे कोणत्या विचारप्रणालीशी जोडलेले होते?

(४) कोणत्या विचारसरणीमध्ये परंपरा, रूढी, प्रस्थापित संस्था इत्यादींना महत्त्व दिले जाते?

(५) राष्ट्रवाद आणि छपाई कलेचा विकास यांसंबंधी मुलभूत मांडणी कोणी केली आहे?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) आधुनिक राष्ट्रवादाचा उदय हा अठराव्या शतकात ..........येथे झाला.

(२) फ्रेंच इतिहासकार .......... याने सन १८८२ मध्ये 'राष्ट्र म्हणजे काय?' या विषयावर व्याख्यान दिले.

(३) 'राष्ट्रवाद' ही एक .......... संकल्पना आहे यावर बहुतांश इतिहासकारांचे एकमत आहे.

(४) इतिहासात आधुनिक राष्ट्रवादाची पहिली अभिव्यक्ती ही सन १७८९ मधील .......... च्या स्वरूपात दिसून येते.

(५) नेपोलियनने फ्रेंच नागरी संहितेत सुधारणा केल्या ज्याला .......... म्हणून ओळखले जाते.

## ३.२.२ मॅझिनी, गॅरिबाल्डी आणि काव्हूर

राष्ट्रवादाच्या प्रसारामुळे विविध छोट्या-छोट्या राज्यात विभागलेल्या किंवा परकीय सत्तेच्या वर्चस्वाखाली असलेल्या विशिष्ट भूप्रदेशातील समान भाषा, समान संस्कृती असलेल्या लोकांत राष्ट्रीय एकात्मतेची आणि राजकीय स्वातंत्र्याची भावना निर्माण झाली. आज आपण ज्या राष्ट्रांना इटली आणि जर्मनी म्हणून ओळखतो ती राष्ट्रे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अस्तित्वात आली. इटली हे विविध छोट्या छोट्या राज्यांमध्ये विभागलेले होते. जनमताच्या रेट्यामुळे आणि राजकारणाच्या गरजेमुळे अनेक वर्षे चाललेल्या सततच्या संघर्षांनंतर छोट्या छोट्या राज्यांचे एकीकरण होऊन इटली हे राष्ट्र उदयाला आले. इटली एकीकरण हे जागतिक इतिहासातील अत्यंत दूरगामी परिणाम करणारी घटना होती. त्यामुळे इटलीच्या एकीकरणाची प्रक्रिया समजून घेण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

- **इटलीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी**

आज ज्या राष्ट्राला आपण 'इटली' म्हणून ओळखतो ते राष्ट्र अनेक शतकांपासून अनेक छोट्या छोट्या राज्यांच्या स्वरूपात विखुरलेले होते. काही प्रदेशावर हॉब्सबर्ग साम्राज्याचे शासन होते तर काही राज्यांवर वंशपरंपरेने शासन करणारी राजघराणी होती. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात इटली हे सात राज्यांमध्ये विभाजित होते. टस्कनी राज्य, मोडेना राज्य, पेपल राज्य, पर्मा राज्य, सिसिली राज्य, नेपल्स राज्य, सार्डिनीया-पीडमॉऊंट ही ती सात राज्ये होती. यांपैकी फक्त सार्डिनीया-पीडमॉऊंट राज्यात एक इटालियन राजघराण्याचे शासन होते. बाकी राज्यांवर पोप, हॉब्सबर्ग घराणे आणि स्पॅनिश बुर्रबॉन घराण्याची सत्ता होती. इटालियन भाषेत देखील अजून एकसारखेपणा नव्हता. इटालियन भाषेचे अनेक प्रादेशिक आणि स्थानिक स्वरूप अस्तित्वात होते. अनेक राज्यांचे अस्तित्व असल्याने इटलीच्या प्रदेशात ऐक्य निर्माण होऊ शकले नाही. ही राज्ये सतत एकमेकांशी संघर्ष करत राहिली त्यामुळे इटालियन जनतेत राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली नव्हती. इटलीतील लहान लहान राज्यांवर फ्रान्स, ऑस्ट्रिया, स्पेन, प्रशिया इत्यादी शक्तीशाली

युरोपियन राज्यांचे वर्चस्व होते. आपले वर्चस्व आणि प्रभाव कायम राखण्यासाठी या शक्तींनी इटलीच्या एकीकरणास विरोध केला.

- **फ्रेंच राज्यक्रांती आणि इटालियन जनतेत एकीकरणाची भावना :**

सन १७८९ मध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमधील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मुल्यांचा संपूर्ण युरोपात प्रसार झाला. या मूल्यांच्या प्रभावापासून इटलीचा प्रदेश देखील अलिप्त राहिला नाही. फ्रेंच राज्यक्रांतीची माहिती आणि मूल्यांच्या प्रसारामुळे इटालियन लोकांत एकीकरणाची भावना उत्पन्न झाली. नेपोलियनच्या नेतृत्वातील फ्रेंच सैन्याने इटलीतील छोट्या छोट्या राज्यांवर सत्ता स्थापित केली. नेपोलियनने इटलीमधील छोट्या छोट्या राज्यांचे उत्तर इटली, मध्य इटली आणि दक्षिण इटली असे तीन भौगोलिक भाग केले. उत्तर इटली आणि मध्य इटलीवर नेपोलियन ने आपले थेट नियंत्रण आणले आणि दक्षिण इटलीवर अप्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित केले. उत्तर इटली मध्ये आधी सन १८०२ मध्ये इटालियन प्रजासत्ताकची स्थापना करून नेपोलियन तेथील अध्यक्ष बनला आणि नंतर याच प्रजासत्ताकचे सन १८०५ मध्ये 'किंगडम ऑफ इटली' (इटलीचे राज्य) असे रुपांतर करून नेपोलियनने 'इटलीचे राजपद' देखील धारण केले. नेपोलियनच्या शासनकाळात इटलीमध्ये नेपोलियनची संहिता लागू केली गेली. नेपोलियन संहिते अंतर्गत इटलीमधील सामंतवादी व्यवस्थेतील विशेषाधिकार नष्ट करण्यात आले, संपूर्ण इटलीमध्ये चालणाऱ्या अंतर्गत व्यापारावरील बंधने रद्द केली आणि कायद्यापुढे सर्वांना समानतेचे तत्त्व लागू केले. नेपोलियनच्या या सुधारणांमुळे इटालियन जनतेत राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या मूल्यांच्या आणि इटालियन राष्ट्रवादाच्या वाढीस या घटनाक्रमाद्वारे खतपाणी मिळाले.

- **व्हिएन्ना परिषद आणि इटलीची विभागणी :**

सन १८१५ मध्ये नेपोलियनचा पराभव केल्यानंतर युरोपचे भवितव्य ठरवण्यासाठी युरोपमधील जेत्या शक्तींची व्हिएन्ना येथे परिषद झाली. जेत्या शक्तींनी आपल्या आपल्या राज्यांचे हितसंबध लक्षात घेऊन युरोपचे विभाजन केले. हे विभाजन करत असताना त्या त्या प्रदेशातील लोकांच्या इच्छा-आकांक्षा यांच्याकडे साफ दुर्लक्ष करून तेथील उदारमतवादी चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. नेपोलियनद्वारे इटलीमध्ये घडवून आणलेल्या सुधारणा रद्द करण्यात आल्या. नेपोलियनने इटलीचे जे तीन गट केले होते त्यांचे देखील छोट्या छोट्या राज्यात विभाजन केले गेले आणि तेथे नवरूढीवादी राजघराण्यांची सत्ता स्थापन केली. व्हिएन्ना परिषदेने इटलीमधील व्हेनेशिया आणि लोंबार्डीचा प्रदेश ऑस्ट्रियास दिला. टस्किनी, ल्युका, मोडेना, पार्मा, इत्यादी ठिकाणी ऑस्ट्रियाच्या राजघराण्यातील म्हणजे हॉब्सबर्ग घराण्यातील व्यक्तींना राजपदावर बसवण्यात आले. रोममध्ये पोपच्या सत्तेची पुर्नस्थापना करण्यात आली. सिसिली आणि नेपल्स या राज्यात स्पॅनिश बुर्बॉन घराण्याला पुन्हा सत्तास्थानी आणण्यात आले. सॅव्हाय आणि पीडमॉऊंट-सार्डेनिया येथे व्हिक्टर इमॅन्युएल याला राजपदावर बसवण्यात आले. इटलीमधील उदारमतवादी चळवळी हरप्रकारे दडपून टाकण्याचा प्रयत्न ऑस्ट्रियाचा 'चान्सलर' अर्थात पंतप्रधान असलेल्या मेटरनिकने केला. इटलीतील नवरूढीवादी सत्ताधाऱ्यांनी उदारमतवादी आणि राष्ट्रवादी चळवळींना दडपून टाकण्यासाठी दमनाचे

धोरण अवलंबिले. परिणामी, अन्याय, अत्याचारग्रस्त जनतेच्या मनात इटलीतील नवरूढीवादी राजवटींच्या विरुद्ध असंतोष निर्माण झाला. इटलीच्या विविध राज्यातील अत्याचारी नवरूढीवादी राजवटींना प्रतिरोध करून इटालियन राष्ट्राची उभारणी करण्याच्या विचाराने इटलीच्या जनमानसात जोर धरला.

- **'कोळसे जाळणाऱ्यांची' कार्बोनरी संघटना :**

मेटरनिक आणि युरोपातील नवरूढीवादी सत्ताधीशांच्या दडपशाही विरोधात युरोपातील जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला होता. इटलीतील राष्ट्रवादी जनता देखील यास अपवाद नव्हती. इटलीच्या दक्षिण भागातील नेपल्स राज्यात राष्ट्रवादी लोक एकत्रित आले आणि त्यांनी 'कार्बोनरी' नावाची संघटना स्थापन केली. 'कार्बोनरी' म्हणजे 'कोळसा जाळणारे' असे या संघटनेच्या सभासदांना टोपण नाव देण्यात आले होते म्हणून ही संघटना 'कार्बोनरी' म्हणजे 'कोळसा जाळणाऱ्यांची संघटना' म्हणून ओळखली जाते. सन १८०० ते १८३१ याकाळात कार्यरत असणारी कार्बोनरी संघटना ही सत्ताधाऱ्यांच्या दडपशाहीच्या धोरणामुळे गुप्तपणे काम करत असे. सदर संघटना ही उदारमतवादी विचारांच्या लोकांची होती ज्यातील बरेचजण हे राष्ट्रवादाने देखील प्रेरित होते. त्यांचा मुख्य उद्देश हा अनियंत्रित सत्तेला पराजित करून घटनात्मक सरकार स्थापन करण्याचा होता. उदारमतवादी आणि राष्ट्रवादी असून देखील कार्बोनरी संघटनेकडे आपल्या उद्देशाच्या पुर्ती करिता कोणताही स्पष्ट असा तात्कालिक राजकीय कार्यक्रम नव्हता. सन १८१५ नंतरच्या राजकीयदृष्ट्या दडपशाहीच्या वातावरणातील वाढत्या असंतोषावर विशेषत: दक्षिण इटलीमध्ये त्यांनी लक्ष केंद्रित केले होते. कार्बोनरी संघटनेच्या सदस्यांनी इटलीच्या एकीकरणाच्या चळवळीत भाग घेतला होता. सन १८२० ची अयशस्वी क्रांती आणि इटलीच्या राष्ट्रवादाच्या विकासात कार्बोनरी संघटनेच्या सभासदांची मोठी भूमिका होती. इटलीच्या एकीकरणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या इटालियन क्रांतिकारी राष्ट्रवादी नेत्यांमधील जोसेफ मॅझिनी आणि जोसेफ गॅरिबाल्डी हे दोघे या कार्बोनरी संघटनेचे सभासद होते.

- **सन १८२० च्या नेपल्स आणि पीडमॉऊंटमधील अयशस्वी क्रांत्या :**

सन १८२० मध्ये युरोपातील इंग्लंड, स्पेन, पोर्तुगाल आणि रशिया या विविध देशातील जनतेने अनियंत्रित राजेशाही ऐवजी घटनात्मक राजेशाही स्थापित करण्यासाठी उठाव केला. त्याचवेळी ग्रीस मधील जनतेने ऑटोमन साम्राज्याविरोधात स्वातंत्र्य मिळवण्यासाठी उठाव केला. उदारमतवादी विचारांच्या विरोधातील दडपशाही धोरणाविरोधातील असंतोषातून झालेल्या सन १८२० च्या दशकातील विविध देशातील उदारमतवादी-राष्ट्रवादी जनतेने उठाव केले, याला '१८२० च्या क्रांत्या' असे म्हटले जाते. इटलीमधील जनता देखील १८२०च्या क्रांत्यांपासून अलिप्त नव्हती.

स्पेनच्या उदारमतवादी-राष्ट्रवादी क्रांतिकारकांनी उठाव करून घटनात्मक राजेशाही प्रस्थापित केली. स्पेनमधील या घटनाक्रमापासून प्रेरणा घेऊन इटलीच्या काही भागात देखील उठाव झाले. इटलीच्या दक्षिण भागातील नेपल्स आणि उत्तर भागातील पीडमॉऊंट येथे हे उठाव झाले. नेपोलियनने इटलीवर कब्जा केल्यानंतर नेपल्समध्ये त्याने उदारमतवादी घटनात्मक राजेशाही प्रस्थापित केली होती. मात्र, नेपोलियनच्या पाडावानंतर आलेल्या राजसत्तेने उदारमतवादी घटनात्मक व्यवस्था रद्दबातल केली. राजाच्या या कृतीमुळे

नेपल्सच्या जनतेमध्ये मोठ्याप्रमाणात असंतोष निर्माण झाला. परिणामी १८२० मध्ये नेपल्स मध्ये उठाव झाला. जनतेच्या उठावाची तीव्रता लक्षात घेऊन राजाने उदारमतवादी घटनेस मंजुरी दिली.

नेपल्सच्या क्रांती पासून प्रेरणा घेऊन पीडमॉऊंटमध्ये देखील उठाव झाला. व्हिक्टर इमॅन्युअल हा पीडमॉउंट-सार्डेनियाचा राजा होता. पीडमॉऊंटच्या जनतेने उठावाद्वारे उदारमतवादी घटनात्मक व्यवस्थेची मागणी केली. उठावास जनतेचा असलेला पाठींबा पाहून त्याने आपल्या चुलतभावाकडे म्हणजे चार्ल्स अल्बर्टकडे सत्तेची सूत्रे देऊन राजत्याग केला. पीडमॉऊंटमध्ये घटनात्मक राजेशाही स्थापन करण्यात आली. इटलीच्या नेपल्स आणि पीडमॉऊंट या भागात झालेले या क्रांतिकारी घटना युरोपातील अनियंत्रित आणि नवरूढीवादी राजसत्तांच्या हितसंबधांना बाधा पोचविणाऱ्या होत्या. त्यामुळे ऑस्ट्रियाच्या चान्सलर असलेल्या मेटरनीकने युरोपातील राजसत्तांशी संधान साधून नेपल्स आणि पीडमॉऊंटमध्ये आपले सैन्य पाठविले. ऑस्ट्रियन सैन्याने नेपल्स आणि पीडमॉऊंटचा उठाव मोडून काढला. मेटरनीकच्या या कारवाईमुळे नेपल्स आणि पीडमॉऊंटमध्ये नव्याने प्रस्थापित झालेली घटनात्मक व्यवस्था नष्ट करून तेथे पुन्हा अनियंत्रित राजेशाही स्थापन करण्यात आली. अशा रीतीने इटलीमधील १८२०ची क्रांती ही अयशस्वी ठरली.

- **१८३० ची फ्रेंच राज्यक्रांती आणि इटली :**

सन १८३० मध्ये युरोपात क्रांतीकारी उठावांची एक लाट आली. सन १८३० च्या क्रांत्यांच्या मागे युरोपातील स्वच्छंदतावादी राष्ट्रवादाचा (Romantics Nationalism) प्रभाव कारणीभूत होता. स्वच्छंदतावादी राष्ट्रवादानुसार, कोणत्याही राजघराण्याच्या किंवा राजकीय व्यवस्थेच्या आधारे एकता किंवा एकनिष्ठता निर्माण होत नाही. राष्ट्रीय एकता ही समान भाषा, समान वंश, समान राहणीमान, समान संस्कृती, समान धर्म आणि समान चालीरीती इत्यादींच्या आधारे निर्माण होते, असे स्वच्छंदतावादी राष्ट्रवाद्यांचे मत होते. सन १८३० च्या या क्रांतिकारी लाटेत नेदरलँड्स, फ्रान्स, पोलंड, इटली, पोर्तुगाल आणि स्वित्झर्लंड इत्यादी राष्ट्रांत क्रांतिकारी उठाव झाले. युनायटेड किंगडम ऑफ नेदरलँड्समध्ये क्रांती होऊन त्याचा भाग असलेला बेल्जियम स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र किंगडम ऑफ बेल्जियमची स्थापना झाली. फ्रान्समध्ये नेपोलियनचा पाडाव झाल्यानंतर पुनर्स्थापित करण्यात आलेल्या पारंपारिक 'बुर्बॉन' राजघराण्यातील चार्ल्सला राजपदावर बसविण्यात आले होते. सन १८३० च्या क्रांतीद्वारे चार्ल्सला राजपदावरून दूर करून त्याच्या जागी 'बुर्बॉन' राजघराण्याची दुय्यम शाखेतील आणि चार्ल्सचा चुलतभाऊ तसेच ऑर्लिन्सचा ड्युक असलेल्या लुई फिलीप याला 'फ्रान्सचा राजा' म्हणून घोषित करण्यात आले. पोलंडमध्ये देखील रशियाच्या वर्चस्वाविरुद्ध उठाव झाला. युरोपात घडणाऱ्या या १८३० च्या क्रांत्यांच्या लाटेपासून इटली देखील अलिप्त राहिला नाही. १८३० च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे पडसाद इटलीमध्ये देखील उमटले. मोडेना, टस्किनी, पार्मा आणि रोम येथील लोकांनी तेथील नवरूढीवादी सत्तांच्या विरोधात उठाव केले. इटलीतील नवरूढीवादी राजवटींनी स्वत:च्या जनतेविरुद्ध ऑस्ट्रियन सैन्याचा वापर करून हे उठाव मोडून काढले. इटलीतील अनियंत्रित सत्ताधाऱ्यांनी ही क्रांती दडपून टाकण्यासाठी क्रांतीकारींना पकडून त्यांना मृत्युदंड दिला. अशाप्रकारे १८३० चे क्रांतिकारी उठाव इटलीतील नवरूढीवादी राज्यसत्तांनी दडपून टाकले तरी राष्ट्रवादी भावनेच्या प्रसाराला रोखण्यात त्यांना अपयश आले.

- **१८४८ ची क्रांती आणि इटली :**

सन १८४८ मध्ये युरोपातील अनेक देशात प्रजासत्ताक राजवटी प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने उठाव झाले. रशिया, स्पेन इत्यादी देश वगळता इतर सर्व देशात कमी-अधिक तीव्रतेचे उठाव झाले. सन १८४८ च्या क्रांत्यांची सुरवात ही इटलीच्या सिसिली या प्रदेशातील स्थानिक क्रांतीने झाली आणि क्रांतीचे लोण अतिशय वेगाने फ्रान्स, जर्मनी, इटली आणि ऑस्ट्रिया इत्यादी प्रदेशात पसरले. हे सर्व उठाव युरोपातील रूढीवादी राजतंत्रांविरोधात होते आणि जनतेचा त्यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग होता. फ्रान्सच्या जनतेने बुर्बबॉन राजघराण्याच्या लुई फिलीपला राजपदावरून दूर करून नवीन राजघटना बनवून प्रजासत्ताकाची स्थापना केली. ऑस्ट्रियन साम्राज्यात देखील क्रांती होऊन ऑस्ट्रियाचा नवरूढीवादी चान्सलर असलेल्या मेटरनिक याला आपल्या पदाचा त्याग करून परागंदा व्हावे लागले. सन १८४८ च्या क्रांतीची सुरवात जरी इटलीच्या सिसिली मध्ये झाली असली तरी १८४८ च्या फ्रेंच राज्यक्रांती आणि १८४८ च्या ऑस्ट्रियन साम्राज्यातील क्रांतीद्वारे मेटरनिकचा पाडाव झाल्यानंतर इटलीमध्ये क्रांतीची तीव्रता वाढली. व्हेनेशिया आणि लोंबार्डी या ऑस्ट्रियन साम्राज्याच्या थेट वर्चस्वाखाली असलेल्या इटालियन प्रदेशात उठाव झाले. या प्रदेशातील जनतेने ऑस्ट्रियन वर्चस्वाविरोधात उठावात मोठ्याप्रमाणात भाग घेतला. उठावाचे क्रांतीमध्ये रुपांतर होऊन ऑस्ट्रियाचे वर्चस्व झुगारून देऊन प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा अल्बर्ट याने राष्ट्रवादी भूमिका घेऊन व्हेनेशिया आणि लोंबार्डी येथील उठावाला सहाय्य आणि समर्थन दिले होते. व्हेनेशिया आणि लोंबार्डी येथील क्रांतीचे लोण सिसिली, टस्कीनी, नेपल्स आणि पार्मा या इटालियन राज्यांत देखील पसरले. या राज्यातील जनतेने तेथील प्रस्थापित प्रतिगामी राजवटींच्या विरोधात उठाव केला आणि उदारमतवादी घटना मंजूर करून घेतल्या. इटलीमधील प्राचीन शहर असलेल्या रोममध्ये देखील जनतेने उठाव केला. इटलीच्या एकीकरणाचा समर्थक आणि प्रखर राष्ट्रवादी जोसेफ मॅझिनी याने रोममधील उठावाचे नेतृत्व केले. रोममध्ये झालेल्या यशस्वी उठावानंतर तेथील पोपची सत्ता उलथून टाकून प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. रोममध्ये प्रजासत्ताक स्थापन करण्यात इटालियन राष्ट्रवादी जोसेफ गॅरिबाल्डी याची महत्त्वाची भूमिका होती. रोममध्ये स्थापन झालेले प्रजासत्ताक हे तिसऱ्या नेपोलियनने सैन्य पाठवून नष्ट केले व पोपच्या सत्तेची पुनर्स्थापना केली. इटलीमधील इतर ठिकाणी झालेले उठाव देखील प्रस्थापित सत्ताधाऱ्यांनी मोडून काढले.

- **इटलीच्या एकीकरणाच्या दिशेने :**

इटालियन जनतेने लोकशाही सातत्याने केलेले उठाव हे प्रत्येकवेळी अपयशी ठरले. इटलीच्या विविध प्रदेशातील जनता विविध ठिकाणी वेगवेगळ्या काळात उठाव करत होती. प्रस्थापित प्रतिगामी सत्ता या आपापल्या राज्यातील उठाव स्वत:च्या सैन्याच्या आधारे दडपून टाकत असत. बऱ्याचवेळा जेंव्हा उठावकऱ्यांनी प्रस्थापित राजवटी उलथून टाकल्या त्यावेळी परकीय राजवटींनी आपले सैन्य पाठवून यशस्वी झालेली क्रांती मोडून काढली होती. मात्र, संपूर्ण इटली मधील जनता एकाच वेळी एकत्रित आणि संघटीतरित्या उठावात सामील झाली तरच जनतेच्या लोकशाहीसाठीच्या उठावास यश येईल ही बाब इटलीच्या विविध भागातील उदारवादी इटालियन राष्ट्रवाद्यांच्या लक्षात आली. इटलीच्या विविध राज्यात

विभागलेल्या क्रांतिकारकांना उदारवादी लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करायची असल्यास सर्व राज्यांतील क्रांतिकारकांनी संघटीत होणे आवश्यक होते. विविध राज्यांतील क्रांतिकारी संघटीत झाले तरच प्रतिगामी राजवटी टिकवून ठेवण्यासाठी होणारे परकीय सत्तांचे लष्करी हस्तक्षेप उधळून लावता येतील ही बाब देखील स्पष्ट झाली होती. परिणामी, संघटीतपणे आणि परस्पर समन्वय साधत इटलीच्या एकीकरणासाठीचे प्रयत्न सुरु झाले. इटलीच्या एकीकरणाच्या लढ्यात अनेक क्रांतिकारकांनी महत्त्वाची भूमिका निभावली. त्यांच्यापैकी इटालियन एकीकरणाचा प्रणेता आणि प्रखर राष्ट्रवादी जोसेफ मॅझिनी, प्रखर राष्ट्रवादी योद्धा जोसेफ गॅरिबाल्डी, इटलीच्या एकीकरणाला प्रत्यक्षात साकारणारा मुत्सद्दी काऊंट कॅमिलो डी काव्हूर आणि ज्याच्या नेतृत्वाखाली इटलीचे एकीकरण घडून आले तो पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हे प्रमुख नेते होते.

- **जोसेफ मॅझिनी – वैचारिक आधाराचा रचनाकार : (१८०५ ते १८७२)**

जोसेफ मॅझिनी हा अत्यंत प्रखर राष्ट्रवादी आणि तितकाच प्रखर उदारवादी नेता म्हणून ओळखला जातो. जोसेफ मॅझिनी यांचा जन्म २२ जून १८०५ रोजी इटलीजवळ जिनोआ येथे झाला. त्यांचे वडिल विश्वविद्यालयात प्रोफेसर होते. वडिलांच्या क्रांतीकारक विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. इटालियन लोकांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण करण्यात जोसेफ मॅझिनीचा मोठा वाटा होता. मॅझिनीने इटलीच्या एकीकरणाचा पाया रचला आणि इटालियन लोकांमध्ये देशभक्ती, कर्तव्य आणि त्यागाचे विचार रुजविले. प्रत्यक्षात तो स्वत: एक कवी, आदर्शवादी विचारवंत आणि राज्यक्रांतीचा उद्गाता होता. इटलीतील गरीब लोकांची स्थिती पाहून जोसेफ मॅझिनीला प्रचंड दुःख होई. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी जोसेफ मॅझिनीने प्रथम कर्बोनरी चळवळीत भाग घेतला. सन १८३० च्या उठावाच्या वेळी मॅझिनीला अटक करून तुरुंगात डांबण्यात आले. आपल्या तुरुंगवासाच्या काळात केलेल्या चिंतनानंतर कार्बोनरी संघटने पुढे कोणताही निश्चित कार्यक्रम नाही याची स्पष्ट जाणीव जोसेफ मॅझिनीला झाली. सन १८३१ मध्ये मॅक्झिनीला तुरुंगातून मुक्त करून हद्दपार करण्यात आले. इटलीतून झालेल्या हद्दपारीमुळे जोसेफ मॅझिनीने फ्रान्समध्ये आश्रय घेतला. फ्रान्समध्येच सन १८३१ मध्ये जोसेफ मॅझिनी याने 'यंग इटली' ही संघटना स्थापन केली. जोसेफ मॅझिनीच्या विचारांनी प्रेरित होऊन हजारो इटालियन तरुण 'यंग इटली' या संघटनेत सामील झाले. दोन वर्षातच 'यंग इटली' संघटनेची सभासद संख्या ६०,००० च्या वर गेली. 'देशावर आणि जनतेवर श्रद्धा' हे या संघटनेचे ब्रीद वाक्य होते. जोसेफ मॅझिनीने आत्तापर्यंत झालेल्या उठावांच्या अनुभवातून निश्चित केलेली उद्दिष्ट्ये 'यंग इटली' संघटनेसमोर अत्यंत स्पष्टपणे मांडली. स्वातंत्र्य, समता आणि लोककल्याणाच्या मुल्यांवर आधारलेले 'इटली' हे सुसंघटीत राष्ट्र निर्माण करणे हे 'यंग इटली' संघटनेच्या समोरील सर्वोच्च उद्दिष्ट होते. या सोबतच यंग इटली समोर पुढील उद्दिष्ट्ये होती जी इटलीच्या एकीकरणाला पूरक होती.

१. इटलीचे एकीकरण करण्यासाठी इटलीतील ऑस्ट्रियाचे वर्चस्व नष्ट करणे आवश्यक होते.

२. इटलीतील अनियंत्रित राजसत्ता संपुष्टात आणून इटलीमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना करणे.

३. पोपच्या कारभारात सुधारणा घडवून आणणे.

४. परकीयांच्या मदतीशिवाय इटलीचे ही एकीकरण घडवून आणणे.

वरील उद्दिष्टे लक्षात घेऊन जोसेफ मॅझिनी आणि त्याच्या 'यंग इटली' संघटनेद्वारे इटालियन लोकांमध्ये मोठ्याप्रमाणात जागृती होऊन राष्ट्रवादाची भावना वाढीस लागली. इटलीतील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचून त्यांच्यात क्रांतीचा विचार रुजवून राष्ट्रासाठी सर्वस्व त्याग करण्यासाठी तयार करण्याचे कार्य 'यंग इटली' आणि जोसेफ मॅझिनी यांनी केले.

सन १८४८ साली फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद युरोपभर उमटले. ऑस्ट्रियामध्ये क्रांती होऊन अनियंत्रित राजवटीला हादरे बसले आणि तेथील चान्सलर मेटरनिक यास ऑस्ट्रियातून पलायन करावे लागले. ऑस्ट्रियाचा इटलीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रभाव आणि हस्तक्षेप असल्यामुळे वरील घडामोडींचे परिणाम इटलीवर होणे साहजिक होते. सन १८४८ च्या क्रांती आणि इतर घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इटलीमधील लोंबार्डी, व्हेनेशिया आणि रोम येथे उठाव झाले. रोममधील उठावानंतर पोपच्या सत्तेचा पाडाव होऊन जोसेफ मॅझिनी याच्या नेतृत्वाखाली प्रजासत्ताकाची स्थापना झाली. सन १८४८ च्या या घडामोडीत जोसेफ मॅझिनी याला जोसेफ गॅरिबाल्डी याची साथ मिळाली. मात्र, इटलीमधील सन १८४८ सालातील क्रांतीचे प्रयत्न अपयशी ठरले. फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनने फ्रेंच सैन्य पाठवून रोममधील प्रजासत्ताकाचा पाडाव केला आणि पोपची सत्ता पुन्हा बहाल केली. क्रांती अपयशी ठरल्यामुळे मॅझिनी आणि गॅरिबाल्डी यांना इटलीतून पलायन करावे लागले. जोसेफ मॅझिनीने सिसिलीमध्ये आश्रय घेतला आणि तेथील लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाचा आणि राष्ट्रवादी भावनेचा प्रसार केला. जोसेफ मॅझिनीच्या या कार्यामुळे सन १८६० साली सिसिलीमध्ये उठाव होऊन बुरबॉन घराण्यातील राजा फ्रान्सिस द्वितीय याचा पाडाव होऊन सिसिली स्वतंत्र झाला.

जोसेफ मॅझिनी हा प्रखर राष्ट्रवादी असण्यासोबतच प्रखर प्रजासत्ताकवादी होता. मात्र, इटलीतील राजकीय परिस्थिती ही पूर्ण प्रजासत्ताक व्यवस्था स्थापित होण्यासारखी नव्हती. परिणामी नंतरच्या काळात इटलीच्या एकीकरणाचे नेतृत्व काऊंट कॅमिलो डी काव्हूर या पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या मुत्सद्दी पंतप्रधानाकडे गेले. जोसेफ मॅझिनीचा प्रत्यक्ष राजकीय प्रभाव कमी होऊन त्याला आपल्या उर्वरित आयुष्यातील मोठा काळ इटलीबाहेर काढावा लागला. सन १८७२ साली इटलीमधील पिसा येथे फुफुसाच्या आजाराने जोसेफ मॅझिनीचा मृत्यू झाला. जरी इटलीच्या एकीकरणाच्या प्रक्रियेत जोसेफ मॅझिनी नंतरच्या काळात निष्प्रभ ठरला असला तरी पूर्वीच्या कार्यामुळे जोसेफ मॅझिनीने इटलीच्या एकीकरणाचा पाया रचला असे मानले जाते.

- **जोसेफ गॅरिबाल्डी – क्रांतिकारी नायक : (१८०७-१८८२)**

इटलीच्या एकीकरणाच्या लढ्यातील योद्धा म्हणून जोसेफ गॅरिबाल्डी हा सुप्रसिद्ध आहे. १८०७ मध्ये नॉईस या शहरात त्याचा जन्म झाला. जोसेफ गॅरिबाल्डीचे कुटुंब हे समुद्र किनारी प्रदेशातील व्यापारी वर्गाचे होते. परिणामी, नौकानयन आणि परदेश प्रवासाची संधी गॅरिबाल्डीला लवकरच लाभली. सन १८३२ मध्ये गॅरिबाल्डी हा व्यापारी जहाजाचा कॅप्टन म्हणून नियुक्त झाला. रशिया, डेन्मार्क अशा देशात प्रवास करताना जोसेफ मॅझिनीच्या 'यंग इटली' या गुप्त संघटनेतील सदस्यांशी गॅरिबाल्डीची ओळख झाली. सन १८३३ च्या

नोव्हेंबर महिन्यात जिनेव्हा या शहरात जोसेफ गॅरिबाल्डी आणि मॅझिनी या दोन कट्टर इटालियन राष्ट्रवादींची भेट झाली. या काळातच जोसेफ गॅरिबाल्डी हा कार्बोनरी संघटनेचा सदस्य झाला. सन १८३४ च्या फेब्रुवारी महिन्यात पीडमॉऊंटमध्ये झालेल्या उठावात गॅरिबाल्डीने भाग घेतला. पीडमॉऊंटमध्ये झालेल्या उठावात भाग घेतल्याबद्दल गॅरिबाल्डीवर खटला दाखल होऊन जिनेव्हा न्यायालयाने त्याला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. गॅरिबाल्डी फरार असल्यामुळे सुनावणीस हजर नव्हता आणि त्यामुळे मृत्युदंडाची शिक्षा त्याच्या गैरहजेरीमध्ये सुनावण्यात आली. पीडमॉऊंटचा उठाव अपयशी ठरल्यानंतर लगेचच गॅरिबाल्डी फ्रान्समध्ये पळून गेला. जोसेफ गॅरिबाल्डी फ्रान्समधून समुद्रमार्गे आफ्रिकेतील ट्युनिसला पोहचला. ट्युनिसमधून निघून समुद्रमार्गे दक्षिण अमेरिकेतील ब्राझील पर्यंतचा प्रवास जोसेफ गॅरिबाल्डी याने केला. ब्राझील देशामधील क्रांतिकारी राष्ट्रवादी संघर्षात भाग घेऊन गॅरिबाल्डीने महत्त्वाची भूमिका निभावली. ब्राझीलमधून उरुग्वे या देशात जाऊन तेथील गृहयुद्धात गॅरिबाल्डीने मोठे शौर्य गाजविले.

सन १८४८ मध्ये फ्रान्स मध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद संपूर्ण युरोपात उमटले. इटलीवर वर्चस्व गाजवणाऱ्या ऑस्ट्रियामध्ये उठाव होऊन मेटरनिकला पलायन करावे लागले. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर इटलीमध्ये ठिकठिकाणी उठाव झाले. याचकाळात गॅरिबाल्डी हा जवळपास चौदा वर्षे अमेरिकेत राहून इटलीच्या एकीकरणाच्या उद्देशाने इटलीला परत आला आणि त्याने इटलीमधील उठावात भाग घेतला. इटलीचे एकीकरण करण्याच्या उद्देशाने गॅरिबाल्डी याने क्रांतिकारी सैन्य उभे केले. गॅरिबाल्डीच्या या सैन्यातील सैनिक हे लाल रंगाचा सदरा (शर्ट) वापरत असत म्हणून गॅरिबाल्डीच्या या सैन्याला 'लाल डगलेवाल्यांचे सैन्य' (Red Shirts) म्हणून ओळखले जाते. गॅरिबाल्डी आणि त्याच्या लाल डगलेवाल्यांच्या सैन्याने उत्तर इटलीमधील लोंबार्डी आणि व्हेनेशिया या ठिकाणी झालेल्या उठावात भाग घेतला. ऑस्ट्रियन सैन्याने लोंबार्डी आणि व्हेनेशिया येथील उठाव मोडून काढल्यानंतर घालणाऱ्या गॅरिबाल्डी आणि त्याच्या सैन्याने दक्षिणेला रोमच्या दिशेला आपला मोर्चा वळवला. जोसेफ मॅझिनीच्या नेतृत्वाखाली झालेल्या क्रांतीत गॅरिबाल्डीने भाग घेतला. रोम मधील पोपची सत्ता जाऊन जोसेफ मॅझिनीच्या नेतृत्त्वाखाली प्रजासत्ताक राज्याची स्थापना झाली. जोसेफ गॅरिबाल्डीला या प्रजासत्ताकच्या सैन्याचे सेनापतीपद प्रदान करण्यात आले. जोसेफ मॅझिनीच्या नेतृत्त्वाखाली रोममधील प्रजासत्ताक राज्य अल्पजीवी ठरले. फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियन याने फ्रेंच सैन्य पाठवून रोममधील प्रजासत्ताक नष्ट करून पोपच्या राज्याची पुनर्स्थापना केली. पोपची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाल्याने आणि क्रांती अयशस्वी झाल्याने गॅरिबाल्डीला इटलीमधून पलायन करावे लागले. इटलीमध्ये घडलेल्या या अयशस्वी क्रांती संघर्षात गॅरिबाल्डीची पत्नी अनिता हिचा देखील मृत्यू झाला. आपल्या शौर्य, राष्ट्रभक्ती आणि त्यागामुळे जोसेफ गॅरिबाल्डी हा इटालियन राष्ट्रभक्तांचा आराध्यदैवत बनला.

इटलीतून पलायन केल्यानंतर जोसेफ गॅरिबाल्डीने अमेरिकेत आश्रय घेतला. व्यापाराच्या निमित्ताने गॅरिबाल्डीने जगभर नाविक सफरी केल्या. सन १८५४ मध्ये गॅरिबाल्डी इटलीस परत आला. फेलिक्स या आपल्या मृत भावाकडून मिळालेल्या संपत्तीच्या आधारे इटलीतील कॅप्रेरा बेटाचा अर्धा भाग विकत घेऊन गॅरिबाल्डी तेथे शेती करू लागला. दरम्यानच्या काळात इटलीच्या एकीकरणाच्या चळवळीचे नेतृत्व जोसेफ

मॅझिनीकडून काऊंट कॅमिलो डी काव्हूरकडे गेले. बलाढ्य परकीय सत्ता आणि इटलीतील राजकीय परिस्थिती पाहता पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या राजेशाहीच्या नेतृत्त्वाखालीच इटलीचे एकीकरण होऊ शकते हे वास्तव लक्षात आल्याने जोसेफ गॅरिबाल्डीने काऊंट कॅमिलो डी काव्हूरचे नेतृत्त्व स्विकारले.

सन १८६० साली सिसिली बेटावर उठाव झाल्यानंतर गॅरिबाल्डीने आपल्या लाल डगलेवाल्यांच्या सैन्यासह जिनोव्हा येथून समुद्रमार्गे सिसिली गाठले आणि सिसिली बेट जिंकून घेतले. इटलीच्या मुख्यभूमीच्या दक्षिणेकडील सिसिली हे बेट जिंकल्यानंतर इटलीच्या मुख्यभूमीवरील नेपल्सचा प्रदेश देखील गॅरिबाल्डीच्या ताब्यात आला. जोसेफ मॅझिनी, काऊंट कॅमिलो डी काव्हूर आणि राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांचा गॅरिबाल्डीला पाठींबा होता. सिसिली बेट आणि नेपल्सचा भूभाग ताब्यात आल्यानंतर गॅरिबाल्डीने राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नावाने तेथील सत्ता हाती घेतली.

इटलीच्या दक्षिणेकडील मुख्यभूमीचा काही भागावर वर्चस्व मिळवल्यानंतर गॅरिबाल्डीने पोपची सत्ता असलेल्या रोमवर आक्रमण करण्याचे ठरवून कूच केले. पोप हे पद जगभरातील कॅथलिक पंथीयांच्या धर्मप्रमुखाचे पद असल्याने पोपच्या राज्यावरील आक्रमणामुळे कॅथलिक राष्ट्रे संतप्त होण्याची शक्यता होती. तसेच फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन याने देखील पोपच्या राज्याला संरक्षण दिले असल्याने तो देखील नाराज होण्याची शक्यता होती. त्यामुळे काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने गॅरिबाल्डी याला पोपच्या राज्यावरील आक्रमणाची योजना स्थगित करण्यास सांगितले. मात्र, गॅरिबाल्डीने त्यास नकार दिला आणि आपल्या सैन्याची रोमच्या दिशेने कूच सुरू ठेवली. या घटनाक्रमामुळे इटलीच्या एकीकरणासमोर मोठा राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला. गॅरिबाल्डीने जर रोमवर हल्ला केला तर कॅथलिक राष्ट्रे संतप्त होऊन त्यांच्याकडून इटलीच्या एकीकरणास विरोध सुरू होणार होता. पोपच्या राज्यावरील हल्ल्यामुळे फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन हा नाराज झाला असता. इटलीच्या एकीकरणाच्या विरोधी असलेल्या ऑस्ट्रियाशी युद्ध झाल्यास तिसरा नेपोलियन आणि फ्रान्स यांच्या मदतीची आवश्यकता भासणार आहे असे काऊंट कॅमिलो डी काव्हूर याला वाटत होते. पोपच्या राज्यावर कब्जा झाल्यानंतर गॅरिबाल्डीच्या ताब्यात संपूर्ण दक्षिण इटलीचा प्रदेश येणार होता. तसे झाल्यास गॅरिबाल्डी स्वत:ला दक्षिण इटलीचा राजा घोषित करेल किंवा दक्षिण इटलीमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना करेल, अशी भीती काव्हूर याला वाटत होती. त्यामुळे गॅरिबाल्डीचे पोपच्या राज्यावरील आक्रमण रोखण्याची आवश्यकता आहे असे काव्हूर याला वाटत होते.

काऊंट कॅमिलो डी काव्हूर फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनकडून गुप्त मान्यता घेऊन पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नेतृत्त्वाखाली पोपच्या राज्यावर सौम्य हल्ले करून त्याचे काही भाग जिंकून गॅरिबाल्डीचा मार्ग अडवण्याची योजना बनवली. सदर योजनेनुसार पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांच्या नेतृत्वाखालील पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या सैन्याने उम्ब्रिया आणि मार्चेज हे दोन पोपच्या राज्यातील प्रदेश जिंकून घेतले. यानंतर व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीयच्या सैन्याने गॅरिबाल्डीची पोपवरील स्वारी रोखण्याच्या दृष्टीने चाल केली. व्हिक्टर इमॅन्युएलचे आणि गॅरिबाल्डीचे सैन्य समोरासमोर आले. व्हिक्टर इमॅन्युएलच्या सैन्यातील अनेक सैनिक गॅरिबाल्डीला इटलीचा क्रांतिकारी नायक मानणारे होते. दोन्ही बाजूंना रक्तपात नको होता. त्यामुळे इटलीच्या एकीकरणाला प्राधान्य देत जोसेफ गॅरिबाल्डीने आपली

फक्त पोप वरील स्वारी रद्द केली. त्याने आतापर्यंत जिंकलेला सिसिली आणि नेपल्ससहित दक्षिण इटलीचा सर्व प्रदेश पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याला देऊ केला. यानंतर व्हिक्टर इमॅन्युएलने देऊ केलेले पारितोषिक आणि पद नाकारून जोसेफ गॅरिबाल्डी हा कॅप्रेरा बेटावर वास्तव्यास निघून गेला. कॅप्रेरा बेटावरील वास्तव्यात सन १८८२ मध्ये इटलीच्या एकीकरणाचा नायक जोसेफ गॅरिबाल्डी मरण पावला. जोसेफ मॅझिनी, काऊंट कॅमिलो डी काव्हूर आणि व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यांनी जरी इटलीच्या एकीकरणात महत्त्वाची भूमिका निभावली असली तरी आपले शौर्य, राष्ट्रप्रेम आणि सर्वस्वाचा केलेला त्याग यामुळे जोसेफ गॅरिबाल्डी हा जगभर प्रसिद्धीस पावला.

- **काऊंट कॅमिलो डी काव्हूर–वास्तववादी मुत्सद्दी :**

सन १८१० मध्ये एका उमराव घराण्यात जन्मास आलेला काऊंट कॅमिलो डी काव्हूर हा इटलीचे एकीकरण प्रत्यक्षात साध्य करणारा मुत्सद्दी म्हणून ओळखला जातो. इटलीच्या जनमानसात वैचारिक जागृती करणारा म्हणून जोसेफ मॅझिनी आणि आपल्या शौर्याने इटलीच्या राष्ट्रभक्तांसाठी प्रेरणादायी ठरलेला जोसेफ गॅरिबाल्डी या दोहों इतकीच महत्त्वाची भूमिका काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने इटलीच्या एकीकरण साकार करण्यात बजावली. लष्करी शिक्षण घेऊन लष्करात इंजिनियरच्या नोकरी पासून काव्हूर याने आपल्या कार्यकीर्दीची सुरवात केली. मात्र, मुळचा क्रांतिकारी विचारांचा असल्याने काव्हूर हा नोकरीत फार काळ रमला नाही. सन १८३१ मध्ये आपल्या लष्करातील नोकरीचा राजीनामा देऊन काव्हूरने इंग्लंड आणि फ्रान्सचे दौरे केले. इंग्लंड आणि फ्रान्सच्या वारंवार केलेल्या आपल्या दौऱ्यात काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने या दोन्ही देशातील शासनपद्धतींचा अभ्यास केला. इंग्लडमधील संसदीय शासनपद्धतीचा काव्हूरवर मोठा प्रभाव पडला. छोट्या छोट्या राज्यात विभागलेल्या इटलीच्या प्रगतीसाठी इंग्लंडसारखी शासनपद्धती उपयोगी पडेल असे काव्हूरचे ठाम मत बनले होते.

सन १८४८ सालच्या फ्रान्समधील क्रांतीचे पडसाद इटलीमध्ये उमटून इटलीमध्ये ठिकठिकाणी उठाव झाले. इटलीमधील पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्यातील जनतेने देखील उठाव करून तेथील राजाकडे उदारमतवादी घटनेची मागणी केली. उदारमतवादी घटनेच्या लोकमागणीस काऊंट कॅमिलो डी काव्हूरचा पाठींबा होता. पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या राजाने आपल्या जनतेची मागणी मान्य करून पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या जनतेस उदारमतवादी घटना दिली. सदर घटनेनुसार प्रातिनिधिक सरकार स्थापन करण्याकरिता निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत काव्हूर हा निवडून आला. निवडणुकीनंतर सन १८५० मध्ये स्थापन झालेल्या प्रातिनिधिक सरकारच्या मंत्रिमंडळात काव्हूरला देखील स्थान मिळाले. आपल्या कुशल मुत्सद्देगिरी आणि कामाच्या जोरावर दोन वर्षातच काव्हूर हा पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या पंतप्रधान पदावर विराजमान झाला.

काव्हूर हा राष्ट्रवादी विचारांचा होता. इटलीचे एकीकरण व्हावे आणि परकीय शक्तींच्या वर्चस्वातून इटली मुक्त व्हावा असे त्याला वाटत असे. मात्र, वास्तववादी दृष्टिकोनाचा असल्यामुळे राष्ट्रवादी भावनेच्या प्रवाहात वाहत जाण्याऐवजी परिस्थितीचे योग्य आकलन करून पाऊले टाकावीत असे काव्हूरचे मत होते.

ऑस्ट्रिया साम्राज्य हे इटलीच्या एकीकरणातील सर्वात मोठा अडथळा आहे याचे भान काव्हूरला होते. सर्वांगानी युरोपातील बलाढ्य साम्राज्य असणाऱ्या ऑस्ट्रियाचा पराभव करून त्याचा इटलीतील राजकारणातील हस्तक्षेप नष्ट करणे हे इटलीच्या एकीकरणासाठी आवश्यक होते. इटालियन राष्ट्रवादाचा प्रणेता जोसेफ मॅझिनी याला देखील ही बाब स्पष्टपणे लक्षात आली होती. आदर्शवादी कल्पनाविश्वात रमणाऱ्या मॅझिनीला वाटत होते की निव्वळ जनतेच्या उठावाद्वारे ऑस्ट्रियाचे इटलीवरील वर्चस्व नष्ट करता येईल. इटालियन जनतेने देखील ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाविरोधात वेळोवेळी केले. पण, हे सर्व उठाव सैन्यशक्तीच्या बळावर अल्पावधीत दडपून टाकण्यात आले. त्यामुळे फक्त जनतेच्या उठावाद्वारे ऑस्ट्रियाचे वर्चस्व नष्ट करता येणार नाही याची काव्हूरला पक्की खात्री पटली होती. उदारमतवादी विचारांच्या पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नेतृत्त्वाखाली इटलीचे एकीकरण करून तेथे इंग्लंडप्रमाणे राजा नामधारी प्रमुख असलेली संसदीय लोकशाही व्यवस्था स्थापना करायला हवी असे काव्हूरला वाटत होते. इटलीचा एकीकरणाचा आणि ऑस्ट्रियापासून इटलीच्या स्वातंत्र्याचा लढा पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या पुढाकाराने लढला जावा आणि आवश्यकता भासल्यास परकीय शक्तींची देखील या कामी मदत घेण्यात यावी असे काव्हूरचे स्पष्ट मत होते. सन १८५० ते १८६१ या आपल्या कार्यकिर्दीत काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने टप्प्या टप्प्याने इटलीच्या एकीकरणाच्या दिशेने पाऊले टाकली. पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या पुढाकाराने इटलीचे एकीकरण व्हावे यादृष्टीने काव्हूरने प्रयत्न केले. परिणामी, पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हा इटलीच्या एकीकरणाच्या संघर्षाच्या केंद्रस्थानी आला. सन १९६१ मध्ये काव्हूरचा मृत्यू झाला. तरी काव्हूरने आखलेल्या धोरणानुसार राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्या नेतृत्वात इटलीचे एकीकरणाची प्रक्रिया १९७१ पर्यंत सुरू राहून 'इटली' हे राष्ट्र अस्तित्वात आले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) 'यंग इटली' या गुप्त संघटनेची स्थापना कोणी केली?

(२) इटलीच्या एकीकरणाला विरोध करणारा ऑस्ट्रियाचा पंतप्रधान कोण होता?

(३) इटलीच्या एकीकरणाच्या लढ्यातील योद्धा म्हणून कोण सुप्रसिद्ध आहे?

(४) कोणत्या राज्याच्या पुढाकाराने इटलीचे एकीकरण व्हावे असा काव्हूरचा प्रयत्न होता?

(५) कोणते साम्राज्य हे हे इटलीच्या एकीकरणातील सर्वात मोठा अडथळा होते?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) .......... हा इटलीचे एकीकरण प्रत्यक्षात साध्य करणारा मुत्सद्दी म्हणून ओळखला जातो.

(२) फ्रान्सच्या .......... याने फ्रेंच सैन्य पाठवून रोममधील प्रजासत्ताक नष्ट करून पोपच्या राज्याची पुनर्स्थापना केली.

(३) जोसेफ गॅरिबाल्डीचे सैन्य हे ......... सैन्य म्हणून प्रसिद्ध होते.

(४) अमेरिका खंडातील ......... देशामधील क्रांतिकारी राष्ट्रवादी संघर्षात भाग घेऊन गॅरिबाल्डीने महत्त्वाची भूमिका निभावली.

(५) .........येथील संसदीय शासनपद्धतीचा काव्हूरवर मोठा प्रभाव पडला.

### ३.३.३ व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय आणि इटलीचे एकीकरण

व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हा सन १८४९ ते १८६१ या काळात पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा होता. तो उदारमतवादी विचारांचा असून धोरणी राज्यकर्ता-प्रशासक होता. ऑस्ट्रियाला इटलीतून हद्दपार करून पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या नेतृत्वात इटलीचे एकीकरण घडवून आणण्याच्या काव्हूरच्या धोरणाला व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने संपूर्ण पाठींबा दिला. पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याच्याच नेतृत्त्वाखाली सन १८६१ साली इटलीचे एकीकरण होऊन एकीकृत प्रदेशाला 'इटलीचे राज्य' (Kingdom of Italy) म्हणून घोषित करण्यात आले. व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हा इटलीच्या एकीकरणाचा प्रतिक ठरून त्याला 'इटलीचा राजा' (King of Italy) म्हणून घोषित करण्यात आले.

पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याचा पंतप्रधान झाल्यानंतर लगेचच आपल्या उद्दीष्ट्यांच्या पुर्ती करण्याच्या दृष्टीकोनाने काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने पाऊले उचलण्यास सुरवात केली. व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने काव्हूरच्या प्रयत्नांना संपूर्ण पाठींबा दिला. पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या राज्याच्या नेतृत्त्वात इटलीचे एकीकरण करायचे असल्यास पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याला सामर्थ्यशाली बनवणे आवश्यक होते. काव्हूरने उद्योगधंदे, कारखाने, व्यापार, आधुनिक शेती, चांगल्या प्रतीचे रस्ते, रेल्वेमार्गांचे जाळे, पाण्याचे कालवे इत्यादी पायाभूत गोष्टी पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्यात विकसित केल्या. परिणामी, लवकरच पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्य हे समृद्ध राज्य म्हणून ओळखले जाऊ लागले. पीडमॉऊंट-सार्डेनियामध्ये शैक्षणिक संस्था उभारून काव्हूरने शिक्षणाचा मोठ्याप्रमाणात प्रसार केला. स्वत: लष्करी शिक्षण घेतलेल्या काव्हूरने पीडमॉऊंट-सार्डेनियामध्ये लष्करी शिक्षणाचा प्रसार वाढवून पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या लष्करात मोठी वाढ केली. राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय आणि पंतप्रधान काऊंट कॅमिलो डी काव्हूर यांच्या नेतृत्त्वाखालील पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याच्या सर्वांगीण देदीप्यमान प्रगतीमुळे इटलीच्या एकीकरणाचे नेतृत्त्व आपोआप पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याकडे आले.

पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याला सामर्थ्यशाली बनवल्यानंतर व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय आणि काव्हूरने इटलीच्या एकीकरणाच्या दिशेने पाऊले टाकण्यास सुरवात केली. ऑस्ट्रिया हा इटलीच्या एकीकरणातील प्रमुख अडथळा असल्यामुळे ऑस्ट्रिया विरोधात फ्रान्स आणि इंग्लंड यांचे सहाय्य प्राप्त करणे आवश्यक आहे हे दोघे जाणून होते. फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यापैकी फ्रान्सची मदत इटलीच्या एकीकरणास प्राप्त होईल याची काव्हूरला खात्री होती. फ्रान्सचे ऑस्ट्रियाशी पूर्वीपासूनच शत्रुत्व होते. त्याच बरोबर फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनला आपले आसन बळकट करण्यासाठी आक्रमक परराष्ट्र धोरण राबविण्याची आवश्यकता होती.

त्यामुळे काव्हूरने इटलीच्या एकीकरणासाठी फ्रान्सची मदत मिळावी या दृष्टीने प्रयत्न करण्यास सुरवात केली. क्रिमियन युद्धाच्या निमित्ताने फ्रान्स आणि इंग्लंडची इटलीच्या एकीकरणासाठी सहानभूती मिळवण्याची संधी काव्हूरला लवकरच प्राप्त झाली. सन १८५४ मध्ये तुर्कस्थान आणि रशिया यांच्यात युद्ध सुरु झाले ज्याला क्रिमियन युद्ध म्हणून ओळखले जाते. या युद्धात फ्रान्स आणि इंग्लंड यांनी तुर्कस्थानच्या बाजूने युद्धात भाग घेतला. व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीयच्या नेतृत्त्वाखालील पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याचा या युद्धाच्या कारणांशी काही संबंध नसताना देखील काव्हूरच्या धोरणानुसार पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याने फ्रान्स आणि इंग्लंडच्या बाजूने क्रिमियन युद्धात भाग घेतला. क्रिमियन युद्धात तुर्कस्थान, इंग्लंड, फ्रान्स आणि पीडमॉऊंट-सार्डेनिया यांना जय मिळाला. सन १८५६ साली युद्धात सहभागी झालेल्या राष्ट्रात फ्रान्सच्या पॅरीस शहरात वाटाघाटी झाल्या. वाटाघाटीनंतर पॅरीसचा तह होऊन शांतता स्थापित झाली. क्रिमियन युद्धातील पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या सहभागामुळे पॅरीसमधील वाटाघाटीसाठी काव्हुरला निमंत्रित करण्यात आले होते. शांततेसाठी पॅरीस येथे भरलेल्या परिषदेत काव्हूरने इटलीच्या एकीकरणाची बाजू युरोपातील बलाढ्य राष्ट्रांसमोर मांडली. काव्हूरच्या मुत्सद्दीपणामुळे फ्रान्स आणि इंग्लंड या राष्ट्रांना इटलीच्या एकीकरणाबद्दल सहानभूती वाटू लागली.

क्रिमियन युद्धाच्या समाप्ती आणि पॅरीस परिषदेनंतर काव्हूरने फ्रान्सच्या तिसऱ्या नेपोलियनशी मैत्री संबंध वाढवत नेऊन आणखी घनिष्ठ केले. सन १८५८ मध्ये फ्रान्समधील प्लॉबिअर्स येथे काव्हूर आणि तिसरा नेपोलियन यांच्यात वाटाघाटी होऊन फ्रान्स आणि पीडमॉऊंट-सार्डेनिया यांच्यात ऑस्ट्रियाशी युद्ध आणि इटलीचे एकीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून एक गुप्त करार अस्तित्वात आला जो प्लॉबिअर्सचा तह म्हणून ओळखला जातो. या तहानुसार ऑस्ट्रियाला पीडमॉऊंट-सार्डेनिया विरोधात युद्ध पुकारण्यासाठी उचकावण्यात यावे. ऑस्ट्रियाने पीडमॉऊंट-सार्डेनिया विरुद्ध युद्ध सुरु करताच फ्रान्सने पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या बाजूने ऑस्ट्रियाच्या विरोधात युद्धात सामील व्हावे. ऑस्ट्रिया विरुद्धच्या युद्धाद्वारे पीडमॉऊंट-सार्डेनिया आणि फ्रान्स हे मिळून ऑस्ट्रियाला लोंबार्डी आणि व्हेनेशिया या राज्यातून हुसकावून लावतील आणि लोंबार्डी आणि व्हेनेशिया ही राज्ये पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्यात समाविष्ट करण्यात येतील. ऑस्ट्रिया विरुद्धच्या या युद्धातील मदतीच्या बदल्यात सॅव्हॉय आणि नाईस हे फ्रेंच बहुभाषिक असलेले प्रदेश फ्रान्सला देण्यात यावे असे ठरले.

प्लॉबिअर्सचा तह अस्तित्वात आल्यानंतर व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय आणि काव्हूरने लगेचच पीडमॉऊंट-सार्डेनियाचे लष्करी सामर्थ्य वाढवण्यास सुरवात केली. ऑस्ट्रियाने पीडमॉऊंच्या वाढत्या लष्करीकरणास हरकत घेतली तरीदेखील पीडमॉऊंट-सार्डेनियाने लष्करीकरण सुरूच ठेवले. परिणामी, ऑस्ट्रियाने पीडमॉऊंट-सार्डेनिया राज्याविरुद्ध युद्धाची घोषणा केली. ऑस्ट्रियाने पीडमॉऊंट-सार्डेनिया विरोधात युद्ध पुकारताच पीडमॉऊंट-सार्डेनियाच्या बाजूने फ्रान्स युद्धात सामील झाला. सदर युद्धातील अनेक लढायांमध्ये ऑस्ट्रियाचा मोठा पराभव झाला. लोंबार्डीच्या प्रदेशावर पीडमॉऊंट-सार्डेनियाचे वर्चस्व स्थापन झाले आणि व्हेनेशिया देखील जिंकण्याच्या टप्प्यात आला होता. तथापि, सन १८५९ साली तिसऱ्या नेपोलियन याने अचानकपणे युद्धबंदीची घोषणा करून ऑस्ट्रियाशी शांततेचा तह केला. तिसऱ्या

नेपोलियनच्या या निर्णयामुळे पीडमॉऊंट-सार्डेनियाला देखील युद्धबंदीची घोषणा करावी लागली. सदर युद्धाद्वारे पीडमॉऊंट-सार्डेनियाला फक्त लोंबार्डीचा प्रदेश आपल्या राज्याला जोडता आला आणि व्हेनेशियाचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या वर्चस्वाखालीच राहिला.

ऑस्ट्रियाशी युद्ध सुरु असतानाच्या काळात मोडेना, पार्मा आणि टस्कनी राज्यातील जनतेने उठाव करून तेथील रूढीवादी राजेशाह्या उलथून टाकल्या होत्या. ऑस्ट्रिया आणि फ्रान्समध्ये शांतता करार झाल्यानंतर या राज्यातील जनतेने पुन्हा राजेशाही स्थापन करण्यास नकार दिला. सदर राज्यातील जनतेला काव्हूरने गुप्तपणे सहाय्य आणि पाठींबा दिला होता. पुढे जोसेफ  गॅरिबाल्डी याच्या नेतृत्त्वाखाली दक्षिण इटलीमधून क्रांतीची सुरवात झाल्यावर काव्हूरने त्यालादेखील गुप्तपणे पाठींबा दिला. जोसेफ  गॅरिबाल्डीने स्वत: जिंकलेला नेपल्स आणि सिसिलीचा प्रदेश पीडमॉऊंट-सार्डेनियाचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय यास देऊ केला. अशा प्रकारे काव्हूरने आपल्या मुत्सद्दीगिरीद्वारे इटलीच्या एकीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. सन १८६१ मध्ये मलेरियामुळे काऊंट कॅमिलो डी काव्हूर याचा मृत्यू झाला.

सन १८६६ मध्ये प्रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्यातील युद्धामुळे बदलेल्या राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध घोषित केले. ऑस्ट्रिया-प्रशिया युद्ध आणि युद्धोपरांत तहामुळे व्हेनेशियाचा प्रांत इटलीच्या राज्याला जोडण्यात आला. व्हेनेशियाचा प्रदेश इटलीच्या राज्याला जोडल्यानंतर फक्त फ्रान्सचा पाठींबा असलेले पोपचे राज्य हे शिल्लक होते.  सन १८७० मध्ये फ्रान्स विरुद्ध प्रशिया असे युद्ध सुरु झाले. या युद्धात फ्रान्सचा मोठा पराभव होऊन फ्रान्सचा सम्राट नेपोलियन तिसरा याला राजपदाचा त्याग करून निर्वासित व्हावे लागले. फ्रान्समध्ये राजेशाही संपून प्रजासत्ताक अस्तित्वात आले. दरम्यानच्या काळात पोपच्या राज्याच्या संरक्षणासाठी ठेवलेले फ्रेंच सैन्य काढून घेण्यात आले होते. परिणामी, फ्रान्सचा इटलीमधील राजकारणावरचा प्रभाव आणि हस्तक्षेप कमी झाला होता. हीच संधी साधून व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने पोपशी वाटाघाटी आणि सैन्यबळाचा उपयोग करून पोपचे राज्य इटलीच्या राज्याला जोडले आणि  इटलीचे एकीकरण परिपूर्ण केले.

सन १८७० मध्ये रोम मध्ये प्रवेश करून पुढील वर्षी म्हणजे १८७१ साली रोम शहराला इटलीची नवी राजधानी म्हणून घोषित केले. सन १८७८ मध्ये रोम शहरात इटलीच्या राज्याचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याचा मृत्यू झाला. इटलीच्या एकीकरणात व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याने व्यक्तीश: तर महत्त्वाची भूमिका निभावलीच पण इटलीच्या एकीकरणासाठी प्रतिकात्मकरित्यादेखील उपयुक्त ठरला. इटलीच्या जनतेने प्राचीनकाळी रोमन साम्राज्यात सम्राटाला देण्यात येणाऱ्या पदवीवरून प्रेरणा घेऊन व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय याला 'पितृभूमीचा पिता' अशी पदवी दिली.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) इटलीच्या एकीकरणातील प्रमुख अडथळा ऑस्ट्रिया विरोधात यांचे सहाय्य प्राप्त करणे आवश्यक होते?

(२) इटलीच्या एकीकरणाच्या उद्देशांने फ्रान्स व पीडमॉऊंट-सार्डेनिया यांच्यातील गुप्त करार कोणत्या नावाने ओळखला जातो?

(३) सन १८७१ साली कोणत्या शहराला इटलीची नवी राजधानी म्हणून घोषित करण्यात आले?

(४) प्रशिया सोबतच्या युद्धात फ्रान्सचा मोठा पराभव झाल्याने कोणाला राजपदाचा त्याग करून निर्वासित व्हावे लागले?

(५) इटलीच्या जनतेने 'पितृभूमीचा पिता' अशी पदवी कोणाला दिली?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय हा .......... विचारांचा होता.

(२) ऑस्ट्रिया-प्रशिया युद्ध आणि युद्धोपरांत तहामुळे .......... चा प्रांत इटलीच्या राज्याला जोडण्यात आला.

(३) जोसेफ गॅरिबाल्डीने स्वत: जिंकलेला नेपल्स आणि सिसिलीचा प्रदेश .......... यास देऊ केला.

(४) सन १८५४ मध्ये .......... आणि रशिया यांच्यात युद्ध सुरु झाले ज्याला क्रिमियन युद्ध म्हणून ओळखले जाते.

(५) मोडेना, पार्मा आणि टस्कनी राज्यातील जनतेने उठाव करून .......... राजेशाह्या उलथून टाकल्या होत्या. रूढीवादी

## ३.५ सारांश :

युरोपात राष्ट्रवादाचा झालेला उदय ही जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन परिणाम करणारी घटना आहे. फ्रेंच राज्यक्रांतीतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही आधुनिक मुल्ये राष्ट्रवादामागील सुरवातीच्या प्रेरणा होत्या. राष्ट्रवादाच्या उदयामुळे युरोपात उदारमतवादी क्रांत्यांची मोठी लाट येऊन रूढीवादी राज्यसत्तांना हादरे बसून ते छिन्नविच्छिन्न झाले. मोठ्या साम्राज्यांमध्ये स्वातंत्र्यासाठी आणि लोकशाहीसाठी आंदोलने झाली. युरोपातील इटली आणि जर्मनी या राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळी उभ्या राहिल्या. जोसेफ मॅझिनी आणि जोसेफ गॅरिबाल्डी यांच्यासारख्या विचारवंत क्रांतिकारकांनी विभिन्न छोट्या-छोट्या राज्यात विभागलेल्या इटालियन जनतेमध्ये राष्ट्रवादाची भावना जागृत केली. इटलीच्या एकीकरणासाठी सातत्याने बलाढ्य शक्तींशी संघर्ष करून हे दोघे विजनवासाला सामोरे गेले. काऊंट कॅमिलो डी काव्हूर या मुत्सद्दी राजकीय नेत्यामुळे आणि त्याला व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय सारख्या उदारवादी राज्यकर्त्यांचा संपूर्ण पाठींबा मिळाल्याने अनेक दशकांच्या संघर्षानंतर इटलीचे एकीकरण वास्तवात आले. राष्ट्रवादाच्या विचारातून इटलीचे झालेले एकीकरण हे जगातील अनेक राष्ट्रांतील क्रांतीकारकांना प्रेरणादायी ठरले.

## ३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

राष्ट्रवाद : आपण एका समान भाषा, वंश, संस्कृती आणि समान इतिहास असलेल्या विशिष्ट समुदायाचे भाग असून त्याचे राष्ट्र-राज्य निर्माण असावे असे मानणारा विचार अथवा चळवळ

राष्ट्र-राज्य : विशिष्ट राष्ट्र आणि त्यातील राज्यसत्ता यांच्यात एकसंघपणा आल्यामुळे तयार झालेली राजकीय संस्था

उदारमतवाद : स्वातंत्र्य, समता आणि लोकशाहीचा आग्रह धरणारी विचारप्रणाली

सामंतवादी व्यवस्था : जमीन मालकीच्या आधारे राजा ते सामंत अशी उतरंडीची व्यवस्था

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) स्वातंत्र्य, समता आणि बंधुता (२) इंग्लंड आणि फ्रान्स

(३) उदारमतवादाशी (४) रूढीवादी

(५) बेनेडीक्ट ॲन्डरसन

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) पश्चिम युरोप (२) अर्नेस्ट रेनन (३) आधुनिक (४) फ्रेंच राज्यक्रांती

(५) नेपोलियनची विधीसंहिता

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) जोसेफ मॅझिनी (२) मेटरनिक (३) जोसेफ गॅरिबाल्डी

(४) पीडमॉऊंट-सार्डेनिया (५) ऑस्ट्रिया साम्राज्य

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) काऊंट कॅमिलो डी काव्हूर (२) तिसरा नेपोलियन

(३) लाल डगलेवाल्यांचे (४) ब्राझील

(५) इंग्लड

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३ ची उत्तरे

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) फ्रान्स आणि इंग्लंड (२) प्लॉबिअर्सचा तह

(३) रोम (४) नेपोलियन तिसरा

(५) व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) उदारवादी (२) व्हेनेशिया (३) राजा व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय

(४) तुर्कस्थान (५) रूढीवादी

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

(१) राष्ट्रवादाच्या उदयाची प्रक्रिया स्पष्ट करा.

(२) जोसेफ मॅझिनी याचे कार्याचे मूल्यमापन करा.

(३) जोसेफ गॅरिबाल्डी याच्या क्रांतीकार्याचे वर्णन करा.

(४) काऊंट कॅमिलो डी काव्हूर याने इटलीच्या एकीकरणात दिलेल्या योगदानाची चर्चा करा.

(५) इटलीच्या एकीकरणाचे प्रतिक म्हणून व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीयचे महत्त्व व कार्य विशद करा.

(ब) टिपा लिहा.(लघुत्तरी प्रश्न)

(१) राष्ट्रवाद

(२) कार्बोनरी संघटना

(३) १८३० ची फ्रेंच राज्यक्रांती आणि इटली

(४) १८४८ ची क्रांती आणि इटली

(५) व्हिक्टर इमॅन्युएल द्वितीय

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

कटारे, अनिल, आधुनिक जगाचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१८

जैन आणि माथुर, आधुनिक जगाचा इतिहास, के'सागर प्रकाशन, पुणे, २०१९

वानखेडे आणि अमृतकर, आधुनिक युरोपचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०२०

Anderson, Benedict, *Imagined Communities: Reflections on The Origin and Spread of Nationalism*, London, Verso, 1991

Blanning, T.C.W., *The Oxford History of Modern Europe*, OUP, 2000

Mukherjee, L., *A Study of Modern Europe and the World*, Calcutta, 2011

❑❑❑

घटक ४

# जर्मनीचे एकीकरण (१८७१)

## (Unification of Germany 1871)

**अनुक्रमणिका**


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ पार्श्वभूमी

४.३.२ विल्यम पहिला यांची भूमिका

४.३.३ बिस्मार्क आणि जर्मनीचे एकीकरण

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.१ उद्दिष्टे

- जर्मनीच्या एकीकरणामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट होईल.
- राष्ट्रवादाचा उदय आणि जर्मनीचे एकीकरण यांचा सहसंबंध लक्षात येईल.
- जर्मनीच्या एकीकरणामधील विल्यम पहिला याची भूमिका समजून घेता येईल.
- जर्मनीच्या एकीकरणाचे टप्पे जाणून घेता येतील.
- जर्मनीच्या एकीकरणात बिस्मार्कच्या योगदानाचे आकलन होईल.
- युरोपात राष्ट्रवादाच्या उदय व प्रसाराचे परिणाम स्पष्ट होतील.

## ४.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनों, बी.ए. भाग ३ सत्र ५ मध्ये आपण १८ व्या व १९ व्या शतकामध्ये आधुनिक जगाच्या जडणघडणीचा अभ्यास करत आहोत. मागील घटकात इटलीचे एकीकरण कसे घडून आले याचा अभ्यास आपण केला. युरोपमध्ये झालेल्या राष्ट्रवादाच्या उदयामुळे अनेक राष्ट्रांत राष्ट्रीय जागृती निर्माण

क्रांतिकारक घटना घडून आल्या. त्यापैकी इटलीच्या एकीकरणा इतकीच क्रांतिकारी घटना ही जर्मनीचे एकीकरण ही देखील होती. जर्मनीच्या एकीकरणाची ऐतिहासिक प्रक्रिया घडून येण्यामागे राष्ट्रवादाचा उदय हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. अनेक टप्प्यांतून व रक्तरंजित संघर्षातून साकार झालेल्या जर्मनीच्या एकीकरणाच्या ऐतिहासिक प्रक्रियेत पहिला जर्मन सम्राट विल्यम पहिला आणि त्याचा पंतप्रधान ऑटो वॉन बिस्मार्क यांची महत्त्वाची भूमिका होती. जर्मनीचे एकीकरण हे युरोपमधील सत्ता समतोलाला हादरा देणारे आणि युरोपवर दीर्घकाळासाठी मुलभूत बदल घडवून आणणारा ऐतिहासिक टप्पा आहे. जर्मनीचे एकीकरणाची ऐतिहासिक प्रक्रिया या घटकाच्या माध्यमातून आपण समजून घेणार आहोत.

## ४.३ विषय विवेचन

### ४.३.१ पार्श्वभूमी

मध्ययुगीन काळापासून जर्मन भाषिक जनता ही पवित्र रोम साम्राज्याचा भाग होती. मध्ययुरोपातील छोट्या-मोठ्या राज्यांचे मिळून 'पवित्र रोमन साम्राज्य' बनले होते. पवित्र रोमन साम्राज्यात भाषिक व वांशिक विभिन्नता मोठ्या प्रमाणात होती. जर्मन भाषिक लोक हे शेकडोच्या संख्येने असललेल्या वेगवेगळ्या छोट्या-मोठ्या राज्यांत विभागलेले होते. ही सर्व राज्ये पवित्र रोमन साम्राज्याच्या अंतर्गत समविष्ट होती. सन १८०६ मध्ये फ्रेंच सम्राट नेपोलियन बोनापार्ट याने 'पवित्र रोमन साम्राज्य' नष्ट करून ऱ्हाईन नदीजवळील प्रदेशांचा वेगळा 'ऱ्हाईन राज्यसंघ' तयार केला. परिणामी, ऱ्हाईन नदी जवळील प्रदेशातील जर्मन भाषिक लोकांमध्ये एकतेची भावना वाढीस लागली. युरोपातील जर्मन भाषिकांची एकता हीच जर्मनी या राष्ट्राच्या एकीकरणाचा मूलाधार होती.

- **व्हिएन्ना काँग्रेस आणि जर्मन राज्यसंघ :**

सन १८१५ मध्ये नेपोलियन बोनापार्टचा पराभव झाल्यानंतर ऱ्हाईन राज्यसंघाचे देखील पतन झाले. सन १८१५ साली नेपोलियन फ्रान्सविरोधातील युद्धात विजय मिळवणारी युरोपीय राष्ट्रे व्हिएन्ना येथे चर्चेसाठी जमले यालाच 'व्हिएन्ना काँग्रेस' (व्हिएन्ना परिषद) म्हणून ओळखले जाते. युरोपची पुनर्रचना करण्यासाठी आणि युरोपचे भवितव्य ठरवण्यासाठीचे धोरण आखणे हा व्हिएन्ना परिषदेचा मुख्य उद्देश होता. व्हिएन्ना परिषदेमध्ये जर्मन भाषिक जनतेची राष्ट्रीय भावना विचारात घेऊन एक संघटित जर्मन राष्ट्र बनवावे असे जनतेस अपेक्षित होते. मात्र, व्हिएन्ना परिषदेने एक सुसंघटीत जर्मन राष्ट्र बनवण्याऐवजी ऑस्ट्रियाच्या नियंत्रणाखाली राहतील अशी ३९ छोटी-मोठी जर्मन राज्ये बनवली. सदर ३९ जर्मन राज्ये ही ऑस्ट्रियाच्या प्रभावाखाली एका राज्यसंघात राहतील अशी व्यवस्था केली, ज्याला 'जर्मन राज्यसंघ' म्हणून ओळखले जाते. ऑस्ट्रिया, ब्रिटन आणि युद्धात पराजित झालेल्या फ्रान्स यांनी गुप्तपणे समझोता करून या योजनेस व्हिएन्ना परिषदेत मान्यता मिळवली. सदर योजनेमागे जर्मन राज्यांतील प्रशिया या सामर्थ्यशाली राज्याच्या मध्य-युरोपात वाढत्या प्रभावाला चाप बसवण्याचा ऑस्ट्रिया, ब्रिटन आणि फ्रान्स या शक्तींचा हेतू होता.

संपूर्ण जर्मन राज्यसंघाचे म्हणून एक कार्यकारी मंडळ तयार करण्यात आले. एक भाषा, एक राज्यसंघ, एक कार्यकारी मंडळ असले तरी प्रत्येक राज्य स्वतंत्र होते. प्रत्येक राज्याचा शासक हा आपल्या मर्जीप्रमाणे वागू शकत होता. परिणामी, जर्मन राज्यकर्त्यांच्या मनात जर्मनीच्या एकीकरणाची भावना रुजणे कठीण होते.

- **विद्यार्थ्यांचे आंदोलन व जर्मन एकीकरणाची घोषणा :**

संपूर्ण युरोपात उदारमतवाद आणि राष्ट्रवादाचे वारे वाहत असताना जर्मन भाषिक प्रदेशात त्याचे पडसाद उमटणे स्वाभाविक होते. नेपोलियनचा पराभव केल्यानंतर जर्मन राज्यांमध्ये उदारमतवादी लोकशाहीची स्थापना होण्याऐवजी रूढीवादी अनियंत्रित राजेशाहीलाच पुनर्प्रस्थापित करण्यात आले. जर्मन राज्यांतील विचारवंत आणि विद्यार्थी हे उदारमतवादी लोकशाहीचे समर्थक आणि रूढीवादी अनियंत्रित राजेशाहीचे विरोधक होते. ऑस्ट्रियाचा पंतप्रधान मेटरनिकच्या मुत्सद्दीगिरीतून अस्तित्वात आलेल्या रूढीवादी अनियंत्रित राजेशाही असलेल्या जर्मन राज्यसंघाची उभारणी झाली होती. ऑस्ट्रियाच्या नियंत्रणात राहतील अशा ३९ जर्मन राज्यांचा राज्यसंघ स्थापन झाल्याने जर्मनीतील विचारवंत आणि  विद्यार्थी यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला. ऑस्ट्रियाचे जर्मन राज्यांवरील प्रभाव कमी करून रूढीवादी अनियंत्रित राजेशाही उलथून टाकणे त्यांना आवश्यक वाटत होते. विस्कळीत आणि दुर्बळ जर्मन राज्यसंघाऐवजी सर्व जर्मन राज्यांचे एकीकरण करून सामर्थ्यशाली जर्मन राष्ट्र अस्तिवात यावे अशाप्रकारची राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लागली होती. सदर परिस्थितीमध्ये जर्मनीतल्या विद्यार्थ्यांनी जर्मन राष्ट्र अस्तित्वात यावे उद्देशाने सर्व जर्मन राज्यांत चळवळ उभी केली. विद्यार्थी हा जर्मन समाजामधील महत्त्वाचा आणि प्रभावशाली घटक होता. जेना विद्यापीठातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी जर्मनीच्या एकीकरणाचा समस्येचा सर्वांगाने विचार करून करून जर्मन समाजासमोर उच्च विचार, चरित्र संपन्नता आणि जर्मनीचे एकीकरण हे ध्येय ठेवावेत असे जाहीर आवाहन केले. परिणामी, जेना विद्यापीठ हे जर्मनीच्या एकीकरण चळवळीचे प्रमुख केंद्र बनले. जर्मनीच्या सर्व विद्यापीठातील उदारमतवादी आणि राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित विद्यार्थ्यांनी १२ जून १८१५ रोजी जेना शहरात बर्शेनशॅफ्ट (Burschenschaft) ही विद्यार्थी संघटना स्थापन केली. जर्मन राष्ट्रासाठीची राष्ट्रीय भावना वाढीस लावणे आणि स्वातंत्र्य, नागरी अधिकार आणि लोकशाहीसाठी प्रयत्न करणे ही बर्शेनशॅफ्ट संघटनेची मुख्य उद्दिष्ट्ये होती. बर्शेनशॅफ्ट संघटनेचे विद्यार्थी हे जर्मनीच्या एकीकरणाच्या चळवळीत भारावून जाऊन सहभागी होत आणि वेगवेगळ्या कृती-कार्यक्रमांचे आयोजन करत असत. जर्मनीच्या धर्मसुधारणा चळवळ मधील नेता मार्टिन ल्युथर यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय वारबर्ग येथील बर्शेनशॅफ्ट या संघटनेच्या विद्यार्थ्यांनी घेतला. सन १८१७ मध्ये वारबर्ग येथील विद्यापीठात मार्टिन ल्युथर यांची जयंती साजरी करण्यात येऊन त्यानिमित्ताने झालेल्या सभेत जर्मनीच्या एकीकरणाचे समर्थन करणारे विचार मांडण्यात आले.  सदर घटनाक्रमाच्या परिणामस्वरूप जर्मनीच्या एकीकरणासाठीचे जनसमर्थन मोठ्या प्रमाणात वाढले. क्रांतिकारी चळवळींचा आरंभ झाला  आणि दहशतवादी घटनांचे प्रमाण वाढले.

- **कार्लसबाड डिक्रीज-विद्यार्थी, विचारवंत आणि पत्रकारितेविरुद्ध दडपशाही :**

क्रांतिकारी चळवळींना आणि दहशतवादी घटनांना तोंड फुटल्यामुळे जर्मन राज्यसंघातील प्रस्थापित राजेशाह्या आणि त्यातील उमराव वर्ग अस्वस्थ झाला आणि या चळवळी दडपण्याचा प्रयत्न करू लागला.

प्रस्थापित राजेशाह्या, त्यांचा उमराव वर्ग आणि ऑस्ट्रियाचा मुत्सद्दी पंतप्रधान मेटरनिक हे विद्यार्थी आणि मध्यमवर्गाचे समर्थन लाभत असलेल्या जर्मनीच्या एकीकरणाच्या चळवळी दडपण्यासाठी निमित्त शोधत होते. मार्च १८१९ मध्ये ऑगस्ट वॉन कोटझेब्बू नावाच्या जर्मन नाटककार-पत्रकाराचा कार्ल लुडविग सँड या जर्मन राष्ट्रवादी विद्यार्थ्याने खून केला. नवरूढीवादी अनियंत्रित राजसत्तांनी ऑगस्ट वॉन कोटझेब्बू खूनप्रकरण हे उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारवंत आणि विद्यार्थी यांच्या विरोधात दडपशाही धोरण राबवण्यासाठी निमित्त म्हणून वापरले.

सन १८१९ च्या ऑगस्ट महिन्यात मेटरनिकने जर्मन राज्यसंघाच्या प्रतिनिधींची परिषद बोहेमिया प्रांतातील कार्लसबाड येथे आयोजित केली. सदर परिषदेत क्रांतिकारी चळवळी आणि दहशतवादी कृत्यांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने चर्चा होऊन जर्मनीच्या एकीकरणासाठी वाढत्या राष्ट्रवादी भावनेला दडपण्यासाठी कायदे संमत करण्यात आले. या कायद्यांना 'कार्लसबाड डिक्रीज' म्हणून ओळखले जाते. 'कार्लसबड डिक्रीज' द्वारे विद्यापीठांची स्वायत्ता नष्ट करण्यात येऊन त्यावर राज्यसत्तांच्या अधिकाऱ्यांचे नियंत्रण स्थापित करण्यात आले. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या भाषण स्वातंत्र्यावर गदा आणण्यात आली. उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारांच्या प्राध्यापकांना पदावरून हटविण्यात आले. बर्शेनशॅफ्ट या विद्यार्थी संघटनेवर आणि त्यांच्या हालचालींवर बंदी घालण्यात आली आणि ही संघटना मोडून काढण्यासाठीचे शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात आले. पत्रकार आणि पत्रकारीतेवर बंधने घालण्यात आली. वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांच्यात छापल्या जाणाऱ्या मजकुरावर करडी नजर ठेवून त्यावर सेन्सॉरशीप लादण्यात आली. पोलीस आणि गुप्त पहारे यांच्या सहाय्याने दडपशाही राबवून उदारमतवादी आणि राष्ट्रवादी विचारांना दडपून टाकण्याचा प्रयत्न संपूर्ण जर्मन राज्यसंघात सुरु झाला. पुढची काही दशके ही दडपशाही अशाच पद्धतीने सुरु राहिली आणि त्यामुळे उदारमतवादी-राष्ट्रवादी राजकीय हालचाली पूर्णपणे थांबल्या. मात्र, जर्मन राष्ट्रभावनेला थोपविण्यात नवरूढीवादी राज्यसत्तांना यश आले नाही.

सन १८३० मध्ये फ्रान्समध्ये झालेल्या क्रांतिकारी उठावाच्या परिणामस्वरूप जर्मन राज्यसंघात उठावाचा झालेला प्रयत्न मेटरनिकने मोडून काढला. तरी देखील युरोपमधील उदारमतवादी-राष्ट्रवादी क्रांत्यांचे पडसाद जर्मनीत उमटत राहिले. जर्मन विचारवंत, लेखक, कवी इत्यादींनी आपल्या लिखाणातून जर्मन जनतेच्या मनात राष्ट्रीय भावना तेवत ठेवली. इमॅन्यूअल कान्ट, जॉन हेरडेर, जॉन फित्शे, जॉन गटे इत्यादी जर्मन विचारवंताच्या उदारमतवादी-राष्ट्रवादाचा प्रभाव जर्मनीमधील मध्यमवर्ग आणि विद्यार्थ्यांवर पडत होता.

- **जर्मनीच्या एकीकरणाची पहिली पायरी – जकात संघ ते जॉल्वेरीन :**

जर्मन राज्यसंघातील ३९ राज्ये ही स्वतंत्र आणि सार्वभौम असल्यामुळे प्रत्येक राज्याची स्वत:ची जकात व्यवस्था, जकातीचे दर आणि जकातीविषयक कायदे होते. परिणामी, व्यापारविषयक आर्थिक व्यवहारात प्रचंड अडचणी निर्माण होत होत्या. प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र कर द्यावा लागत असल्याने व्यापारी वर्गावर अतिरिक्त भार पडत असे आणि मालाचे दर देखील वाढत असत. व्यापारात जकातीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी चोरटी आयात-निर्यात वाढीस लागली आणि त्यामुळे राज्यसत्तेच्या महसूलामध्ये घट होऊन

नुकसान होऊ लागले. जकात व्यवस्थेतील सुधारणांच्या आभावी जर्मनीतील अंतर्गत आणि बहिर्गत व्यापार खूपच मागासलेला राहिला होता.

जर्मन राज्यसंघातील एक मोठे राज्य असलेल्या प्रशियामध्ये तर राज्यांतर्गत अनेक भागात वेगवेगळी जकात व्यवस्था होती. अशा परिस्थितीमुळे चोरटी आयात-निर्यात मोठ्याप्रमाणात होत असल्याने प्रशियाचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे प्रशियातील राज्यसत्तेच्या लक्षात आले. प्रशियाच्या महसुलाच्या उत्पन्नाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सन १८१८ साली प्रशियाने आपल्या संपूर्ण राज्यात अंतर्गत व्यापारासाठी एकच जकात व्यवस्था लागू केली. तसेच आयात आणि निर्यात यांच्यावरील निर्बंध कमी करून अंतर्गत आणि बहिर्गत व्यापाराला प्रोत्साहन दिले. सदर उपाययोजनांमुळे प्रशियाच्या अर्थव्यवस्थेला चांगलीच गती मिळून प्रशियाची भरभराट झाली. इतर अनेक जर्मन राज्यांनी देखील प्रशियाचे अनुकरण करून अशाच प्रकारच्या सुधारणा स्वत:च्या राज्यात केल्या. खुल्या व्यापाराचे तत्त्व स्वीकारून आणि जकात व्यवस्थेत सुधारणा करून संपूर्ण जर्मन राज्यसंघासाठी एकच जकात व्यवस्था उभारूनच जर्मन राज्यसंघाची आर्थिक प्रगती साध्य होऊ शकते असा विचार मूळ धरू लागला.

जर्मनीतील व्यापारी आणि मध्यमवर्ग यांना देखील संपूर्ण जर्मन राज्यसंघात एकच जकात व्यवस्था असावी असे वाटत होते. परिणामी, प्रशियाच्या पुढाकाराने जर्मन राज्यसंघातील उत्तरेकडील भागातील राज्यांचा एक जकात संघ (Custom Union) स्थापन केला. प्रशियाप्रणित उत्तरेतील जर्मन राज्यांचा जकात संघ स्थापन झाल्यानंतर सन १८२८ मध्ये बव्हेरियाच्या पुढाकाराने दक्षिणेतील राज्यांचा जकात संघ स्थापन झाला. त्याचवर्षी सॅक्सनीच्या पुढाकाराने मध्य जर्मनीतील राज्यांचा जकात संघ स्थापन झाला. पुढे सन १८३३ मध्ये प्रशियाप्रणित जकात संघ, बव्हेरिया प्रणित जकात संघ आणि सॅक्सनीप्रणित जकात संघ यांना एकत्रित करून जर्मन जकात संघ स्थापन करण्याचा करार झाला. जर्मन जकात संघाला जर्मन भाषेत जॉल्वेरीन (Zollverein) म्हणून ओळखले जाते. सन १८३३ मध्ये जॉल्वेरीन करार होऊन पुढच्या वर्षी म्हणजे १८३४ मध्ये जॉल्वेरीन म्हणजेच जर्मन जकात संघ प्रत्यक्ष अस्तित्त्वात आले. पुढच्या काळात अनेक जर्मन राज्ये ही जॉल्वेरीनमध्ये सहभागी होत गेली. जॉल्वेरीन ही १९ व्या शतकाच्या मध्यात जर्मनीच्या आर्थिक एकीकरणाच्या दृष्टीकोनातून सर्वात महत्त्वाची संस्था ठरली. त्याकाळात जर्मन राज्यसंघात झालेला प्रादेशिक विकास आणि भरभराट यामध्ये जॉल्वेरीनचा मोठा वाटा आहे. जर्मनीच्या राजकीय एकीकरणासाठी आवश्यक असणारी मानसिकता निर्माण करण्यात देखील जॉल्वेरीनचा काही अंशी प्रभाव पडला असे मानले जाते.

जॉल्वेरीन (Zollverein) मध्ये जर्मन राज्यसंघातील बलाढ्य राज्य ऑस्ट्रिया हे सहभागी झाले नव्हते किंवा ऑस्ट्रियाला सहभागी करून घेण्याचा कोणताही प्रयत्न प्रशिया कडून केला गेला नाही. परिणामी, जॉल्वेरीनद्वारे प्रशियाचा जर्मन राज्यसंघावरील प्रभाव वाढत गेला आणि ऑस्ट्रिया हा जर्मन राज्यसंघापासून दुरावत गेला.

- **१८४८ ची क्रांतीचे पडसाद – फ्रँकफुर्ट पार्लमेंट :**

सन १८४८ साली फ्रान्स मध्ये झालेल्या क्रांतीचे पडसाद युरोपात सर्वत्र उमटले होते. ऑस्ट्रियामध्ये जनतेने तेथील पंतप्रधान मेटरनिक विरोधात उठाव केला आणि मेटरनिकला ऑस्ट्रियातून पलायन करावे लागले. युरोपातील या घडामोडींचा प्रभाव जर्मनीमध्ये पडणे साहजिक होते. जर्मन राज्यसंघातील अनेक राज्यात उठाव झाले. मार्च १८४८ मध्ये प्रशियामध्ये झालेल्या उठावाच्या परिणाम स्वरूप प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने आपल्या जनतेस उदारमतवादी घटना देण्याचे मान्य करून जर्मनीच्या एकीकरणासाठी प्रयत्न करण्याचे वचन दिले. जर्मनीच्या एकीकरणावर विचार करण्यासाठी जर्मन लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींची सभा म्हणजेच पार्लमेंट स्थापन करण्यात आली. जर्मन लोकांच्या या प्रतिनिधी सभेला 'जर्मन नॅशनल असेंब्ली' म्हणून ओळखले जाते. 'जर्मन नॅशनल असेंब्ली'मध्ये कायदेतज्ञ, न्यायाधीश, वकील, धर्मोपदेशक आणि मध्यमवर्गातील इतर उदारमतवादी घटकांचा समावेश होता.

जर्मन नॅशनल असेंब्लीची बैठक सन १८४८ च्या मे महिन्यात जर्मनीतील फ्रँकफुर्ट शहरात आयोजित करण्यात आली, याला फ्रँकफुर्ट पार्लमेंट म्हणून देखील ओळखले जाते. सदर बैठकीत जर्मन जनतेच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा होऊन सर्व जर्मन राज्यांचे मिळून एक जर्मन संघराज्य बनविण्यात यावे आणि या संघराज्यात मर्यादित लोकशाही व्यवस्था स्थापन केली जावी असा ठराव मांडला. या प्रक्रीयेद्वारे जर्मनीचे एकीकरण होऊन मर्यादित लोकशाही व्यवस्था स्थापन होणार होती. हे ध्येय साध्य करण्यासाठी ऑस्ट्रिया आणि प्रशिया या बलाढ्य राज्यांकडे सनदशीर मार्गाने विनंती-अर्ज करून जर्मनीचे एकीकरण घडवून आणावे असे ठरले. जर्मन नॅशनल असेंब्लीमध्ये विविध विचारांचे प्रतिनिधी होते. त्यामधील जहाल लोकशाहीवादी प्रतिनिधींना उपरोक्त ठराव अत्यंत सौम्य स्वरूपाचा वाटल्याने त्यांनी पार्लमेंटमध्ये गोंधळ माजवून कामकाज बंद पाडण्याचा प्रयत्न केला. अशांतता निर्माण होण्याचा धोका लक्षात घेऊन प्रशियाच्या लष्कराने ही बंडाळी मोडून काढली. त्यानंतर पार्लमेंटने जर्मन नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सोबतच जर्मन संघराज्य निर्माण करून त्याचे सम्राटपद हे प्रशियाच्या राजा कडे देण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. जेंव्हा प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याच्या समोर हा प्रस्ताव मांडण्यात आला. जर्मन राज्यसंघातील दुसरे बलाढ्य राज्य ऑस्ट्रियाशी वितुष्ट येण्याची शक्यता असल्याने प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने जर्मन संघराज्याच्या सम्राट पदाचा स्वीकार करण्यास नकार दिला. राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याला राजा पेक्षा कमी दर्जाच्या असलेल्या पार्लमेंटकडून दिले जाणारे 'सम्राट पद' स्वीकारणे कमीपणाचे वाटत होते. प्रशियाच्या राजाने दिलेल्या नकारानंतर इतर जर्मन राज्यांनी फ्रँकफुर्ट पार्लमेंटच्या ठरावांना विरोध केला. परिणामी, सन १८४९ च्या जून महिन्यात पार्लमेंट बरखास्त करण्यात आली.

फ्रँकफुर्ट पार्लमेंट हा जर्मन राज्यांतील उदारमतवादी-राष्ट्रवादी विचारांच्या लोकांद्वारे जर्मनीचे एकीकरण करून तेथे इंग्लंडप्रमाणे मर्यादित अधिकार असलेल्या सम्राट पदाच्या अंतर्गत लोकशाही व्यवस्था आणण्याचा एक प्रयत्न होता. हा प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाला. जर्मन राज्यसंघातील राजघराणी, उमराव वर्ग आणि लष्करी अधिकारी यांनी आपल्या विशेषाधिकारांचे रक्षण करण्यासाठी हा प्रयत्न जाणीवपूर्वक हाणून पडला.

मात्र, जर्मनीच्या एकीकरणाचा मुद्दा हा पार्लमेंटच्या ठरावाच्या निमित्ताने ठळकपणाने पुढे येऊन जर्मन राज्यसंघातील राज्यकर्त्या वर्गाला याबाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक बनले.

- **एरफुर्ट अधिवेशन आणि प्रशियाप्रणित जर्मन राज्यसंघ :**

प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने फ्रँकफुर्ट पार्लमेंटच्या ठरवांना नाकारले असले तरी जर्मनीच्या एकीकरणास त्याचा विरोध नव्हता. इतकेच नव्हे तर प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली जर्मनीचे एकीकरण साकार व्हावे असे त्याला वाटत होते. प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली जर्मनीचे एकीकरण प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीकोनातून विचारविनिमय करण्यासाठी सन १८५० च्या मार्च महिन्यात जर्मनीतील एरफुर्ट शहरात अधिवेशन बोलाविले ज्याला एरफुर्ट अधिवेशन म्हणून ओळखले जाते. ऑस्ट्रियाला जर्मन राज्यसंघातून हाकलून लावून प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली बळकट जर्मन राज्यसंघाची म्हणजेच प्रशियाप्रणित जर्मन राज्यसंघाची (Closer German Union under Purssian Leadership) स्थापना करण्यात यावी अशी कल्पना प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याने एरफुर्ट अधिवेशनात मांडली. मात्र, इतर काही बलाढ्य जर्मन राज्यांनी आणि ऑस्ट्रियाने अशा प्रकारच्या राज्यसंघाच्या स्थापनेस कडाडून विरोध केल्यामुळे अल्पकाळातच हे अधिवेशन बारगळले.

- **सनदशीर मार्गाचा अंत आणि आक्रमक धोरणाच्या दिशेने :**

फ्रँकफुर्ट पार्लमेंटच्या निमित्ताने जर्मनीतील उदारमतवाद्यांनी आणि एरफुर्ट अधिवेशनाच्या निमित्ताने प्रशियातील राज्यकर्त्यांनी जर्मनीचे एकीकरणासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब केला. मात्र, हे दोन्ही प्रयत्न विफल ठरले. जर्मनीचे एकीकरण करायचे असल्यास ऑस्ट्रिया साम्राज्यातील जर्मन भाषिक प्रदेश हा जर्मनीमध्ये समाविष्ट होणार होता. परिणामी, ऑस्ट्रियाच्या साम्राज्यात फुट पडण्याची शक्यता होती. तसेच इतर काही जर्मन राज्यांना जर्मनीच्या एकीकरणामुळे आपले सार्वभौमत्व नष्ट होईल, आपले स्वतंत्र अस्तित्त्व नष्ट होईल याची भीती वाटत होती. त्यामुळे ऑस्ट्रिया साम्राज्य आणि काही जर्मन राज्ये यांचा जर्मनीच्या एकीकरणाला विरोध होता. सबब, जर्मनीचे एकीकरण साध्य करण्यासाठी एकीकरणास विरोध करणाऱ्या ऑस्ट्रिया साम्राज्य आणि इतर जर्मन राज्ये यांचा विरोध मुत्सद्देगिरी आणि बळाच्या सहाय्याने मोडून काढणे आवश्यक आहे असे प्रशियाच्या राज्यकर्त्या वर्गाच्या लक्षात आले. मात्र, प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा हा आक्रमण धोरण स्वीकारण्यास तयार होत नसल्यामुळे जर्मनीच्या एकीकरणासाठीचे प्रयत्न फ्रेडरिक विल्यम याच्या मृत्यू (सन १८६१) पर्यंत रेंगाळत राहिले. सन १८६१ मध्ये राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याचा भाऊ विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आला. विल्यम पहिला याने कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेच बिस्मार्क याची प्रशियाच्या पंतप्रधानपदी नेमणूक केली. विल्यम पहिला आणि बिस्मार्क यांच्यात उत्कृष्ट ताळमेळ जमल्यामुळे जर्मनीच्या एकीकरणाच्या दिशेने आक्रमक वाटचाल सुरू झाली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) सन १८१५ मध्ये 'व्हिएन्ना काँग्रेस' मध्ये चर्चेसाठी कोण जमले?

(२) जर्मन राज्यसंघातील उत्तरेकडील भागातील राज्यांचा एक जकात संघ कोणाच्या पुढाकाराने स्थापन झाला ?

(३) जॉल्वेरीन म्हणजे काय?

(४) जर्मन नॅशनल असेंब्लीची बैठक सन १८४८ च्या मे महिन्यात जर्मनीतील कोणत्या शहरात आयोजित करण्यात आली?

(५) ऑस्ट्रिया साम्राज्याचा जर्मनीच्या एकीकरणाला का विरोध होता?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) फ्रेंच सम्राट नेपोलियन बोनापार्ट याने ............ नष्ट करून ऱ्हाईन नदीजवळील प्रदेशांचा वेगळा 'ऱ्हाईन राज्यसंघ' तयार केला.

(२) जर्मनीच्या एकीकरणासाठी वाढत्या राष्ट्रवादी भावनेला दडपण्यासाठी केलेले कायदे ............ म्हणून ओळखले जातात.

(३) प्रशियाचा राजा ............ याने आपल्या जनतेस उदारमतवादी घटना देण्याचे मान्य केले.

(४) प्रशियाप्रणित जर्मन राज्यसंघाची स्थापना करण्यात यावी अशी कल्पना ............ अधिवेशनात मांडण्यात आली.

(५) जर्मन लोकांच्या या प्रतिनिधी सभेला ............म्हणून ओळखले जाते.

## ४.३.२ विल्यम पहिला यांची भूमिका :

१९ व्या शतकात झालेले जर्मनीचे एकीकरण ही युरोपच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या भूराजकीय स्थित्यंतरांपैकी एक आहे. जर्मनीचे एकीकरण होण्यापूर्वी, जर्मन भाषिक प्रदेश अनेक स्वतंत्र राज्यांमध्ये विभागले गेले होते, प्रत्येकाचे स्वतःचे सरकार, सैन्य आणि धोरणे होती. एकीकरणाची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होती आणि त्यात लष्करी, मुत्सद्दी आणि राजकीय धोरणांचे सरमिसळ होती. जर्मनीच्या एकीकरणाच्या ऐतिहासिक कार्यात प्रशियाचा राजा व नंतर जर्मन सम्राट बनलेला विल्यम पहिला हा मध्यवर्ती ठरला. आधुनिक जर्मन साम्राज्याला आकार देण्यासाठी त्याचे नेतृत्व आणि निर्णय महत्त्वपूर्ण होते.

- **आरंभीचे जीवन व राजकीय स्थान :**

विल्यम पहिला याचा जन्म २२ मार्च १७९७ रोजी बर्लिन येथे झाला. तो प्रशियाचा फ्रेडरिक विल्यम दुसरा आणि राणी लुईस यांचा मोठा मुलगा होता. नेपोलियन बोनापार्टच्या युद्धांचा काळ हा जर्मन राज्यांवर आणि युरोपच्या इतिहासावर दूरगामी परिणाम करणारा काळ होता. विल्यमचा आरंभीचा काळ या नेपोलियन

युगाच्या छायेत गेला. सन १८१५ मध्ये नेपोलियनच्या पराभवानंतर झालेल्या व्हिएन्ना काँग्रेसमध्ये 'जर्मन राज्यसंघ' स्थापना करण्यात आले, ज्यावर ऑस्ट्रियाचे वर्चस्व आणि ३९ स्वतंत्र जर्मन राज्यांचा समावेश होता. राजकीय भूदृश्य खंडित झाले होते आणि एकसंध जर्मन राष्ट्राची कल्पना वास्तवापासून दूर गेलेली होती. अशा परिस्थिती विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आला.

- **विल्यम पहिला – प्रशियाचा राजा ते जर्मनीचा सम्राट :**

ऑस्ट्रिया आणि काही जर्मन राज्ये यांचा जर्मनीच्या एकीकरणाला विरोध होता. या राज्यांचा विरोध मोडून काढून जर्मनीचे एकीकरण साध्य करण्यासाठी आक्रमक धोरण राबवणे आवश्यक होते. प्रशियाने या बाबतीत पुढाकार घेण्याची निकड होती. मात्र, प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा हा आक्रमक स्वीकारण्यास तयार नव्हता. परिणामी जनमताचा रेटा असून देखील जर्मनीचे एकीकरण रखडले होते. सन १८५७ मध्ये प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याला अर्धांगवायूचा झटका आल्यामुळे प्रशियाचा काळजीवाहू कारभार त्याचा धाकटा भाऊ विल्यम याच्याकडे आला. दि. २ जानेवारी १८६१ रोजी फ्रेडरिक विल्यम चौथा याच्या मृत्युनंतर विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आला. युरोपमधील राजकीय अशांतता आणि महत्त्वपूर्ण बदलांच्या काळात त्याच्या कारकिर्दीची सुरुवात झाली. राष्ट्रवादाची वाढती लाट आणि एकसंध जर्मनीची इच्छा जोर धरू लागली होती आणि विल्यम पहिला याचे नेतृत्व लवकरच या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरले.

विल्यम पहिला हा अत्यंत सभ्य, दृढनिश्चयी आणि धोरणी राज्यकर्ता होता. विल्यम पहिला याने स्वत: अनेक युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला असल्याने लष्करी योद्धा आणि लष्करी व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून तो अत्यंत अनुभवसंपन्न आणि कुशल होता. विल्यम पहिला हा प्रशियाच्या गादीवर आल्याने प्रशियात एक प्रकारचे नवे युग अवतरल्या प्रमाणे वातावरण जनमानसात निर्माण झाले.

जर्मनीचे एकीकरण प्रत्यक्षात आणायचे असेल तर बळाचा म्हणजेच लष्करी शक्तीचा वापर करणे अपरिहार्य आहे याची जाणीव विल्यम पहिला यास झालेली होती. त्यामुळे गादीवर येताच विल्यमने प्रशियाचे लष्करीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलली. हेलमूथ वॉन मोल्टेक हा विल्यम पहिला याच्या कार्यकिर्दीत प्रशियाचा लष्करप्रमुख होता. मोल्टेक याने शांतता काळातील प्रशियाचे लष्कर १,५०,००० वरून २,००,००० इतके वाढवणे, वार्षिक नवीन सैन्यभरती ही ४०,००० वरून ६३,००० इतकी करणे, लष्करी नोकरीचा कालावधी वाढवणे इत्यादी लष्करी सुधारणा आवश्यक असल्याचे विल्यम पहिला यास सुचविले. या लष्करी सुधारणांसाठी येणाऱ्या खर्चाची मंजुरी प्रशिया राज्याच्या लँडट्याग (Landtag) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पार्लमेंटकडून घेणे आवश्यक होते. अल्बर्ट वॉन रून हा प्रशियाचा राजा विल्यम पहिला याचा युद्धमंत्री होता. युद्धमंत्री रून याच्या माध्यमातून पार्लमेंटकडे लष्करी सुधारणांच्या खर्चाच्या मंजुरीचा प्रस्ताव पाठविण्यात आला. पार्लमेंटने खर्चाला मंजुरी देण्याचे नाकारले. त्यामुळे प्रशियाचे पार्लमेंट आणि प्रशियाचा राजा विल्यम पहिला यांच्यात खटके उडू लागले. पार्लमेंटच्या लष्करीकरण विरोधातील भुमिकेमुळे वैतागून प्रशियाचा राजा विल्यम पहिला याने राजपदाचा त्याग करण्याचे ठरविले. मात्र, राजपुत्र फ्रेडरिक याने

आपल्या वडिलांना म्हणजे विल्यम पहिला याला राजत्याग करण्यापासून परावृत्त केले. याप्रसंगातून विल्यम पहिला हा प्रशियाच्या लष्करीकरण आणि सैन्याच्या आधुनिकीकारणासाठी किती आग्रही होता हे स्पष्ट होते. पुढे विल्यम पहिला याने बिस्मार्कच्या सहाय्याने प्रशियाचे सैन्य आधुनिक व शक्तिशाली बनवले की जर्मन एकीकरणासाठी झालेल्या अनेक युद्धांत प्रशियाच्या सैन्याचे प्रचंड विजय मिळवला.

- **प्रशियाचा पंतप्रधान म्हणून बिस्मार्कची निवड:**

राजपुत्र फ्रेडरिक आणि युद्धमंत्री रून यांच्या सल्ल्यानुसार विल्यम पहिला याने ऑटो वॉन बिस्मार्क याची प्रशियाच्या पंतप्रधानपदी नेमणूक केली. पुढे विल्यमने बिस्मार्कच्या साथीने प्रशियाची लष्करी शक्ती प्रचंड प्रमाणात वाढवली. विल्यम पहिला याच्या कार्यकाळात गृहनीती, संरक्षणनीती, विदेशनीती, अर्थनीती इत्यादी सर्व आघाड्यांवर बिस्मार्कने प्रचंड योगदान दिले. विल्यम पहिला याच्या धोरणीपणामुळे आणि बिस्मार्कच्या मुत्सद्दीगिरीमुळे टप्प्याटप्प्याने जर्मनीचे एकीकरण प्रत्यक्षात येऊन प्रशियाचा राजा विल्यम पहिला हा एकीकृत 'जर्मन सम्राट' पदी विराजमान झाला.

- **विविध युद्धांतील विजय :**

जर्मनीच्या एकीकरणासाठी एकीकरणाला विरोध करणाऱ्या सत्तांशी युद्धे ही अटळ होती. विल्यम पहिला याच्या पुढाकाराने शक्तिशाली बनलेल्या प्रशियाच्या लष्कराने विल्यम पहिला याच्या नेतृत्वाखाली दशकभरात अनेक युद्धात विजय मिळवून एकीकरणाची वाट मोकळी केली. डेन्मार्क-प्रशिया युद्ध (१८६४), ऑस्ट्रिया-प्रशिया युद्ध (१८६६) आणि फ्रान्स-प्रशिया युद्ध (१८७०-७१) या युद्धात प्रशियाच्या सैन्याने उत्तम कामगिरी बाजावून विजय मिळवला. प्रशियाच्या सैन्याचे आधुनिकीकरण व प्रशियाचे लष्करीकरण याबाबत विल्यम पहिला याच्या धोरणीपणामुळे प्रशियाची सैन्य शक्ती आणि युद्ध कौशल्य वाढल्यामुळे हे यश प्राप्त झाले.

- **जर्मन साम्राज्य व जर्मन सम्राटाची घोषणा :**

सन १८७१ मध्ये जर्मन साम्राज्य आणि जर्मन सम्राटाची घोषणा झाली. ही घोषणा म्हणजे जर्मनीच्या एकीकरण हे पूर्णत्वास गेल्याचे चिन्हांकित करणारी घटना होती. फ्रान्समधील व्हर्सायच्या राजवाड्यातील 'हॉल ऑफ मिरर' मध्ये १८ जानेवारी १८७१ रोजी जमलेल्या जर्मन राज्यांच्या नेत्यांनी प्रशियाचा राजा विल्यम पहिला याला जर्मन सम्राट म्हणून घोषित केले. नव्या साम्राज्यात युरोपातील बहुतांश जर्मन भाषिक प्रदेश सामील होता. जर्मनचे एकीकरण हे प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली शक्य झाले होते आणि प्रशियाचा दबदबा हा जर्मन साम्राज्याचे महत्त्वाचा निदर्शक होता. प्रशियाचा राजा म्हणून विल्यम पहिला याचे जर्मनीच्या एकीकरणातील योगदान हे निर्णायक ठरले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) जर्मनीच्या एकीकरणाच्या ऐतिहासिक कार्यात कोण मध्यवर्ती ठरला?

(२) जर्मनीच्या एकीकरणासाठी आक्रमक धोरण स्वीकारण्यास कोण तयार नव्हता?

(३) प्रशियाचा राजा विल्यम पहिला याचा युद्धमंत्री कोण होता?

(४) पार्लमेंटच्या लष्करीकरण विरोधातील भुमिकेमुळे वैतागून प्रशियाचा राजा विल्यम पहिला याने काय करण्याचे ठरविले?

(५) विल्यम पहिला याला राजत्याग करण्यापासून कोणी परावृत्त केले?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) विल्यम पहिला याचा जन्म............ येथे झाला.

(२) प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याच्या मृत्यू नंतर ............ प्रशियाच्या गादीवर आला.

(३) प्रशियाच्या गादीवर येताच विल्यम पहिला याने ............ करण्याच्यादृष्टीने पावले उचलली.

(४) ............ हा विल्यम पहिला याच्या कार्यकिर्दीत प्रशियाचा लष्करप्रमुख होता.

(५) लष्करी सुधारणांच्या खर्चाच्या मंजुरीचा प्रस्ताव ............ ने नाकारला.

### ४.३.३ बिस्मार्क आणि जर्मनीचे एकीकरण

जर्मनीचे एकीकरणाचा शिल्पकार म्हणून ओळखला जाणारा ऑटो वॉन बिस्मार्क हा एकोणिसाव्या शतकातील सर्वोत्तम मुत्सद्दी नेत्यांपैकी एक मानला जातो. आपल्या वास्तववादी (Realpolitik) मुत्सद्दीपणा, राजकारण आणि प्रशासन शैलीमूळे बिस्मार्क याला पोलादी पंतप्रधान (Iron Chancellor) म्हणून देखील ओळखतात. आपल्या याच कौशल्यांमुळे बिस्मार्क याने युरोपच्या इतिहासातील महत्त्वाची घटना मानल्या गेलेल्या जर्मनीच्या एकीकरणाची प्रक्रिया पूर्णत्वास नेली.

**ऑटो वॉन बिस्मार्क – जर्मनीचे एकीकरण साधणारा मुत्सद्दी :**

प्रशिया राज्याच्या सॅक्सनी प्रांतातील जमीनदारी आणि लष्करी पार्श्वभूमी असलेल्या घराण्यात एप्रिल १८१५ मध्ये ऑटो वॉन बिस्मार्क याचा जन्म झाला. बर्लिन आणि गॅटिंगन या सुप्रसिद्ध विद्यापीठात शिक्षण पूर्ण केल्या बिस्मार्कने फ्रान्स आणि इंग्लंड इत्यादी देशांत भ्रमंती केली होती. फ्रान्स आणि इंग्लंडमधील राजकारणाचा बारकाईने अभ्यास केलेला बिस्मार्क हा कुटनीतीत पारंगत राजकीय नेता म्हणून नावारूपास आला. लँडट्यागशी म्हणजे प्रशियाच्या पार्लमेंटशी खटके उडू लागल्यानंतर सन १८६२ च्या सप्टेंबर महिन्यात प्रशियाचा राजा विल्यम पहिला याने बिस्मार्कला प्रशियाचा पंतप्रधान म्हणून नियुक्त केले. सन १८६२ ते १८९० इतक्या दीर्घकाळ पदावर राहून बिस्मार्कने १८७१ साली जर्मनीचे एकीकरण पूर्ण केले आणि सन १८९० पर्यंत जर्मनीला सर्वार्थाने शक्तिशाली राष्ट्र बनवले.

**जर्मनीच्या एकीकरणाच्या दिशेने घोडदौड :**

बिस्मार्क आणि विल्यम पहिला यांचे बहुतांश विचार मिळते जुळते होते. बिस्मार्क हा प्रशियन जंकर्स (Prussian Junkers) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमीनदारांच्या वर्गातील होता. त्यामुळे बिस्मार्क हा

लोकशाही ऐवजी राजावर निष्ठा ठेवणारा व्यक्ती होता. परिणामी, विल्यम पहिला आणि बिस्मार्क यांच्यात दीर्घकाळ व्यवस्थित समन्वय साधला गेला. बिस्मार्कने आखलेल्या धोरणांना विल्यम पहिला याने पूर्ण पाठींबा आणि मंजुरी दिली. परिणामी, बिस्मार्कला फक्त दहा वर्षातच जर्मनीचे एकीकरण पूर्ण करता आले.

- **प्रशियाचे लष्करीकरण :**

जर्मनीचे एकीकरण करण्यासाठी बळाचा वापर करणे हाच एकमेव पर्याय असल्याचे एव्हाना बिस्मार्कच्या देखील लक्षात आले. जर्मनीच्या एकीकरणाच्या मार्गात ऑस्ट्रिया हा एक बलाढ्य अडथळा आहे आणि सनदशीर मार्गाने जर्मनीचे एकीकरण शक्य नसून युद्ध आणि रक्तपात याच मार्गाने प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण साध्य होईल असे धोरण बिस्मार्कने आखले यालाच 'रक्त आणि लोह धोरण' (Blood and Iron Policy) म्हणून ओळखले जाते. पंतप्रधान बनताच बिस्मार्कने पार्लमेंटच्या मंजुरीशिवाय सैन्यभारती सुरु केली. सैन्यभरतीसाठी लागणारा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी पार्लमेंटची मंजुरी न घेताच अनेक नवी कर लावले. परिणामी, प्रशियाचे महसुली उत्पन्न वाढले आणि प्रशियाचे लष्कर अत्यंत सामर्थ्यशाली बनले.

- **डेन्मार्कशी युद्ध (१८६४) :**

जर्मनीच्या एकीकरणात ऑस्ट्रियाचा अडसर असला तरी लगेचच ऑस्ट्रियाशी युद्ध करण्याची प्रशियाची लष्कर आणि लष्करी संसाधनांची तयारी नव्हती. तसेच ऑस्ट्रियाविरोधात युद्ध घोषित करण्यासाठी काहीतरी निमित्त आवश्यक होते. बिस्मार्कला ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध घोषित करण्याआधी जी पार्श्वभूमी आवश्यक होती ती डेन्मार्कच्या माध्यमातून प्राप्त झाली. प्रशियाच्या उत्तरेस असलेल्या श्लेस्विग आणि होलेस्टेन या दोन परगण्यांतील बहुतांश लोक हे जर्मन भाषिक असल्याने त्यांचा ओढा जर्मनी कडे होता. मात्र, या दोन्ही परगण्यामध्ये डेन्मार्कच्या राजाच्या नावाने कारभार चालत असे. सन १८५२ साली झालेल्या लंडनच्या तहानुसार डेन्मार्कच्या राजाच्या नावाने श्लेस्विग आणि होलेस्टेन या जर्मन बहुसंख्य परगण्यातील कारभार चालविला जात असला तरी डेन्मार्कने या परगण्याला आपल्या राज्यात समाविष्ट करून घेऊ नये असे ठरले होते. दोन्ही परगण्यातील जर्मन जनतेने हे परगणे जर्मनीला जोडण्यात यावेत अशी चळवळ सुरु ठेवली होती. हे दोन्ही परगणे प्रशियाला जोडून घेण्याचा निश्चय करून बिस्मार्क संधीची वाट पाहत होता.

सन १८६३ साली ख्रिश्चन नववा हा डेन्मार्कच्या राजपदावर आला. गादीवर येताच ख्रिश्चन नववा याने श्लेस्विग आणि होलेस्टेन हे दोन्ही परगणे डेन्मार्कला जोडून घेतले. डेन्मार्कशी युद्ध पुकारून हे दोन्ही परगणे प्रशियाला जोडून घेण्याची संधी बिस्मार्कला आपोआप मिळाली. मात्र, अत्यंत मुत्सद्दी असलेल्या बिस्मार्कने डेन्मार्कशी युद्ध करताना ऑस्ट्रियाचा प्रशियाला विरोध होऊ नये म्हणून ऑस्ट्रियाला देखील आपल्या बाजूने युद्धात सामिल करून घेतले. सन १८६४ मध्ये फेब्रुवारी ते ऑक्टोबर असे जवळपास नऊ महिने चालेल्या डेन्मार्क विरुद्ध प्रशिया-ऑस्ट्रिया युद्धात प्रशिया-ऑस्ट्रिया आघाडीचा विजय झाला. डेन्मार्कच्या पराभवानंतर होलेस्टेनचा परगणा ऑस्ट्रियाला आणि श्लेस्विगचा परगणा प्रशियाला अशी वाटणी करण्यात आली.

ऑस्ट्रियाला होलेस्टेनचा परगणा दिल्यामुळे भविष्यात हेच निमित्त घेऊन ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध पुकारण्याची संधी बिस्मार्क साधणार हे निश्चित होते.

**ऑस्ट्रियाशी युद्ध (१८६६) :**

जर्मनीचे एकीकरण हे ऑस्ट्रियाचा पराभव केल्याशिवाय शक्य नसल्याने डेन्मार्कशी युद्ध संपल्यानंतर बिस्मार्क ऑस्ट्रियाशी होणाऱ्या भावी युद्धाच्या तयारीला लागला. प्रशियाचे लष्करी बळ आणखी वाढवून आंतरराष्ट्रीय पातळीवर ऑस्ट्रियाला एकटे पडण्याची तजवीज बिस्मार्कने सुरु केली.

बिस्मार्क हा रशियामध्ये प्रशियाचा वकील म्हणून नियुक्त असताना त्याचे आणि रशियाचा सम्राट झार अलेक्झांडर दुसरा याचे अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले होते. सन १८६३ मध्ये रशियाचे वर्चस्व असलेल्या पोलंडमधील पोलिश जनतेने रशिया विरुद्ध उठाव केला. पोलिश जनतेला प्रशियामधील जर्मन जनतेची सहानभूती होती. मात्र, बिस्मार्कने जनतेच्या सहानभूतीचा विचार न करता पोलंडमधील जनतेचा उठाव मोडून काढण्यात रशियाला सर्वोपरी मदत केली. बिस्मार्कने केलेल्या मदतीमुळे रशिया आणि प्रशिया यांचे संबंध दृढ झाले. प्रशियाच्या जनमताचा विचार न करता जर्मनीच्या एकीकरणासाठी आवश्यक सामरिक (Strategic) निर्णय मुत्सद्दीपणा बिस्मार्कने दाखवला.

प्रशियाचा पंतप्रधान बनण्यापूर्वी बिस्मार्क हा काहीकाळ फ्रान्समध्ये प्रशियाचा वकील म्हणून नियुक्त होता. याकाळात फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन याच्यावर आपला प्रभाव पाडून बिस्मार्कने त्याची मैत्री संपादली होती. सन १८६५ साली बिस्मार्कने नेपोलियन तिसरा याची बियारित्झ येथे भेट घेतली. सदर भेटीत ऑस्ट्रियाशी युद्धानंतर फ्रान्सला ऱ्हाईनच्या प्रांतातील काही भाग किंवा बेल्जियम देणार असल्याचा आभास निर्माण केला. त्याद्वारे बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी होणाऱ्या युद्ध प्रसंगी फ्रान्स तटस्थ राहील अशी हमी फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा याच्याकडून मिळवली.

राष्ट्र म्हणून एकत्र येण्यासाठी ऑस्ट्रियाच्या दक्षिणेस असलेल्या इटलीचा ऑस्ट्रियाशी सतत संघर्ष सुरु होता. ऑस्ट्रियाच्या उत्तरेस असणाऱ्या प्रशियाच्या पंतप्रधान बिस्मार्कने ऑस्ट्रियाच्या दक्षिणेस असणाऱ्या इटलीची मदत ऑस्ट्रियाविरुद्धच्या युद्धासाठी घेण्याचे ठरवले. इटली जर ऑस्ट्रियाविरुद्धच्या युद्धात प्रशियाच्या बाजूने सामिल झाल्यास ऑस्ट्रियाला दोन आघाड्यांवर लढावे लागेल आणि त्याचे लष्करी बळ विभागले जाईल आणि ऑस्ट्रियाचा पराभव करणे सोपे होईल अशी बिस्मार्कची योजना होती. प्रशियाच्या बाजूने युद्धात सहभागी होण्याच्या बदल्यात इटलीला ऑस्ट्रियाच्या ताब्यातील व्हेनेशियाचा प्रदेश देण्याचे बिस्मार्कने कबूल केले.

उपरोक्त प्रमाणे ऑस्ट्रिया विरुद्ध प्रशिया युद्ध सुरु झाल्यानंतर इटली हा प्रशियाच्या बाजूने युद्धात उतरेल आणि रशिया व फ्रान्स हे युद्धामध्ये तटस्थ राहतील अशी पूर्वतयारी करून बिस्मार्क ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध पेटवण्याच्या कामी लागला. डेन्मार्कवरील विजयानंतर ऑस्ट्रियाला दिलेल्या होलेस्टेनचा परगण्याने बिस्मार्कला ऑस्ट्रियाशी युद्ध करण्याचे निमित्त मिळवून दिले. होलेस्टेनचा परगण्यातील ऑस्ट्रियाचा कारभार हा अत्यंत अयोग्य पद्धतीने चालवला जात असल्याचा आरोप बिस्मार्कने केला. होलेस्टेन मधील

ऑस्ट्रियाच्या गैरकारभारामुळे ऑस्ट्रियाला जर्मन राज्यसंघातून हाकलून देण्यात यावे अशी मागणी बिस्मार्कने केली. परिणामी, ऑस्ट्रिया विरुद्ध प्रशिया अशा युद्धाला तोंड फुटले. प्रशियाचा युद्धमंत्री अल्बर्ट वॉन रून आणि प्रशियाचा लष्करप्रमुख हेलमूथ वॉन मोल्टेक यांच्या नेतृत्त्वाखालील प्रशियाच्या लष्कराने संपूर्ण युरोपला अचंबित करणारा पराक्रम केला. १४ जून ते २२ जुलै १८६६ या काळात एकूण सात आठवडे चाललेल्या या युद्धात ऑस्ट्रियाचा दारूण पराभव झाला. ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात प्राग या शहरात युद्ध विराम आणि शांततेचा तह झाला.

- **प्रागचा तह –उत्तर जर्मन राज्यसंघाची निर्मिती :**

प्राग या शहरात ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात २३ ऑगस्ट १८६६ रोजी शांततेचा तह होऊन युद्ध संपुष्टात आले. युद्धात प्रशिया आणि इटली यांच्या आघाडीला ऑस्ट्रिया विरुद्ध विजय मिळाल्यामुळे त्यांनी ऑस्ट्रियाला तहासाठीच्या अटी मान्य करण्यास भाग पाडले. व्हेनेशियाचा प्रांत इटलीला देण्याचे ऑस्ट्रियाने मान्य केले. जर्मन प्रदेशातून ऑस्ट्रियाचे वर्चस्व संपुष्टात आणण्यात आले. श्लेस्विग आणि होलेस्टेन हे दोन्ही परगणे प्रशियाला जोडण्यात आले. त्याचप्रमाणे ऑस्ट्रियाच्या बाजूने युद्धात सामिल झालेल्या हॅनोव्हर, हेसे–नसाऊ इत्यादी राज्ये प्रशियाला जोडण्यात आली. ऑस्ट्रियाला वगळून प्रशियाच्या नेतृत्वाखाली उत्तरेकडील जवळपास २२ जर्मन राज्यांचा 'उत्तर जर्मन राज्यसंघ' निर्माण करण्यात आला. व्हिएन्ना परिषदेद्वारे निर्माण करण्यात आलेला जर्मन राज्यसंघ आणि त्याद्वारे जर्मन प्रदेशावरील ऑस्ट्रियाचे वर्चस्व अशारीतीने संपुष्टात आले. 'उत्तर जर्मन राज्यसंघ'चा प्रमुख म्हणून प्रशियाच्या राजाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. प्रागच्या तहात मिळालेल्या विजयामुळे प्रशियाची प्रतिष्ठा वाढली, नव्याने प्रशियाला जोडलेल्या प्रदेशामुळे प्रशियाचे समर्थ वाढले. तसेच उत्तर जर्मन राज्यसंघाच्या रूपाने जर्मनीच्या एकीकरणाचा अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा पार पडला.

- **फ्रान्सशी युद्ध आणि जर्मन साम्राज्याची स्थापना :**

प्रशियाने ऑस्ट्रियाचा पराभव करून उत्तर जर्मन राज्यसंघाची स्थापना केली. ऑस्ट्रियाविरुद्धच्या युद्धात फ्रान्स तटस्थ राहिला ही प्रशियाच्या विजयामागील एक महत्त्वाचे कारण ठरले. या तटस्थतेच्या बदल्यात बिस्मार्कने फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा याला ऱ्हाईनच्या प्रांतातील काही भाग किंवा बेल्जियम देणार असल्याचा आभास निर्माण केला होता. युद्ध संपल्यानंतर प्रत्यक्षात मात्र बिस्मार्कने फ्रान्सला काही ही दिले नाही. उलट ऑस्ट्रियावरील विजयामुळे प्रशिया अत्यंत बलाढ्य होऊन युरोपातील सत्ता समतोल बिघडला. बलाढ्य झालेल्या प्रशियाचा आता फ्रान्सला देखील त्याचा धोका निर्माण झाला. परिणामी, ऑस्ट्रिया–प्रशिया युद्धाविषयक फसलेल्या परराष्ट्रीय धोरणामुळे फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा याची प्रचंड नाचक्की झाली.

ऑस्ट्रियाविरूद्धचे युद्ध जिंकल्यानंतर दक्षिणेकडील जर्मन राज्यांना जिंकून जर्मनीचे एकीकरण करता येणे प्रशियाला शक्य होते. मात्र, युरोपातील आपल्या हितसंबंधाला बाधा पोहचण्याचा धोका असल्याने फ्रान्सद्वारे प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित करण्याची शक्यता होती. तसेच युद्धखोरीचा आरोप प्रशियाच्या माथी फुटला

असता. जर्मनीचे एकीकरण पूर्ण करण्यासाठी दक्षिणकडील जर्मन राज्ये जोडून घेणे आवश्यक होते. तसेच ही गोष्ट प्रत्यक्षात आणण्यासाठी फ्रान्सशी युद्ध करून त्याचा पराभव करणे आवश्यक होते. प्रशियाद्वारे युद्ध घोषित न करता फ्रान्सला प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित करण्यास भाग पाडल्यास युरोपातील इतर बलाढ्य शक्तींची सहानभूती प्रशियाला मिळणार होती. बिस्मार्कने आपल्या मुत्सद्देगिरीने इंग्लंड, रशिया, इटली यांच्याकडून फ्रान्स विरुद्ध युद्ध झाल्यास तटस्थ राहण्याचे अभिवचन घेतले. अशाप्रकारे युरोपात फ्रान्सला एकटे पडल्यानंतर फ्रान्स विरुद्ध युद्ध पेटवण्यासाठी बिस्मार्क संधीची वाट पाहत होता. स्पेनच्या गादीच्या प्रश्नामुळे ही संधी बिस्मार्कला मिळाली आणि त्याने त्याचा पुरेपूर उपयोग केला.

स्पेनमध्ये क्रांती होऊन प्रशियाच्या राजाच्या नातेवाईकास स्पेनच्या राजपदावर बसवण्यात आले. फ्रान्सचा याला प्रचंड विरोध होता. त्यामुळे प्रशिया आणि फ्रान्स या दोन्ही देशातील वातावरण संतप्त झाले. नंतर प्रशियाच्या राजाच्या नातेवाईकाने स्पेनच्या राजपदाचा त्याग केला. मात्र, याच घडामोडी दरम्यान १३ जुलै १८७० रोजी फ्रान्सचा वकील आणि प्रशियाचा राजा यांच्यात प्रशियाच्या एम्स शहरात संतप्त वातावरणात वाटाघाटी करण्याचा प्रयत्न फिस्कटला. या फिसकटलेल्या वाटाघाटीचा वृत्तांत प्रशियाचा राजा विल्यम पहिला याने टेलिग्रामद्वारे म्हणजे तारेने बिस्मार्कला कळवला याला 'एम्स टेलिग्राम' म्हणून ओळखले जाते. बिस्मार्कने या वृत्तांतामध्ये फ्रान्स आणि प्रशिया दोन्हींना अपमानास्पद वाटेल असा बदल करून वृत्तपत्रांकडे  प्रसिद्धीस दिला. वृत्तांत प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचा अर्थ लावण्यात आणि त्याच्या फ्रेंच भाषांतरात अनेक गफलती होऊन फ्रान्सच्या वकिलाचा पर्यायाने फ्रान्सचा अपमान झाल्याची भावना होऊन फ्रान्स मधील जनमानस संतप्त झाले. प्रशियामध्ये देखील प्रशियाच्या राजाचा अपमान झाला म्हणून फ्रान्सविरोधी वातावरण निर्माण झाले. फ्रेंच नागरिकांच्या भावनेच्या दबावामुळे तिसऱ्या नेपोलियनला प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित करावे लागले.

फ्रान्सने १५ जुलै १८७० रोजी प्रशिया विरुद्ध युद्ध घोषित केले. युद्धाची घोषणा फ्रान्सकडून झाल्याने फ्रान्स हा जर्मन लोकांविरुद्धचा आक्रमणकारी आणि युद्धखोर ठरला. त्यामुळे दक्षिण जर्मन राज्यसंघातील राज्ये ही प्रशियाच्या नेतृत्त्वाखालील उत्तर जर्मन राज्य संघात समाविष्ट झाली तसेच फ्रान्स विरोधातील युद्धात प्रशियाच्या बाजूने सामिल झाली. उत्तर जर्मन राज्य संघ आणि दक्षिण जर्मन राज्य संघ एकत्रित झाल्याने प्रशियाची शक्ती मोठ्याप्रमाणात वाढली. प्रशियाच्या बलाढ्य लष्कराने फ्रान्सच्या सैन्याचा अनेक लढायांमध्ये दारूण पराभव केला. फ्रान्समधील सेडेन येथे १ सप्टेंबर आणि २ सप्टेंबर १८७० ला झालेल्या लढाईत फ्रेंच सैन्याचा मोठा पराभव होऊन खुद्द फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा हा शरण येऊन प्रशियाच्या कैदेत सापडला. नेपोलियन तिसरा याच्या कैदेची बातमी पॅरीसमध्ये पोहचल्यानंतर तेथील जनतेने उठाव करून नेपोलियन तिसरा याला फ्रान्सच्या सम्राट पदावरून पदच्युत केले आणि फ्रान्समध्ये 'दुसरे प्रजासत्ताक' स्थापन केले. 'दुसऱ्या प्रजासत्ताक' सरकारने प्रशियाविरूद्धचे युद्ध सुरु ठेवले. मात्र, प्रशियाने फ्रान्सचा मोठा भूप्रदेश काबीज करून पॅरीस जिंकून घेऊन जून १८७१ मध्ये फ्रान्सचा संपूर्ण पराभव केला. फ्रँकफुर्ट येथे १० मे १८७१ मध्ये फ्रान्स आणि प्रशियामध्ये तह होऊन फ्रान्सचे अल्सेस आणि लॉरेन हे समृद्ध प्रदेश प्रशियाला जोडण्यात आले आणि फ्रान्सवर मोठी युद्ध खंडणी लादण्यात आली. तत्पूर्वी जानेवारी १८७१ मध्ये जेंव्हा

फ्रान्स विरूद्धचे युद्ध अंतिम टप्प्यात आले होते आणि प्रशियाचा विजय निश्चित दिसत होता तेंव्हा बिस्मार्कने उत्तर आणि दक्षिण जर्मन राज्य संघातील एकूण २५ राज्यांच्या राजांशी बोलणी करून सर्व जर्मन राज्यांचे मिळून 'जर्मन साम्राज्य' स्थापन करण्यास मंजुरी मिळवली. दि. १८ जानेवारी १८७१ रोजी फ्रान्समधील व्हार्यायच्या राजवाड्यातील 'हॉल ऑफ मिरर' मध्ये प्रशियाचा राजा विल्यम पहिला याला 'जर्मन सम्राट' म्हणून जाहीर करण्यात येऊन 'जर्मन साम्राज्य' स्थापन झाल्याची घोषणा करण्यात आली. जर्मन साम्राज्याच्या रूपाने सर्व जर्मन राज्ये एकत्र आली आणि जर्मन राष्ट्रवादाने प्रेरित जर्मनीचे एकीकण होऊन 'जर्मनी' हे राष्ट्र प्रत्यक्षात आले.

- **राष्ट्रवादाचा परिणाम :**

अठराव्या शतकात युरोपमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. राष्ट्रवादाशी संलग्न राष्ट्र-राज्याची संकल्पना देखील याच काळात विकसित होत होती. युरोपात झालेला प्रबोधनकाळ, औद्योगीक क्रांती, भांडवलशाहीचा विकास, छपाई कलेचा प्रसार आणि आधुनिक विचारसरणी इत्यादी विविध घटक हे राष्ट्रवादाच्या उदयाला आणि झपाट्याने झालेल्या त्याच्या प्रसाराला कारणीभूत ठरले. राष्ट्रवादामुळे पहिल्यांदा पश्चिम युरोपातील इंग्लंड आणि फ्रान्स हे राष्ट्र म्हणून विकसित झाले. राष्ट्रवादाचा प्रसार पश्चिम युरोप कडून पूर्व युरोपच्या दिशेने झाला. युरोपात क्रांत्यांची लाट येऊन जनतेने प्रस्थापित राज्यकर्त्यांच्या विरोधात सातत्याने उठाव केले. इटली आणि जर्मनी ही दोन राष्ट्रे ही याच काळात कशी अस्तित्वात आली हे आपण या घटकात आणि मागील घटकात समजून घेतले आहे. जाताजाता युरोप आणि जगावर राष्ट्रवादाचा नेमका काय परिणाम झाला हे मुद्देसूद पद्धतीने जाणून घेणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय जागृती :** राष्ट्रवादाच्या प्रसारामुळे युरोपातील अनेक नव रूढीवादी साम्राज्यांमध्ये आणि राज्यांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. भाषा, संस्कृती, वंश, भूप्रदेश इत्यादी लक्षणांच्या आधारवर लोकांमध्ये एकतेचे भावना निर्माण झाली. राष्ट्रवादाने लोकांना आपण एका राष्ट्राचा सामुहिकरित्या भाग आहोत (Sense of Collective Belonging) याची जाणीव दिली. आपण राष्ट्राचा भाग असल्याने त्या राष्ट्राशी, त्याच्या संस्कृतीशी, परंपरेशी आणि त्याच्या ऐतिहासिक वारसा सोबत जोडलेलो आहोत आणि त्या राष्ट्राचा भाग असणे म्हणजे राष्ट्रीयत्व (Nationality) हीच आपली खरी ओळख (Identity) असल्याची भावना लोकांमध्ये तयार झाली. राष्ट्रवादाने लोकांना संघटीत (Mobilization) करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली. राष्ट्रवादाच्या नावाखाली लोक राष्ट्राच्या रक्षणासाठी, युद्धासाठी, दुसऱ्या राष्ट्रावर आक्रमण करण्यासाठी किंवा आपल्याच राष्ट्रातील विशिष्ट समुदायांविरोधात एकत्र येत या गोष्टीचा म्हणजेच पर्यायाने राष्ट्रवादाचा फायदा युरोपातील राज्यकर्त्यांनी बऱ्याचदा आपले आसन स्थिर ठेवण्यासाठी उचलला.

**लोकशाहीचा प्रसार :** राष्ट्रीय जागृती ही जरी सांस्कृतिक घटकांच्या आधारे झाली असली तरी लोकांना एकत्र आणण्यात त्यांचे सामुहिक हितसंबध महत्त्वाचे ठरले होते. नव्याने उदयाला आलेल्या मध्यमवर्गाने, उदारमतवादी विचारवंत आणि विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय जागृतीच्या माध्यमातून लोकशाहीचा आग्रह धरला. रूढीवादी अनियंत्रित राजतंत्राऐवजी घटनेला आणि पार्लमेंटला बांधील असणारे लोकांनी निवडून दिलेले

सरकार असावे अशी मागणी लोकांनी लावून धरली. युरोपातील अनेक राज्यात क्रांती यशस्वी होऊन अनेक ठिकाणी  संविधानावर आधारलेली लोकशाही तर काही ठिकाणी घटनात्मक राजेशाही असलेली लोकशाही व्यवस्था स्थापन झाली.

**क्रांतीच्या लाटा :** राष्ट्रवादामुळे झालेल्या राष्ट्रीय जागृती आणि लोकशाहीच्या मागणीमुळे युरोपात सातत्याने क्रांतिकारी घटना घडत राहिल्या. अनेक क्रांतिकारी संघटना आणि त्यांचे नेते उदयाला आले. एखाद्या राज्यात झालेल्या क्रांतीचे परिणाम इतर राज्यांत-प्रदेशात होत असत. परिणामी, अस्वस्थता, अशांतता, असंतोष निर्माण होऊन क्रांतीसाठी सातत्याने प्रयत्न होत. युरोपातील नव-रूढीवादी राज्यसत्तांनी या राष्ट्रवादाला आणि क्रांत्याना दडपून टाकण्याचा सर्वोपरी प्रयत्न केला. मात्र, क्रांत्याच्या सततच्या लाटांनी युरोपातील राजतंत्रांना जोरदार हादरे दिले.

**जुन्या साम्राज्यांचा ऱ्हास :** राष्ट्रवादामुळे झालेल्या राष्ट्रीय जागृतीमुळे अनेक भाषिक, अनेक संस्कृती असलेल्या ऑस्ट्रिया साम्राज्यात अनेक समूहांत राष्ट्रीय भावना निर्माण झाल्या. एका मोठ्या साम्राज्यात अनेक राष्ट्रांच्या जनतेचे शोषण होत आहे अशी भावना निर्माण होऊन ऑस्ट्रिया साम्राज्यातील जर्मन, इटालियन, सर्ब इत्यादी राष्ट्रवादांचा उदय झाला. अठराव्या शतकात ऑस्ट्रिया साम्राज्यात निर्माण झालेल्या 'राष्ट्रवादाच्या प्रश्ना'वर तोडगा काढण्यास ऑस्ट्रिया साम्राज्याच्या राज्यकर्त्यांस अपयश आले. परिणामी, ऑस्ट्रिया साम्राज्यात असंतोष माजून अनेक उठाव झाले. अंतिमत: इटलीचे एकीकरण, जर्मनीचे एकीकरण होऊन ऑस्ट्रियाचे साम्राज्य लयास गेले. पहिल्या महायुद्धाची ठिणगी ही ऑस्ट्रिया साम्राज्यात दडपणूक होत असलेल्या  सर्ब राष्ट्रवादाच्याच परिणामस्वरूप पडली.

ऑटोमन साम्राज्याला देखील राष्ट्रवादाच्या उदयाचा फटका बसला. पूर्व युरोपातील ऑटोमन साम्राज्यांतर्गत येणाऱ्या बोस्नियामधील विविध समुदायांनी स्वत: चे स्वत्रंत राष्ट्र असावे म्हणून चळवळी आरंभल्या. राष्ट्रवादी चळवळींमुळे वारंवार अशांतता निर्माण होऊन दुबळ्या झालेल्या ऑटोमन साम्राज्याला 'युरोपचा आजारी माणूस' (Sick man of Europe) म्हणून ओळखले जाऊ लागले. राष्ट्रवादी चळवळीच्या परिणाम स्वरूप २० व्या शतकाचा आरंभ होता होता ऑटोमन साम्राज्याचे अनेक तुकडे झाले.

**अल्पसंख्यांकांचा प्रश्न :** राष्ट्रवादी भावना ही मुलत: आपण विशिष्ट समुदायाचा भाग आहोत यावर आधारित असते. मात्र, त्याचवेळी आपण इतर समुदायांपेक्षा वेगळे आहोत अशी जाणीव राष्ट्रवादातून निर्माण होऊन 'आपण' विरुद्ध 'ते' असा संघर्ष उभा राहतो. राष्ट्र हे विशिष्ट, भाषा, वंश, धर्म असणाऱ्या लोकांचाच आहे अशी जर राष्ट्रवादामागील प्रेरणा असल्यास अशा राष्ट्रात भाषिक / वांशिक / धार्मिक अल्पसंख्याकांचा प्रश्न निर्माण होतो. अल्पसंख्याकांच्या प्रश्नामुळे एकतर अल्पसंख्याकांवर अन्याय होतो किंवा त्यांना राष्ट्रात दुय्यम वागणूक दिली जाते. तसेच अल्पसंख्याकांमध्ये त्यांच्या राष्ट्रवादाचा उदय होऊन संघर्ष विकोपाला जातो. एखाद्या देशातील अल्पसंख्याकांचा मुद्दा उचलून दुसरे राष्ट्र त्या देशावर युद्ध घोषित करते. १९ व्या शतकातील अनेक युद्धांचे आणि २० व्या शतकातील दोन्ही महायुद्धांच्या कारणांमध्ये अल्पसंख्याकांचा प्रश्न एक महत्त्वाचे कारण ठरले. आत्यंतिक जर्मन राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे अल्पसंख्याक

असलेल्या 'ज्यु' समाजावरील हल्ले वाढत जाऊन हिटलरच्या काळात युरोपातील ज्यूंचे सामुदायिक हत्याकांड (हॉलोकॉस्ट) ( Holocaust) घडून आले.

**वसाहतवाद आणि साम्राज्यवाद :** राष्ट्रवादाच्या उदयापूर्वी साम्राज्ये ही त्या-त्या राज्यकर्त्यांची असत त्यामुळे साम्राज्यविस्तार हा राज्यकर्त्यांशीच निगडीत होता औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेला माल खपविण्यासाठी दुसऱ्या देशात वसाहती स्थापन करून किंवा साम्राज्यविस्तार करून हक्काच्या बाजारपेठा मिळवण्याचे धोरण विविध राष्ट्रातील राज्यकर्त्यांनी अवलंबिले. राष्ट्राच्या या वसाहतवादाद्वारे आणि साम्राज्यवादाद्वारे होणाऱ्या आर्थिक लाभात राष्ट्रातील उद्योजक-मध्यमवर्ग-व्यापारी इत्यादींचे हितसंबंध जोडलेले असल्याने त्यांचा देखील वसाहतवादाला आणि साम्राज्यवादाला पाठींबा मिळाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या आरंभापर्यंत युरोपातील राष्ट्रांनी आशिया आणि आफ्रिका खंडात आपल्या वसाहती स्थापन करून साम्राज्यविस्तार केला.

**दोन महायुद्धे :** जगाच्या इतिहास सर्वोच्च मानवी हानि झालेली पहिले आणि दुसरे महायुद्ध हे राष्ट्रवादाची एक फलनिष्पती होती. युरोपातील बलाढ्य राष्ट्रात साम्राज्यविस्तारामुळे तीव्र स्पर्धा आणि शत्रुत्व निर्माण झाले. राष्ट्रां-राष्ट्रातील शत्रुत्व हे त्या-त्या राष्ट्रातील जनतेमधील राष्ट्रवादी भावनेमुळे टोकाला पोहचून शांततामय तोडग्या निघण्यापलीकडे गेले. परिणामी, युरोपात युद्धाला तोंड फुटून युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यविस्तारामुळे ही दोन महायुद्धे आशिया आणि आफ्रिका खंडामध्ये देखील लढली गेली. युरोपीय राष्ट्रांच्या वर्चस्वाखालील असलेल्या राष्ट्रांमध्ये देखील प्रचंड मनुष्य आणि संपत्तीची हानि झाली.

**आशिया आणि आफ्रिका खंडात वसाहतविरोधी संघर्ष :** युरोपमधील राष्ट्रवादी विचार हा युरोपीय देशांच्या साम्राज्याचा भाग असलेल्या आशिया आणि आफ्रिकेतील वसाहतींमध्ये देखील पोहचला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून आणि २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत युरोपीय राष्ट्रांच्या अनेक वसाहतींमध्ये राष्ट्रवादी भावनेचा विकास होऊन राष्ट्रीय जागृती झाली. वसाहतीतील जनतेने स्वातंत्र्य आणि लोकशाहीची मागणी करत हिंसक आणि अहिंसक आंदोलने उभारली. दोन महायुद्धात युरोपीय राष्ट्रांची झालेली हानि आणि तीव्र झालेल्या स्वातंत्र्य आंदोलनांमुळे युरोपच्या अनेक वसाहती या स्वातंत्र्य मिळवून स्वतंत्र 'राष्ट्र' म्हणून उदयाला आल्या.

१९ व्या आणि २० व्या शतकात राष्ट्रवादाच्या परिणामांची आपण चर्चा केली आहे. २१ व्या शतकात जरी जागतिकीकरण झाले असे मानले जात असले तरी देखील राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष-स्पर्धा, अल्पसंख्य-बहुसंख्यवाद, राजकारणासाठी राष्ट्रवादाचा वापर, राष्ट्रवादाच्या नावाने पसरविला जाणारा उन्माद, विविध राष्ट्रातील जनतेमध्ये विद्यमान असलेली राष्ट्रीय भावना यावरून 'राष्ट्रवाद' ही एक प्रभावी विचारप्रणाली म्हणून अस्तित्त्वात आहे हे निदर्शनास येते आणि यावरूनच राष्ट्रवादाच्या मानवी इतिहासावरील परिणामांची प्रचीती येते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) आपल्या वास्तववादी मुत्सद्दीपणा, राजकारण आणि प्रशासन शैलीमूळे बिस्मार्क याला कोणत्या उपाधीने देखील ओळखतात?

(२) युद्ध आणि रक्तपात याच मार्गाने प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण साध्य होईल असे धोरण बिस्मार्कने आखले त्याला काय म्हणून ओळखले जाते?

(३) ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात २३ ऑगस्ट १८६६ रोजी शांततेचा तह कोठे झाला ?

(४) ऑस्ट्रिया-प्रशिया युद्धावेळी फ्रान्सच्या फसलेल्या परराष्ट्रीय धोरणामुळे कोणाची नाचक्की झाली?

(५) विल्यम पहिला याला 'जर्मन सम्राट' म्हणून जाहीर करण्यात येऊन 'जर्मन साम्राज्य' स्थापन झाल्याची घोषणा कोठे करण्यात आली ?

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) बिस्मार्क हा ............ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमीनदारांच्या वर्गातील होता.

(२) पंतप्रधान बनताच बिस्मार्कने पार्लमेंटच्या मंजुरीशिवाय ............ सुरू केली.

(३) ............च्या नावाने श्लेस्विग आणि होलेस्टेन या जर्मन बहुसंख्य परगण्यातील कारभार चालविला जात होता.

(४) ऑस्ट्रिया विरुद्ध प्रशिया युद्ध सुरु झाल्यानंतर ............ हा प्रशियाच्या बाजूने युद्धात उतरला.

(५) प्रशियाचा युद्धमंत्री अल्बर्ट वॉन रून आणि प्रशियाचा लष्करप्रमुख हेलमूथ वॉन मोल्टेक यांच्या नेतृत्त्वाखालील ............ ने संपूर्ण युरोपला अचंबित करणारा पराक्रम केला.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

बर्शेनशॅफ्ट: जर्मन राष्ट्रवादी विद्यार्थ्यांची संघटना

कार्लसबाद डिक्रीज: जर्मनीच्या एकीकरणाच्या वाढत्या राष्ट्रवादी भावनेला दडपण्यासाठीचे कायदे

जॉल्वेरीन: जकात संघासाठीचा जर्मन भाषेतील शब्द, जर्मन जकात संघ

लँडट्याग: प्रशिया राज्याची पार्लमेंट

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) नेपोलियन फ्रान्सविरोधातील युद्धात विजय मिळवणारी युरोपीय राष्ट्रे

(२) प्रशिया (३) जकात संघ (४) फ्रँकफुर्ट

(५) ऑस्ट्रिया साम्राज्यात फुट पडेल म्हणून

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) पवित्र रोमन साम्राज्य (२) कार्लसबड डिक्रीज

(३) फ्रेडरिक विल्यम चौथा (४) एरफुर्ट

(५) जर्मन नॅशनल असेंब्ली

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२

(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) विल्यम पहिला (२) फ्रेडरिक विल्यम चौथा

(३) अल्बर्ट वॉन रून (४) राजपदाचा त्याग

(५) राजपुत्र फ्रेडरिक

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) बर्लिन (२) विल्यम पहिला

(३) लष्करीकरण (४) हेलमूथ वॉन मोल्टेक

(५) प्रशियाच्या पार्लमेंटने

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३

(१) पोलादी पंतप्रधान (२) रक्त आणि लोह धोरण

(३) प्राग शहरात (४) फ्रेंच सम्राट नेपोलियन तिसरा

(५) व्हर्सायच्या राजवाड्यातील 'हॉल ऑफ मिरर' येथे

(ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(१) प्रशियन जंकर्स (Prussian Junkers) (२) सैन्यभारती

(३) डेन्मार्कच्या राजा (४) इटली

(५) प्रशियाच्या लष्कराने

## ४.५ सारांश :

युरोपात राष्ट्रवादाचा झालेला उदय ही जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन परिणाम करणारी ऐतिहासिक प्रक्रिया होती. पारंपारिक-रूढीवादी राजसत्तांना विरोध करत युरोपातील अनेक प्रदेशांमध्ये राष्ट्रवादाचा झेंडा घेऊन लोक संघटित झाले. राष्ट्राच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी चळवळी उभारून जनतेने संघर्ष आरंभला. युरोपातील इटली आणि जर्मनी या राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळी उभ्या राहिल्या. इटलीचे एकीकरण जनतेच्या आणि जनतेतून निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या दिशादिग्दर्शनातून

आकाराला आले. विभिन्न छोट्या-छोट्या राज्यात विभागलेल्या जर्मन भाषिकांचे 'जर्मन राष्ट्र' हे प्रशियाच्या पुढाकाराने आणि तिच्या सैन्यशक्तीच्या सहाय्याने वास्तवात आले. तरीही जर्मन जनतेची राष्ट्र म्हणून एकत्र येण्याची भावना जर्मनीच्या एकीकरणांमध्ये प्रभावी ठरली. १९ व्या शतकातील युरोप मधील सत्ता संघर्ष व क्रांतिकारी वातावरण यांनी जर्मन लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना जागृत केली. जर्मन राष्ट्रवादाच्या उदयामागे सांस्कृतिक व भौतिक कारणे देखील प्रभावी ठरली. जर्मनीच्या एकीकरणाला ऑस्ट्रिया साम्राज्य व इतर काही जर्मन राज्ये यांचा विरोध होता. फ्रान्ससाठी देखील शक्तिशाली जर्मन राष्ट्र धोकादायक वाटत होते. अशी युरोपातील परिस्थिती असताना प्रशियाचा राजा विल्यम पहिला, त्याचा पंतप्रधान ऑटो वॉन बिस्मार्क यांनी सातत्याने जर्मनीच्या एकीकरणाचे प्रयत्न सुरू ठेवले. जर्मनीच्या एकीकरण विरोधी शक्तींना एकटे पाडून एका मागोमाग एक त्यांचा पराभव केला. विल्यम पहिला आणि बिस्मार्क यांनी लष्करी शक्ती व मुत्सद्देगिरीच्या अचूक वापर करून जर्मनीचे एकीकरण घडवून आणले. जर्मनीचे एकीकरण आणि त्यासोबतच झालेले इटलीचे एकीकरण  हे युरोपच्याच नव्हे जगाच्या इतिहासाचा वेगळे वळण देणाऱ्या घटना ठरल्या.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)

(१) जर्मनीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

(२) विल्यम पहिला याच्या कार्याचे मूल्यमापन करा.

(३) जर्मनीच्या एकीकरणात प्रशिया राज्याचे योगदान स्पष्ट करा.

(४) ऑटो वॉन बिस्मार्क याने जर्मनीच्या एकीकरणात दिलेल्या योगदानाची चर्चा करा.

(५) जर्मनीच्या एकीकरणाच्या प्रक्रियेचे वर्णन करा.

(ब) टिपा लिहा. (लघुत्तरी प्रश्न)

(१) जॉल्वेरीन

(२) व्हिएन्ना काँग्रेस

(३) फ्रँकफुर्ट पार्लमेंट

(४) कार्लसबड डिक्रीज

(५) प्रशिया-फ्रान्स युद्ध

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

कटारे, अनिल, आधुनिक जगाचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०१८

जैन आणि माथुर, आधुनिक जगाचा इतिहास, के'सागर प्रकाशन, पुणे, २०१९

वानखेडे आणि अमृतकर, आधुनिक युरोपचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, २०२०

Anderson, Benedict, *Imagined Communities: Reflections on The Origin and Spread of Nationalism*, London, Verso, 1991

Blanning, T.C.W., *The Oxford History of Modern Europe*, OUP, 2000

Mukherjee, L., *A Study of Modern Europe and the World*, Calcutta, 2011

❑❑❑

# घटक १
# पहिले महायुद्ध (१९१४)
## (First World War)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ पहिल्या महायुद्धाची कारणे

१.२.२ महत्त्वाच्या घटना

१.२.३ पहिल्या महायुद्धाचे परिणाम

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न.

१.७ संदर्भ ग्रंथ यादी


## १.० उद्दिष्टे

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणास.....

- पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीची माहिती घेता येईल.
- पहिल्या महायुद्धाची कारणे अभ्यासता येतील.
- पहिल्या महायुद्धाच्या कालखंडातील महत्वपूर्ण घटनांचा आढावा घेता येईल.
- विल्सन यांच्या चौदा कलमांची माहिती घेता येईल.
- पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या महत्वपूर्ण संघटनांची माहिती देता येईल.
- पहिल्या महायुद्धाचे परिणाम सांगता येतील.

## १.१ प्रास्ताविक :

आधुनिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि विनाशकारी संघर्ष म्हणजे पहिले महायुद्ध (१९१४-१९१८) होय. पहिल्या महायुद्धाने आपल्या अलिंगनात संपूर्ण जगाला जखडून टाकले होते. पहिले महायुद्ध हे जगभरातील राष्ट्रांनी एका मोठ्या संघर्षात सहभागी होऊन लढलेले एक विनाशकारी युद्ध ठरले. या युद्धाने युरोपातील राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक स्थितीला मोठा धक्का दिला आणि आधुनिक इतिहासाला एक नवीन वळण दिले.या महायुद्धास जगातील कोणतेही एक राष्ट्र अथवा एखादी राजकीय व्यक्ती पूर्णतः जबाबदार नसून युरोपातील सर्वच राष्ट्रे व तत्कालीन मुत्सद्दी व राजकारणी कारणीभूत होते.

विसावे शतक हे 'संघर्षमय व क्रांतीकारी शतक' म्हणून मानले गेले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झालेल्या पहिल्या महायुद्धाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. हे युद्ध जगाच्या इतिहासात 'न भूतो न भविष्यति' व कल्पनातीत मानले गेले. यापूर्वी मानवाच्या इतिहासात एवढ्या व्यापक प्रमाणावर युद्ध झालेले नव्हते. हे युद्ध युरोपातच नव्हे तर जगभर पसरलेले होते. जवळजवळ संपूर्ण जग या युद्धाच्या खाईत लोटले गेले होते. युरोपात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवाद व साम्राज्यवादाला ऊत आलेला होता. त्यातून परस्परविरोधी स्पर्धा, चढाओढ, हेवेदावे, एकमेकांबद्दल संशय, भीती व युद्ध सज्जता यामुळे महायुद्धपुर्व काळात इतकी काही स्फोटकता युरोपीय राजकारणात दाटलेली होती या युद्धात विज्ञानाने अविष्कारलेली नवनवीन शस्त्रे व अस्त्रांचा वापर केला गेला. हे युद्ध चार वर्ष अकरा महिने आकाश, भूमी व समुद्र अशा तिन्ही ठिकाणी लढले गेले. या युद्धात युरोपियन राष्ट्र, आशिया व आफ्रिका खंडातील त्यांच्या वसाहती, अमेरिका, जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली, जपान व चीन इत्यादी राष्ट्रांनी प्रत्यक्षपणे तर इतर काही राष्ट्रे अप्रत्यक्षपणे सहभागी झालेली होती. या महायुद्धाची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी विविध राजकीय, आर्थिक, लष्करी, आणि सामाजिक घटकांचा विचार करावा लागतो. यामध्ये प्रमुख राष्ट्रांच्या महत्त्वाकांक्षा, साम्राज्यवादी वर्चस्वासाठीची स्पर्धा, राष्ट्रवाद, लष्करी शस्त्रास्त्र स्पर्धा, आणि आंतरराष्ट्रीय गटबाजी यांचा समावेश होतो.

## १.२ विषय विवेचन :

जर्मनीच्या एकीकरणाचा शिल्पकार बिस्मार्क याचा शांतता व वाटाघाटी या मार्गावर विश्वास नव्हता. बिस्मार्कने म्हटले होते, ''भाषणाने किंवा बहुमताने जागतिक महत्त्वाचे प्रश्न सुटत नसतात तर त्यासाठी रक्तपात व तलवारीचा खणखणाट याची आवश्यकता असते.'' बिस्मार्कचे हे धोरण 'रक्त व लोह नीती' (Blood Iron Policy) म्हणून ओळखले जाते. नित्शे या विचारवंताच्या मते, ''युद्ध हे नेहमी चांगल्या कारणाकरिताच होत असते. मानवसमाजाला युद्धाचा विसर पडला तर त्याचा उत्कर्ष होणार नाही.'' लुडेन डार्फसारखे जर्मन सेनानी जर्मन जनतेला सांगत होते, ''युद्धामुळेच शौर्य, धैर्य अशा श्रेष्ठ गुणांची जोपासना होते. अकार्यक्षम, दुबळी व जगण्यास नालायक अशी माणसे नाहीसी करून केवळ सर्वश्रेष्ठ व पूर्णावस्थेला गेलेल्या मानवाचे अस्तित्व भूतलावर असावे असा विधिसंकेत आहे व त्याकरिता युद्ध हा एकमेव परमेश्वर नियोजित मार्ग आहे.''

पहिल्या महायुद्धातील हा युद्ध संहार अतिशय भयावह होता या युद्धात जेवढी मनुष्यहानी, वित्तहानी, झाली तेवढी हानी इतर कोणत्याही युद्धात यापुर्वी झालेली नसेल. या युद्धात सुमारे ३ कोटी लोक मारले गेले व २ कोटी लोक जखमी झाले. युद्धातून जे कोणी वाचले त्यांना रोगराई, कत्तली, महागाई व दुष्काळ इत्यादी संकटांना सामोरे जावे लागले. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रापासून हजारो किलोमीटर अंतरावर असलेल्या नागरिकांनाही या युद्धाची झळ सोसावी.

### १.२.१ पहिल्या महायुद्धाची कारणे :

ऑस्ट्रियाच्या हॅप्सबर्ग राजघराण्याचा राजपुत्र आर्च फर्डीनाड याची सेराजेव्हो येथे झालेली हत्या हे जरी महायुद्धाचे तात्कालिक कारण असले तरी खरी कारणे त्याआधीच्या शंभर वर्षाच्या इतिहासातील राजकारणात दडलेली दिसून येतात. की कोणत्यातरी कारणाने त्याचा भडका होणार हे उघड होते. अशा या विनाशकारी महायुद्धाची कारणे पुढीलप्रमाणे वर्णन करता येतील.

**१) आंतरराष्ट्रीय गटांची निर्मिती :**

२८ जुलै १९१४ रोजी पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली असली तरी महायुद्धाच्या पार्श्वभूमीला १८७१ पासून सुरूवात श्री झालेली दिसून येते. युद्धात कोणाचा तरी विजय होतोच म्हणजेच कोणीतरी पराभूत होतेच पण विजयी राष्ट्राचे पराभूत राष्ट्राला अपमानीत न करता सन्मानाने मी वागविले तर पुढे होणारे युद्ध टळू शकते. परंतू जर विजयी राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांचा अपमान करून अन्यायाकारक तह लादला तर हा तहच पुढील युद्धाचे कारण बनू शकते. पहिल्या महायुद्धाला व दुसऱ्या महायुद्धाला तेच कारण मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरले.

१८७०-७१ मध्ये फ्रँको प्रशिया युद्ध झाले. या युद्धात प्रशियाने बलाढ्य फ्रान्सचा पराभव केला. आणि बिस्मार्कने फ्रांन्सवर पॅरिसचा तह लादला. स्वाभिमानी असलेल्या फ्रान्सला हा तह अपमानस्पद वाटला या अपमानस्पद तहाचा बदला घेणे आवश्यक आहे असे फ्रान्सला वाटू लागले. याची भिती बिस्मार्क म्हणजेच जर्मनीलाही वाटत होती. म्हणून बिस्मार्कने युरोपच्या राजकारणात फ्रान्सला एकटे पाडावे व आपणास मित्र मिळावेत यासाठी प्रयत्न सुरू केले त्यामधुन युरोपच्या राजकारणात गट-तट निर्माण झाले रशिया-जर्मनी-ऑस्ट्रिया यांचा तीन सम्राटाचा संघ (१८७२) जर्मनी-ऑस्ट्रिया करार (१८७९) जर्मनी-ऑस्ट्रिया-इटली यांच्यामध्ये त्रिराष्ट्र मैत्री करार (Triple Alliance) (१८८२) अशा प्रकारे युरोपच्या राजकारणात पहिला गट निर्माण झाला त्यामुळे युरोपच्या राजकारणातील सत्तेचा समतोलपणा (Balance of Power) ढळला. त्यास प्रत्युत्तर म्हणून फ्रांन्स रशिया मैत्री करार (१८९३) इंग्लंड-फ्रान्स मैत्री करार (१९०४) इंग्लंड-जपान मैत्री करार (१९०२) इंग्लंड-रशिया मैत्री करार (१९०७) अशा प्रकारे १९०७ मध्ये इंग्लंड-फ्रान्स-रशिया या युरोपीय राष्ट्रांचा दुसरा प्रभावी गट निर्माण झाला. या गटास त्रिराष्ट्र मित्र संघ म्हणून ओळखले जाते अशा प्रकारे दोन तुल्यबळ गट युरोपच्या राजकारणात निर्माण झाल्यामुळे युद्धास आवश्यक असे वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

**२) साम्राज्यवाद :**

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपात औद्योगिक प्रगतीला प्रचंड चालना मिळाली. नव्या वैज्ञानिक शोधांमुळे उत्पादनात मोठी वाढ झाली. या वाढत्या उत्पादनासाठी हक्काच्या बाजारपेठा आणि कारखान्यांना आवश्यक असलेल्या कच्च्या मालासाठी युरोपियन राष्ट्रांना वसाहतींची गरज भासू लागली. परिणामी, वसाहती मिळविण्यासाठी युरोपियन राष्ट्रांमध्ये सत्तासंघर्ष सुरू झाला. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, आणि हॉलंड या देशांनी आफ्रिका, अमेरिका, आणि भारतासारख्या विशाल भूभागावर आपले साम्राज्य निर्माण केले.

जोपर्यंत प्रदेश उपलब्ध होत होते तोपर्यंत स्पर्धेतून निर्माण होणारे मतभेद सामोपचाराने मिटविले जात होते. परंतु जसजसे एकामागून एक प्रदेश व्यापले जाऊ लागले तसतसे उरलेल्या व महत्त्वाचे प्रदेश प्राप्तीसाठी युरोपातील राष्ट्रांतील कलह व शत्रुत्व विकोपाला गेले. इंग्लंड व फ्रान्स यांच्यात सुदानच्या प्राप्तीकरिता युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. १९१४ पर्यत ब्रिटीश साम्राज्याचा सुर्य कधीही मावळत नव्हता या वाढत्या साम्राज्यवादामुळे युरोपियन राष्ट्रे एकमेकांसमोर उभी ठाकली.

**३) युरोपातील लष्करवाद :**

२० व्या शतकाच्या प्रारंभी, युरोपातील प्रत्येक राष्ट्र आपले लष्करी सामर्थ्य वाढवू लागले होते, कारण त्या काळात संशय आणि अविश्वासाचे वातावरण पसरले होते. राष्ट्राराष्ट्रात शस्त्रास्त्रे निर्मिती तसेच लष्कर वाढीसाठी चुरस लागली होती. आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज लष्कराची उभारणी केली जात होती आणि नागरिकांना सक्तीचे लष्करी शिक्षण दिले जात होते. अनेक राष्ट्रे त्यांच्या उत्पन्नाचा सुमारे ८० टक्के भाग लष्करी खर्चासाठी वापरत होती. १९१४ च्या सुमारास जर्मनीचे वर्णन 'A Country With an Army' असे करण्यापेक्षा 'An Army With a Country' असे केले जात होते. जगातील अनेक भाग लष्करी छावणीचे रूप घेत होते आणि केवळ ठिणगी पडण्याची आवश्यकता होती, जेणेकरून संघर्षाची सुरुवात होऊ शकेल.

**४) आक्रमक राष्ट्रवाद :**

राष्ट्रवादाची भावना आपल्याला आपल्या राष्ट्रावर प्रेम करावयास शिकवते. तथापि, राष्ट्रवादाने जर विकृत स्वरूप धारण केले तर कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्रावर प्रेम करणे आणि आपल्या शत्रू राष्ट्राचा द्वेष करणे सुरु करते. फ्रेंच राज्यक्रांतीने प्रखर राष्ट्रवादाला जन्म दिला, तर तत्पूर्वी १७७६ च्या अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने युरोपात राष्ट्रवादाच्या कल्पनेला सुरुवात केली. नेपोलियन बोनापार्टच्या पाडावानंतर, वंश आणि भाषा या तत्वावर राष्ट्रराज्य निर्माण झाले पाहिजेत अशी भावना संपूर्ण युरोपभर पसरली.

आपले राष्ट्र, वर्ण, आणि भाषा जगात सर्वश्रेष्ठ आहेत आणि आपणच जगात राज्य करण्यास पात्र आहोत असा दुराभिमान युरोपिय राष्ट्रांमध्ये पसरला. इतरांना ज्ञानमार्ग दाखविणारे आपणच आहोत असे फ्रेंचांना वाटत होते आणि त्यांनी स्वतःला श्रेष्ठ मानले. यामुळे युरोपिय राष्ट्रांमध्ये एकमेकांबद्दल द्वेष, घृणा, मत्सर, ताणतणाव आणि गुंतागुंत वाढत गेली. अखेरीस, युद्धाशिवाय दुसरा पर्याय नाही असे युरोपियन राष्ट्रांना वाटू लागले, ज्यामुळे या राष्ट्रांमध्ये तणाव वाढत गेला आणि ते युद्धाच्या दिशेने झुकले.

### ५) आर्थिक साम्राज्यवाद :

आर्थिक साम्राज्यवादामुळे युरोपियन राष्ट्रांमध्ये मोठे मतभेद निर्माण झाले.१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात, युरोपियन राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात आपल्या वसाहती निर्माण केल्या होत्या. वसाहतवादाचे रुपांतर पुढे आर्थिक साम्राज्यवादात झाले. युरोपीयन राष्ट्र, विशेषतः इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन व पोर्तुगाल यांच्यात आर्थिक साम्राज्यवादामुळे प्रचंड स्पर्धा सुरू झाली होती. प्रत्येक राष्ट्र कच्चा माल प्राप्त करण्यासाठी आणि पक्का माल खपविण्यासाठी संघर्ष करीत होते. यासाठी त्यांच्यात सतत रस्सीखेच सुरू होती.

या स्पर्धेने आणि मतभेदांनी परिस्थिती अधिकच ताणली गेली आणि अखेर याचे पर्यवसान पहिल्या महायुद्धात झाले. वसाहतींमधून मिळणाऱ्या संपत्तीवर नियंत्रण मिळवण्याच्या या धडपडीने आणि बाजारपेठेवर वर्चस्व गाजवण्याच्या स्पर्धेने युरोपियन राष्ट्रांना एकमेकांशी उभे केले. अशा परिस्थितीत, विविध राष्ट्रांच्या आर्थिक हितसंबंधांनी आणि त्यांच्या सामरिक योजनांनी या तणावाला आणखी गडद केले आणि त्यामुळेच पहिल्या महायुद्धाची ठिणगी पडली.

### ६) जर्मन प्रवृत्ती :

जर्मनीमध्ये प्रशियन प्रवृत्तीचा खूप मोठा प्रभाव होता. प्रशियन लोकांचा असा विश्वास होता की त्यांच्या प्रत्येक विजयामध्ये कोणतीही चूक नसते. बिस्मार्कने 'रक्त आणि शस्त्र' हाच विचार जर्मन नागरिकांमध्ये रुजवला. जर्मनीचा सम्राट कैसर विल्यमनेही याच तत्वाचा अवलंब केला आणि जर्मन जनता सर्वश्रेष्ठ आहे, जर्मन वंश सर्वोच्च आहे, आणि जर्मन लोकांनाच जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे हा विचार पसरवला. त्यामुळे, जर्मन जनता आपल्या श्रेष्ठत्वासाठी काहीही करण्यास तयार झाली.

### ७) जागतिक संघटनेचा अभाव :

पहिल्या महायुद्धानंतर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली आणि दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. मात्र, पहिल्या महायुद्धापूर्वी अशी कोणतीही आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वात नव्हती, त्यामुळे हा संघर्ष घडून आला. अनेक राष्ट्रांनी मैत्री करार करून एकमेकांविरुद्ध संशयाचे वातावरण निर्माण केले होते. सर्व राष्ट्र शस्त्रास्त्रे आणि लष्करी निर्मितीवर भर देत होती. अतिवादी राष्ट्रवाद, प्रादेशिकता, साम्राज्यवाद आणि वंशवाद बोकाळले होते. एक देश दुसऱ्या देशाचा प्रदेश हस्तगत करण्यासाठी आसुसलेला होता. अशा संघर्षमय परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि या देशांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी कोणतीही आंतरराष्ट्रीय संघटना नसल्याने ही सर्व राष्ट्रे मोकाट वावरत होती. परिणामी, ही राष्ट्रे महायुद्धाच्या संहारकांडात होरपळून निघाली.

### ८) भौतिक संघर्षवाद :

वैज्ञानिक प्रगतीमुळे उद्योगधंदे व्यापाराची वृद्धी झाली. राष्ट्रे सुखलोलुप बनली. त्याचबरोबर त्यांच्यातील महत्त्वाकांक्षा व स्वार्थही वाढत गेला.१९ व्या शतकापासुन जगातील वेगवेगळी राष्ट्र व समाज

भौतिकवादी बनत गेली. त्याच्या पुर्ततेसाठी त्यांनी संघर्षवादाचा पुरस्कार केला. एकीकडे राष्ट्रवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, समाजवाद, धार्मिक स्वातंत्र्य व समाजोन्नती होत असतानाच वंशवाद, लष्करवाद, वसाहतवाद, साम्राज्यवादक सुखलोलूप भौतिकवादाचा अतिरेक झाला. या भौतिक वादातून युरोपमध्ये संघर्ष निर्माण झाला. या संघर्षामधूनच पहिल्या महायुद्धाचा वनवा पेटला.

**९) अल्सेस व लॉरेनचा प्रश्न :**

अल्सेस आणि लॉरेन्सच्या प्रश्नावरूनच युरोपच्या राजकारणात दोन तुल्यबळ गट निर्माण झाले होते. १८७०-७१ च्या फ्रँको-प्रशिया युद्धानंतर झालेल्या पॅरिसच्या तहात, बिस्मार्कने फ्रान्सचे अल्सेस आणि लॉरेन हे अतिशय समृद्ध प्रांत जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेतले. त्यामुळे फ्रान्सला अपमान सहन करावा लागला आणि त्या अपमानाचा बदला घेण्याची तीव्र इच्छा फ्रान्समध्ये निर्माण झाली. या अपमानातून फ्रान्सने आपली शक्ती वाढवण्याचा आणि त्याचे गमावलेले प्रांत परत मिळवण्याचा निर्धार केला. परिणामी, युरोपमध्ये दोन विरोधी गट निर्माण झाले. एकीकडे जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि इटली यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय सत्ता, तर दुसरीकडे फ्रान्स, रशिया आणि इंग्लंड यांच्या नेतृत्वाखालील त्रैध्द शक्ती.

या दोन गटांमध्ये वाढता तणाव आणि शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेमुळे युरोपमधील राजकारण अधिकच तणावपूर्ण झाले. या परिस्थितीमुळे युद्धाची शक्यता वाढली आणि अखेरीस पहिल्या महायुद्धाला आवश्यक असे वातावरण तयार झाले. अल्सेस आणि लॉरेनच्या वादामुळे निर्माण झालेली वैरभावना आणि प्रतिस्पर्धी गटांच्या उभारणीने युरोपला एका मोठ्या संघर्षाच्या उंबरठ्यावर आणले.

**१०) वृत्तपत्रे :**

युरोपमधील अनेक राष्ट्रे एकमेकांची शत्रू होती आणि त्यांच्या दरम्यान संघर्षमय वातावरण होते. अशा परिस्थितीत, वृत्तपत्रांनी ठिणगी लावण्याचे आणि भडका उडवण्याचे काम केले. परदेशी राजनैतिक वकिलाती, राजदूत, आंतरराष्ट्रीय संवाद, बैठकांच्या चर्चा यासंबंधी अनेक अतिशयोक्त वर्णने वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होऊ लागली. आपल्या शत्रू राष्ट्राने आपल्या देशाचा कसा अपमान केला आहे, याच्या बातम्यांनी जनतेच्या मनावर परिणाम होऊन सरकारवर दबाव आणण्यास सुरुवात झाली. जनतेच्या भावना ओळखून सरकारनेही युद्धाच्या तयारीस सुरुवात केली. त्यामुळे युरोपमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली.

पहिल्या महायुद्धासाठी वृत्तपत्रे मोठ्या प्रमाणात जबाबदार ठरली. युरोपातील अनेक राष्ट्रे एकमेकांची शत्रू होती, ज्यामुळे संघर्षमय वातावरण होते. अशा परिस्थितीत, वृत्तपत्रांनी ठिणगी लावण्याचे आणि परिस्थिती अधिक उग्र करण्याचे काम केले. परदेशी राजनैतिक वकिलाती, राजदूत, आंतरराष्ट्रीय संवाद आणि बैठका यासंबंधी अतिशयोक्त वर्णने वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध होऊ लागली. शत्रू राष्ट्रांनी आपल्या देशाचा अपमान कसा केला आहे, याच्या बातम्यांनी जनतेच्या मनावर परिणाम होऊन त्यांनी सरकारवर दबाव टाकला. जनतेच्या भावना ओळखून सरकारने युद्धाच्या तयारीस सुरुवात केली. परिणामी, युरोपमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली.

**११) कैसर विल्यम दुसरा यांचा स्वभाव :**

एक माणूस जगाला महायुद्धाच्या खाईत लोटू शकतो, हे पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धातून स्पष्ट झाले आहे. पहिल्या महायुद्धाला जर्मनीचा सम्राट कैसर विल्यम दुसरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरला आहे. कैसर विल्यम दुसरा जर्मनीचा सम्राट होताच, त्याचे चॅन्सलर बिस्मार्क बरोबर मतभेद सुरू झाले. शेवटी, बिस्मार्कने चॅन्सलर पदाचा राजीनामा दिला, आणि त्यानंतर कैसर विल्यम जर्मनीचा सर्वेसर्वा बनला.

कैसर विल्यम उद्धट, हेकेखोर आणि महत्त्वाकांक्षी प्रवृत्तीचा होता. त्याचे धोरण ''विश्वशक्ती किंवा पतन'' असे होते. त्याच्या मते, युरोपमधील प्रत्येक राष्ट्राने जर्मनीचे वर्चस्व मान्य केलेच पाहिजे. त्याने वसाहती मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला, ज्यामुळे इंग्लंडबरोबर संघर्ष निर्माण झाला. यामुळे युरोपमध्ये तणाव वाढला आणि महायुद्धासाठी आवश्यक असे वातावरण तयार झाले.

**१२) बाल्कन प्रश्न :**

पॅन्ट टेम्पले म्हणतात की. १९१४ च्या महायुद्धाला बाल्कन युद्धे जितकी कारणीभूत झाली तितकी इतर कोणतीही गोष्ट कारणीभूत झाली नाही. या टेम्पले यांच्या उद्गारावरून पहिल्या महायुद्धाला बाल्कन प्रश्न किती मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरला हे दिसून येते. युरोपचा जो प्रदेश तुर्कस्थानच्या साम्राज्यात मोडत होता त्यास बाल्कन प्रदेश या नावाने ओळखले जाते. तुर्कस्थानची सत्ता जसजशी कमकूवत बनत चालली त्यावेळी युरोपिय राष्ट्रांनी यावर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. यामधूनच बाल्कन प्रश्न निर्माण झाले. बाल्कन प्रश्नाची सोडवणूक करण्याचा युरोपिय राष्ट्रांनी प्रयत्न केला नाही तर त्यामध्ये गुंतागुंतच निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

इ.स. १८४९ गाये जर्मनीचा चॅन्सलर बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली बर्लिन परिषद झाली. या परिषदेने बोस्निया व हर्जेगोव्हिनाचा प्रदेश ऑस्ट्रियाकडे दिला. बाल्कन प्रदेशातील सर्विया एक बडे राष्ट्र होते. त्यास हे दोन्ही प्रदेश आपल्याकडे हवे होते. तर बोस्निया व हर्जगोव्हिनातील जनतेला स्वातंत्र्य हवे होते. अशा परिस्थितीमध्ये ऑस्ट्रियाने इ.स.१९०८ मध्ये वरील प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडून टाकले ऑस्ट्रियाच्या या कृतीने ऑस्ट्रिया-सर्बिया यांच्यात संघर्ष होऊन १९१२-१३ मध्ये बाल्कन युद्धे झाली. या युद्धानंतर झालेल्या बुखारेस्टच्या तहान्वये सर्वियाचा बाल्कन प्रदेशात विस्तार झाला. सर्बियाला स्लाव वंशाचे एक बलाढ्य साम्राज्य निर्माण करावयाचे होते. तर त्यास ऑस्ट्रियाचा विरोध होता. सर्बियास रशियाचा पाठींबा होता तर ऑस्ट्रियास जर्मनीचा पाठींबा होता. त्यामुळे बाल्कन समस्या जास्तच गंभीर झाली. या बाल्कन समस्येमधून युरोपमध्ये पहिल्या महायुद्धाचे ढग जमू लागले.

**१३) तात्कालिक कारण :**

२८ जून, १९१४ रोजी राजपुत्र आर्च ड्यूक फर्डिनंड आपल्या पत्नीसह साराजोव्हा या ठिकाणी दाखल झाला. राजपुत्राचा हा लवाजामा टाऊन हॉलकडे जाताना त्याच्या गाडीवर बॉम्ब टाकण्यात आला. पण सुदैवाने त्यावेळी तो वाचला. वेळ आल्यानंतर कोणी काहीही करु शकत नाही. टाऊन हॉलचा कार्यक्रम

आटोपून परत येत असताना दुर्देवाने गाडीचा रस्ता चुकला. गाडी मागे घेत असतानाच 'गॅव्हरी लो प्रिन्सिपने' गोळ्या झाडून युवराज व त्याची पत्नी सोफिया यांचा खून केला. या खुनाची बातमी युरोपमध्ये वाऱ्यासारखी पसरली. संपूर्ण युरोप स्तब्ध झाला. बाल्कन प्रश्नावरुन ऑस्ट्रिया व सर्विया यांच्यातील संघर्ष कळसास पोहचला होता. बाल्कन प्रदेशात अनेक दहशतवादी संघटना निर्माण झाल्या होत्या. त्यापैकी 'ब्लॅक हॅन्ड' नावाची संघटना होती. 'जिंकू किंवा मरु' असे धोरण या संघटनेचे होते. या संघटनेने बोस्नियाच्या गव्हर्नरला ठार मारण्याचा कट रचला होता. तेवढ्यात त्यांना ऑस्ट्रियाचा राजपुत्र आर्च ड्यूक फर्डिनंड आपल्या सोफिया पत्नीसह बोस्नियाची राजधानी साराजोव्हा या ठिकाणी येणार आहे याची बातमी समजली. नोकरास मारण्यापेक्षा मालकालाच मारुया असा विचार ब्लॅक हॅन्डच्या सदस्यांनी केला.

वरील अनेक कारणामुळे युरोपची परिस्थिती अतिशय स्फोटक बनली होती. युद्धाचा दारुगोळा ठासून भरला होता. फक्त ठिणगी लावण्याचे काम बाकी होते. आर्च ड्यूक फर्डिनंडच्या खुनाने ठिणगी पडली आणि महायुद्धाचा भडका उडाला.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न क्र. १**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. पहिल्या महायुद्धाची सुरुवात ............ खंडात झाली

अ) आशिया ब) अमेरिका क) आफ्रिका ड) युरोप

२. बिस्मार्क हा ............या देशाचा चान्सलर होता.

अ) अमेरिका ब) ऑस्ट्रिया क) जर्मनी ड) रशिया

३. रक्त आणि लोह नीतीचा पुरस्कार ............ यांने केला.

अ) व्हाल्टेअर ब) बिस्मार्क क) मिराबो ड) रॉबेस्पिअर

४. 'मानवी समाजाला युद्धाचा विसर पडला तर त्याचा उत्कर्ष होणार नाही' हे विधान ............ यांचे आहे.

अ) नित्से ब) रूसो क) व्हाल्टेअर ड) कॅने

५. ऑस्ट्रियन राजपुत्र फर्डिनांड याचा खून ............ रोजी झाला.

अ) १६ एप्रिल १९१० ब) १७ मे १९१२

क) १८ जून १९१३ ड) २८ जून १९१४

## १.२.२ महत्त्वाच्या घटना आणि युद्धाची सुरुवात :

### युद्धाची सुरुवात :

सर्बियन राष्ट्रवादी क्रांतीकारक 'गॅव्हरी लो प्रिन्सिपने' २८ जून, १९१४ रोजी भर रस्त्यावर ऑस्ट्रियाच्या राजपूत्राची आर्च ड्युक फर्डिनांडची निघृण हत्या केली. या खुनाची बातमी वाऱ्यासारखी

पसरली सर्व बड्या राष्ट्रांनी या घटनेचा निषेध केला. ऑस्ट्रियन जनता संतप्त झाली. ऑस्ट्रियाने सर्बियाला चौकशी करून जबाबदार धरले. त्यांच्यावर १० अटी लादल्या आणि त्या ४८ तासात मान्य करण्याचे दडपण सर्वियावर टाकले व सर्बियातील गुप्त संघटनेने हा खुन केला असावा असे ऑस्ट्रियाला वाटले. सर्बियाने मान्यता कळविण्यापुर्वी ऑस्ट्रियाने आततायीपणा करून एक खलिता ऑस्ट्रियाला पाठविला त्यात सर्बियाला राजपुत्र आर्च ड्यूक फर्डीनांड यांच्या हत्येस जबाबदार धरून ऑस्ट्रियाने सर्बियाविरूद्ध युद्ध पुकारले.

ऑस्ट्रिया सर्बियाशी युद्ध करण्याच्या संधीची वाट पाहत होता. वरील तात्कालिक कारणाने २८ जुलै, १९१४ रोजी ऑस्ट्रियाने अकस्मितपणे सर्बियावर आक्रमण केले. स्लाव वंशाच्या रक्षणासाठी रशिया सर्बियाच्या मदतीला धावून गेला. जर्मनीने ३१ जुलै १९१४ रोजी रशियाविरूद्ध युद्ध पुकारले मित्र राष्ट्रांनी सर्बियाला लष्करी सहाय्य पाठविले. जर्मनीने ३ ऑगस्ट १९१४ रोजी फ्रांन्स विरोधी युद्ध पुकारले. बेल्जियमच्या तटस्थतेचा भंग होताच इंग्लंडने जर्मनीविरूद्ध ४ ऑगस्ट १९१४ रोजी युद्ध जाहीर केले. जर्मनी व बल्गेरिया ही राष्ट्रे धावून आली. अशा प्रकारे पहिल्या महायुद्धाचे रणशिंग फुंकले गेले.

**युद्धाची धुमश्चक्री :**

पहिले महायुद्ध चार वर्षे चालले. १९१४ मध्ये सुरू झालेले हे युद्ध १९१८ पर्यंत सुरू राहिले. या युद्धात दोन प्रमुख गट होते. एका बाजूला रशिया, इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, आणि सर्बिया यांसारखी दोस्त राष्ट्रे होती. दुसऱ्या बाजूला ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, जर्मनी आणि बल्गेरिया यांचा समावेश होता.

युद्धाच्या कालावधीत, अनेक राष्ट्रे या संघर्षात सहभागी झाली. कालांतराने रूमानिया, जपान, आणि इटली हे राष्ट्रे दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उतरले. तर दुसऱ्या बाजूने तुर्कस्थान आणि बल्गेरिया या राष्ट्रांनी आपला सहभाग नोंदवला. या युद्धाच्या वेळी, विविध देशांनी आपले सैन्य आणि संसाधने या संघर्षात गुंतवली, ज्यामुळे युरोपभर मोठ्या प्रमाणात विध्वंस आणि मानवहानी झाली. या युद्धाचा प्रभाव जागतिक पातळीवर जाणवला, ज्यामुळे पुढील अनेक दशकांपर्यंत जगभरात राजकीय, आर्थिक, आणि सामाजिक बदल घडून आले.

**अमेरिकेचा युद्धप्रवेश :**

इंग्लंडच्या आरमाराला पराभूत करण्यासाठी जर्मनीने पाणबुड्यांचा प्रखर मारा सुरू केला. या युद्धात अमेरिकन जहाजांवर हल्ला केला जाणार नाही असे या पूर्वीच म्हणजे मे. १९१६ मध्ये जर्मनीने वचन दिले होते. मात्र ३१ जानेवारी, १९१७ रोजी जर्मनीने जाहीर केले की, तटस्थ राष्ट्रांसह इतर राष्ट्रांच्याही जहांजावर हल्ला केला जाईल. त्यात अमेरिकेची गनफ्लाईट, सरोक्स, अरेबिक व लुसिटानिया इत्यादी बोटींवरील हल्ल्यांमुळे अमेरिकन प्रवाशांची जिवीत व वित्तहानी झाली. त्यातील लुसिटानिया जहाजात १७५ अमेरिकन प्रवासी होते. त्यामुळे अमेरिकन जनता प्रक्षुब्ध झाली. व जनतेने सरकारवर युद्धप्रवेशासाठी दबाव टाकला. त्यामुळे ६ एप्रिल, १९१७ रोजी दोस्त राष्ट्रांच्या बाजूने अमेरिकेने युद्धात उडी घेतली. युद्धप्रवेश करताना अमेरिकन राष्ट्राध्यक्षाने अशी घोषणा केली की, ''जगाची लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी आम्ही युद्धात प्रवेश करीत आहोत.''

अमेरिकेच्या युद्धप्रवेशाने दोस्तांची बाजू वरचढ बनली. अमेरिकेचा पैसा, मनुष्यबळ, साधनसंपत्ती दोस्तांना मिळाली. त्यामुळे दोस्तांनी विजयाकडे कूच केली. याउलट जसेजसे युद्ध लांबत गेले तसतसे जर्मनीचे उपासमारीने हाल होऊ लागले. म्हणून पश्चिम आघाडीवर जर्मनीने बचावत्मक पवित्रा घेतला. याच सुमारास रशियामध्ये लेनिनच्या नेतृत्त्वाखाली बोल्शेव्हिक राज्यक्रांती यशस्वी झाली. नव्याने आलेल्या रशियन सरकारने युद्धबंदी करण्यासाठी १९१८ मध्ये ब्रेस्ट लिटोव्हास्कचा तह केला. याचवेळी फ्रेंच सेनापती फो व इंग्रज सेनापती डग्लस या दोघांनी दोस्त राष्ट्रांच्या युद्ध मोहिमांमध्ये सुत्रबद्धता आणली. १९१८ च्या ऑक्टोबर अखेर जर्मनीला मागे रेटून सर्व फ्रेंच प्रदेश मुक्त केला. जर्मनीकडील राष्ट्र हळूहळू युद्धातून अंग काढू लागले. १९ नोव्हेबरला बल्गेरिया, ३१ ऑक्टोबरला तुर्कस्थान व ४ नोव्हेंबर १९१८ ला ऑस्ट्रिया या राष्ट्रांनी युद्धबंदी केली. खुद्द जर्मनीत अराजकता निर्माण होऊन विविध गट युद्धबंदीची मागणी करू लागले. अंतर्गत प्रक्षोभ, उपासमार, लष्कराचे खचलेले मनोधैर्य, आरमाराचे बंड, समाजवादी क्रांतीमूळे जर्मनी एकाकी पडले. जर्मनीपुढे या परिस्थतीत शरणागती शिवाय पर्याय नव्हता. तेव्हा ९ सप्टेंबर, १९१८ रोजी कैसर विल्यमने राजत्याग केला. जर्मनीत नवे प्रजासत्ताक राज्य घोषित केले गेले. या राज्याने ११ नोव्हेबर, १९१८ रोजी दोस्त राष्ट्रांशी युद्धबंदीचा करार केल्याने पहिल्या महायुद्धाची सांगता झाली. युद्धसमाप्तीनंतर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुल्ड्रो विल्सन याने आपली १४ कलमी योजना जाहीर केली.

**विल्सनची १४ कलमे :**

अमेरिकेने १९१७ मध्ये महायुद्धात प्रवेश केल्यानंतर राष्ट्राध्यक्ष वुल्ड्रो विल्सनने चौदा कलमी योजना प्रसिद्ध केली. या योजनेलाच विल्सनची १४ कलमे असे म्हणतात. यामध्ये अमेरिकेची युद्धविषयक भूमिका, धोरण व परराष्ट्रनितीचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे.

१) सर्व आंतरराष्ट्रीय तह व करार स्वरुपात करावेत.

२) सर्व राष्ट्रांना सागरावर मुक्त संचार असावा. जलमार्गावर कोणत्याही एका राष्ट्राची मक्तेदारी नसावी व ते सर्व राष्ट्रांसाठी खुले असावेत.

३) आंतरराष्ट्रीय उद्योग, व्यापार व आर्थिक व्यवहार सर्वांनी मुक्तपणे करावेत. सर्वाना आंतरराष्ट्रीय व्यापारात समान संधी असावी.

४) सैन्य व शस्त्रांचा अतिरिक्त साठा न करता देशांत शांतता, सुव्यवस्था व सुरक्षा ठेवण्यापुरतेच सैन्य व शस्त्र ठेवावे.

५) साम्राज्यवादी राष्ट्रांनी वसाहतींवरील आपले निर्बंध उठवून 'स्वयंनिर्णयाचा अधिकार' द्यावा.

६) रशियन प्रांतातील आपले सैन्य शत्रुराष्ट्रांनी काढावे.

बेल्जियममधील सैन्य परत बोलावून त्या राष्ट्रास स्वातंत्र्य प्रदान करावे.

८) पराभूत जर्मन राष्ट्राने फ्रान्समधील आपले सैन्य मागे घेऊन फ्रान्सचे घेतलेले अल्सेस व लॉरेन्स हे प्रदेश परत करावे.

९) इटलीच्या सीमा राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून निश्चित कराव्यात.

१०) ऑस्ट्रिया-हंगेरीतील जनतेलाही 'स्वंयनिर्णयाचा अधिकार' देण्यात यावा.

११) रुमानिया, मॉनेनिग्रो व सर्बिया येथील सैन्य काढून या राष्ट्रांमध्ये सार्वभौम प्रजासत्ताक राज्याची निर्मिती करावी. तसेच बाल्कन राष्ट्रांची पुनर्रचना करण्यात यावी.

१२) तुर्कस्थानच्या मुळ प्रांताला मान्यता देऊन तुर्कस्थानातील जनतेला स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्यात यावा व दार्दानेल्सची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली ठेवावी.

१३) पोलीश वंशीय लोकांचे वास्तव्य असलेल्या प्रदेशात स्वतंत्र पोलंडची निर्मिती करून त्यांना दळणवळण व वाहतुकीसाठी एक आंतरराष्ट्रीय मार्ग उपलब्ध करून द्यावा.

१४) जगभरातील छोट्या-मोठ्या राष्ट्रांच्या सुरक्षा, स्वातंत्र्य सहकार्य, जागतिक शांतता व सुव्यवस्थेसाठी तसेच एकमेकांमधील समस्यांचे विधायक मार्गाने निराकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रसंघ' ही जागतीक संघटनेची स्थापना व्हावी.

विल्सनची ही १४ कलमे जगात शांतता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शक अशी तत्त्वे होती. युद्धसमाप्तीनंतर पॅरिस येथे शांतता परिषद भरविली. ही परिषद पॅरिसमधील व्हर्सायच्या राजवाड्यात चालु होती. म्हणून या तहाला व्हर्सायचा तह असेही म्हणतात. या परिषदेत जित दोस्त राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांना प्रामुख्याने जर्मनीला युद्धासाठी कारणीभूत ठरवून आकस, संताप, सुड व द्वेषभावनेने अन्यायकारक तह लादला. या तहामूळे जर्मनीला राजकीय, आर्थिक व लष्करीदृष्ट्या दुर्बल करण्यात आले. व्हर्सायच्या या तहामुळे जर्मनी दुखावला गेला व या तहातच दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली.

**पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या विजयाची कारणे :**

**१) इंग्लंडचे आरमारी श्रेष्ठत्व :**

इंग्लंडचे आरमारी श्रेष्ठत्वामुळे त्यांनी जर्मनीची सागरी नाकेबंदी केली. त्यामुळे जर्मनीची उपासमार होऊन कच्च्या मालाचा पुरवठा बंद झाला. शिवाय इंग्लंडच्या उत्कृष्ट आरमारामुळे त्यांनी जर्मनीच्या वसाहती जिंकल्याने जर्मनीची अवस्था बिकट बनली.

**२) अमेरिकेचा युद्धप्रवेश :**

अमेरिकेने युद्धप्रवेश केल्यामुळे दोस्त राष्ट्रांना अमेरिकन साधनसंपत्ती, मनुष्यबळ, आर्थिक व लष्करी सहाय्य मिळाले. म्हणून दोस्तांच्या परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला व पराजयाकडे वाटचाल करणारे दोस्त राष्ट्रे एकाएकी विजयाकडे निघाले. याउलट जर्मनीच्या मित्र राष्ट्रांनी त्यांना सहाय्य न करता युद्धातून काढता पाय घेतला.

**३) ब्रिटीश साम्राज्याच्या वसाहतींचे पाठबळ :**

ब्रिटीश साम्राज्याच्या वसाहतीतील राष्ट्रांनी उदा. भारताने इंग्लंडला मदत केल्याने इंग्लंडला या राष्ट्रांकडून पैसा व मनुष्यबळ मिळाले.

**४) भक्कम राष्ट्रांचा जर्मनीकडील अभाव :**

हंगेरी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान, बल्गेरिया इत्यादी जर्मनीच्या बाजुने लढणाऱ्या राष्ट्रापैकी एकाचीही स्थिती भरभक्कम नव्हती. त्यामुळे युद्धकाळात जर्मनीलाच या देशांना मदत करण्याची वेळ आली.

**५) दोस्तांकडील मनुष्यबळ :**

सतत चार वर्षे लढल्या गेलेल्या युद्धामुळे जर्मनीच्या मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी व वित्तहानी झाली. याची भरपाई जर्मनीत होऊ शकली नाही. व जर्मनीकडे वृद्ध व लहान मुले एवढेच मनुष्यबळ राहिले. मात्र दोस्तांना युद्धादरम्यान कधीही या गोष्टींची कमतरता भासली नाही.

**पहिल्या महायुद्धाचे परिणाम :**

पहिल्या महायुद्धाचा संपूर्ण जगावर परिणाम झाला. यात संपूर्ण मानवी जनजीवन प्रभावित व विस्कळीत झाले. युद्धात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे भाग घेतलेल्या तसेच युद्धात भाग न घेतलेल्या राष्ट्रांनाही या युद्धाचे परिणाम भोगावे लागले. या महायुद्धातून एका भयंकर, संघर्षमय संहारपर्वाला सुरुवात झाली. यातून दोस्त राष्ट्रांच्या असुरी महत्त्वाकांक्षा समोर आल्या. राजकीय क्षेत्रातील नेतृत्व इंग्लंडकडून अमेरिकेकडे आले. युद्धापुर्वी शक्तीशाली असलेली राष्ट्र कर्जबाजारी व शक्तीहीन बनली. तर युरोपातील ऑस्ट्रिया, जर्मनी, रशिया व तुर्कस्थान इत्यादी राष्ट्रात राजसत्तांचे विघटन होऊन तेथील राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदलली. तसेच युद्धानंतर बेरोजगारी, आर्थिक मंदी, वस्तुंची टंचाई व महागाई यासारखे अनेक प्रश्न निर्माण झाले. या महायुद्धानंतर जो व्हर्सायचा तह झाला त्यातच दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली. पहिल्या महायुद्धाचे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) जीवितहानी :**

दीर्घकाळ चाललेल्या या महायुद्धात सहभागी झालेल्याजगातील २८ प्रमुख देशांची मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. सुमारे ८० लाख लोक मारले गेले. सुमारे २ कोटी लोक जायबंदी व अपंग झाले. म्हणजेच जवळपास ३ कोटी कुटुंबियांचे संसार देशोधडीला लागले. युद्धानंतर पसरलेल्या रोगराईमुळे सुमारे १ कोटी ३० लाख लोक मृत्युमुखी पडले. स्थूलमानाने या युद्धात भीषण मानवसंहार घडून आला. एवढ्या प्रचंड प्रमाणात जिवीतहानी यापुर्वी मानवजातीच्या इतिहासात झालेली नव्हती.

**२) आर्थिक नुकसान :**

पहिल्या महायुद्धादरम्यान युरोपियन राष्ट्रांची अपरिमित आर्थिक हानी झाली. प्रचंड प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले. युद्धात सहभागी झालेल्या राष्ट्रांचा एकुण खर्च २० अब्ज डॉलर्स एवढा होता. त्यात केवळ जर्मनीने युद्धाकरिता ४ हजार कोटी पौंड एवढा खर्च केला. युद्धाप्रसंगी ब्रिटनची ६ हजार जहाजे व जर्मनीच्या २०० पाणबुड्या नष्ट झाल्या. त्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची कल्पना करता येईल. या युद्धामुळे युरोपियन राष्ट्रांवर १०,००,००,००० डॉलर्स एवढ्या प्रचंड कर्जाचा बोजा चढला. ताशी १०० लक्ष डॉलर्स

एवढा खर्च होत होता. याशिवाय गिरण्या, उद्योगधंदे, सांस्कृतिक केंद्रे, रेल्वे, रस्ते, शेती, धरणे, खाणी यांचेही प्रचंड नुकसान झाले.

**३) जगाचे स्वरूप पालटले :**

पहिल्या महायुद्धाने जगाचे स्वरूप पालटून युरोपच्या रणभूमीवर एका युगाचा अस्त होऊन मानवाच्या आशा-आकांक्षांनी भरलेल्या नव्या युगाची पहाट झाली. अर्थात युद्धोत्तर काळात सर्व आशा- आकांक्षा धुळीस मिळाल्या.

**४) समाजजीवन व विचारप्रणालीत आमुलाग्र बदल :**

समाजजीवनात आमुलाग्र बदल घडुन माणसाच्या विचारप्रणालीत बदल घडून आला. सामाजिक मूल्यांमध्ये बदल घडून भौतिकता, भोगवाद, चैन-विलासितेचे प्रमाण वाढलेली नवीन तरुण पिढी उदयास आली. या पिढीने मानवी मूल्यांना दुय्यम स्थान देऊन शक्तीचे प्रदर्शन करण्यात धन्यता मानली. त्यामुळे युरोपातील सामाजिक परिस्थितीत अनेक इस्ट-अनिष्ट परिणाम स्थित्यंतरे घडुन आली.

**५) सैनिक बेकार झाले :**

महायुद्धाकाळात युरोपात अनेक सैनिकांची भरती करण्यात आली होती. यात अनेक बेरोजगारांना सैन्यात काम मिळाले. एकट्या अमेरिकन सैन्यात ४७ लाख सैनिक होते. मात्र युद्ध समाप्तीनंतर विविध देशातील सैनिकांना आता काम राहिले नाही. त्यामुळे अनेकांना कामावरून काढून टाकण्यात आले. म्हणून महायुद्धात लढलेल्या सैनिकांवर बेरोजगारीची वेळ आली. त्यामूळे या सैनिकांच्या जीवनात नैराश्य आले व त्यांच्यातील विध्वंसक प्रवृत्ती जागृत होऊन त्यांनी नागरी समाजात हैदोस मांडला. त्यातून हिंसा, अत्याचार, दहशतवाद, क्रांती यांना समाजजीवनात ऊत आला.

**६) राजेशाही नष्ट झाली :**

पहिल्या महायुद्धामुळे ऑस्ट्रिया-हंगेरी, जर्मनी, रशिया, तुर्कस्थान या देशातील राजेशाही नष्ट झाली. साम्राज्यवादी शक्तींना आळा बसून राजसत्तेची जागा लोकशाही शासनप्रणालीने घेतली नाही तर ती हुकूमशाहीने घेतली. त्यातुन लोकशाहीची पिछेहाट झाली व रशियात साम्यवाद, जर्मनीत नाझीवाद आणि इटलीत फॅसिस्टवाद हुकुमशाहीच्या स्वरूपात पुढे आला. हिटलर, मुसोलिनी यासारखे हुकूमशाह निर्माण झाले.

**७) महायुद्धानंतर आर्थिक प्रश्न गंभीर बनले :**

युरोपातील सर्वच देशाना महागाई, बेरोजगारी, महामंदी व वस्तुंची टंचाई यासारखे प्रश्न भेडसावू लागले. त्यात लोकांवर जबरदस्त कर लावले गेले. या सर्वाचा परिणाम म्हणजे युरोपातील मानवी जीवन विस्कळीत झाले. तेथील शेतकरी, कामगार, व्यापारी व उद्योगपती या सर्वानाच आर्थिक प्रश्न निर्माण झाले. त्यांची अवस्था बिकट बनली.

**८) इंग्लंड व फ्रान्सचे खच्चीकरण :**

महायुद्धापूर्वी इंग्लंड व फ्रान्स हे जागतिक राजकारणात पहिले व दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र होते. परंतु महायुद्धात ही जागा जागा अमेरिका, रशिया या दोन राष्ट्रांनी घेतली.

**९) रशियन राज्यक्रांतीला हातभार :**

इंग्लंडयानाप्रमाणे रशिया हे प्रगत राष्ट्र नव्हते. येथील शासन प्रष्ट व अनियंत्रित असून अराक्ष होते. त्यातच रशिया महायुद्धात अनेक आघाडयांवर पराभूत झाले. तेथील जनता राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांमुळे असंतुष्ट होती. यात पराभवामुळे भर पडली. त्यामुळे शासनप्रणालीविषयी जनतेत कमालीचा असंतोष निर्माण झाला. त्याचे पर्यावसन १९१७ च्या राज्यक्रांती यशस्वी होण्यात

**१०) व्हर्सायच्या तहाने जर्मनीचे केलेले खच्चीकरण :**

जर्मनीमुळेच जग पहिल्या महायुद्धाच्या खाईत लोटले गेले. अशी भावना जित राष्ट्रांनी केलेली होती. व या भावनेतून जर्मनीला महायुद्धासाठी जबाबदार धरून त्यांच्यावर व्हर्सायचा तह लादण्यात आला. या तहाद्वारे जर्मनीचे जास्तीत-जास्त खच्चीकरण करण्यात आले. जर्मनीला राजकीय आर्थिक व लष्करीदृष्ट्या दुर्बल करण्याकरिता व्यांच्यावर जबर युद्धाखंडणी लादुन त्यांना युद्धखोर राष्ट्र घोषित करून त्यांनी बदनामी केली.

जर्मनीला परिषदेचे प्रतिनिधीत्व न देता केवळ तहाला मान्यता देण्यासाठी बोलावण्यात येऊन त्यांच्या शिष्टमंडळाला हीन वागणूक देण्यात आली होती. या तहाने जर्मनीला फ्रान्सचा घेतलेला अल्सेस व लॉरेन्स हा प्रदेश परत द्यावा लागला. तसेच जर्मनीच्या आशिया खंडातील सर्व वसाहती व बेटे काढून घेण्यात येऊन ती दोस्त राष्ट्रांच्या स्वाधीन करण्यात आली. या अशा अनेक अटी व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर लादण्यात आल्यामुळे जर्मन राष्ट्रे दुखावला गेले. हा तह तेथील जनतेला अपमानास्पद वाटल्याने याचा वचपा काढण्यासाठी जनतेने हिटलरच्या हुकूमशाहीला पाठींबा दर्शविला व यातुन दुसरे महायुद्ध झाले.

**११) समाजजीवन विस्कळीत झाले :**

महायुद्धात जगातील सर्व प्रमुख राष्ट्रातील कोट्यावधी लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग होता. युद्धात सुमारे तेरा कोटीहून अधिक माणसे मारली गेली व बावीस रजनीअरंगशाली त्यांच्यावर आधारित हजारो कुटुंबे निराधार बनली. युद्धानंतर पसरलेल्या रोगराई, दारिद्र्य, टंचाई, साठेबाज काळाबाजार, चलन फुगवटा, महामंदी व प्रदुषण यामुळे समाजात नैराश्य निर्मान झाले. नीतीमुल्यांचा हास होऊन महत्वाकांक्षा, युद्ध, आक्रमक, हिंसाचार हुकुमशाहीच्या प्रतिगामी प्रवृत्तीला चालना मिळाल्याने सामान्य माणसाचे जन विस्कळीत होऊन लोकशाही, उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्य व धार्मिक नीती लोप पावली. सुख व आनंद समाजाला दुर्मिळ झाला. यातून शासनकर्त उद्योगपती, लेखक, कलावंत, मजूर व श्रमजीवी वर्गही सुटला नाही. थोड जगभरातील संपुर्ण मानव समाज क्षतिग्रस्त होऊन विस्कळीत झाला.

**१२) लष्करीकरण व शस्त्रास्त्रनिर्मिती :**

पॅरीसच्या तहामुळे लढाऊ राष्ट्रवादाला पुन्हा प्रेरणा मिळाली. पराभूत राष्ट्रमध्ये महायुद्धात प्रदेशाची पुनःप्राप्ती करण्याची इर्षा निर्माण झाली. आक्रमण केल्याशिवाय प्रदेशाची पुर्नप्राप्ती संभवणार नाही या भावनेतून शत्रूराष्ट्रांनी आपले भूदल नौदल व वायुदल सामर्थ्य वाढविण्यास सुरुवात केली. सक्तीने लष्करमरती कसर सैन्यशक्ती वाढविली. लष्करी प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करून शस्त्रांचे उत्पाद वाढविले. तेथील राज्यकर्त्यांनी युद्ध व पराक्रमाला प्राधान्य देऊन लष्करीकरणास भर दिला. यामुळे दोस्तराष्ट्रांना यांची भिती बाटुन त्यांनीही आपली सैन्यशी वाढविण्यावर भर दिला. यामुळे जगातील सर्व राष्ट्र परस्पराविषयी साशंक होऊन दुसऱ्याला पराभूत करण्यासाठी युद्धाची तयारी करू लागले. शासनकर्त्यांनी लष्करी प्रगतीसाठी वैज्ञानिकांना वेठीस धरले. यातुन वैज्ञानिक प्रगतीने उच्चांक गाठल्याने तोफा, बंदुका, रणगाडे, पाणबुड्या, विमाने, बोटी, क्षेपणास्त्रे, अवकाशयाने व अणूबॉम्बसारख्या घातक आधुनिक शस्त्रास्त्रांची निर्मिती होऊन परिणामी जर दुसऱ्या एका भीषण संघर्षासाठी सज्ज झाले.

**१३) अमेरिका जागतिक महसत्ता बनली :**

अमेरिकेने मन्रो सिद्धांतानुसार इतर राष्ट्रांशी संघर्ष टाळून अलिप्ततावादी धोरण स्वीकारले होते. या तत्त्वामूळे अमेरिकेची आर्थिक भरभराट होऊन अमेरिकेची शांतताप्रिय राष्ट्र म्हणून प्रतिमा निर्माण झाली होती, परंतु पहिल्या महायुद्धात सुरूवातीला दोस्त राष्ट्रांचा पराभवाची चिन्हे दिसू लागली. अमेरिकेतील बहुसंख्य उद्योगपतींनी इंग्लंड फ्रान्स यासारख्या देशात आपले भांडवल गुंतविले होते तसेच या देशांशी अमेरिकेचे आर्थिक हितसंबंध गुंतलेले होते. तसेच या देशातून अमेरिकन आल्यामुळे आपल्या वंशातील लोकांचे संरक्षण करण्यासाठी, जगात शांतता टिकविण्यासाठी व अमेरिकेची प्रवाशांची जिवीत व वित्तहानी झाल्यामुळे अमेरिकेने महायुद्धात प्रवेश करून दोस्त राष्ट्रांना दणदणीत विजय मिळवून दिला. त्यामुळे युरोपियन राष्ट्रांची लष्करी व आर्थिक दुर्बलता दिसून आली. यामुळे अमेरिकेचे जागतिक राजकारणात वर्चस्व निर्माण होऊन अमेरिका जागतिक महासत्ता बनली.

**१४) राष्ट्रसंघाची निर्मिती :**

महायुद्धापर्यंत आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे प्रश्न सोडविण्यासाठी नानाविध संघटना अस्तित्वात होत्या. त्यांच्या माध्यमातुन अनेक तह करण्यात आले व परिषदा भरविण्यात आल्या, परंतु त्या फारशा प्रभावी ठरल्या नाहीत. त्यांचे वसाहतवादी राज्यांवर नियंत्रण नव्हते. यांच्यात सामंजस्य व जगात शांतता निर्माण करण्यात या संघटना अयशस्वी ठरल्याने जगाला पहिले महायुद्ध पाहावे लागून भीषण नरसंहार झाला. या महायुद्धाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व जगात शांतात. सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय प्रश्न वाटाघाटी व शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी, परस्परात सहकार्य निर्माण करण्यासाठी, साम्राज्यवादाला पायबंद घालण्यासाठी जगात एखादी व्यापक संघटना निर्माण करण्याच्या हेतूने अमेरिक राष्ट्रध्यक्ष वुड्रो विल्सनच्या पुढाकाराने १९२० मध्ये 'राष्ट्रसंघाची' (League of Nations) ची स्थापना करण्यात आली. 'राष्ट्रसंघ' हे पहिल्या महायुद्धाचे फलित होते.

**१५) हुकूमशाहीचा उदय व दुसऱ्या महायुद्धाची नांदी :**

पॅरिस शांतता परिषदेत दोस्त राष्ट्रांनी शत्रूराष्ट्रांवर अपामानकारक अटी लादल्याने इटली, जर्मनीसारख्या राष्ट्रांमध्ये जनमत प्रक्षुब्ध झाले व त्यांच्यामध्ये सुडाची भावना निर्माण झाली. यामुळे जर्मनीत हिटलर व इटलीत मुसोलिनी व इतर टोजो, फ्रेंको यांनी आक्रमक विस्तारवादाचा पुरस्कार केल्याने जागतिक शांतता धोक्यात आली. राष्ट्रसंघ या हुकूमशहांना आळा घालण्यात अयशस्वी झाल्याने पहिल्या महायुद्धानंतर केवळ २० वर्षानी दुसऱ्या महायुद्धाला प्रारंभ झाला. त्यासाठी महायुद्धाने निर्माण केलेली प्रतिकूल परिस्थिती कारणीभूत ठरली. पहिल्या महायुद्धातच दुसऱ्या महायुद्धाचे बीजारोपण झाले होते.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न क्र. २**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. पहिल्या महायुद्धानंतर बलाढ्य सत्ता म्हणून ............या राष्ट्राचा उदय झाला.

अ) अमेरिका ब) ऑस्ट्रिया क) इथेयोपिया ड) ब्रियान

२. पहिल्या महायुद्धाने ............ या देशाच्या औद्योगिकीकरणात वृद्धी झाली.

अ) नेपल्स ब) अमेरिका क) जर्मनी ड) ऑस्ट्रिया

३. पहिल्या महायुद्धामुळे ............ या राष्ट्रामध्ये साम्यवादी क्रांती झाली.

अ) पॅरिस ब) व्हर्साय क) रशिया ड) अमेरिका

४. ............ याच्या शरणागतीनंतर पहिले महायुद्ध समाप्त झाले.

अ) कैसर विल्यम दुसरा ब) कॅने क) फॅने ड) मिरॅबो

५. पॅरिसची शांतता परिषद ............ मध्ये पर पडली..

अ) १९१७ ब) १९१९ क) १९२१ ड) १९२३

अशा प्रकारे पहिल्या महायुद्धामुळे प्रचंड जिवित व वित्तहानी होऊन समाजजीवन विस्कळीत झाले. रोगराई, बेरोजगारी, महामारी, आर्थिक मंदी, हिंसाचार, गुन्हेगारी व प्रदुषण यासारखे प्रश्न जगासमोर आ वासून पुढे आले. अमेरिका जागतिक महासत्ता बनली. रशियात १९१७ ची बोल्शेविक क्रांती होऊन बलाढ्य साम्यवादी रशियाचा उदय झाला. विजयी राष्ट्रांची स्वार्थी वृत्ती, अमेरिकेचा अलिप्ततावाद, पॅरिस शांतता परिषद, दुबळा राष्ट्रसंघ यामुळे हुकुमशाहांची निर्मिती झाली व जगाची वाटचाल दुसऱ्या महायुद्धाकडे झाली.

**राष्ट्रसंघाची स्थापना :**

महायुद्धामुळे जागतिक शांततेचे महत्व जगाला कळून चुकले. आधुनिक शस्त्रास्त्रांच्या युद्धाची भीषणता जगाला जाणवली. राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष चर्चने सामोपचाराने सोडविले पाहिजेत. ह्याची राजकीय नेत्यांना जाणीव झाली. या दृष्टीने जागतिक शांतता आणि सहकार्यासाठी एखादी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करावी

असे महत्त्वाचे तत्त्व प्रे. विल्सन यांनी आपल्या चौदा मुद्यांत मांडले होते. त्याच्या आधारावर ''राष्ट्रसंघ'' (League of Nations) या आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करण्यात आली.

**पॅरिस शांतता परिषद :**

मानवाच्या इतिहासातील सर्वात पहिले विध्वंसक युद्ध १८ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीच्या शरणागतीनंतर संपले. युद्ध समाप्ती नंतर फ्रान्सच्या आग्रहाखातर पॅरिस या ठिकाणी सर्व विजयी राष्ट्रांची परिषद भरली. या परिषदेचे उद्‌द्घाटन १८ जानेवारी १९१९ रोजी फ्रान्सचे अध्यक्ष रेमंड पॉईनकेअर यांच्या हस्ते करण्यात आले. तर परिषदेच्या अध्यक्षपदी फ्रांन्सचे पंतप्रधान जॉर्जी क्लेमेन्शू यांची निवड केली. पॅरिसला शांतता परिषद भरली असली तरी त्या ठिकाणचे वातावरण अतिशय तंग होते. जर्मनी, ऑस्टिया, बल्गेरिया, तुर्कस्तान यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. इंग्लंड, फ्रांन्स ही विजयी राष्ट्र असली तरी त्यांचे नुकसान ही प्रचंड झाले होते. त्या राष्ट्रात जर्मनीविरुद्ध सुडाची भावना होती. युद्धखोर राष्ट्रांचा बदला घेतलाच पाहिजे अशी जनतेची भावना होती.

युरोपातील राजकीय व आर्थिक अस्थिरतेचा परिणाम या परिषदेवर होणे अटळ होते. शांतता परिषदेसाठी पॅरिस शहराची निवड मुळात चुकीची होती. फ्रान्सने आपणावर इ.स. १८७१ मध्ये झालेल्या पॅरिस तहाचा बदला घेण्यासाठी पॅरिस शहर निवडले. पहिल्या महायुद्धात सर्वात जास्त हानी पॅरिस शहराची झाली होती. या विध्वंसाच्या खुणा ताज्या होत्या. शहरातील प्रत्येक नागरिक जर्मनीचे नाव निघताच सुडाने पेटून उठत होता. जर्मनीला नेस्तनाबून करा अशा प्रकारची मागणी करत होता. अशा धगधगत्या परिस्थितीचा पॅरिसच्या शांतता परिषदेवर अत्यंत अनिष्ट परिणाम झाला. पॅरिसला परिषद होणे हेच मुळात चुकीचे होते. युद्धापासुन अलिप्त असणारे प्रत्यक्ष युद्धाची झळ न बसलेल्या स्विर्झलँड मधील एखादे शहर शांतता परिषदेसाठी निवडले असले तर चांगले झाले असते म्हणजे परिषदेसाठी शहराची निवड मुळातच चुकीची होती. त्याचे अनिष्ट परिणाम पुढील काळात दिसून आले.

**परिषदेतील महत्त्वाच्या व्यक्ती :**

१८ जानेवारी १९१९ रोजी परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. या परिषदेला ३२ राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. या शिवाय प्रतिनिधी मंडळाचे अनेक सल्लागार पत्रकार, सहकारी, लेखक हे उपस्थित होते. रशियाला या परिषदेला निमंत्रण दिले नाही. परिषदेच्या कामाची धूरा खालील चार नेत्यांनी समर्थपणे सांभाळली.

**१) वुड्रो विल्सन :**

पॅरिस शांतता परिषदेमधील सर्वात महत्त्वाचे व्यक्तिमत्व म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन होय, अमेरिका सुरूवातीच्या काळात महायुद्धापासून अलिप्त होता. युरोपमधील लोकशाहीच्या रक्षणासाठी त्यांनी भाग घेऊन आपली १४ कलमी योजना जाहीर केली. केवळ अमेरिकेच्या सहभागामुळेच महायुद्धात दोस्त राष्ट्रांना विजय मिळाला होता. त्यामुळे शांतता परिषदेमध्ये वुड्रो विल्सनच्या शब्दाला मान होता. आदर्शवादी, स्वतःच्या न्यायबुद्धीवर पूर्ण विश्वास असलेला, लोकशाहीचा पुरस्कर्ता वुड्रो विल्सन हे परिषदेचे

एक आदर्श होते. महायुद्धात विजयी होऊनही आपणास प्रादेशिक लाभ व्हावा अशी त्यांची इच्छा नव्हती. त्यामुळेच त्यांना निःपक्षपाती मध्यस्थाची भूमिका पार पाडता आली. जर्मनीवर अन्याय होऊ नये अशी त्यांची भावना होती. पॅरिस शांतता परिषद संपल्यानंतर व राष्ट्रसंघ अस्तित्वात आल्यानंतर अमेरिकेने जागतिक राजकारणात अलिप्ततावाद स्वीकारला.

**२) लॉईड जॉर्ज :**

पॅरिस शांतता परिषदेमधील दुसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे इंग्लंडचे पंतप्रधान लॉईड जार्ज होय. तो अतिशय बुद्धीमान व चाणाक्ष होता. तो उदामतवादाचा पुरस्कर्ता असून लोकशाहीवर प्रचंड श्रद्धा असलेला होता. महायुद्ध सुरू असतानाच इंग्लडमध्ये निवडणूका होऊन त्याच्या पक्षास बहुमत मिळाले होते. निवडणूकीमध्ये त्यांने युद्धाचा मुख्य गुन्हेगार म्हणून जर्मन सम्राट कैसरला फासावर देऊ व जर्मनीकडून युद्ध खर्चाचा पैसा न पैसा वसूल करू असे आश्वासन जनतेला दिले होते. त्या आश्वासनानुसार त्यास वागावे लागते होते. परिषद चालू असताना दिलेल्या आश्वासनाची स्मरण करून देणारी हजारो पत्रे त्यांना इंग्लंडमधून येत होती. या दबावामुळे लोकशाहीची तत्वे त्यांना बाजूला सारावी लागली. मेन्सोचा वास्तववाद व वुड्रो विल्सनचा आदर्शवाद याधी सांगड घालून सर्वसंमती घडवुन आणण्याची नाजूक जबाबदारी त्यांना पार पाडावी लागली. त्याच प्रमाणे पराभूत राष्ट्रांच्या अनेक वसाहती इंग्लडला मिळवून देण्यात ते यशस्वी ठरले.

**३) जॉर्जी क्लेमेन्शू :**

पॅरिस शांतता परिषदेतील तिसरी महत्वाची व्यक्ती म्हणजे फ्रांन्सचे पंतप्रधान जॉर्जी क्लेमेन्शू होय. अतिशय धूर्त व तीक्ष्ण बुद्धीचा म्हणून तो ओळखला जात होता. त्यास या परिषदेचा वाघ म्हणून ओळखले जात होते. जर्मनीकडून पुन्हा धोका उत्पन्न होऊ नये, यासाठी जर्मनीचे पुर्ण खच्चीकरण्याचा प्रयत्न होता. जर्मनीकडून नुकसान भरपाई मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आवेशपूर्ण भाषण करून वाघा सारखा चवताळून उठत असे त्यांनी फ्रांन्सला जास्तीत जास्त फायदा मिळवून दिला.

**४) ओरलॅन्डो :**

पॅरिस शांतता परिषदेतील चौथी महत्वाची व्यक्ती म्हणजे इटलीचे पंतप्रधान ओरलॅन्डो होय. जर्मनीचा मित्र देश असून ही इटली पहिल्या महायुद्धापासून अलिप्त होता. इ.स.१९१५ मध्ये युद्ध सुरू असताना इंग्लंडने इटली बरोबर लंडनचा गुप्त करार केला. त्यानुसार इटलीने दोस्त राष्ट्राच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. ओरलॅन्डो अतिशय विद्वान, मुत्सद्दी राजकारणी विधीतज्ञ व चाणाक्ष होता. लंडनच्या गुप्त कराराप्रमाणे दोस्त राष्ट्रांनी इटलीला योग्य प्रदेश दिला पाहिजे असा त्याचा आग्रह होता. आपल्या स्वार्थापलिकडे ओरलॅन्डोने परिषदेच्या कामकाजात लक्ष घातले नाही. तो राष्ट्रसंघाबाबत म्हणतो की, 'फ्युमचा प्रश्न आमच्या बाजूने सोडवावा म्हणजे राष्ट्रसंघावर आमची श्रद्धा आहे हे जाहीर करण्यास बरे होईल.' अशा प्रकारे चार महत्त्वाच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली ही पॅरीस शांतता परिषद पार पडली, या पॅरिस शांतता परिषदेत पराभूत राष्ट्रावर तह लादण्यात आले. त्यापैकी सर्वात महत्वाचा तह म्हणजे जर्मनीवर लादलेला व्हसार्यचा तह होय.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न क्र. ३**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. वूड्रो विल्सन हे ............ या देशाचे अध्यक्ष होते.

अ) अमेरिका ब) इंग्लंड क) रशिया ड) जर्मनी

२. दोस्त राष्ट्रांकडून जर्मनीवर ............ तह लादण्यात आला.

अ) कॅलोन ब) नेकर क) व्हर्साय ड) टरगॉट

३. जॉर्जी क्लेमेन्शू हे ............ या राष्ट्राचे पंतप्रधान होते.

अ) ऑस्ट्रेलिया ब) जर्मनी क) रशिया ड) फ्रांस

४. लॉईड जॉर्ज हे ............ या राष्ट्राचे पंतप्रधान होते..

अ) ऑस्ट्रेलिया ब) जर्मनी क) इंग्लंड ड) फ्रांस

५. पॅरीस शांतता परिषदेला ............ राष्ट्राचे प्रतिनिधी हजर होते.

अ) २६ ब) २८ क) ३० ड) ३२

## १.३ सारांश :

ऑस्ट्रिया-हंगेरी, ओटोमन साम्राज्य, जर्मन साम्राज्य, आणि रशियन साम्राज्य यांराष्ट्रांचे पतन झाल्यामुळे नवीन राष्ट्रांची निर्मिती झाली. उदा., पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, यूगोस्लाविया, फिनलंड, लाटव्हिया, लिथुआनिया, एस्टोनिया. परिणामतः युरोपातील राजकीय सत्ता संतुलन बदलले. जर्मनीचा पराभव आणि अमेरिकेचा उदय जागतिक महासत्ता म्हणून झाला. व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर कठोर निर्बंध घालण्यात आले. त्यांना प्रचंड युद्ध भरपाई भरावी लागली आणि त्यांच्या सैन्यदलावरही मर्यादा घालण्यात आल्या.

भविष्यातील युद्धं टाळण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय शांतता राखण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली, परंतु ती प्रभावी ठरली नाही.या युद्धामुळे अनेक देशांची अर्थव्यवस्था कोसळली. युद्धानंतर आर्थिक मंदी आली, ज्याचा परिणाम अनेक वर्षे झाला. या युद्धाने जर्मनीला प्रचंड युद्धभरपाई भरावी लागली, त्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण आला आणि जर्मनीला महामंदीचा सामना करावा लागला.

अमेरिकेने युद्धादरम्यान मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रांची निर्मिती केली आणि युद्धानंतरच्या पुनर्निर्माण प्रक्रियेत प्रमुख भूमिका बजावली. युद्धादरम्यान नवीन शस्त्रास्त्रं आणि तंत्रज्ञान विकसित झाले. टँक, हवाई दल, रासायनिक शस्त्रांचा वापर यामुळे युद्धनीतीत क्रांतिकारी बदल झाले. पारंपारिक युद्धनीती बदलून खंदक युद्ध, हवाई युद्ध, आणि तंत्रज्ञानाच्या आधारे युद्ध लढण्याची पद्धत विकसित झाली. पहिल्या महायुद्धात सुमारे १० दशलक्ष सैनिक आणि ७ दशलक्ष नागरिक मारले गेले. आणखी लाखो लोक जखमी झाले किंवा

अपंग झाले. युद्धामुळे सैनिक आणि नागरिकांवर मानसिक आरोग्याचे गंभीर परिणाम झाले. पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर (PTSD) आणि अन्य मानसिक समस्या सामान्य झाल्या.

युद्धानंतर अनेक देशांमध्ये सामाजिक परिवर्तन झाले. विशेषतः रशियामध्ये बोल्शेविक क्रांती झाली आणि सोवियत संघाची स्थापना झाली. पहिल्या महायुद्धाने जगभरात मोठे बदल घडवले. या युद्धामुळेच दुसऱ्या महायुद्धाच्या बीजांची पेरणी झाली, कारण व्हर्साय तहामुळे निर्माण झालेल्या असंतोषामुळे हिटलरच्या नाझी पार्टीचा उदय झाला. युद्धानंतरच्या काळात जागतिक राजकारण, अर्थव्यवस्था, समाज आणि संस्कृती या सर्वच क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडले.

युद्धादरम्यान महिलांनी उद्योगधंदे आणि अन्य कामे हाताळली, ज्यामुळे महिला सशक्तिकरणाचे आंदोलन पुढे आले. कामगार संघटनांचे महत्वही वाढले. युद्धानंतर साहित्य, कला, आणि संगीत क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल झाले. ''लॉस्ट जनरेशन'' या संकल्पनेचा उदय झाला.

## ४.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ :

१. राष्ट्रवाद : राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यांवर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय विचारप्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद म्हणजेच राष्ट्रवाद होय.

२. साम्राज्यवाद : जगातील भूप्रदेशावर आपले राजकीय व आर्थिक वर्चस्व निर्माण करण्यासाठी चाललेली संघर्षाची स्पर्धा म्हणजे साम्राज्यवाद होय.

३. आरमारी सामर्थ्य : इंग्लंड या देशाचे समुद्रावरील सैनिकी वर्चस्वाला आरमारी सामर्थ्य म्हटले जाते.

४. परिषद : जगातील राष्ट्रांनी आपले प्रश्न सोडवण्यासाठी एका निश्चित ठिकाणी बोलावलेली सभा

५. शांतता करार : विचार विनिमयाच्या माध्यमातून केलेली वाटचाल

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

* स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १

    १) ड) युरोप २) क) जर्मनी ३) ब) बिस्मार्क ४) अ) नित्से

    ५) ड) २८ जून १९१४

* स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २

    १) अ) अमेरिका २) ब) अमेरिका ३) क) रशिया ४) अ) कैसर विल्यम दुसरा

    ५) ब) १९१९

* स्वयं-अध्यायनासाठी प्रश्न क्र.३

    १) अ) अमेरिका २) क) व्हर्साय ३) ड) फ्रांस ४) क) इंग्लंड ५) ड) ३२

## ४.६ सरावासाठी प्रश्न :

अ) दीर्घोत्तरी प्रश्न :

१. पहिल्या महायुद्धाच्या  कारणांची सविस्तर चर्चा करा.

२. वूड्रो विल्सन यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घ्या.

३. पहिल्या महायुद्धकालीन महत्वपूर्ण घटनांचा आढावा घ्या.

४. पहिल्या महायुद्धाचे युरोप आणि जगावर  कोणते परिणाम झाले ते विशद करा.

५. विल्सनची १४ कलमे विस्ताराने लिहा.

ब) टिपा लिहा.

१. व्हर्सायचा तह

२. रशियन क्रांती

३. राष्ट्रवाद

४. वूड्रो विल्सन

५. राष्ट्रसंघ

## १.७ संदर्भ ग्रंथ यादी


१. पहिले महायुद्ध, गजानन भास्कर मेहेंदळे

२. वैद्य सुमन, 'आधुनिक जग', मंगेश प्रकाशन, नागपुर १९७५.

३. कुलकर्णी अ.रा. / फडके श्री. रा., 'आधुनिक युरोप', देशमुख आणि कंपनी पुणे. १९७६.

४. सावंत पंढरीनाथ, पहिले महायुद्ध : का झाले? कसे झाले?

५. Ketelbey, C.D.M. A Short History of Modern Eueope, Surjeet Publication, Delhi 1978.

६. Gooh G. P. History of Modern Europe. 1878-1919.

७. Mahajan V.D. History of Modern Europe Since 1789.

८. Hazew C.D. Modern Europe up to 1945.

९. Hayes Cariton J.H Contemporary EuropeSine 1870, Macmillion Co'Newyork 1958.

१०. Rao B.V. History of Modern Europe Since 1789. S. Chand Co. New Delhi. 1963.

❑❑❑

## घटक २
# रशियन राज्यक्रांती (१९१७)
## (Russian Revolution)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ कारणे

२.२.२ महत्त्वपूर्ण घटना

२.२.३ परिणाम

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## २.० उद्दिष्टे

या घटकातून आपल्याला खालील बाबी लक्षात येतील

१. रशियन राज्यक्रांती पूर्व परिस्थितीची माहिती मिळेल

२. रशियन राज्यक्रांतीच्या कारणांचा आढावा घेता येईल

३. रशियन राज्यक्रांती दरम्यान घडलेल्या महत्त्वपूर्ण घटनांचा मागोवा घेता येईल

४. रशियन राज्यक्रांतीमुळे झालेल्या विविध परिणामांचा अभ्यास करता येईल

## २.१ प्रास्ताविक

रशियन राज्यक्रांती म्हणजे १९ व्या शतकातील युरोपमध्ये घडलेल्या विविध क्रांत्यांचा वारसा होय. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या उत्तरार्धात रशियन क्रांती घडून आली. या क्रांतीचे स्वरूप, व्याप्ती व जगामध्ये

भयंकर उलथापालत घडवण्याची तिची क्षमता पाहिली म्हणजे यापूर्वीच्या क्रांत्यांपेक्षा तिचे असलेले वेगळेपण जाणवते. या क्रांतीने रशियाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणले, इतकेच नव्हे तर पाश्चात्य जीवनमूल्य, अर्थरचना व समाज रचना या सर्वांनाच तिने जबरदस्त आव्हान दिले. औद्योगिक क्रांती मधून उदयास आलेला कामगार वर्ग, उद्योगधंद्यांची मूठभर लोकांकडे असलेली मक्तेदारी, त्यामुळे कामगारांची होत असलेली पिळवणूक, याबाबत या क्रांतीने नवा दृष्टिकोन निर्माण केला. राजकीय हक्क व स्वातंत्र्याद्वारे जनतेची दुःखे नष्ट होणार नाहीत, तर त्यासाठी खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित झाली पाहिजे, असा नवा दृष्टिकोन या क्रांतीने प्रस्थापित केला. नवविचारांना, कल्पनांना चालना दिली. रशियन राज्यक्रांती म्हणजे जगाच्या इतिहासाला नवे वळण लावणारी एक अत्यंत प्रभावी घटना आहे. तिची याबाबत इतर कोणत्याही क्रांतीशी तुलना करता येणार नाही. आधुनिक जगाच्या इतिहासात १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. बोलशेविक क्रांतीनंतर बलाढ्य रशियाचा उदय झाला. रशियन क्रांतीने नवी जीवनमूल्य, नवी विचारधारा, नवी संस्कृती जन्मास घातली. क्रांतिकारक विचार जगाला देणारी रशियन बोलशेवीक क्रांती मोठी अद्‌भुत समजली जाते

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ क्रांतीची कारणे

रशियातील झारशाही उलटून टाकण्याच्या घटने पाठीमागे किमान अर्धशतकाचा रशियाचा आर्थिक, सामाजिक व राजकीय इतिहास आहे. क्रांतीचा विस्फोट होण्यासारखी परिस्थिती या काळात निर्माण होत गेली. पहिल्या महायुद्धात भाग घेतल्याने रशियाची आर्थिक व्यवस्था पार डबघाईस आली. बेसुमार करवाढ झाल्याने जनतेची परिस्थिती शौचनीय झाली. निकोलस दुसरा याची दडपशाही पराकोटीस गेली होती. शेवटी याची परिणीती १९१७ च्या सुप्रसिद्ध क्रांतीत घडून आली. १९१७ च्या बोलशेविक क्रांतीची कारणे पुढील प्रमाणे.

**१. रशियातील विषम समाज रचना –** रशियात सरंजामशाही समाजव्यवस्था कायम होती. समाजात प्रमुख दोन वर्ग होते– एक विशेष अधिकार असलेल्यांचा तर दुसरा सामान्य लोकांचा. पहिल्या वर्गात झार व त्याचे नातेवाईक, सरंजामदार व धर्मगुरू होते. उत्पादनाची साधने त्यांच्या ताब्यात होती. सामान्यांकडे कसलेही अधिकार नव्हते. या वर्गात गुलाम व भूदास होते. त्यांना जनावरापेक्षाही हिनतेने वागविले जात. राज्यकारभारातील सर्व महत्त्वाच्या जागा, अधिकार अमीर उमरावासाठी राखून ठेवले जात. दुसऱ्या अलेक्झांडरने काही सुधारणा केल्या तरी, सामान्य लोकांच्या दुःखात फारसा फरक पडला नाही. निरक्षरता, धर्म भोळेपणा, अंधश्रद्धा, नव्या तंत्रांचा अभाव यामुळे सामान्य माणसांचे जीवन दुःखदायकच होते. १९१४ मध्ये रशियाचे दर एकरी कृषी उत्पादन युरोपियन राष्ट्रातच नव्हे तर चीन व हिंदुस्थान वगळता सर्वात कमी होते. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स यांचा विचार करता ते एक चतुर्थांश होते. यातूनच वारंवार पडणारे दुष्काळ, झारच्या साम्राज्यवादी वृत्तीमूळे उद्भवणारी युद्धे, त्यामुळे रशियाचा दरिद्री देशात समावेश होत गेला. ९०% लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होते. सहाजिकच हे लोक तत्कालीन समाज व्यवस्था व राज्यव्यवस्था

उलटून टाकण्याच्या प्रयत्नात होते. शेतकऱ्यांप्रमाणेच मजुरांचे जीवन अत्यंत कष्टप्रद व निराशजनक होते. कारखाने सरकारी मालकीचे व अमीर उमरावांच्या मालकीचे असत. सर्व फायदा कारखानदारांना मिळत. प्रत्यक्ष कष्ट करणारा कामगार अर्धपोटी जीवन जगत होता. कारखानदारास झारचा पाठिंबा होता. सर्वत्र दडपशाही होती. साहजिकच कामगारात भांडवलदार व झार शाही विरोधी असंतोष होता, त्यामुळे ते क्रांतीसाठी सज्ज होते.

**२. दुबळी व अकार्यक्षम झारशाही –** रशियाच्या तत्कालीन राजवटीचे प्रतिगामी स्वरूपही क्रांतीस कारणीभूत होते. रशियात सुमारे ३०० वर्षापासून रोमनाव्ह घराण्याची अनियंत्रित राजसत्ता होती. पीटर दि ग्रेट सारखे सुधारणा प्रिय सम्राट वगळता बहुतेक सर्व सम्राट जुलमी अत्याचारी व अनियंत्रित सत्ता उपभोगणारे होते. राजे स्वतःला ईश्वराचे प्रतिनिधी समजत .राजाच्या दैवी अधिकाराच्या सिद्धांतावर त्यांचा विश्वास होता, त्यामुळे रशियात राजाचा शब्द म्हणजे कायदा अशी स्थिती होती. हे सर्व राजे चैनी, विलासी, भ्रष्टाचारी होते. त्यांना प्रजेच्या कल्याणाचे कोणतेच सोयर सुतक नव्हते. त्यांनी रशियात जुलमानेच राज्य केले. त्यांच्या कारकिर्दीत व्यक्ती स्वातंत्र्याचा पूर्णपणे लोप होऊन विरोधकांना स्थानच उरले नाही. झार निकोलस दुसरा याच्या कारकीर्दीत तर जुलमाने परमावधी गाठली. राजा राणी व रासपुतीन हा धर्मगुरू, या दृष्ट त्रयींचा उदय होऊन त्यांनी स्वतःच्या चैनीकरिता जुलूम केले, त्यामुळे रशियन प्रजा भरडून निघाली व त्याची परिणीती क्रांती झाली.

**३. राज्यकारभारातील भ्रष्टाचार –** रशियाचे सत्ताधीश भ्रष्टाचारी, चैनी, विलासी असल्याने झारशाहीतील सर्व राज्यकारभार भ्रष्टाचारी बनला होता. साध्या साध्या कामासाठी सुद्धा अधिकारी लाच मागत असत. राजाच्या व अधिकार्यांच्या लहरीनुसार राज्यकारभार चालत असे. देशात समान कायदा व समान शिक्षा यांचा अभाव होता. न्यायालयांच्या अधिकार क्षेत्रात गोंधळ होता. सामान्य माणसाला न्याय मिळण्याची शक्यता राहिली नव्हती. मुलकी कारभारातील भ्रष्टाचाराने सैन्यात सुद्धा प्रवेश केला होता. त्यामुळे सैन्यात बेशिस्त, लाच खाऊपणा यांचे प्राबल्य होते. अशा भ्रष्टाचारी जीवनाचा सामान्य माणसांना वीट आला होता, त्यातूनच क्रांती घडून आली.

**४. झार राजांची युद्धखोर धोरणे –** झार राजा अलेक्झांडर पहिला यांनी नेपोलियन विरोधी आघाडीत सहभाग घेऊन महत्त्वाची भूमिका बजावली. झार निकोलस पहिला यानेही क्रिमियन युद्धात सहभाग घेतला मात्र त्याला अपयश आले. झार अलेक्झांडर दुसरा याच्या कालखंडात रशिया तुर्कस्तान युद्ध झाले, या युद्धाचा रशियाला फायदा झाला. झार निकोलस दुसरा याच्या कालखंडात रशिया जपान युद्धात रशियाचा पराभव झाला. सर्व युद्धामध्ये रशियाला मोठी आर्थिक झळ सहन करावी लागली. झार राजांचे युद्धखोर धोरण रशियाच्या विपनावस्थेस कारणीभूत ठरले.

**५. रशिया जपान युद्धातील रशियाचा पराभव–** १९०४–०५ नैतिकदृष्टीने अधिपतीत झालेल्या राष्ट्राला लढाईत विजय मिळणे कठीण होते. १९०४ मध्ये रशिया जपान युद्धातही चिमुकल्या जपान सारख्या आशियाई राष्ट्राकडून महाबलाढ्य रशियाचा पराभव झाला. भ्रष्टाचाराने पोखरून गेलेल्या बेशिस्त रशियाचा शिस्तबद्ध व

निष्ठेने लढणाऱ्या जपान पुढे टिकाऊ लागला नाही, त्यामुळे रशियात या पराभवामुळे झार विरुद्ध मोठा असंतोष निर्माण झाला. राजाच्या अप्रामाणिकपणामुळे, निष्ठेच्या अभावामुळे व नालायक नेतृत्वामुळे आपला पराभव झाला, याबाबत रशियन लोकांची खात्री पटवून त्यांनी झारला पदच्युत करण्याचा निश्चय केला व क्रांती झाली.

**६. पहिल्या महायुद्धातील पराभव –** पहिला महायुद्धात रशियाने दोस्त राष्ट्राकडून सहभाग घेतला होता. झारच्या जुलुमामुळे रशिया आतून पोखरून निघाला होता. युद्ध खर्चाचा भार सहन करणे सामान्यांना असह्य होते. युद्धामुळे जीवनाशक वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती. भ्रष्टाचारामुळे युद्ध सामग्री पोहोचविणे कठीण होऊन बसले. त्यातच जुलमी राजाने आपल्यावर हे महायुद्ध लादले, अशा प्रकारची रशियन सैनिकांची कल्पना झाल्याने ते जिद्दीने लढू शकले नाहीत. त्यातच युद्धावर जाण्याची सक्ती झारने शेतकरी व कामगारांवर केली, त्यामुळे तोही वर्ग नाराज होता. त्यांना लढाईचे शास्त्रोक्त प्रशिक्षण न दिल्यामुळे त्यांचा रणक्षेत्रावर विनाकारण बळी जाऊ लागला, यामुळेच रशियात असंतोष वाढून क्रांती झाली.

**७. रशियातील औद्योगिक क्रांती –** औद्योगिक क्रांतीमुळे संपूर्ण युरोपात नवीन शहरे उदयास आली. समाजाचे स्वरूप बदलून गेले. युरोपातील अनेक राष्ट्रावर या यंत्र युगाचे बरे वाईट परिणाम झाले. जागृत असा मध्यमवर्ग वकील, डॉक्टर्स व्यापारी, शिक्षक इत्यादी लोकांचा अंतर्भाव विविध देशात होता. रशिया देखील या यंत्र युगाच्या चक्रात सापडला होता. कारखाने, गिरण्या रशियात निर्माण झाली. कामगारांच्या एकत्र येण्यामुळे कामगार संघटित होण्यास वाव मिळाला. त्यांच्यात आपल्या हक्कांची जाणीव झाली. समाजातील आर्थिक विषमता त्यांच्या लक्षात आली. वैचारिक जागृतीमुळे सामाजिक नीतिमूल्य बदलली. या बदलाचा समाज रचनेचा रशियन जीवनावर अप्रत्यक्षपणे परिणाम होऊ लागला व क्रांती झाली.

**८. ढासळती आर्थिक परिस्थिती :** रशियन राज्यक्रांतीचे मूळ रशियाच्या आर्थिक दुरावस्थेत होते. विस्ताराने मोठा असलेला रशिया आर्थिक दुरावस्थेत गेला होता. गरीब शेतकरी व मजूर यांना समाजात कोणतेही अधिकार नव्हते. प्रतिष्ठा नव्हती. दारिद्र्य, भूक रोगराई यांनी हा समाजग्रस्त होता. युरोप आधुनिकतेकडे जात असताना रशिया मात्र मध्ययुगीन सरंजामशाहीच्या युगातच होता. झार निकोलसच्या युद्धखोर धोरणामुळे युद्धाचा खर्चाचा बोजा जनतेवर लादला जात होता. उपजीविकेचे दुसरे कोणतेच साधन नसल्याने या वर्गाची अवस्था बिकट होती. रशियावर क्रांती पूर्व काळात विदेशी राष्ट्रीय कर्जाची रक्कम ३०० कोटी डॉलर्स इतकी झाली होती. अशा सर्व परिस्थितीमुळे रशियाची आर्थिक दुरावस्था झाली होती. मंद गतीने होणारे औद्योगिक कमी उत्पादन आणि जास्त खर्च यामुळे जनता त्रस्त झाली होती व क्रांतीच्या दिशेने रशियाची वाटचाल होऊ लागली.

**९. समाजवादी विचारसरणीचा प्रभाव –** १९व्या शतकात राष्ट्रवादी व उदारमतवादी विचारांचा उद्रेक युरोपीय राष्ट्रात झाला होता. समाजवादी विचारांचे विविध प्रवाह जनमानसात वाहू लागले होते. कार्ल मार्क्स प्रणित समाजवाद ही अखिल जगास एक नवी देणगी होती. 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' व 'दास कॅपिटल' या काल मार्क्सच्या ग्रंथाची कामगार जगात चर्चा होती. उत्पादन साधनांची मालकी, कामगारांची हुकूमशाही या

तत्व प्रणालीने रशियन जनता भारावून गेली होती. शोषण रहित, वर्ग विहीन समाजाची कल्पना कार्ल मार्क्सने समोर ठेवल्याने शतकानूशतके पोळल्या जाणाऱ्या मानव समाजासमोर आशादायक भविष्यकाळ निर्माण झाला होता. समाजात अन्याय, पिळवणूक करणारा धनिक वर्ग व जुलमाचे अत्यंतिक टोक गाठणारी झार शाही यामुळे क्रांती झाली.

**१०. बौद्धिक जागृती–** कनिष्ठ वर्गाची जी ससेहोलपट चाललेली होती, त्याला आपल्या कलात्मक लेखणीने वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य रशियातील नामावंत लेखकांनी केले. लिओ टॉलस्टॉय ने १९ व्या शतकातील रशियन समाज व्यवस्थेचे यथार्थ दर्शन आपल्या लिखाणातून घडविले. ॲना कॅरेनिना आणि वॉर अँड पीस या कादंबऱ्यातून त्याने औद्योगिक क्रांतीचे दुष्परिणाम, नैतिक मूल्यांचे अधपतन, कामगारांचे जीवन, सरंजामशाही इत्यादीचे दर्शन घडविले आणि समाज परिवर्तनासाठी प्रस्थापित शासन व्यवस्था उलथून टाकण्यासाठी लोकांना आवाहन केले तुर्जेने रशियातील भूदसांच्या व सामान्य लोकांच्या दुःखाला वाचा फोडली. रदीन, फादर्स अँड सन्स, स्मोक, वर्जिन सॉईल इत्यादी त्याच्या गाजलेल्या कलाकृती होत. त्यातून सामान्यांचे दुःख झारशाहीचे हिडीस स्वरूप जगासमोर ठेवले. डोटोव्हासकीने आपल्या कादंबऱ्यातून मानवी मनाचे संमिश्र दर्शन घडविले. तो प्रभावशाली विचारवंत होता. क्रांतिकारी आंदोलन केल्यामुळे त्यास अनेक वेळा तुरुंगवास भोगाव लागला होता. त्याने इडियट, गॅम्बलर, द अंडरग्राउंड इत्यादी ग्रंथांचे लेखन केले होते. क्रांतीसाठी जनमत तयार करण्यामध्ये त्याचे आचार विचार अत्यंत महत्वपूर्ण ठरले.

मॅक्झिम गॉर्कीने कामगारांच्या दुःखांना वाचा फोडली. त्यांनी 'आई' ही कादंबरी लिहिली. रशियातील एक तरुण पिढी या लेखकांच्या लिखाणावर पोसली केली होती. त्यांनी पाश्चात्य कल्पना, रशियन लोकांना ज्ञात करून दिल्या. पाश्चात्त्य देशात अनियंत्रित राजेशाहीला लगाम घालण्यासाठी तेथील लोकांनी केलेले आत्म बलिदान लोकांच्या समोर ठेवले. रशियातील सोशल डेमोक्रॅटिक चळवळीची उभारणी केली. लेनिन, ट्रोटस्कि या तरुणांनी या चळवळीचे नेतृत्व केले. अशा रीतीने बौद्धिक जागृती झाल्यामुळे सुशिक्षित मध्यम वर्गातून बुद्धीवादी आणि मूलभूत सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी वाहून घेतलेले प्रभावी नेतृत्व तयार झाले.

**११. प्रतिनिधी लोकशाहीचा असफल प्रयोग –** रशियात १९०५ साली झालेल्या दंगली राजसत्तेने मोडून काढल्या, तरी जनतेच्या असंतोषाची जाणीव राजसत्तेला झाली होती. हा संतोष संपवण्यासाठी झार दुसरा निकोलस याने घटनात्मक शासन आणि प्रातिनिधिक लोकशाही यांचा प्रयोग करण्याचे ठरविले. वरिष्ठ व कनिष्ठ सभा स्थापण्यासाठी काही आदेश काढले. वरिष्ठ सभेत सरकारी अधिकाऱ्यांचा भरणा करण्यात आला व कनिष्ठ सभेसाठी निवडणुका घेण्यासंबंधी फर्मान काढले. जनतेने निवडलेल्या ड्युमा चार वेळा राजाने बोलविल्या. या चारही ड्यूमा मध्ये लोकप्रतिनिधींच्या वर राजसत्तेने दडपण आणले आणि त्यांचे अधिकार मर्यादित करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधींच्या अपेक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत व क्रांतीच्या दिशेने वाटचाल झाली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १**

अ) रिकाम्या जागा भरा

१. १९०५ मध्ये ............ हा झार होता.

अ) रासपुतिन  ब) निकोलस  क) अलेक्झांडर  ड) पुश्किन

२. दास कॅपिटल हा ग्रंथ ............ ने लिहिला.

अ) कार्ल मार्क्स  ब) रासपुतिन  क) स्टॅलिन  ड) निकोलस

३. १९०५ मध्ये ............ ने बलाढ्य रशियाचा पराभव केला.

अ) जपान  ब) पोलंड  क) कोरिया  ड) अमेरिका

४. कामगारांच्या केंद्रीय समितीला ............ असे म्हटले जात असे.

अ) मेंनशेविक  ब) सोव्हिएत  क) प्रावदा  ड) ड्युमा

५. वॉर अँड पीस हा ग्रंथ ............ ने लिहिला.

अ) एंजल्स  ब) लेनिन  क) टॉलस्टॉय  ड) मॅक्झिम गॉर्की

## २.२.२ महत्त्वपूर्ण घटना

रशियात राजसत्ते विरोधी वातावरण सर्व बाजूंनी तापले होते राजकीय दृष्ट्या पहिल्या महायुद्धातील अपयशामुळे अंतर्गत गोंधळात जास्त भर पडली होती, अशा स्थितीत क्रांतीसाठी वातावरण तयार झाले.

**पेट्रोग्राड ग्राउंड ची क्रांती १९१७** -१९१७ मध्ये झालेली क्रांतीची सुरुवात ते बोलशेविक सरकारची स्थापना यादरम्यान अनेक महत्त्वाच्या घडामोडी रशियात घडून आल्या. रशियातील ढासळती अर्थव्यवस्था, तेथील अराजकतेची परिस्थिती याला झारशाही जबाबदार असल्याची रशियन जनतेची खात्री होती. सर्वत्र असंतोष दिसूनही झार दुर्लक्ष करीत होता. पेट्रोग्राड मधील एक लाख कामगार ०८ मार्च १९१७ रोजी संपावर गेले. झार विरोधात त्यांनी आंदोलने केली. लष्कराच्या मदतीने झारने आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, मात्र सैनिकांनी गोळीबार करण्यास नकार दिला व तेही आंदोलन कर्त्यांना येऊन मिळाले. सरकारी कचेऱ्यांवर हल्ले झाले. तुरुंग फोडून अनेक राजबंद्यांना मुक्त केले. शेतकऱ्यांनी जमीनदारांच्या मालमत्तेवर हल्ले केले. झारने ड्यूमा बरखास्त करण्याचा निर्णय घेतला, मात्र ड्युमा सदस्यांनी नकार दिला. परिस्थिती हाताबाहेर गेली आहे, हे पाहून १५ मार्च १९१७ रोजी झार निकोलस दुसरा याने राजत्याग केला. त्याने आपला भाऊ ड्युक मायकेल याचे कडे सत्ता दिली, मात्र जनतेने त्यास नाकारले. झारला व त्याच्या कुटुंबीयांना अटक करून पूर्व रशियातील उरलं पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या तुरुंगात ठेवले. अशा प्रकारे पहिल्या टप्प्यात क्रांतिकारकांना यश मिळाले.

**हंगामी सरकार** - ड्यूमाने हंगामी सरकार स्थापले. त्याचे पंतप्रधानपद प्रिन्स जॉर्ज एलवाव याच्याकडे दिले. या मंत्रिमंडळात उच्च वर्गीय सरदार, भांडवलदार यांच्या प्रतिनिधींचा मंत्री म्हणून सहभाग होता. या सरकारने जनतेला भाषण मुद्रण स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य इत्यादी घटनात्मक स्वातंत्र्य बहाल केली. देशाबाहेर

पाठविलेल्या क्रांतीकारकांना मायदेशी बोलविले. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स या राष्ट्रांनी या सरकारला मान्यता दिली. याच काळात लेनिन, ट्रोटस्की, स्टॅलिन  हे हद्दपार झालेले नेते रशियात परत आले.

एलवॉवचे सरकार फार काळ टिकले नाही. रशियन जनतेला महायुद्धातून माघार घ्यायची होती. तरी या सरकारने युद्धातील सहभाग तसाच चालू ठेवला. क्रांतिकारी नेत्यांनी सैनिक, शेतकरी, कामगार यांच्या संघटना म्हणजेच सोव्हिएत स्थापन केल्या. या संघटना सरकारच्या मवाळ धोरणास जोरदार विरोध करू लागल्या. शेवटी हंगामी सरकारने राजीनामा दिला.

**केरेन्स्कीचे सरकार–** केरेन्स्की हा महत्त्वाकांक्षी, कर्तबगार राष्ट्रभक्त होता. हंगामी सरकारचा पंतप्रधान प्रिन्स जॉर्ज एलवाव सत्ता सांभाळण्यात अपयशी ठरल्याने त्याच्याच सरकारमध्ये वित्तमंत्री म्हणून काम करणारा मेनशेविक गटाचा नेता केरेन्स्की कडे सरकारचे प्रमुख पद देण्यात आले. त्याने तडजोडीचे धोरण ठेवले. भांडवलदार, कामगार, जमीनदार, शेतकरी यांच्यातील मतभेद कमी करण्याचे प्रयत्न केले. शेतकरी कामगारांना केरेन्स्की हा क्रांतीविरोधक वाटू लागला. देशासाठी नवी राज्यघटना करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. इंग्लंड फ्रान्सच्या आग्रहामुळे त्याने युद्ध सुरू ठेवले. रशियाच्या ताब्यातील रिंगा शहर जर्मनीने जिंकले. रशियन जनतेला युद्ध नको होते. त्यामुळे केरेन्स्की सरकार विरोधात असंतोष वाढला. बोलशेविकांचा वाढता विरोध पाहून केरेन्स्की आपल्या कॉर्निलिव्ह या सरसेनापतीस बोलशेविकांचा बंदोबस्त करण्याचा आदेश दिला. त्याने लष्कराच्या मदतीने सत्ता स्वतः घेण्याचा प्रयत्न केला. सत्ता लष्कराच्या ताब्यात जाणे बोलशेविक गटास योग्य वाटत नव्हते, त्यांनी पाठिंबा देणाऱ्या कामगार व सैनिकांच्या मदतीने कॉर्निलॉव याचा मुकाबला केला. एकूणच अराजकतेची परिस्थिती रशियात निर्माण झाली. केरेन्स्की सरकारला परिस्थिती योग्यपणे हाताळता आली नाही.

**बोलशेविक राज्यक्रांती (नोव्हेंबर १९१७) –** हंगामी सरकार रशियन जनतेच्या अपेक्षा पूर्ण करू शकले नाही. जनतेला अंतर्गत शांतता हवी होती. लेनिन हा द रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीचा सदस्य होता. लेनिनला कामगारांना क्रांतीसाठी प्रेरित करायचे होते. सर्व निर्णय बहुमताने घ्यावेत असे त्याचे मत होते. पक्ष नेतृत्व एककेंद्रीय असू नये त्याचप्रमाणे निर्णय सर्वांवर बंधनकारक असून नये अशी ट्रोटस्की ची मागणी होती. त्यांच्यातील मतभेद वाढले. बहुमत असलेला लेनिनच्या समर्थक गट बोलशेविक आणि अल्पमतात असलेला गट मेनशेविक या नावाने ओळखला जाऊ लागला. लेनिनला त्याच्या क्रांतीकार्यामुळे हद्दपार व्हावे लागले, मात्र रशियातील राज्यक्रांतीची बातमी कळल्यावर तो रशियात परत आला. त्याने बोलशेविक पक्षाची बांधणी केली. ट्रोटस्की त्याला येऊन मिळाला. शेतकरी कामगारांच्या मंडळावर नियंत्रण आणण्याचे त्याने प्रयत्न केले. शांतता, जमिनीचे फेरवाटप आणि प्रत्येकाला भाकरी ही त्याची घोषणा लोकप्रिय झाली. कार्ल मार्क्सच्या कामगारांचे राज्य या संकल्पनेस प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याने प्रयत्न सुरू केले. त्यासाठी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब करणे त्याला आवश्यक वाटत होते. या काळात त्याला सामान्य जनतेचा मिळत असलेला पाठिंबा वाढत गेला. केरेन्स्की सरकारला परिस्थितीवर नियंत्रण ठेवता आले नाही, याचा फायदा घेत बोलशेविकांनी ७ नोव्हेंबर १९१७ या दिवशी सरकारी कचेऱ्या, पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे इत्यादी महत्त्वाची केंद्रे स्वतःच्या ताब्यात घेतली. कॅरेन्स्की ला सत्ता त्याग करण्यास भाग पाडले. सर्व सत्ता

बोलशेविक पक्षाकडे आली. ८ नोव्हेंबरला लेनिनने अध्यक्षपदाची सूत्रे आपल्या हातात घेतली. परराष्ट्रमंत्री म्हणून ट्रोटस्की, शिक्षण मंत्री म्हणून लुनाचरस्कि, तर गृहमंत्री म्हणून रिकोव तर अल्पसंख्यांक गटांचे मंत्री म्हणून स्टालिन यांना कारभार देण्यात आला. अशा रीतीने रक्तपात न होता बोल्शेव्हीकांकडे सत्ता आली.

**बोलशेविक सरकारचे कार्य –** बोलशीविकांनी आपले लक्ष राष्ट्रीयकरण व शांतता या दोन मुद्द्यांवर केंद्रित केले. लेनिनच्या अध्यक्षतेखाली सोविएत कार्यकारी मंडळ स्थापन केले. मूलभूत बदल घडवून आणणारे कायदे मंजूर केले. रशियासाठी नवी राज्यघटना तयार केली गेली. २३ जानेवारी १९१८ रोजी राष्ट्राचे नाव रशियन सोशालिस्ट फेडरेटेड सोविएत रिपब्लिक असे केले गेले. नंतरच्या काळात हे नाव युनियन ऑफ सोविएत सोशालिस्ट रिपब्लिक (यु एस एस आर) असे झाले. बोलशेविक सरकारने देशातील उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करून सर्व कारखाने कामगार सोविएतच्या ताब्यात दिले. जमिनीचे वाटप भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये करण्यात आले. धर्म आणि राजकारण याची फारकत करताना चर्चची सर्व मालमत्ता जप्त केली. शेतकऱ्यांनी सर्व अतिरिक्त उत्पादन सरकार जमा करावे अशी सक्ती केली. अंतर्गत विरोधकांचा बंदोबस्त करण्यासाठी चेका या विशेष समितीची स्थापना करण्यात आली. अनेक विरोधकांना चेकाच्या माध्यमातून हद्दपार करण्यात आले. क्रांती स्थिर करण्यासाठी लेनिनला हे आवश्यक वाटत होते. रशियातील भांडवलदार जमीनदार आणि काही लष्करी अधिकाऱ्यांनी बोलशेविक शासन उलथून टाकण्यासाठी प्रयत्न केले. काही युरोपीय राष्ट्रांनीही या लोकांना मदत केली, कारण त्यांना साम्यवादी तत्त्वज्ञान आणि त्यावर आधारित रशियाचे सरकार नको होते. मात्र हा सर्व विरोध लेनिन व त्याच्या सहकाऱ्यांनी मोडून काढला आणि क्रांती यशस्वी केली.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानावर आधारित संपूर्ण कार्यक्रम लेनिनने रशियात अमलात आणण्याचा प्रयत्न केला. मार्क्स प्रणित साम्यवादाचा जगातील हा पहिलाच प्रयोग असल्याने संपूर्ण जगाचे या प्रयोगाकडे लक्ष लागले होते. लेनिनच्या लाल सैन्याने रेल्वे, रहदारीचे पूल, तारायंत्रे, राजधानीतील बँका यांच्यावर ताबा मिळविला व शाही राजवाड्यात आश्रय घेतलेल्या केरेन्सकीच्या मंत्रिमंडळातील सदस्यांना अटक करण्यात आले. लेनिनने समाजवादी विषयाचा घोष केला. क्रेमलीन राजवाड्यात जाऊन बोलशेविक सत्ता मॉस्को वर स्थापन केली .अशा प्रकारे बोलशेविकांना सत्ता हस्तगत करण्यात यश मिळाले.

**स्वयंअध्यनासाठी प्रश्न २**

अ) रिकाम्या जागा भरा

१. पेट्रोग्राडची क्रांती ............ रोजी झाली.

अ) १ मे १९१७ ब) ७ नोव्हेंबर १९१७

क) ८ मार्च १९१७ ड) १० नोव्हेंबर १९१७

२. बोलशेविक क्रांती ............ च्या नेतृत्वाखाली झाली.

अ) लेनिन ब) केरेन्स्की क) डोटोव्हस्कि ड) टेर्जेनिव्ह

३. पेट्रोग्राड क्रांतीनंतर ............ या राजाने रशियामध्ये राजत्याग केला.

अ) झार निकोलस दुसरा ब) अलेक्झांडर

क) मॅक्झिम गॉर्की ड) स्टॅलिन

४. बोलशेविक क्रांतीनंतर रशियामध्ये ............ शिक्षण सक्तीचे करण्यात आले.

अ) माध्यमिक ब) प्राथमिक क) उच्च माध्यमिक ड) उच्च

५. मेनशेविक सरकार ............ च्या नेतृत्वाखाली सत्तेवर होते.

अ) लेनिन ब) स्टॅलिन क) केरेन्स्की ड) ट्रॉटस्कि

## २.२.३ क्रांतीचे परिणाम

रशियन राज्यक्रांतीचा रशियाच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्या इतिहासावर दूरगामी व क्रांतिकारी परिणाम घडून आला. बोलशेविकांनी सत्ता मिळविल्यानंतर भावी परिणामांची क्षिती न बाळगता आपले लक्ष राष्ट्रीयकरण व शांतता या दोन मुद्द्यांवर केंद्रित केली व झपाट्याने कामाला सुरुवात केली, लेनिनच्या अध्यक्षतेखाली सोविएत कार्यकारी मंडळ स्थापन केले. अनेक मूलभूत बदल अल्पकाळात केले गेले. या क्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून येतात.

**१. झारशाहीचा शेवट–** क्रांतीच्या सुरुवातीच्या टप्प्यात झारला आपली सत्ता सोडावी लागली. नंतर शेवटचा झार निकोलस दुसरा आणि त्याच्या कुटुंबीयांना देशद्रोही कारवयामध्ये क्रांतिकारकांनी गोळ्या घालून ठार केले. झारवंशीयांच्या जुलूम अत्याचाराला कंटाळून रशियन जनतेने झारशाही पूर्णपणे उखडून टाकली. ३०० वर्ष निरंकुश पणे राज्य करणाऱ्या रोमोनोव्ह घराण्याच्या झारशाहीस या १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीने कायमस्वरूपी संपविले. रशियात मध्ययुगाचा शेवट होऊन आधुनिक युगाची सुरुवात झाली.

**२. फॅसीझम विरुद्ध कम्युनिझम या संघर्षाचा उदय –** कार्ल मार्क्स व लेनिन यांनी जे साम्यवादाचे नवीन तत्त्वज्ञान सांगितले, त्यामुळे जगातील निरनिराळ्या राजकीय विचार प्रणालीत संघर्ष निर्माण होऊन त्याचे आंतरराष्ट्रीय संबंधावर दूरगामी परिणाम घडून आले. भांडवलदार वर्गाला आता आपल्या हितसंबंधांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला असे वाटू लागले व त्यांनी भांडवलशाहीच्या संरक्षणाकरिता साम्यवादी राष्ट्राभोवती हुकूमशाही फॅसिस्ट राष्ट्रांची साखळी तयार करण्याचा प्रयत्न केला, यातूनच जगात फॅसीझम विरोधी कम्युनिझम असा संघर्ष निर्माण झाला.

**३. महासत्ता म्हणून रशियाची वाटचाल –** क्रांती पूर्व रशिया एक मागासलेले राष्ट्र होते. सुधारणांचा त्याला स्पर्शही झालेला नव्हता. परंतु इसवी सन १९१७ मध्ये बोलशेविक क्रांती घडवून आल्यानंतर एक साम्यवादी राष्ट्र म्हणून रशियाचा जागतिक राजकारणात उदय झाला. जगातील लक्षावधी श्रमिक रशियाकडे नेतृत्वाच्या आशेने पाहू लागले. एक बलशाली राष्ट्र या नात्याने रशियाला जागतिक राजकारणात मानाचे स्थान प्राप्त झाले. खऱ्या अर्थाने रशियाने नव्या युगात प्रवेश केला.

**४. वर्ग विहीन समाज रचना –** सामाजिक विषमता हे क्रांती पूर्वकाळातील रशियन समाजाचे एक वैशिष्ट्य बनले होते. १९१७ च्या क्रांतीनंतर मात्र ही विषमता नष्ट झाली. प्रत्येकाने आपल्या शक्तीनुरूप गुणानुरूप काम करावे या आधारावर नवीन समाज उदयास आला. या समाजात गरीब श्रीमंत, भांडवलदार जमीनदार, व्यापारी धर्मगुरू या सर्वांना काही ना काही काम करावे लागणार होते. कामानुरूप वेतन सर्वांनाच मिळणार होते. राष्ट्रीय करणाद्वारे इथल्या सर्व जमिनी सरकारने स्वतःच्या ताब्यात घेतल्या. चर्चच्या मालमत्ता ही जप्त केल्या. विशेषतः वर्गविरहित समाज रचनेसाठी येथे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले. दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले. अशा रीतीने क्रांतीनंतर रशियात शोषणरहित समाज उदयास आला व ज्याने जगात फार मोठी क्रांती घडवून आणली.

**५. रशियाचे औद्योगीकरण –** क्रांती पूर्वकाळात रशियात उद्योगधंदे सुरू झाले. मात्र औद्योगीकरणाचा वेग त्यात मंद होता. बोलशेविक राज्यक्रांतीनंतर मात्र औद्योगीकरणाचा वेग वाढला. नियोजनबद्धरित्या आर्थिक विकास घडवून आणताना लेनिन, स्टॅलीन यांनी उद्योगधंद्याकडे विशेष लक्ष दिले. शेतीमध्ये सामुदायिक प्रयोग राबविल्याने व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्याने धान्य उत्पादनात मोठी वाढ झाली. सहकारी संस्थांना सरकारने पाठिंबा दिला. वीज, लोखंड कोळसा, पेट्रोलियम, सिमेंट, शस्त्रास्त्रे यांच्या उत्पादनाबरोबरच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही प्रगती झाली. अगदी कमी काळातच रशियाने अवकाश संशोधनात मोठी झेप घेतल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचे स्थान मिळविले. लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणामुळे विकासाची प्रक्रिया कायम राहून रशिया समृद्ध बनला.

**६. साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार–** झारशाही संपविल्यावर बोलशेविक नेत्यांनी रशियात राजकीय व सामाजिक बदल करण्यास प्रारंभ केला. कार्ल मार्क्सच्या साम्यवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करत ही क्रांती घडवून आली. भूदास प्रथा संपुष्टात आणली. भांडवलशाहीला मूठमाती दिली. बोलशेविक क्रांतीने साम्यवाद हे केवळ क्रांतीचे तत्त्वज्ञान नसून तो सर्वांगीण उन्नतीचा व नाविन्यपूर्ण जीवन पद्धतीचा प्रभावी मार्ग असल्याचे दाखविले. रशियन क्रांतीमुळे लोकशाही, स्वातंत्र्य, उदारमतवाद या कल्पनांची लोकप्रियता कमी झाली. भांडवलशाही साम्राज्यवादी राष्ट्रांनी साम्यवादाचा धसका घेतला. रशियाने या तत्त्वज्ञानामुळे आर्थिक प्रगती साधली. अनेक मागासलेल्या शोषित आणि पारतंत्र्यात असलेल्या राष्ट्रांना रशियाने स्वतःच्या रूपाने एक नवा मार्ग दाखविला.

**७. शैक्षणिक प्रगती –** क्रांती पूर्व काळात सरासरी ८०% जनता निरक्षर होती. राज्यक्रांतीनंतर रशियाने शिक्षण विकासाकडे विशेष लक्ष दिले. धर्म संस्थांचा शिक्षणावर असलेला पगडा पूर्णपणे नष्ट करण्यात आला. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. प्रौढांसाठी रात्र शाळा सुरू केल्या. विज्ञान आणि तांत्रिक शिक्षणावर विशेष भर दिला गेला. शैक्षणिक संस्थांची संख्या वाढविली. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या, त्या सर्व प्रयत्नामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक वाढले. १९३३ पर्यंत ८५% जनता साक्षर झाली. शिक्षणातून साम्यवादी तत्त्वज्ञान, विचारांचा मोठ्या प्रमाणात प्रसार

होईल, याकडे रशियाने लक्ष दिले. अल्पावधीत रशियाने उपग्रह, अवकाशयाने, शस्त्रास्त्रे यामध्ये अभुतपूर्व प्रगती केली.

**८. नवीन समाजात कामगारांना अग्रक्रम –** रशियन राज्यक्रांतीनंतर रशियात श्रम करणाऱ्यांच्या हातात सत्ता आली. समाजात कामगारांचे वर्चस्व स्थापन झाले. साम्यवादाच्या तत्त्वावर समाजाची पुनर्रचना करण्यात आली. या क्रांतीनंतर केवळ रशियाच्याच नव्हे तर जगभरातल्या श्रमिकांना प्रतिष्ठा मिळाली. रशियात श्रमजीवी वर्गासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. यामध्ये मोफत वैद्यकीय मदत, भर पगारी वार्षिक सुट्ट्या, यांचा समावेश होता. यामुळे श्रमिकांचे जीवनमान सुधारले. त्याचे फलित म्हणजे इतर देशातील श्रमिक वर्ग जागृत होऊन तो सुधारणांची मागणी करू लागला. काही देशांनी सुधारणा घडवून आणल्या. एकूणच रशियन राज्यक्रांतीमुळे श्रमिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

**९. स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा –** क्रांती पूर्वकाळात रशियातील स्त्रियांची परिस्थिती अत्यंत वाईट होती. घराच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या स्त्रियांना सामाजिक रूढी परंपराचे पालन करावे लागत असे. बोलशेविक सरकार सत्तारूढ झाल्यावर त्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. राज्यघटनेत स्त्रियांना अनेक सवलती देण्यात आल्या. त्यांच्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी सरकारकडून उचलली गेली. या सर्वांमुळे सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली. त्याचबरोबर डॉक्टर, तंत्रज्ञ म्हणूनही स्त्रिया काम करू लागल्या.

**१०. साम्यवादी हुकूमशाहीची सुरुवात –** बोलशेविक क्रांतीमुळे जुलमी राजेशाहीचा अस्त झाला. लेनिनने मार्क्सवादाचा अवलंब करून रशियात कम्युनिस्ट शासन प्रणाली निर्माण केली. लेनिन, ट्रॉटस्की, स्टॅलिन यांनी सत्तेचे अमर्याद केंद्रीकरण करून शासन पद्धती अमलात आणली. शेती व्यवसाय, उद्योग, शिक्षण, कायदा, न्याय, वाङ्‌मय, प्रसारमाध्यमे, अर्थव्यवस्था व एकंदरीत राष्ट्रीय जीवनावर साम्यवादी पक्षाचे प्रभुत्व निर्माण केले. सत्ता विभाजन, विकेंद्रीकरण, विचार स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य व नागरी हक्क इत्यादी बाबींना येथे स्थान नव्हते. शाळा, महाविद्यालय विद्यापीठ, संशोधन संस्थांवर सरकारने नियंत्रण आणले. खाजगी मालमत्ता रद्द झाल्या. शासनाच्या विविध क्षेत्रांमध्ये साम्यवादी कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या केल्या गेल्या. विरोधकांची हकालपट्टी करण्यात आली. सरकार विरुद्ध कोणी आवाज उठविल्यास त्याचा बंदोबस्त करण्यासाठी चेका ही गुप्त पोलीस संघटना कार्यरत होती. या संघटनेने अनेकांना तुरुंगात पाठविले, तर अनेकांना ठार केले.

**११. जागतिक साम्यवादी क्रांत्यांना प्रेरणा –** भांडवलशाहीची शेवटची अवस्था म्हणजे साम्राज्यवाद होय. १९ व्या २० व्या शतकात आशिया, आफ्रिका खंडातल्या अनेक देशांमध्ये वसाहतवाद विरोधी राष्ट्रवादी चळवळी सुरू झाल्या होत्या. हे देश वैज्ञानिक दृष्ट्या मागास होते. साम्राज्यवादी राष्ट्रांनी तेथील जनतेचे अमर्याद शोषण केले. अशा मागासलेल्या राष्ट्रांमध्ये साम्यवादाचा विस्तार शक्य असल्याचे जाणून रशियाने तेथील क्रांत्यांना पूर्णतः सहकार्य केले. परिणामी अनेक देशातील राष्ट्रवादींनी राष्ट्र मुक्तीसाठी

साम्यवादी क्रांतीचा स्वीकार केला आणि त्यातून पोलंड, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, पूर्व जर्मनी, कोरिया, क्युबा, आफ्रिकी राष्ट्रांमध्ये साम्यवादी क्रांती घडवून आल्या.

**१२. पौर्वात्य देशांचे नेतृत्व –** विसाव्या शतकापर्यंत जगाचा इतिहास पाश्चात्य देशांच्या कर्तृत्वा भोवती केंद्रभूत होता. पौर्वात्य राष्ट्रे मागासलेली, अशिक्षित, कर्तव्य शून्य व पारतंत्र्यात राहणारी असा समज पाश्चात्यांनी करून दिला होता. पाश्चिमात्यांच्या या विचारांना पहिल्या धक्का जपानने दिला तर दुसरा मोठा धक्का रशियन राज्यक्रांतीने दिला. पौर्वात्य राष्ट्रे ही कर्तृत्ववान आहेत, हे रशियाने दाखवून दिले. रशियाने पुढील काळात साम्यवादी राष्ट्रांचा प्रभावी गट निर्माण केला व आशियाई मागासलेल्या पौर्वात्य राष्ट्रांचे नेतृत्वही केले.

**१३. जागतिक अशांतता व शीतयुद्ध –** २० व्या शतकाच्या प्रारंभी सामर्थ्यशाली अमेरिका उदय पावली, तर बोलशेविक क्रांतीनंतर अल्पकाळात रशिया महाशक्ती म्हणून पुढे आली. अमेरिका व रशिया ही दोन्ही राष्ट्रे तुल्यबळ होती. जगावर प्रभुत्व गाजवण्याची दोघांचीही इच्छा होती. महायुद्धामुळे युरोपियन राष्ट्रे निष्प्रभ झाली होती. आशिया, आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे विकासाच्या मार्गावर होती, या राष्ट्रांना शस्त्रास्त्रे व अर्थसहाय्य करून आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न अमेरिका व रशियाने सुरू केला. यामुळे जगभरात गटबाजी, सत्ता स्पर्धा व अप्रत्यक्ष संघर्ष सुरू झाला. अमेरिका व त्याची मित्र राष्ट्रे नाटो, सिटो, सेंटो कराराद्वारे एकत्र आली तर रशिया आणि त्याची मित्रराष्ट्रे वॉरसॉ कराराद्वारे एकत्र आली. अमेरिका व रशिया यांच्यातील सत्ता स्पर्धेमुळे जगभरात शीतयुद्ध सुरू झाले.

**१४. जीवन विषयक नवा दृष्टिकोन व नवी मूल्ये –** प्रचलित व्यवस्थेला पहिला धक्का प्रबोधन व धार्मिक सुधारणा चळवळीने दिला, तर त्यानंतरच्या आधुनिक संकल्पना व व्यवस्थेला रशियन राज्यक्रांतीने मोठा धक्का दिला. लोकशाही, भांडवलशाही, साम्राज्यवाद, व्यक्ती स्वातंत्र्य, उदारमत्वात यांच्या विरोधात साम्यवाद उभा ठाकला. साम्यवादाने वर्ग विरहित समाज रचना अस्तित्वात आणली. मानवाच्या कल्याणासाठी व भौतिक उन्नतीसाठी ही व्यवस्था सुरू झाली असली तरी साम्यवादामध्ये मानवाला दुय्यम स्थान दिले गेले. कार्ल मार्क्स हा साम्यवादांचा ईश्वर व दास कॅपिटल हा त्यांचा बायबल बनला.

**स्वयंअध्यानासाठी प्रश्न ३**

अ) रिकाम्या जागा भरा

१. स्टॅलिन हा ............ देशाचा नेता होता.

अ) इंग्लंड ब) भूतान क) भारत ड) रशिया

२. बोलशेविक सरकारने विरोधकांच्या बंदोबस्तासाठी ............ नावाची गुप्त पोलीस संघटना निर्माण केली.

अ) इस्क्रा ब) प्रावदा क) शून्यवादी ड) चेका

३. बोलशेविकांची सेना ............ या नावाने ओळखली जात असे.

अ) हरितसेना   ब) लालसेना   क) पिवळी सेना   ड) व्हाईट आर्मी

४. ............ याचे सरकार उलथवून लेनिनने स्वतःकडे सत्ता घेतली.

अ) जॉर्ज एलवोस   ब) झार निकोलस   क) केरेन्स्की   ड) ट्रोटस्की

५. रशियन राज्यक्रांतीने ............ घराण्याची सत्ता उलथून टाकली.

अ) टुयडर   ब) रोमोनोव्ह   क) ब्युरबोन   ड) बोनापार्ट

## २.३ सारांश

रशियन राज्यक्रांतीने रशियाचा कायापालट केला. या राज्यक्रांतीमुळे युरोपच्या राजकारणावर फार मोठा परिणाम झाला. १९१७ च्या बोलशेविक क्रांतीचे दूरगामी परिणाम घडून आले. १९०५ मध्ये झालेली क्रांती अयशस्वी झाली तरी अन्यायविरुद्ध एकत्रित होण्याचे महत्त्व रशियन जनतेला कळाले. या क्रांतीने झारला जनतेसाठी निर्णय घेणे भाग पाडले. सोविएतची स्थापना ही त्या काळातील महत्वपूर्ण घटना होय. कामगार वर्ग यामुळे संघटित झाला. या संघटित शक्ती समोर झारला माघार घ्यावी लागली, त्यामुळे १९१७ च्या राज्यक्रांतीची जणू ही रंगीत तालीम होती.

साम्यवादी विचारांच्या लाटा रशिया पुरत्या मर्यादित न राहता त्या साऱ्या जगभर पसरल्या व त्यांनी सारे जग अमुलाग्र बदलून टाकले. जुलमी झारशाही, सरंजामशाही व भूदास पद्धतीचा शेवट होऊन समाजवादी समाज रचनेचा नवीन प्रयोग सुरू झाला. ऑक्टोबर १९१७ च्या क्रांतीने अमुलाग्र बदल झाले. महत्त्वाचे उद्योगधंदे, व्यापार व शेतीचे राष्ट्रीयकरण करून देशाच्या विकासासाठी त्याचा उपयोग करण्याचे धोरण स्वीकारले गेले. केरेन्स्कीचे सरकार उलथवून टाकून लेनिनने सत्ता हाती घेतली. लेनिन व स्टालिन यांनी मार्क्सचा समाजवाद प्रत्यक्षात आणला. रशियन राज्यघटनेने काम मागण्याचा मूलभूत हक्क जनतेला दिला. या क्रांतीने भांडवलशाही राष्ट्रांना हादरा बसला. ही क्रांती यशस्वी होऊ नये म्हणून भांडवलशाही राष्ट्रांनी अनेक संकटे आणण्याचे प्रयत्न केले, यातून भांडवलशाही विरुद्ध समाजवाद असा संघर्ष सुरू झाला. युरोपातील भांडवलदार वर्ग समाजवादी क्रांतीच्या भीतीने घाबरला. या क्रांतीला अटकाव करण्यासाठीच इटली, जर्मनी स्पेन, पोर्तुगालमध्ये हुकूमशाहीचा उदय झाला. त्यामुळेच दोस्तांनी हिटलरच्या कारवायांकडे दुर्लक्ष केले. पुढे भांडवलशाही विरोधी साम्यवादी राष्ट्रांमध्ये शीतयुद्ध सुरू झाले.

या क्रांतीमुळे जगातील सर्व कामगार आपल्या अधिकाराबाबत जागृत झाले. आपल्या देशातील कामगार रशिया प्रमाणेच क्रांती घडवून आणतील या भीतीने अनेक भांडवलशाही राष्ट्रांनी कामगारांना अनेक प्रकारच्या सवलती दिल्या. कामगारांना प्रतिष्ठा मिळाली. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेमुळे रशियन राज्यक्रांती अद्याप जिवंत आहे. राजेशाही उलथून लावत कामगारांचे राज्य आणणारे आणि साम्यवाद प्रस्थापित करणारे रशिया जगातील पहिले राष्ट्र ठरले. यानंतरच्या काळात रशियाचा चेहरा मोहरा बदलला. अमेरिकेच्या तोडीचे रशिया हे राष्ट्र झाले. उदारमतवादी धोरण, व्यक्ती स्वातंत्र्य, लोकशाही, संसदीय

राज्यपद्धती, त्याचबरोबर भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि या अर्थव्यवस्थेतून निर्माण झालेल्या समाज व्यवस्थेलाही आव्हान देण्याचे कार्य रशियन साम्यवादाने केले. १९१७ च्या क्रांतीचा शिल्पकार म्हणून लेनिन चा उल्लेख करावा लागतो. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्याने आखलेल्या योजना, क्रांती प्रत्यक्षात येण्यासाठी व ती स्थिर करण्यासाठी त्याचे प्रयत्न, यामुळे क्रांती यशस्वी झाली. स्वतःचे पूर्ण आयुष्य त्याने या क्रांतीसाठी वाहून घेतले. त्याच्या प्रेरक नेतृत्वामुळेच कामगारांची जगातील पहिली सत्ता रशियात स्थापन झाली. त्याने घेतलेल्या विविध निर्णयामुळे रशियाची महासत्ता होण्याकडे वाटचाल सुरू झाली.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

झार, झारीना – रोमानोव्ह घराण्यातील राजाला झार आणि राणीला झारीना म्हटले जात.

रोमँनोव्ह – सतराव्या शतकापासून रशियात रोमॅनोव्ह  घराणे राज्यकारभार करीत होते.

सोव्हिएत – कामगारांना मार्गदर्शन करण्यासाठी स्थापन झालेली कामगार प्रतिनिधींची केंद्रीय समिती.

कार्ल मार्क्स – जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि कामगार राज्याचा पहिला पुरस्कर्ता, त्याने भांडवलशाहीचे विश्लेषण करून दास कॅपिटल या ग्रंथाची निर्मिती केली.

साम्यवाद – समाजातील संपत्ती सर्वांच्या मालकीची असावी, संघटित श्रमाद्वारे निर्मित उत्पादन आणि तिचे वितरण प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे व्हावे, समाजाच्या शक्तीचा विकास व्हावा व अंतिमता वैश्विक स्तरावर वर्ग विहीन समाज स्थापन व्हावा, की जिथे मनुष्य आपल्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा विकास करावयास मुक्त असेल, असे सांगणारी विचार प्रणाली होय.

बोलशेविक – बहुमतातील गट.

लाल सेना – प्रतिक्रांतीवाद्यांचा सामना करण्यासाठी ट्रोटस्की ने उभा केलेली सेना, यामध्ये शेतकरी-कामगारांचा सहभाग होता.

चेका – युध्दकालीन परिस्थितीत लेनिनने स्थापन केलेली गुप्तहेर संघटना होय.

## २.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १

१. निकोलस  २. कार्ल मार्क्स  ३. जपान  ४. सोव्हिएत

५. टोलस्टॉय

स्वयं अध्ययन प्रश्न २

१. ८ मार्च १९१७  २. लेनिन  ३. झार निकोलस दुसरा

४. प्राथमिक  ५. केरेन्स्की

स्वयंअध्ययन प्रश्न ३

१. रशिया २. चेका ३. लालसेना ४. केरेन्स्की

५. रोमोनोव्ह

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. १९१७ च्या रशियन बोलशेविक क्रांतीसाठी कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचे वर्णन करा.

२. १९१७ च्या रशियन राज्यक्रांती मधील महत्त्वाचे टप्पे लिहा.

३. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीचे परिणाम लिहा.

४. १९१७ च्या बोलशेविक क्रांतीतील लेनिनच्या भूमिकेचे मूल्यांकन करा.

ब) टीपा लिहा.

१. १९०५ ची रशियन राज्यक्रांती

२. लेनिन

३. रशियातील हंगामी सरकार

४. बोलशेवीक क्रांती

५. रशिया आणि पहिले महायुद्ध

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके.

१. गायकवाड आर. डी. कदम वाय. एन. थोरात डी. जी. आधुनिक जगाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, १९७८.

२. कदम य.ना. विसाव्या शतकातील जगाचा इतिहास, फडके प्रकाशन कोल्हापूर,२००५.

३. कोलारकर श.गो. आधुनिक जग, श्री मंगेश प्रकाशन नागपुर, १९९९.

४. वैद्य सुमन, आधुनिक जग, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, १९९७.

५. गर्गे स. मा. भारतीय समाज विज्ञान कोष -दोन, मेहता प्रकाशन कोल्हापूर, २०१७.

६. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, २००३.

७. वाड विजया (संपा), मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

❑❑❑

### घटक ३

# दुसरे जागतिक महायुद्ध (१९३९)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ दुसऱ्या महायुद्धाची कारणे

  ३.२.२ युद्धप्रसंग

  ३.२.३ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- पहिल्या महायुद्धानंतर युरोपमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीची माहिती होईल.
- दुसऱ्या महायुद्धाची कारणे विस्तृतपणे अभ्यासता येतील.
- पोलंडवरील जर्मनीच्या आक्रमणानंतर महायुद्ध कसे सुरू झाले हे अभ्यासता येईल.
- दोस्त गट व अक्ष गटात युरोपची झालेली विभागणी आणि त्यांच्यातील संघर्षाची माहिती पाहता येईल.
- दुसरे महायुद्ध खऱ्या अर्थाने जागतिक कसे बनले याचा विस्तृत आढावा घेता येईल.
- हुकुमशाही अक्ष गटाच्या पराभवाची माहिती समजून घेता येईल.
- दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यासता येईल.
- दुसऱ्या महायुद्धाचे आजपर्यंतच्या मानवी इतिहासामधील सर्वात संहारक परिणामांची चर्चा करता येईल.
- महायुद्धानंतर जगाची भांडवलवादी अमेरिका आणि साम्यवादी रशियात कशी विभागणी झाली आणि जागतिक स्तरावर शीतयुद्धास झालेल्या आरंभाची माहिती होईल.

## ३.१ प्रास्ताविक :

इ.स १९१४ ते इ.स १९१८ या दरम्यान पहिले संहारक महायुद्ध युरोपात लढले गेले. जगावरील एक मोठे संकट टळले. परंतु पहिल्या महायुद्धानंतर झालेल्या व्हर्साय तहामध्ये दुसऱ्या महायुध्दाची बीजे रोवली गेली. पहिल्या महायुद्धानंतर केवळ वीस वर्षामध्ये दुसरे महायुद्ध झाले. पहिल्या महायुद्धाच्या संहाराची संपूर्ण जगास कल्पना असली तरी दुर्दैवाने दुसरे महायुद्ध घडून आले. युद्ध टाळण्यासाठी आणि आपापसातील मतभेद, वादग्रस्त प्रश्न सामंजस्याने सोडवण्यासाठी पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ ही जागतिक संघटना निर्माण झाली. परंतु युरोपात आणि जागतिक स्तरावर शांतता फार काळ टिकू शकली नाही. या कार्यामध्ये राष्ट्रसंघास अपयश आले. वास्तविक पहिल्या महायुद्धानंतर भयानक युद्धे होवू नयेत म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी १४ तत्वे जाहीर केली. परंतु त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली नाही. युरोपात जर्मनी व इटलीमध्ये अनुक्रमे एडोल्फ हिटलर आणि बेनिटो मुसोलिनी या हुकुमशहांचा उदय झाला. आशियामध्ये जपानने आक्रमक धोरण स्वीकारले. या दरम्यान आधुनिक आणि ज्यादा संहारक हत्यारांचा शोध लागला. हुकुमशहांनी केलेल्या या प्रचंड लष्करी तयारीमुळे युद्ध किती विनाशकारी बनू शकेल याची सर्वच राष्ट्रांना जाणीव झाली. त्यामुळे अनेक युरोपीय देशांनी महायुद्ध टाळण्याचा प्रयत्न केला परंतु ते टळले नाही. या दुसऱ्या महायुद्धा ची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ दुसऱ्या महायुद्धाची कारणे :

**१) व्हर्सायच्या अपमानास्पद तहात युद्धाची बीजे :** इ.स १९१९ मध्ये झालेल्या व्हर्साय तहामध्ये दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली. राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्या चौदा तत्त्वावर आधारित विजयी राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांशी विविध तह केले. त्यापैकी जर्मनीशी युद्धाच्या अखेरीस जर्मनी पराभूत होण्यापूर्वी शांतता मार्गाने तह करण्यासाठी व्हर्सायचा करार करण्यात आला. जर्मनीने शरणागती पत्करल्यावर दोस्त राष्ट्रांनी सुडाने जर्मनीवर जास्तीत जास्त कठोर अटी लादण्यात येवूनजास्तीत जास्त खच्चीकरण करण्यात आले. युरोपच्या नकाशावरून जर्मनीचे संपूर्ण अस्तित्व संपवण्यासाठी फ्रान्सने पुढाकार घेतला. इंग्लंडने हा तह लादण्यासाठी फ्रान्सला साथ दिली नंतर नाईलाजाने अमेरिकेने या तहास संमती दिली.

या तहाने जर्मन साम्राज्याची शकले करण्यात आली. युरोपबाहेरील जर्मनीच्या वसाहती दोस्त राष्ट्रांनी विश्वस्त या नावाने ताब्यात घेतल्या. जर्मनीची प्रादेशिक मर्यादा संकुचित करण्यात आल्या. एकेकाळी लष्करीदृष्ट्या बलाढ्य जर्मनीचे लष्करी सामर्थ्य नष्ट करण्यात आले. जर्मनीचे लष्कर कमी करण्यात आले. वायुदल, आरमार नष्ट केले. विपुल खनिजसंपत्तीने युक्त जर्मनीच्या ऱ्हाईन प्रदेशात दोस्त राष्ट्रांचे लष्कर ठेवले. जर्मनीचा सार हा प्रदेश युद्ध नुकसानभरपाई म्हणून फ्रान्सने आपल्या ताब्यात आणला. पोलंडला सागरी मार्ग प्रवेश यासाठी जर्मन प्रदेशामधून 'पॉलिश कॉरिडॉर' (पोलंडसाठी मार्ग) तयार करण्यात आला. झेकोस्लोव्हेकियात जर्मन वंशीयांचा समावेश करण्यात आला. पहिल्या महायुद्धास जर्मनीस सर्वस्वी जबाबदार

धरण्यात येवून त्याची नुकसानभरपाई जर्मनीने द्यावी यासाठी युद्धगुन्हेगार राष्ट्र म्हणून जर्मनीवर प्रचंड खंडणी लादण्यात आली. ही युद्धखंडणी इतकी प्रचंड होती कि, प्रामाणिकपणे वर्षानुवर्षे खंडणी फेडण्याचा जर्मनीने प्रयत्न केला तरी सर्व देणे फिटने शक्य नव्हते. हे हप्ते फेडताना जर्मनी मेटाकुटीस यावा अशी दोस्त राष्ट्रांची इच्छा होती. ही युद्धखंडणी फेडताना जर्मनीचे उत्पन्न किती टिकेल याचा विचार कोणत्याही राष्ट्राने केला नाही. यामुळे दोस्त राष्ट्रांबाबत जर्मनीमध्ये सुडाची भावना निर्माण झाली. खंडणी देण्याचा विचार जर्मनीने सोडून दिला आणि लवकरात लवकर हा तह तोडणे, राष्ट्रीय स्वाभिमान जागृत करणे, आर्थिक स्थैर्य निर्माण करणे आणि विजेत्या राष्ट्रांनी हस्तगत केलेला प्रदेश पुन्हा ताब्यात घेणे या हेतूने जर्मनी पुन्हा संघर्षासाठी तयार झाला. या पार्श्वभूमीवर जर्मनीत हिटलरचा उदय झाला आत्यंतिक राष्ट्रवाद आणि जर्मनीचे वैभव पुन्हा प्राप्त करण्याचा निर्धार त्याने केला. हिटलरने व्हर्साय तहामधील एक एक कलम पायदळी तुडवले आणि जग पुन्हा दुसऱ्या महायुद्धाच्या छायेखाली आले. म्हणजे दुसऱ्या महायुद्धाची नांदी पहिल्या महायुध्दामधील शांतता तहात होती.

**२) युद्धोत्तर आक्रमक हुकुमशाही निर्माण :** व्हर्साय तहाने जर्मनीस अपमानित केल्याची भावना जर्मन जनतेत निर्माण झाली. पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेले क्लिष्ट प्रश्न सोडवण्यात जर्मनीमधील वायमार प्रजासत्ताक सरकारला सपशेल अपयश आले. त्यामधून जर्मनीत आक्रमक नाझी पक्षाचा उदय घडून आला. या नाझी पक्षास ॲडोल्फ हिटलररूपाने हुकुमशाही नेता मिळाला. व्हर्साय तहामधील अपमानाचा बदला घेण्यासाठी 'एक पक्ष, एक नेता, एक वंश' असलेले राष्ट्र निर्माण होणे गरजेचे आहे हे नाझी पक्षाने हिटलरद्वारा पटवून दिले. जर्मन जनतेने हिटलरची हुकुमशाही राजवट मान्य केली. आरंभी हिटलरने शांततामय सहजीवनाचा पुरस्कार केला. त्याने जर्मनीमधील आपली सत्ता भक्कम झाल्यानंतर पोलंड, झेकोस्लोव्हेकिया, ऱ्हाईनचा प्रदेश यावर आक्रमण केले. जर्मनीप्रमाणे इटलीसोबत झालेल्या पॅरिस शांतता कराराने इटालियन जनतेची निराशा केली होती. युद्धात विजयी राष्ट्र गटात असूनही इटलीच्या प्रादेशिक अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत.इटलीस कायदेशीर हक्क असलेला प्रदेश मिळवण्यासाठी आणि इटलीची भक्कम राष्ट्र म्हणून उभारणी करण्याच्या हेतूने बेनिटो मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली फॅसिस्ट पक्षाची हुकुमशाही निर्माण झाली. 'राज्य व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे आणि व्यक्तीने राज्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे' ही विचारसरणी इटालीयन जनतेने मान्य केली. त्यामधून मुसोलिनीने आक्रमक धोरण स्विकारले. हिटलर आणि मुसोलिनी यांनी सतत युद्धजन्य परीस्थिती निर्माण करून जनतेस आपल्या राष्ट्राच्या प्रतिष्ठेस जनतेसही युद्धप्रवृत्त केले.

तुर्कस्थानमध्ये कमी-अधिक फरकाने अशीच परीस्थिती होती. सेव्हर्स तहाने तुर्कस्थानवर अन्याय झाला अशी भावना निर्माण झाली. पहिल्या महायुद्धानंतर तुर्क साम्राज्य आणि प्रतिष्ठा लयास गेली. ती परत मिळवण्यासाठी केमाल पाशाने तुर्कस्थानमध्ये हुकुमशाही निर्माण केली. रशियामध्ये साम्यवादी देशांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी आणि आदर्श रशिया निर्माण करण्यासाठी म्हणून स्टॅलिनने साम्यवादी हुकुमशाही राजवट निर्माण केली. जपानमध्ये लष्करी गटाकडे सत्ता आलेने तेथील सत्ताधीशांनी युरोपातील हुकुमशाही देशांशी हातमिळवणी केली. स्पेनमध्ये जनरल फ्रॅंकोने हिटलर-मुसोलिनी यांचा मदतीने कम्युनिस्ट प्रजासत्ताक उलथवून तेथे हुकुमशाही सत्ता निर्माण केली. थोडक्यात युरोपमधील अनेक देशांनी पहिल्या महायुद्धानंतर

लोकशाही स्विकारली पण युद्धानंतर निर्माण झालेल्या समस्या सोडवण्यास या प्रजासत्ताकवादी सरकारांना अपयश आलेने त्या देशात हुकुमशाही निर्माण झाली. या सर्वच हुकुमशहांनी साम्राज्यविस्तार आणि युद्धाची गरज आणि महत्व पटवून दिलेने जनतेचा पाठींबा या हुकुमशहांना प्राप्त झाला.

**३) युरोपमधील साम्राज्यवाढीची स्पर्धा :** युरोपात औद्योगिक क्रांतीमुळे कच्चा मालाचा पुरवठा आणि पक्क्या मालासाठी बाजारपेठ मिळवणे यासाठी सर्वच राष्ट्रांना वसाहती निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. तसेच औद्योगिक प्रगतीबरोबर युरोपात लोकसंख्येतही वाढ घडून आली. त्यामुळे या वाढत्या लोकसंख्येस नवीन वसाहतींची गरज निर्माण झाली. यामधून आशिया, आफ्रिका खंडामधील मागास प्रदेश प्राप्त करण्याची युरोपीय देशामध्ये स्पर्धा निर्माण झाली. त्यामध्ये जर्मनी, इटली, इंग्लंड, फ्रांस, पोर्तुगाल, स्पेन या देशांतर्गत वसाहती प्राप्तीसाठी स्पर्धा निर्माण झाली. यामधून संघर्ष, युद्ध अटळ बनले. पहिल्या महायुद्धापूर्वी जर्मनीने अनेक वसाहतीप्राप्त केल्या पण व्हर्साय तहाने दोस्त राष्ट्रांनी जर्मन वसाहती आपणाकडे घेतल्या. हिटलरने सत्ताप्राप्तीनंतर सर्व वसाहती पुन्हा हस्तगत करण्याचा निर्धार करून जर्मन साम्राज्य निर्माण करण्याची घोषणा केली. इटलीमधील मुसोलिनीने आफ्रिकेतील वसाहती ताब्यात घेण्याचा निश्चय केला. प्रत्येक युरोपीय राष्ट्रांनी आपले साम्राज्य वाढ करताना साम्राज्यवादाशी सुसंगत भूमिका घेतली. यामधून राष्ट्राराष्ट्रात तीव्र स्पर्धा निर्माण होवून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.

**४) आशिया खंडामधील जपानचा साम्राज्यवाद :** मेईजी पुनर्रचनेनंतर जपानी शासकांनी जपानला आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान करण्याचे प्रयत्न सुरू केले. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करतानाच परंपरा आणि विज्ञानाची सांगड घातली. त्यामधून लष्करशाही जपानमध्ये निर्माण झाली. जपानने पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस भाग घेताना जर्मनीविरोधी आघाडीत भाग घेतला आणि आफ्रिका खंडामधील जर्मन वसाहती ताब्यात घेतल्या.चीनवर वर्चस्व प्राप्तीसाठी २१ मागण्यांचा खलिता चीनला दिला. ज्या राष्ट्रांचे चीनमध्ये व्यापारी संबंध आहेत अशा राष्ट्रांचा जपान शत्रू बनला. जपानने ''आशिया हा आशियाई लोकांसाठी आहे''. अशी घोषणा करून पाश्चात्य लोकांविरोधी आघाडी उघडली. थोडक्यात जगामधील सर्वच प्रगत राष्ट्रांनी आपल्या स्वार्थासाठी साम्राज्यवादी धोरणाचा स्विकार केला. यामधून हे महायुद्ध खऱ्या अर्थाने जागतिक झाले. जपानने पॅसिपिक महासागरामधील वर्चस्व स्पर्धेमधून अमेरिका आणि जपान यांच्यात संघर्ष वाढत गेला. जपानी पंतप्रधान टोजो यांनी आक्रमकपणे हालचाली करताना १ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेविरोधी युद्धाची घोषणा केली आणि ७ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेच्या पॅसिफिक महासागरामधील सर्वात मोठ्या पर्ल हार्बर या नाविक तळावर हल्ला करून नाविक तळ उध्वस्त केल्याने अमेरिका या युद्धात ओढली गेली.

**५) राष्ट्रसंघाची दुर्बल भूमिका :** आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता ठेवण्याच्या उद्देशाने राष्ट्रसंघ निर्माण झाला होता. परंतु शांतता टिकवण्यात राष्ट्रसंघ अयशस्वी ठरला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्या प्रेरणेने राष्ट्रसंघ निर्माण झाला परंतु नंतर अमेरिकेने राष्ट्रसंघाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे इंग्लंड, फ्रान्स या देशांनी राष्ट्रसंघास आपल्या हातचे बाहुले बनवून त्याचे महत्व कमी केले. तसेच राष्ट्रसंघाची व्हर्साय तहाशी सांगड घातलेने पहिल्या महायुद्धामधील विजेत्यांचे वर्चस्व राष्ट्रसंघावर निर्माण

झाले. रशिया, जर्मनीसारख्या राष्ट्रांना सभासदत्व देण्यास राष्ट्रसंघाने टाळाटाळ केली. त्यांचा उशिरा राष्ट्रसंघात प्रवेश झाला त्यामुळे त्यांना राष्ट्रसंघाच्या कार्याबद्दल आत्मीयता वाटली नाही. युद्धानंतर 'जैसे थे' परिस्थिती टिकवण्याचा जेत्या राष्ट्रांनी प्रयत्न केला. म्हणजे युद्धात प्राप्त केलेले प्रदेश टिकवण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच हिटलरने राष्ट्रसंघ म्हणजे 'लुट वाटून घेण्यासाठी जमलेली मंडळी' अशी टिका केली. यादरम्यान जागतिक स्तरावर अनेक देशांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेस राष्ट्रसंघास पायबंद घालता आले नाही. जपानचे मांचूरियावरील आक्रमण, इटलीचा ॲबेसेनियावरील हल्ला अशा प्रश्नावर राष्ट्रसंघाने निर्णायक आणि खंबीर भूमिका घेतली नाही. त्यामधून आक्रमक राष्ट्रे अधिक आक्रमक बनली. जर्मनी, जपान, इटली यांनी राष्ट्रसंघाचे सदस्यत्व आपल्या हिताआड येत आहे असे दिसताच राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामधून राष्ट्रसंघ आणखी दुर्बल बनला. लहान राष्ट्रांचाही राष्ट्रसंघावर विश्वास राहिला नाही. थोडक्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर संघर्ष उद्भवू न देण्यास आणि आणि उद्भवल्यानंतर संघर्ष टाळण्यात अयशस्वी ठरला. दुसऱ्या महायुद्धापूर्वी राष्ट्रसंघ दुर्बल बनून अस्तित्व हीन झाला.

**६) आक्रमक विचारसरणी व सैद्धांतिक संघर्ष :** पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी-जपान-इटली या देशांमध्ये लोकशाहीवरील विश्वास उडाला. लोकशाहीत आपले प्रश्न सुटणार नाहीत हि विचारसरणी प्रबळ होत जावून त्यामधून या देशांमध्ये आक्रमक हुकुमशाही राजवट निर्माण झाली. त्याविरोधी इंग्लंड-फ्रान्स-अमेरिका हा लोकशाही राष्ट्रांचा गट निर्माण झाला. या लोकशाहीवादी राष्ट्रांमध्ये परस्पर सामंजस्य नव्हते. जर्मनीची ताकत वाढत असताना आरंभी कोणत्याही लोकशाहीवादी राष्ट्राने विरोध केला नाही. यादरम्यान रशियात साम्यवादी राजवट निर्माण झाली त्यास युरोपीय राष्ट्रांनी विरोध केला. त्यामुळे लोकशाही विरुद्ध हुकुमशाही आणि या दोन्ही विचारसरणी विरोधी साम्यवादी विचार असा जागतिक सैद्धांतिक संघर्ष निर्माण झाला. त्यामधून जग सरळ दोन गटात विभागले गेले आणि या दोन्ही गटामधील संघर्ष वाढत जावून त्याचे पर्यावसान दुसऱ्या महायुद्धात झाले.

**७) अमेरिकेची युरोपीय राजकारणामधील निष्क्रियता :** इ.स १९१७ मध्ये अमेरिकेने पहिल्या महायुद्धात प्रवेश केला.अमेरिकेचे प्रचंड लष्करी सामर्थ्य, अफाट युद्धसामग्री, ताज्या दमाचे लाखो सैन्य यामुळे युद्धाचा इ.स १९१८ मध्ये शेवट झाला. युद्धानंतर प्रेसिडेंट विल्सन यांनी शांतता आणि सहजीवनाचा पुरस्कार करून राष्ट्रसंघ स्थापनेत पुरस्कार केला. परंतु अमेरिकेच्या सिनेटने राष्ट्रसंघ कामकाजात भाग घेण्यास नकार दिला तसेच राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्विकारले नाही. पहिल्या महायुध्दाची रणभूमी अमेरिकेपासून दूर असलेने प्रत्यक्ष युध्दाची झळ अमेरिकेस लागली नाही. युरोपमधील कारखाने या काळात उद्‌वस्थ झालेने त्याचा परिणाम म्हणून अमेरिकेतील उद्योग प्रचंड प्रमाणात फोफावले. संपन्न आणि सामर्थ्यशाली अमेरिकेचा जागतिक स्तरावर उदय झाला. संपूर्ण जग अमेरिकेकडे जगाचे नेतृत्व करावे या अपेक्षेने पाहू लागले. परंतु पहिल्या महायुद्धानंतर युरोपात घडणाऱ्या घडामोडीत अमेरिकेने रस घेतला नाही. युद्धानंतर जागतिक राजकारणाशी आपला संबंध नाही अथवा युरोपशी फारसा संबंध ठेवायचा नाही या हेतूने प्रेसिडेंट हार्डीन्जपासून हूवर पर्यंत प्रत्येकाने अलिप्तता धोरणाचा पुरस्कार केला. जर युरोपीय राजकारणात राष्ट्रसंघामार्फत भाग घेतला असता किंवा बाहेरूनही युद्धखोर राष्ट्रांवर दबाव आणला असता तर परीस्थिती नियंत्रणात आली असती

अमेरिकेच्या अलीप्ततेमुळे युरोपला कोणी वाली राहिला नाही परिणामी राष्ट्रांमध्ये निर्माण झालेले छोट्या प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केले युरोपमधील इंग्लंड-फ्रान्स अशा देशांना हुकुमशहाच्या आक्रमणास पायबंद घालता आला नाही.

**८) युरोपमधील लष्कर व शस्त्रास्त्र वाढीची स्पर्धा :** पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी, इटली, तुर्कस्थान अशा राष्ट्रावर व्हर्साय, पॅरिस शांतता परिषदेने मोठा अन्याय केला. या राष्ट्रापुढील समस्या केवळ युद्धानेच सोडविता येतात या भावनेने या राष्ट्रांनी युद्ध तयारी सुरु केली. हिटलरने सत्तेवर आल्यानंतर इ.स. १९३३ च्या नि:शस्त्रीकरण परिषदेत भाग घेतला आणि इतर राष्ट्रे शस्त्रकपात करतील हे गृहीत धरून 'स्वसंरक्षणासाठी जर्मनीस फ्रास इतके सैन्य ठेवण्यास परवानगी द्यावी' अशी मागणी केली. फ्रान्सने शस्त्र कपातीस नकार देताच जर्मनीचे लष्करीकरण सुरू केले. जर्मनीने इंग्लंडशी शांततेचा आभास निर्माण करण्यासाठी नाविक शांतता करार केला.शांततेने व्हर्साय तहात गमावलेला सार, ऱ्हाईन प्रदेश हस्तगत केला. अल्पकाळात जुन्या शस्त्रांजागी नवीन अत्याधुनिक, संहारक, भयानक शस्त्रे शोधून त्याचे प्रचंड उत्पादन करण्यास जर्मनी, इटली, जपान यांनी सुरवात केली. आपल्या शेजारील राष्ट्रात शस्त्रास्त्र स्पर्धा मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने इंग्लंड-फ्रांस या देशांनी शस्त्र उत्पादनास सुरवात केली. लष्करी शिक्षण, कारखानदारी प्रचंड प्रमाणात सुरू झाली. संपूर्ण युरोपात सक्तीने लष्करी शिक्षण सुरू झाले. पहिल्या महायुद्धापेक्षा कित्येकपट लष्कर, संहारक शस्त्रे प्रत्येक राष्ट्राजवळ निर्माण झाली. संपूर्ण युरोप शस्त्र व सैन्याचे आगार बनले. या प्रचंड लष्करी सामर्थ्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविता येतात या गोष्टीचा विसर युरोपीय राष्ट्रांना पडला. ज्या सूडभावनेने फ्रान्सने जर्मनीचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला त्याच सूडभावनेने जर्मनीने आपली ताकद कित्येक पटीने वाढवली. या स्पर्धेतून युरोपममधील वातावरण स्फोटक बनले.

**९) आंतरराष्ट्रीय नि:शस्त्रीकरण परीषदांची विफलता :** राष्ट्राध्यक्ष विल्सन यांच्या १४ कलमी योजनेत तसेच राष्ट्रसंघाच्या मुलभूत उद्देशामध्ये शस्त्रास्त्र कपात आणि नि:शस्त्रीकरण धोरणास महत्व देण्यात आले. त्याप्रमाणे पॅरिस शांतता परिषदेने पराभूत राष्ट्रावर शस्त्रास्त्र कपात लादली. परंतु विजेत्या राष्ट्रांनी विविध कारणांनी शस्त्र कपात टाळली. युद्ध टाळण्यासाठी राष्ट्रसंघानेही यास मान्यता दिली. राष्ट्रसंघाच्या नेतृत्वाखाली जिनेव्हा करार (१९२४), लंडन परिषद (१९३०), आंतरराष्ट्रीय नि:शस्त्रीकरण परीषद (१९३३) या परिषदांमधून शस्त्र कपातीसंबधी व नि:शस्त्रीकरणाबाबत चर्चा करण्यात आली. परंतु या परिषदेत इंग्लंड-फ्रान्सच्या वर्चस्वामुळे पक्षपाती निर्णय घेण्यात आले. पहिल्या महायुद्धामधील विजेत्या देशांनी पराभूत देशांवरच शस्त्रकपात लादली. ज्यांच्यावर शस्त्र कपात लादण्यात आली त्यांनी शस्त्र वाढीची मागणी करताच जितक्या प्रमाणात शस्त्रवाढ देण्यात येईल तितक्या प्रमाणात विजयी राष्ट्रांनी शस्त्रवाढीची मागणी पुढे केली. त्यामधून शस्त्रसज्जतेबाबतचा समतोल राहिला नाही. म्हणून जर्मनीने दोस्त राष्ट्रांच्या दुटप्पीपणावर हल्ला करून हिटलरने लष्करीकरणाची घोषणा केली. इटलीनेही जर्मनीचे अनुकरण केले. त्यामुळे शस्त्रकपातीस अपयश आले. पुढे जागतिक राजकारणाचा विचार न करता विविध देशांनी आपापसात शस्त्रवाढीचे करार केले. इ.स १९३५ मध्ये इंग्लंड-जर्मनीत नाविक करार होतानाच ब्रिटीश आरमाराच्या

३५% आरमार उभारण्याची मुभा जर्मनीस मिळाली. असाच करार इंग्लंड-इटलीत झाला. पुढे वॉशिंग्टन परिषदेत अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली, जपान या देशांचे आरमारी प्रमाण निश्चित करण्यात आले. त्यातून शस्त्रकपातीऐवजी शस्त्रवाढीचे धोरण जगभरात सुरू झाले. राष्ट्राध्यक्ष विल्सन अथवा राष्ट्रसंघाच्या धोरणाने जर शस्त्रास्त्र कपात झाली असती तर जगात दीर्घकाळ शांतता राहिली असती. दुर्दैवाने शस्त्रकपातीबाबत कोणत्याच राष्ट्राने प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत. उलट युद्धसज्ज होण्याकडे सर्व राष्ट्रांचा कल राहिला. जर्मनी, इटली, फ्रान्स, जपान या देशांनी शस्त्रवाढीच्या विविध योजना अंमलात आणल्या.

**१०) भाषिक, वांशिक अल्पसंख्यांकांच्या समस्या :** पहिल्या महायुध्दानंतर जागतिक स्तरावर अनेक नवीन देश राष्ट्रसंघाच्या स्व:निर्णय तत्वानुसार निर्माण झाले. परंतु या तत्वाचा उपयोग पराजित राष्ट्रांच्या साम्राज्याची शकले करण्यासाठी करण्यात आला. पराभूत देशांमधील अनेक प्रदेश त्यांच्या इच्छेविरोधी परकीय सत्तेच्या अमलाखाली आणण्यात आले. जर्मन भाषिक, वंशाचे लोक झेकोस्लोव्हेकिया, पोलंड, ऑस्ट्रिया या देशात विखुरले गेले. हे जर्मन लोक त्या देशात अल्पसंख्याक असलेने बहुसंख्यांकाकडून त्यांच्यावर अन्याय होण्याचा संभव होता. त्यामधून आपल्या मातृभूमीशी समरस होण्याची इच्छा त्या देशांची होती तसेच आपले बांधव विविध देशात अडकले आहेत त्यांना मुक्त करण्याचे ध्येय अनेक राष्ट्रांनी ठेवले. हिटलरने 'विशाल जर्मनी'चे स्वप्न आपल्या देशामधील नागरिकांपुढे ठेवले आणि आपल्या बांधवांवर त्या देशात अन्याय केला जात आहे असा सातत्याने प्रचार करून अल्पसंख्यांकाचा प्रश्न सतत धगधगता ठेवला. राष्ट्रसंघाने अल्पसंख्यांकाचे प्रश्न सोडवण्यासाठी 'अल्पसंख्याकाकरिता करार' (Minority Treaties) केला. परंतु राष्ट्रसंघ अस्तित्वहीन झालेने हे करार अस्तित्वात येवू शकले नाहीत. त्यामधून युरोपमधील अनेक देशांच्या सरहद्दीवर कायम संघर्षाची परीस्थिती निर्माण झाली. त्यात जर्मनभाषिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी जर्मनीने झेकोस्लोव्हेकिया, पोलंडवर हल्ला केला व दुसऱ्या महायुद्धास आरंभ झाला.

**११) जर्मनीचा आत्यंतिक राष्ट्रवाद :** जर्मनीमध्ये नाझी पक्षाची स्थापना आणि विस्तारापासून एक नवा राष्ट्रवाद जर्मनीत उदयास आला. सर्व जगात जर्मन हेच शुद्ध आर्य वंशाचे आहेत आणि संपूर्ण जगावर राज्य करण्याचा त्यांना अधिकार आहे असे तत्व नाझी पक्षाने स्वीकारले. जर्मनीमधील ज्यू हे जर्मनीचे आर्थिक शोषण करतात म्हणून हि जमात नष्ट झाली पाहिजे अशी घातकी विचारसरणी नाझी पक्षाने जर्मनीत फैलावण्यास सुरवात केली. तसेच ज्या ज्या देशात जर्मन भाषिक लोक विखुरलेले आहेत त्यांना एका विशाल भक्कम जर्मनी राष्ट्राच्या छत्राखाली एकत्र आणले पाहिजे असे धोरण हिटलरने स्वीकारले या धोरणानुसार झेकोस्लोव्हेकियामधील सुडेटन प्रदेशाची मागणी केली. ऑस्ट्रीयामधील जर्मन भाषिकामध्ये उठाव घडवून आणले. ऱ्हाईन प्रांत हस्तगत केला. सार प्रदेशात सार्वमत घडवून आणून तो प्रदेश जर्मनीस जोडला.त्यामधून अनेक शत्रू देश जर्मनीने निर्माण केले. आत्यंतिक राष्ट्रवादाचे दुसरे स्वरूप म्हणजे स्वावलंबी बनणे पहिल्या महायुद्धावेळी जर्मनी संपूर्ण स्वावलंबी नव्हता इंग्लंडने जर्मनीची आर्थिक नाकेबंदी केल्यानंतर जर्मनीतील आर्थिक परीस्थिती ढासळली व महायुद्धात पराभव पत्करावा लागला. म्हणून कोणत्याही परिस्थितीत जर्मनीस लागणाऱ्या सर्व वस्तूंची निर्मिती जर्मनीमध्येच झाली पाहिजे असा आग्रह हिटलरने धरला आणि त्यादृष्टीने प्रयत्न केले परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापार थंडावला. यामधून युरोपमधील

अनेक छोटे मोठे देश आर्थिक संकटात आले. इटलीनेही जर्मनीच्या धोरणाचा स्वीकार केला. या आत्यंतिक राष्ट्रवादामुळे दुसऱ्या देशांचा द्वेष केला जावू लागला. देशांमधील परस्पर सहकार्य नष्ट झाले. शिवाय आपलीच संस्कृती श्रेष्ठ या भूमिकेमधून द्वेष, तिरस्काराची भावना युरोपीय देशात निर्माण झाली.

**१२) इंग्लंड-फ्रान्सचे तटस्थतेचे धोरण :** जर्मनी, इटलीच्या आक्रमक धोरणापासून युरोपचे संरक्षण करण्याची नैतिक जबाबदारी इंग्लंड, फ्रान्स या लोकशाहीवादी देशांवर होती. आपापल्या शस्त्रसज्जतेकडेच या देशांनी लक्ष दिले त्यामधून जागतिक शांतता धोक्यात येवू शकते याचा विचार या देशांनी केला नाही. यादरम्यान रशियात साम्यवादी क्रांतीनंतर साम्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार जगभर होवू लागला यावेळी हिटलरने साम्यवादी विचारसरणी विरोधी भूमिका घेतली तेव्हा इंग्लंड तटस्थ राहिले. हिटलरने एकामागोमाग एक प्रांत हस्तगत करण्यास सुरवात केली परंतु त्याविरोधी लढण्याचा विचार इंग्लंडने केला नाही. त्यामुळे प्रारंभी इंग्लंडचे तटस्थतेचे धोरण जागतिक शांततेस घातक ठरले. फ्रांसचेही देशांतर्गत प्रश्नात लक्ष असलेने जर्मनीच्या आक्रमक भूमिकेचा प्रतिकार करता आला नाही.

**१३) हुकुमशाही व लोकशाहीमधील वैचारिक संघर्ष :** प्रेसिडेंट विल्सनच्या १४ तत्वानुसार पहिल्या महायुद्धानंतर शस्त्रसंधी करारावर सही करणारे देश लोकशाहीवादी प्रजासत्ताक असले पाहिजेत हुकुमशाहीवादी देशांशी शांततेची बोलणी करणार नाही अशी प्रमुख अट होती. यामुळे जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया या देशात प्रजासत्ताक राजवटी निर्माण झाल्या. तेथील जनतेचा प्रजासत्ताक राजवटीवर विश्वास नव्हता. तसेच युद्धोत्तर निर्माण झालेले प्रश्न सोडवण्यात या नवीन प्रजासत्ताक देशांना शक्य झाले नाही. चलनवाढ, बेकारी अशा प्रश्नांना योग्य मार्ग काढण्यासाठी खंबीर हुकुमशाही निर्माण झाली पाहिजे असा प्रचार सुरू झाला. त्यामधून हिटलरची जर्मनीत आणि मुसोलिनीची इटलीत हुकुमशाही निर्माण झाली. त्यामधून दुसऱ्या महायुद्धापूर्वी फ्रांस, इंग्लंड, अमेरिका हि लोकशाहीवादी राष्ट्रे विरुद्ध जर्मनी, इटली, जपान अशी हुकुमशाही राष्ट्रे दुसऱ्या बाजूस असा संघर्ष वैचारिक आणि इतर आघाडीवर निर्माण झाला. हिटलरने आक्रमक धोरणाने आपल्या शेजारील लोकशाहीवादी देशांवर आक्रमण करून दुसऱ्या महायुद्धाची नांदीच केली.

**१४) मित्रराष्ट्रांचे विविध तह व दोन गटाची निर्मिती :** पहिल्या महायुद्धानंतर आपापसामधील अनिश्चित धोरणातून इ.स १९१९ ते इ.स १९३९ दरम्यान परस्परांशी सामंजस्य करार करण्यात आले. जर्मनीपासून धोका ओळखून फ्रान्सने अनेक देशांशी विविध करार केले. लोकशाही संरक्षणासाठी म्हणून अनेक देशांशी इंग्लंडने करार केले. जर्मनी, इटली यांनीही विविध समविचारी देशांशी विविध करार, तह करून आपली बाजू भक्कम केली. यामुळे युरोपची सरळ दोन गटात विभागणी झाली पहिला मित्र राष्ट्र गट यामध्ये इंग्लंड, फ्रांस, रशिया, बेल्जियम, पोलंड आणि त्याविरोधी अक्ष गट यामध्ये जर्मनी, इटली, जपान, हंगेरी, बल्गेरिया हे देश दुसऱ्या गटात होते. ही गटबाजी पुढे वाढत जावून महायुद्ध सुरू झाले.

**१५) तात्कालिक कारण :** पोलंडवरील हल्ला : इ.स १९३९ च्या आरंभी युरोपात स्फोटक परीस्थिती निर्माण झाली होती. हुकुमशाही देश विरुद्ध लोकशाही देश असा संघर्ष निर्माण झाला. जर्मनी, इटली, जपान

यांनी साम्राज्यवादाचा पुरस्कार केलेने त्यांच्यात मैत्री संबंध निर्माण झाले. त्यामधून हिटलरने लोकशाही आणि साम्यवाद विरोधी रोम-बर्लिन-टोकियो असा गट तयार केला. त्यास प्रत्युत्तर म्हणून युरोपमधील फ्रांस, इंग्लंड आणि युरोपमधील छोट्या लोकशाहीवादी राष्ट्रांचा दुसरा गट तयार झाला. या युरोपमधील परिस्थितीचा विचार करून तसेच इ.स १९२९ मधील आर्थिक महामंदीपासून अमेरिकेस वाचविण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रॅकलीन डी रूझवेल्ट यांनी नवे आर्थिक धोरण (New Deal) जाहीर केले व अलिप्तता धोरणाचा पुनर्विचार सुरू केला. पुढे अमेरिकन कायदेमंडळाने मंजूर केलेले तटस्थतेचे कायदे (Neutrality Acts) रूझवेल्ट यांनी रद्द केले आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेने पुंन्हा नव्याने पाऊल टाकले. प्रेसिडेंट विल्सनप्रमाणे प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनी जगामधील लोकशाही देशांच्या रक्षणासाठी आपले सामर्थ्य वापरण्याचे निश्चित केले आणि इंग्लंड-फ्रांस या लोकशाही देशांच्या गटास पाठींबा दिला. दरम्यान पहिल्या महायुध्दानंतर इ.स १९१९ ते इ.स १९३९ या वीस वर्षात जागतिक स्तरावर अनेक घडामोडी घडून जागतिक शांतता भंग होण्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली. आशिया खंडात जपानने ‘आशियाई लोकांसाठी आशिया’या सिद्धांतानुसार आशिया खंडावर वर्चस्व निर्माण करण्याची महत्वाकांक्षा बाळगून होता. त्यामुळे युरोपप्रमाणे आशिया खंडावरही युद्धाचे सावट निर्माण झाले.

जपानने इ.स १९३१ मध्ये मांचुरिया हस्तगत केला आणि चीनच्या भूमीवर नव्याने हल्ला केला. इ.स १९३६ मध्ये इटलीने ॲबिसिनीया ताब्यात घेतले. जर्मनीने इ.स १९३७ मध्ये ऑस्ट्रिया आणि इ.स १९३८ मध्ये झेकोस्लोव्हेकिया जिंकले. जर्मनीच्या आक्रमक धोरणामुळे इंग्लंड आणि फ्रांस या राष्ट्रांनी पूर्वेकडील सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची हमी घेतली. त्यामुळे हिटलर काही काळ शांत राहिला. अचानक रशियाशी दहा वर्षाचा अनाक्रमणाचा करार हिटलरने केला. यानंतर हिटलरने पोलंडकडे विविध मागण्याचा खलिता पाठवला त्यानुसार डॅन्झिग बंदर जर्मनीस देण्यात यावे, जर्मन भाषिक असलेला पूर्व प्रशियामध्ये जाण्यासाठी कॉरीडॉर द्यावा याबदल्यात डॅन्झिग बंदर पूर्वीप्रमाणे मुक्त ठेवून पोलंडचे या बंदरावरील आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवण्याची हमी जर्मनी घेईल. तसेच जर्मनी-पोलंड अनाक्रमण करार करण्यास जर्मनीने तयारी दर्शवली. पोलंडने जर्मनीच्या सर्व मागण्यांना स्पष्ट नकार दिला. त्यामुळे जागतिक परिस्थिती गंभीर बनली यावेळी जर्मनी आणि पोलंडमध्ये मध्यस्थी करण्याचे प्रयत्न झाले. परंतु हिटलरने पोलंड घेण्याचा निर्धार केलेने सर्व प्रयत्न अयशस्वी झाले. शेवटची संधी म्हणून २९ ऑगस्ट १९३९ रोजी हिटलरने पोलंडकडे मागण्याचा पुनरुच्चार केला पोलंडने सर्व मागण्या धुडकावून लावल्या अखेरीस १ सप्टेबर १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर स्वारी केली. इंग्लंड-फ्रान्सने अगोदर निश्चित केल्याप्रमाणे ३ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडच्या बाजूने युद्धात भाग घेतला. आणि दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

अ) खालील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे द्या.

१) व्हर्सायचा तह कोणामध्ये घडून आला?

२) पहिल्या महायुद्धानंतर कोणकोणत्या देशात हुकुमशाही निर्माण झाली.

३) जर्मनीमध्ये पहिल्या महायुद्धानंतर कोणता पक्ष सत्तेवर आला.

४) 'आशिया आशियाईसाठी'अशी घोषणा कोणत्या देशाने केली?

५) अमेरिकेने जपानच्या कोणत्या दोन शहरांवर अणुबॉम्ब हल्ला केला?

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांततेसाठी .......ची स्थापना झाली.

अ) राष्ट्रगट ब) राष्ट्रसंघ क) राष्ट्रसमुह ड) राष्ट्रमित्र गट

२) इ.स १९२४ चा जिनेव्हा करार ....... चा भाग होता.

अ) निश्स्त्रीकरण परिषद ब) शांतता परिषद

क) ऐक्य परिषद ड) संघ परिषद

३) जागतिक शांततेस राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सनची ..... तत्त्वे महत्त्वाची ठरली.

अ) सोळा ब) अठरा क) बारा ड) चौदा

४) पहिल्या महायुद्धानंतर इटलीत ........ याची हुकुमशाही राजवट सुरू झाली.

अ) केमाल पाशा ब) स्टॅलिन क) बेनिटो मुसोलिनी ड) हिटलर

५) जर्मनीने प्रथम ......... देशावर केलेल्या हल्ल्यानंतर दुसऱ्या महायुद्धास आरंभ झाला.

अ) हंगेरी ब) तुर्कस्थान क) पोलंड ड) रशिया

### ३.२.२ युद्धप्रसंग

हिटलरने पोलंडविरोधी प्रथमच नवीन युध्दतंत्र ब्लिटसक्रेग (विजेच्या वेगाने युध्द) या तंत्राचा वापर केला म्हणजे एकाचवेळी भूदळ, चिलखती रणगाडे, अत्याधुनिक हत्यारे, तोफदळ, हवाई दल यांचा आक्रमक पद्धतीने हल्ला करून शत्रूस जेरीस आणले. पोलंडची युद्ध तयारी सुरू असताना अचानक या पद्धतीने हल्ला केलेने आणि अशा प्रकारचा हल्ला होईल याची कल्पना पोलंडला नव्हती तसेच अशा आक्रमक हल्ल्यास तोंड देण्याचे सामर्थ्य आणि तयारीही पोलंडची नव्हती म्हणून जर्मनीच्या या घातक हल्ल्यामुळे पोलंडचा पराभव झाला.

**जर्मनी–रशियाच्या आक्रमक हालचाली :** जर्मनी रशियात ठरल्याप्रमाणे एका बाजूने जर्मनीचे आक्रमण सुरु असतानाच दुसऱ्या बाजूने रशियानेही पोलंडवर हल्ला करून पोलंडचे विभाजन जर्मनी आणि रशियात केले. इ.स १९३९ मध्ये फिनलंडवर हल्ला करून आपणास हवा असणारा प्रदेश हस्तगत करून फिनलंडशी करार केला. पुढे रशियाने आक्रमक हालचाली करताना 'बाल्टिक प्रदेश' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागामधील लाटविया, इस्टोनिया, लिथूआनिया ही छोटी राष्ट्रे आपल्या ताब्यात घेतली. आपल्या सामर्थ्याचा फारसा उपयोग न करताही रशियाने विजय मिळवले. हिटलरनेही 'ब्लिटसक्रेग' युद्धतंत्राचा वापर करून मोठा भूभाग ताब्यात घेतला. एप्रिल १९४० पर्यंत दुसऱ्या महायुद्धात लक्षणीय फारसे घडले नाही.

इंग्लंड-फ्रांसने जर्मनीविरोधी युद्ध घोषणा केलेने हिटलरला पश्चिम आघाडीवर युद्ध सुरू करावे लागले. या पश्चिम आघाडीवर हिटलरने एप्रिल १९४० मध्ये डेन्मार्क हस्तगत केले. नॉर्वेच्या मदतीस आलेल्या ब्रिटीश आरमाराचा पराभव केला. मे १९४० मध्ये हॉलंड, बेल्झीयम जर्मनीने जिंकले.

**जर्मनीकडून फ्रान्सचा पाडाव :** पश्चिम आघाडीवर एकामागोमाग एक देश जिंकल्यानंतर प्रचंड आत्मविश्वासाने जर्मनीने फ्रान्सवर हल्ल्याचा निर्णय घेतला. फ्रान्सने आपल्या सरहद्दीवर मॅझिनी तटबंदी उभारली होती. फ्रान्सचा आपल्या संरक्षणासाठी म्हणून या तटबंदीवर विश्वास होता. जर्मनीने या भिंतीकडून हल्ला करण्याचे टाळून हॉलंड, बेल्झीयममार्गे फ्रान्सवर हल्ला केला. या दरम्यान जर्मनी फ्रान्सवर निर्णायक हल्ला करणार हे ओळखून आपले नुकसान टाळण्यासाठी इंग्लंडने या आघाडीवरून माघार घेतली. ही माघार घेताना इंग्लंडला बरेच युद्धसाहित्य गमवावे लागले परंतु हिटलरच्या आक्रमक युद्दनीतीपासून इंग्लंडने आपला बचाव केला. जर्मनीनेही ब्रिटिशांकडून फ्रान्सला कोणतीही मदत प्राप्त होणार नाही अशी युद्दनिती आखली. ब्लिटसक्रेग (विजेच्या वेगाने युध्द) युद्धतंत्राप्रमाणे एकाचवेळी अत्याधुनिक लष्कर, रणगाडे, वायुदलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला. फ्रान्स दीर्घकाळ जर्मनीच्या हल्ल्यास तोंड देवून जास्तीत जास्त जर्मनीचे नुकसान करेल अशी सर्वांची धारणा होती पण फ्रान्सचे लष्करही निकृष्ट दर्जाचे होते. त्यातच जर्मनीच्या विद्युत वेगाच्या युद्दतंत्रापुढे फ्रान्सने लवकर शरणागती पत्करली. या दरम्यान ११ जून १९४० रोजी मुसोलिनीने जर्मनीच्या बाजूने युद्धात उतरण्याची घोषणा केली.१४ जून १९४० रोजी पॅरिस जर्मन लष्कराच्या ताब्यात आले. २१ जून १९४० रोजी फ्रान्सने जर्मनीपुढे शरणागती पत्करली. हिटलरने फ्रान्सवर कठोर अटी लादून व्हर्साय तहाचा बदला घेतला. या फ्रान्सवरील विजयानंतर फ्रान्सचे युद्ध साहित्य आणि नाविक दल जर्मनीस मिळाले. तसेच अटलांटिक किनाऱ्यावर जर्मनीस आपले वर्चस्व निर्माण करता आले. या फ्रान्सच्या पराभवामुळे लोकशाहीवादी देशांची संपूर्ण जबाबदारी इंग्लंडवर आली.

**जर्मनी विरुद्ध इंग्लंड संघर्ष :** फ्रान्सच्या पाडावानंतर इटलीने भूमध्य समुद्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी इजिप्तमध्ये ब्रिटिशांना विरोध सुरु केला. पुढे इ.स १९४१ मध्ये जर्मनीच्या सहकार्याने ग्रीसवर हल्ला केला ग्रीसने हा हल्ला परतवून लावताना इटलीचा पराभव केला पण इटलीच्या मदतीस जर्मनी आलेने ग्रीसचा ताबा इटलीस मिळाला. यावेळी जर्मनीने क्रीट आणि युगोस्लाव्हिया जिंकले. उत्तर आफ्रिका खंडात वसाहतीवरील वर्चस्वासाठी इंग्लंड व इटलीत युद्द सुरू झाले.

यावेळी नॉर्वेच्या मदतीस गेलेल्या इंग्लंडला डंकर्कपर्यंत मागे जर्मनीने पिटाळले आणि डंकर्कचा ताबा जर्मनीने घेतला. या संघर्षात ब्रिटीश नाविक दलाचे मोठे नुकसान झाले. यावेळी इंग्लंडचे हवाई दल गुणवत्तेने चांगले असले तरी जर्मनीच्या तुलनेने कमी होते. यावेळी हिटलरने प्रसंगावधान राखून इंग्लंडवर प्रखर हल्ला केला नाही. हिटलरने दिरंगाई करण्याची घोडचूक केली. यावेळी हल्ला केला असता तर इंग्लंडचा संपूर्ण पराभव होवून युद्धाचे पारडे जर्मनीच्या बाजूने झुकले असते. ही चूकच हिटलरला पराभूत करून गेली. इंग्लंडच्या सातत्याने बचावात्मक पावित्र्यामुळे आणि डंकर्कच्या पराभवामुळे ब्रिटीश पंतप्रधान चेंबरलीनसारखा मवाळ पंतप्रधान नको अशी त्यांच्यावर सातत्याने टिका होवू लागलेने चेंबरलीन यांनी राजीनामा दिला आणि मुत्सद्दी, धोरणी, अनुभवी विन्स्टन चर्चिल यांच्याकडे पंतप्रधानपद आले.चर्चिलने

ब्रिटीश जनतेस आवाहन केले. या आवाहनास प्रतिसाद देवून संपूर्ण ब्रिटीश जनता चर्चिल च्या मागे एकमुखी उभी राहिली. पंतप्रधान झाल्यावर चर्चिलने फ्रान्सला पुरेपूर मदत केली परंतु फ्रान्सचा पराभव अटळ आहे हे लक्षात येताच फ्रान्सचे आरमार जर्मनीच्या ताब्यात जावू नये यासाठी इंग्लंडने त्याचा नाश केला. जर्मनीने १९४० मध्ये इंग्लंडवर हवाई हल्ले सुरु केले. इंग्लंडनेही या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यास सुरवात केली. लंडन तसेच अनेक ब्रिटीश शहरांचा मोठा विध्वंस झाला तरी ब्रिटिशांनी आपला प्रतिकार चालू ठेवला. जर्मनीच्या हवाई हल्ल्याचा पहिला जोर ओसरल्यानंतर ब्रिटीश हवाई दलाने जर्मनव्याप्त फ्रान्स, बेल्जियम, नॉर्वे, हॉलंडवर प्रत्युतर म्हणून हवाई हल्ले सुरू केले.

**अमेरिकेची दोस्त राष्ट्रांना सक्रीय मदत** : जर्मनीची हवाई हल्ल्याची तीव्रता पाहून लवकरच इंग्लंड जर्मनीच्या ताब्यात जाईल असे अमेरिकेस वाटत होते परंतु जून १९४० मध्ये जर्मन आरमाराच्या हाती फ्रेंच आरमार सापडू नये म्हणून ब्रिटीश आरमाराने अनेक फ्रेंच नौका नष्ट केल्या. त्यामुळे फ्रान्सने इंग्लंडशी असलेले सर्व राजनैतिक संबंध तोडले. अमेरिकेस मात्र इंग्लंडचे धोरण योग्य वाटले म्हणून इंग्लंडचा एकाकी जर्मनी व इतर हुकुमशाही देशासोबतचा लढा पाहून अमेरिकेने इंग्लंडला प्रचंड युद्धनौका, लष्करी साहित्य पुरवले. तसेच जर्मनीचा प्रतिकार करणाऱ्या सर्व लोकशाही राष्ट्रांना उधारीवर युद्धसाहित्य पुरवण्याची घोषणा केली. या युद्धजन्य परिस्थितीमध्ये ऑगस्ट १९४१ मध्ये चर्चिल-रूझवेल्ट यांच्यात अटलांटिक महासागरात एका बोटीवर गुप्त भेट झाली. या बैठकीत युद्धाचे उद्देश आणि युद्धोत्तर जग कसे असावे याबाबत विस्तृत चर्चा झाली आणि निश्चित मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आली. ही तत्वे 'अटलांटिक सनद' नावाने प्रसिद्ध आहेत.

**जर्मनीकडून रशियाचा घात व रशियाचा युद्धप्रवेश** : पहिल्या महायुद्धानंतर रशियामधील साम्यवादी नेता स्टॅलिन व जर्मनीमधील हुकुमशाही नेता हिटलर हे परस्पराचे कट्टर शत्रू होते. तरीही आपल्या वैयक्तिक महात्वाकांक्षेतून जर्मनी आणि रशिया यांनी इ.स १९३९ मध्ये अनाक्रमणाचा करार केला होता. जर्मनीच्या पश्चिम आघाडीवर इंग्लंड व्यतिरिक्त इतर सर्व राष्ट्रे पराभूत झाली होती. इंग्लंडवर सातत्याने नाविक आणि हवाई हल्ले जर्मनीकडून सुरू होते. परंतु इंग्लंडने चिवट प्रतिकार सुरू केला यावेळी पूर्व आघाडीवर जलद हालचाली करून रशियावर सहज विजय मिळवता येईल अशी हिटलरची धारणा होती. रशियावरील विजयामुळे युक्रेन, कॉकेशस प्रदेशामधून मोठ्या प्रमाणात अन्नधान्य आणि तेलाचा पुरवठा प्राप्त होईल आणि या विपुल पुरवठ्याच्या जोरावर आपण इंग्लंडवर पुन्हा जोमाने हल्ला करता येईल असे हिटलरचे आडाखे होते. म्हणून जून १९४१ मध्ये जर्मनीने विश्वासघाताने रशियावर अचानक हल्ला केला. रशियानेही या हल्याचा जोरदार प्रतीकार केला. दुसऱ्या महायुद्धात सुरुवात झाल्या नंतर हिटलर रशियावर हल्ला करणार हे गृहीत धरून स्टॅस्लिनने रशियाच्या लष्करी सामर्थ्यात मोठी वाढ केली. पश्चिम सीमेवरील मोठे कारखाने उद्योगधंदे सुरक्षिततेच्या दृष्टीने रशियाच्या पूर्वेकडील भागात स्थलांतरित करण्यात आले. जर्मनीच्या हल्यास रशियाने मॉस्को, लेनिनग्राड, स्टॅलिनग्राड शहरे रशियाने अखेरपर्यंत लढविली. यावेळी दोस्त राष्ट्रांचे क्रिप्स मंडळ रशियात होते या मंडळाने इंग्लंड-रशिया मैत्री करार घडवून आणला. जर्मनीच्या अपेक्षेप्रमाणे रशियात सहजासहजी विजय मिळाला नाही. जर्मनीची प्रचंड हानी झाली. जर्मनीला एकाच वेळी पश्चिम आणि पूर्व

या दोन आघाडीवर तितक्याच ताकदीने लढा देणे अवघड झाले.दोस्त राष्ट्रांची मदत मिळाल्याने रशियाने जर्मनीवर जोरदार प्रतिहल्ला केला. त्यामुळे जर्मनीने रशियामधून हळूहळू माघार घेण्यास सुरुवात केली.

**पर्ल–हार्बरवरील हल्ला व अमेरिकेचा युद्धप्रवेश :** जपानने आशिया खंडामध्ये साम्राज्यविस्ताराचे जोरदार प्रयत्न सुरू केले. युरोपमध्ये दुसऱ्या महायुद्धामुळे सर्व मोठी राष्ट्रे युद्धात गुंतल्याने युरोपीय देशांच्या वसाहती हस्तगत करण्याचे प्रयत्न जपानने सुरू केले. जपानी साम्राज्याची वाढ करावयाची झाल्यास पॅसिपिक महासागरातील अमेरिकेचे वर्चस्व नाहीसे करणे गरजेचे आहे. त्यामुळे पूर्वेकडील साम्राज्य विस्ताराबाबत अमेरिकाच आपला खरा शत्रू आहे अशी जपानची खात्री झाली होती. कारण पॅसिफिक महासागरातील जपानच्या हालचालीला अमेरिकेने मोठा विरोध सुरू केला. यावेळी जर्मनी आणि रशिया यांच्यात अटीतटीचे युद्ध सुरू होते त्यामुळे रशिया युद्धात अडकल्याने जपानवर रशियन आक्रमणाची भीती नव्हती अशावेळी पॅसिफिक महासागरातील बेटांच्या मालकीबाबत अमेरिकन सरकारशी तडजोडीची बोलणी सुरू असतानाच जपानने अमेरिकेचे पॅसिफिक महासागरातील सर्वात मोठे तळ पर्ल–हार्बरवर ६ डिसेंबर १९४१ रोजी शेकडो जपानी विमानांनी हल्ला करून नाविक तळ उध्वस्त केला. यात २३४३ सैनिक ठार आणि हजारो जखमी झाले. अमेरिकेने तत्काळ जपान विरुद्ध युद्ध पुकारले. जपानने यावेळी आग्नेय आशियातील मोठा प्रदेश हस्तगत करून भारताच्या सीमेपर्यंत येऊन पोहोचला. महायुद्धापासून दूर राहणाऱ्या अमेरिकेस दुसऱ्या महायुद्धात जपानने ओढले.

दोस्त राष्ट्रे विरुद्ध अक्ष राष्ट्रे यांच्यातील अटीतटीचे युद्ध:अमेरिकेच्या युद्ध प्रवेशानंतर अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स यांचा मित्र गट विरुद्ध जर्मनी, इटली, जपान यांचा अक्ष गट अशी विभागणी होवून युद्ध निकराचे सुरू झाले. अक्ष गटातील जर्मनीचा पश्चिम आघाडीवर विजय होत होता परंतु पूर्वेकडे रशियाने चिवट प्रतिकार सुरू केला. आफ्रिका खंडामधील दोस्त राष्ट्रांच्या अनेक वसाहती जर्मन सेनापती रोमेलने ताब्यात आणल्या. जपानने पॅसिफिक महासागरातील बहुतेक बेटे, दक्षिण चीन, मलाया, सयाम, इंडो चायना जिंकून ब्रह्मदेशपर्यंत धडक दिली. ब्रिटीशांच्या आधिपत्याखालील भारत अगदी नजीक आलेने भारतामधील ब्रिटिशसत्तेस मोठा धोका निर्माण झाला. इ.स १९४२ पर्यंत अक्ष गटाची सरशी होवू लागली परंतु इ.स १९४२ नंतर युद्धाचे पारडे दोस्त राष्ट्रांकडे झुकू लागले. दोस्त राष्ट्रांनी आपले अनुभवी व मातब्बर सेनापतीकडे विविध जबाबदाऱ्या दिल्या. अमेरिकेने पॅसिफिक प्रदेशामधील मोहीमेचे नेतृत्व जनरल मॅकॉर्थरकडे दिले. इंग्लंडने आग्नेय आशियामधील मोहीम लॉर्ड लॉरेनकडे दिली. आफ्रिकेतील मोहिमेची जबाबदारी मौंटगोमेरीकडे दिली. आयसेन हॉवरकडे फ्रेंच भूमीवरील जर्मन आक्रमण परतवण्याची कामगिरी दिली. या सर्व अनुभवी सेनापतीच्या नेतृत्वाखाली दोस्त राष्ट्रांना विजय मिळाले. दोस्त राष्ट्रांनी आफ्रिका खंडामधील जर्मन ताब्यामधील वसाहती पुंन्हा जिंकल्या. इटलीचा सिसिली प्रांत जिंकून इ.स १९४४ मध्ये इटली जिंकले. मुसोलिनीस अटक झाली परंतु तेथून निसटून जर्मनीमध्ये जावून इटलीचे युद्ध सुरू ठेवले. इटलीमधून जर्मन सैन्यास बाहेर काढण्यात आले. मुसोलिनीस पुन्हा अटक झाली. त्याच्या देशबांधवांनीच मुसोलिनीस गोळ्या घालून ठार केले.

दरम्यान जर्मनीच्या ताब्यातून फ्रान्सला सोडवण्याची तयारी इंग्लंड-अमेरिका या देशांनी केली. जर्मनीची ताकत खच्ची करण्यासाठी जर्मन सैन्यावर बॉम्ब वर्षाव सुरू केला. यामुळे हुर प्रदेशामधील औद्योगिक, व्यापारी केंद्रे, रेल्वेमार्ग, कालवे यांचे बॉम्बवर्षावात प्रचंड मोठे नुकसान झाले. ६ जून १९४४ रोजी आयसेन हॉवरच्या नेतृत्वाखाली दोस्त राष्ट्रांचे सैन्य नॉर्माडी प्रांतात उतरले.

**जर्मनीचा पराभव व हिटलरची आत्महत्त्या :** इ.स १९४४ पर्यंत इटली दोस्त राष्ट्रांच्या सैन्याने काबीज केले जून १९४४ मध्ये पॅरिस जर्मन सैन्यापासून मुक्त करून जर्मन फौजेस मागे रेटण्यास सुरवात केली. या फौजेने बेल्जियम, लक्झेम्बर्ग मुक्त करून जर्मनीमध्ये पोहोचले. पूर्व आघाडीकडून रशियाने पोलंड मुक्त करून रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, हंगेरी मुक्त करून रशियन फौजा जर्मनीत पोहोचल्या. जर्मनी तिन्ही बाजूंनी दोस्त राष्ट्रांच्या सैन्याने घेरला. आपल्या तिन्ही बाजूनी होणाऱ्या आक्रमणापासून बचावासाठी जर्मनीने जोरदार प्रयत्न केले. बर्लिनपर्यंत दोस्त राष्ट्रांच्या फौजा पोहोचल्या. सर्व बाजूंनी होणारा पराभव पाहून ३० एप्रिल १९४५ रोजी हिटलरने आत्महत्या केली. जर्मन सेनाअधिकाऱ्यांनी दोस्त राष्ट्रांच्या सैन्यापुढे शरणागती पत्करली. यापूर्वीच इटलीने २ मे १९४५ रोजी बिनशर्त शरणागती पत्करली. या दोन देशांच्या शरणागतीमुळे युरोपमधील युद्ध संपुष्टात आले.

**जपानवर अणुबॉम्ब हल्ला व द्वितीय महायुद्धसमाप्ती :** जर्मनी, इटलीने शरणागती पत्करली तरी महायुद्ध संपले नव्हते. जपान अजूनही इंग्लंड, अमेरिकेसोबत लढत होता. भारतीय सीमेपर्यंत जपानी फौजा पोहोचल्या आणि इंग्लंडच्या सर्वात मोठ्या वसाहतीस धोका निर्माण झाला. दुसऱ्या बाजूने अमेरिकेने पॅसिपिक महासागरातील जपानच्या आरमारी तळावर जोरदार हल्ले सुरू केले. अमेरिकेच्या सततच्या हवाई हल्ल्यामुळे जपानची युद्धावरील पकड ढिली होवू लागली. अमेरिकेने जपानची महत्वाची मरियाना, ओकिनावा हि बेटे हस्तगत केली. जपानची ताकत क्षीण होवू लागली. यादरम्यान रशियाने पूर्वेकडून मांचुरिया मुक्त करून या ठिकाणी साम्यवादी सत्ता निर्मितीसाठी हालचाली सुरू केल्या. त्यामुळे रशियाचा शिरकाव जपानमध्ये होवू नये असे दोस्त राष्ट्रांना वाटत होते. म्हणून जपानने शरणागती पत्करावी अथवा सर्वनाशास तयार रहावे असा निर्वाणीचा इशारा दोस्त राष्ट्रांनी दिला. जपानने शरणागती पत्करण्यास नकार दिला. परिणामी जगाच्या इतिहासात प्रथमच विनाशकारी अणुबॉम्बचा प्रयोग अमेरिकेने जपानवर करतानाचा ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमा आणि ९ ऑगस्ट १९४५ रोजी नागासाकी या दोन जपानी शहरावर अणुबॉम्ब टाकण्यात आले.या दोन्ही हल्ल्यात १ लाख १० हजाराहून अधिक लोक ठार झाले. दोन्ही शहरे बेचिराख झाली. अखेरीस जपानला दोस्त राष्ट्रांच्या भक्कम एकत्रित आघाडीपुढे युद्ध चालविणे अशक्य झाले आणि १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपान शरण आला. आणि सर्वकष, संहारक महायुद्धाची समाप्ती झाली.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

अ) खालील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे द्या.

१) शत्रूराष्ट्रांपासून बचावासाठी म्हणून फ्रांसने सरहद्दीवर कोणती तटबंदी उभारली होती?

२) इ.स १९४१ मध्ये चर्चिल-रूझवेल्ट यांच्यात कोणत्या ठिकाणी भेट झाली?

३) पॅसिपिक महासागरामधील वर्चस्वावरून कोणत्या दोन देशात संघर्ष होता?

४) इ.स १९३९ मध्ये जर्मनीचा कोणत्या देशाशी अनाक्रमण करार झाला?

५) १४ ऑगस्ट १९४५ रोजी कोणत्या देशाच्या शरणागतीनंतर दुसरे महायुद्ध समाप्त झाले?

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) महायुद्धाच्या आरंभी जर्मनीने प्रथम 'ब्लीटस क्रेग' (प्रभावी युद्धतंत्र)......देशाविरोधी वापरले.

अ) पोलंड ब) रशिया क) तुर्कस्थान ड) इंग्लंड

२) २१ जून १९४० रोजी फ्रान्सने ....... देशासमोर शरणागती पत्करली.

अ) जपान ब) इटली क) जर्मनी ड) स्पेन

३) डंकर्क पराभवानंतर इंग्लंडचे पंतप्रधान चेबररलीन यांनी राजीनामा देवून ......पंतप्रधान झाली.

अ) गोर्डन ब्राऊन ब) मायकल जेम्स क) विल्स्टन चर्चिल ड) जॉन कॅमेरून

४) ६ डिसेंबर १९४१ रोजी पॅसिपिक महासागरामधील ... नाविक तळावर जपानने हल्ला केला.

अ) ग्रेट पर्ल ब) पर्ल हार्बर क) पर्ल हुवर ड) पर्ल फर्स्ट

५) ७ मे १९४५ रोजी जर्मनीच्या ......... याच्या आत्महत्येमुळे जर्मनीने शरणागती पत्करली.

अ) हिमलर ब) जनरल रोमेल क) गोबेल्स ड) हिटलर

### ३.२.३ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

**१) महायुद्धोतर अंधकारमय जग :** जपानच्या शरणागतीनंतर दुसरे महायुद्द समाप्त झाले. इ.स १९४५ या वर्षी अनेक महत्वाच्या घटना घडल्या जर्मनी-जपान-इटलीचा दारूण पराभव झाला. मुसोलिनीची हत्या, हिटलरची आत्महत्या, प्रथमच अणुबॉम्बचा वापर, संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना, अमेरिका आणि रशिया या दोन नवीन महासत्ताचा उदय अशा घटना वेगाने घडल्या. महायुद्धाच्या समाप्तीनंतर भयानक पर्वाचा अंत झाला. यानंतर नवीन अनिश्चित युग सुरू झाले या नवीन युगात शांतता निर्माण होईल अशी जागतिक परिस्थितीमुळे शक्यता नव्हती. मित्र राष्ट्रांमध्ये परस्पर अविश्वास, व्यापक अस्वस्थता, अस्थिरता या नवीन समस्या संपूर्ण मानव जातीसमोर निर्माण झाल्या. संपूर्ण जग अंधकारमय झाले.

**२) प्रचंड जीवित आणि वित्तहानी :** मानव जातीच्या इतिहासामध्ये दुसऱ्या महायुद्धामुळे जितकी हानी झाली तितकी हानी इतर कोणत्याही घटनेने झाली नाही. यासोबतच मानवी मुल्ये आणि नैतिक समाजाची मोठी हानी झाली. प्रत्यक्ष रणांगणावर दिड कोटी सैनिक मारले गेले तितकेच नागरी वस्त्यांमध्ये मारले गेले. जखमींची संख्याही साडेचार कोटी होती. सार्वजनिक संपत्तीचे अगणिक नुकसान झाले. जर्मन हल्ल्याने केवळ ब्रिटनचे २००० कोटी रुपयाची मालमत्ता नष्ट झाली. सार्वजनिक संपत्तीचेही अगणित नुकसान झाले. याशिवाय युद्धानंतर नवीनच समस्या निर्माण झाल्या. युद्धग्रस्त लाखो नागरिकांचे पुनर्वसन, संहारक युद्धामुळे युद्धभूमी ची पुनर्बांधणी, युद्धासाठी जनतेवर लादलेल्या करापासून जनतेची मुक्तता, उद्योग व कारखान्याची पुन्हा उभारणी, शेती-व्यापार याची पुनर्स्थापना, प्रचंड युद्धकर्जाची परतफेड, युद्धखंडणीची वसुली अशा

असंख्य समस्या दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगासमोर निर्माण झाल्या. जगभरातील सुमारे ५७ राष्ट्रे यात सहभागी होती तर युरोपियन राष्ट्रांच्या वसाहतीही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष युद्धात सामील होत्या. या महायुद्धात विजयी आणि पराभूत दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांची मोठी हानी झाली.

**३) युद्धाच्या संहारक स्वरूपामुळे सर्वव्यापी हानी :** दुसऱ्या महायुद्धामुळे जीवित आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात झालीच त्याव्यतिरिक्त युद्धाच्या संहारक स्वरूपामुळे जगभर सर्वव्यापी हानी मोठ्या प्रमाणात झाली. पहिल्या महायुद्धावेळी युद्धाचे स्वरूप केवळ लष्करापुरते सीमित होते. लष्करी छावण्या, कारखाने, खाणी, औद्योगिक केंद्रे केवळ युद्धामध्ये लक्ष्य होती. नागरी वस्त्या, मोठी-छोटी शहरे शाबूत होती. युद्धतंत्रही खंदकाचे, समोरासमोर हातघाईचे होते. परंतु दुसऱ्या महायुद्धात युद्तंत्रात मोठा बदल झाला. दुसरे महायुद्ध रणगाड्यांचे युद्ध म्हणून ओळखले जात होते. या युद्धात विमाने, रणगाडे, विविध विध्वंसक बॉम्ब, रॉकेट, अणुबॉम्ब यांचा मुक्तपणे वापर केला गेला. ही शस्त्रे वापरताना कोणतीही माणुसकी कोणत्याही राष्ट्रांनी दाखवली नाही. या अमानुष संहारात विविध वारसा स्थळे, ऐतिहासिक इमारती, वास्तू, वस्तुसंग्रहालये, प्राणी संग्रहालये, दाट नागरीवस्त्या, अमीर, उमराव, सरदारांचे वाडे, गरिबांची घरे, शाळा, सरकारी इमारती, कारखाने, खाणी, ग्रंथालये हेही हल्ल्यामधून सुटले नाही. कारखाने, धान्यकोठारे जमीनदोस्त झाली. जगभरातील प्रत्येक नागरिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष या युद्धात सहभागी झाला.

**४) महायुद्धाचे राजकीय दूरगामी परिणाम :** जपान, जर्मनी, इटलीमधील हुकुमशाही राजवटी दुसऱ्या महायुद्धानंतर संपुष्टात आल्या. महायुद्धात जर्मनीचा सार्वत्रिक पाडाव झालेने हिटलरने आत्महत्या केली. इटलीमध्ये मुसोलिनीची हत्या झाली. जपानमधील हुकुमशाही राजवट मानणाऱ्या टोजो मंत्रिमंडळास राजीनामा द्यावा लागला. परिणामी हुकुमशाहीचा अस्त झाला. विजयी दोस्त राष्ट्रांच्या वसाहतींनी आपापल्या स्वामित्व असलेल्या राष्ट्रांच्या बाजूने भाग घेतलेने विशेषत: आशिया, आफ्रिका खंडामधील मागास जनतेस जर्मनी, इटली, जपानच्या कट्टर राष्ट्रवादाकडे पाहून स्वातंत्र्याची जाणीव झाली. अमेरिकेसारख्या देशानेही या युरोपीय देशांवर राजकीय दबाव आणला. इंग्लंडच्या जागतिक राजकारणामधील निर्विवाद स्थानास मोठा धक्का लागला. फ्रान्सला जर्मनीच्या ताब्यामधून आपली सुटका करून घेण्यासाठी दोस्त राष्ट्रांची मदत घ्यावी लागली त्यामुळे जागतिक राजकारणामधील फ्रांसने महत्वाचे स्थान गमावले. इटलीचेही महत्व घटले.

**५) महायुद्धानंतर जागतिक आर्थिक दुरावस्था :** युद्धात वापरलेल्या युद्धसाहीत्यामुळे लाखो घरे बेचिराख झाली. युद्धामुळे जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा सधन समजल्या जाणाऱ्या देशांनाही जाणवू लागला. त्यामुळे जागतिक स्तरावर सर्वत्र महागाई निर्माण झाली. बेकारी, टंचाई, चलन फुगवटा, हिंसक कारवाया अशी संकटे निर्माण झाली. युद्धग्रस्त देशामधील आर्थिक केंद्रे नष्ट झालेने औद्योगिक उत्पादनावर परिणाम झाला. युद्ध काळात केवळ युद्धोपयोगी साहित्य निर्माण करण्याचे शेकडो कारखाने संपूर्ण युरोपात निर्माण झाले. युद्धा नंतर या कारखान्याचे काय करायचे हा नवीन प्रश्न निर्माण झाला. युध्दकाळात नागरी जीवन असह्य झाले. विशेषत: इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेस उतरती कळा लागली. या युद्धाचा सर्वात जास्त अमेरिकेस मोठा फायदा झाला. प्रत्यक्ष युद्धभूमी अमेरिका नसलेने नागरी फारसे नुकसान झाले नाही. तसेच संपूर्ण दोस्त राष्ट्रांच्या

गरजे तून औद्योगिक उत्पादन दुप्पट-तिपटीने वाढले. त्यामधून आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिका महासत्ता म्हणून उदयास आली.

**६) सामाजिक नवीन समस्या निर्माण :** दुसऱ्या महायुद्धाचे आर्थिक, राजकीय परिणाम मूर्त स्वरूपाचे होते याउलट दृष्टोत्पत्तीस न आलेले सामाजिक परिणाम भयंकर होते. युद्धामधील जीवित व वित्तहानीमुळे मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून गेली. किड्या-मुंग्यासारखी माणसे सतत ५ ते ६ वर्ष ठार झाली. त्यामधून मानवी संवेदना हरवल्या. 'सर्व मानव समान असतात' या फ्रेंच राज्यक्रांतीतून मिळालेल्या नैतिक तत्वास हरताळ फासून ज्यूंचे हत्याकांड, अणुबॉम्बमध्ये लाखो लोक ठार अशा घटना घडल्या. समाजजीवनच विस्कळीत झालेने सामाजिक नितीमुल्ये नष्ट झाली. विशेषत पराभूत राष्ट्रामधील लोकांचे जीवन अत्यंत अस्थिर झाले. केवळ स्वतःपुरतेच पाहण्याच्या दृष्टिकोनामुळे कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था मोडकळीस आली. स्त्री-पुरुष संबंध भौतिक सुधारणामुळे स्वैर झाले. त्यामधून महायुद्धोत्तर नवीन जगाची निर्मिती करताना अनेक मुलभूत समस्या निर्माण झाल्या.

**७) आशिया, आफ्रिका खंडात स्वातंत्र्याची पहाट** : जगात हुकुमशाही नष्ट करून सर्वत्र लोकशाहीची स्थापना करण्यासाठी आम्ही युद्ध करत आहोत अशी घोषणा दोस्त राष्ट्रांनी केली. या घोषणेचा पारतंत्र्यात असलेल्या देशांवर परिणाम झाला. महायुद्धानंतर इंग्लंडची प्रतिष्ठा, लौकिक लयास गेलेने आशिया, आफ्रिका खंडामधील अनेक वसाहती इंग्लंडचे वर्चस्व झुगारून लावण्यास प्रयत्नरत झाल्या. इंग्लंडचेही वसाहतीवरील नियंत्रण ढिले झाले. भारत, सिलोन, ब्रह्मदेश, मलाया, सयाम, इंडोनेशिया हि आशियाई राष्ट्रे आणि आफ्रिकेतील वसाहतीत स्वातंत्र्याच्या चळवळी, आंदोलनांनी मोठा जोर पकडला. युद्धजर्जर राष्ट्रांनी आपल्या वसाहतींवर पुन्हा नियंत्रणाचा प्रयत्न केला. पंतप्रधान चर्चिलने तर 'ब्रिटीश साम्राज्याचा लिलाव पुकारण्यासाठी पंतप्रधान केले नाही' या शब्दात पारतंत्र्यात असलेल्या देशांची मागणी धुडकावून लावली. परंतु जनतेच्या प्रखर लढ्यापुढे इंग्लंडसारख्या बलाढ्य राष्ट्रास मान झुकावावी लागली. तशीच परिस्थिती इंडोनेशियात डचांची आणि इंडोचायनामध्ये फ्रेंचांची होती. या सर्व वसाहतीत स्वातंत्र्याची पहाट उगवली. संयुक्त राष्ट्रसंघानेही महायुद्धा नंतर वसाहती मुक्त करण्याचे धोरण आखले. त्यामुळे महायुद्धानंतर दहा ते पंधरा वर्षात भारत, इंडोनेशिया, इजिप्त, सुदान, लिबिया अशी राष्ट्रे गुलामगिरीतून मुक्त झाली.

**८) लॅटिन अमेरिकेस स्वातंत्र्य प्राप्त :** अमेरिकेने आपल्या देशात निर्माण होणाऱ्या प्रचंड उत्पादनास हक्काची बाजारपेठ म्हणून लॅटिन अमेरिकेचा वापर केला. दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकेने लॅटिन अमेरिकेची आर्थिक पिळवणूक मोठ्या प्रमाणात केली. त्यामधून तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. राष्ट्रवादी शक्ती मोठ्या प्रमाणात निर्माण होवून स्वातंत्र्याची मागणी करू लागल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर या आंदोलनाचा जोर वाढला. त्यामधून इ.स १९४४ नंतर ब्राझील, ग्वाटेमाला, साल्वाडोर येथील हुकुमशाही राजवटी उलथवून टाकण्यात आल्या. त्यामधून इ.स १९४७ नंतर दक्षिण अमेरिकेत सर्वत्र लोकशाहीवादी प्रजासत्ताक राजवटी निर्माण झाल्या.

**९) संयुक्त अरब प्रजासत्ताक स्थापन :** मध्यपूर्व अथवा पश्चिम आशियामध्ये दुसऱ्या महायुद्धामुळे बरीच उलथापालथ झाली. या प्रदेशात जगामधील सर्वात मोठा तेलाचा साठा असलेने युरोपीय राष्ट्रांचे हितसंबंध या भागात गुंतले होते. महायुद्धानंतर अमेरिकेनेही मध्यपूर्वेत तेलाच्या प्रदेशात आपले हितसंबंध जोपासण्यास प्रारंभ केलेने या युरोपीय देशांतर्गत स्पर्धा सुरु झाली. यावेळी पश्चिम आशियामधील सुएझ कालवा आणि तेलाचे अनन्यसाधारण महत्व या अरब राष्ट्रांना समजले. आपल्या प्रदेशात असलेल्या मालमत्तेसाठी परकीय सत्तांशी लढावे लागते यात अरब अस्मितेचा अवमान आहे या भावनेने अरब राष्ट्रे एक झाली त्यामधून अरब संघ निर्माण झाला आणि इजिप्तच्या नेतृत्वाखाली 'संयुक्त अरब प्रजासत्ताक' स्थापन झाले. भविष्यात अनेक छोटी-मोठी युद्धे या तेलाच्या राजकारणामधुन घडून आली.

**१०) इंग्लंड-फ्रांस-जर्मनीचे श्रेष्ठत्व नष्ट :** दुसऱ्या महायुद्धापर्यंत जागतिक राजकारणावर इंग्लंड आणि फ्रान्सचे वर्चस्व होते. परंतु हे स्थान दुसऱ्या महायुद्धानंतर नष्ट झाले. आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांना दुय्यम स्थान मिळाले. फ्रांसची मोठी आर्थिक व मनुष्यहानी झाली. इंग्लंडच्या साम्राज्यावरील सूर्य कधीही मावळत नव्हता त्या इंग्लंडच्या वसाहती स्वातंत्र्य झालेने साम्राज्य आकुंचन पावले आणि प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले. इंग्लंडकडे या वसाहतीकडून दीड-दोनशे वर्ष सुरू असलेला आर्थिक ओघ थांबला. त्यामुळे इंग्लंडची आर्थिक स्थिती खालावली. याविरुद्ध जर्मनीस युरोपच्या राजकारणात वेगळे महत्व होते परंतु जर्मनी पराभूत झालेने विजेत्या राष्ट्रांनी जर्मनीचे चार भाग करून प्रत्येकावर आपले वर्चस्व निर्माण केलेने जर्मनीचे महत्वही नष्ट झाले.

**११) रशिया-अमेरिका नवीन महाशक्तीचा उदय :** इंग्लंड-फ्रांस यांच्या कमकुवततेमधून नवीन महाशक्ती जागतिक स्तरावर निर्माण झाल्या. महायुद्धात प्रचंड जीवित व वित्तहानी घडूनही सोव्हिएत रशिया एक नवीन महासत्ता म्हणून उदयास आली. प्रचंड क्षेत्रफळ, युद्धामधील नुकसानभरपाईपोटी रशियास मोठा लाभ झाला. मोठी हानी घडूनही रशियन अर्थव्यवस्था, उद्योगधंदे यांनी युद्धानंतर मोठा वेग पकडला. मध्य युरोपात कोणतीही प्रभावी सत्ता न राहिलेने रशियाने आपल्या मर्जीतील सरकारे या देशामध्ये निर्माण केली. त्यामधून पोलंड, झेकोस्लोव्हेकिया, युगोस्लाव्हिया, हंगेरी, पूर्व जर्मनी, कोरिया हि राष्ट्रे आपल्या प्रभावाखाली आणली. दुसऱ्या बाजूस अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धात निर्णायक भूमिका बजावली तसेच जागतिक शांतता प्रस्थापित करण्यात मोठे योगदान दिले. प्रचंड आर्थिक व्यवस्थापन, सर्व प्रकारचे सामर्थ्य, प्रचंड संपन्नता, विशाल भूप्रदेश, भक्कम राजकीय भूमिका यामुळे अमेरिका नवीन महाशक्ती म्हणून उदयास आली. थोडक्यात, इंग्लंड-फ्रान्सची जागा भांडवलशाही समर्थक अमेरिकन संयुक्त संस्थाने (अमेरिका) आणि साम्यवादी समर्थक सोव्हिएत रशिया (रशिया) या दोन तुल्यबळ महाशक्ती जागतिक स्तरावर निर्माण झाल्या. आणि पुढे या दोन महासत्तामध्ये शीतयुद्ध घडून आले.

**१२) संरक्षणात्मक करारामधून शीतयुद्धाची तीव्रता :** रशियन साम्यवादी आणि अमेरिकन भांडवलवादी राष्ट्रामध्ये जागतिक वर्चस्वासाठी स्पर्धा सुरू झाली. पूर्व युरोपात दहा ते अकरा देशांचा एक गटच रशिया च्या नेतृत्वाखाली समाजवादी विचारसरणीचा निर्माण झाला. अमेरिकेनेही युरोपच्या राजकारणात आपल्या वर्चस्वासाठी नव्या संघटना निर्माण केल्या. आपापले गट बळकट करण्यास प्रारंभ केला. साम्यवादी आणि

भांडवलवादी राष्ट्रांनी विविध स्वरूपाचे करार केले. युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेसोबत इ.स १९४९ मध्ये नाटो हा संरक्षणात्मक करार केला. साम्यवादास विरोधी सिटो करार घडून आला. तर विरोधी साम्यवादी राष्ट्रांनी वॉर्सा करार केला. एकूणच जग पुंन्हा दोन गटात विभागले जावून मोठ्या संघर्षाचा धोका निर्माण झाला. यामधून शीतयुद्धाची परिस्थिती निर्माण झाली. शीतयुद्ध म्हणजे प्रत्यक्ष युद्धभूमीवरील युद्धाऐवजी वैचारिक व राजकीय तणाव निर्माण झाला परंतु प्रत्यक्ष युद्धाची परीस्थिती निर्माण झाली नाही.

**१३) लोकशाही विचारांना बळकटी व कॉमनवेल्थ संघटना :** दुसऱ्या महायुद्धानंतर जगात बहुतेक देशात लोकशाही राजवटी निर्माण झाल्या. त्यामधून लोकशाही विचार प्रबळ झाले. नव्याने स्वातंत्र्य झालेल्या भारत, श्रीलंका, इंडोनेशिया, केनिया, नायझेरिया अशा राष्ट्रांनी लोकशाही शासनव्यवस्था स्विकारली. जगामधील सर्वात मोठी लोकशाही, संसदीय लोकशाही, राष्ट्राध्यक्षीय लोकशाही अशा नवीन प्रयोगाने लोकशाही ज्यादा भक्कम झाली. तसेच महायुद्धानंतर झालेला महत्वाचा बदल म्हणजे 'ब्रिटीश कॉमनवेल्थचे' कॉमनवेल्थ मध्ये रुपांतर झाले. या कॉमनवेल्थमध्ये भारत, पाकिस्तानसारखी प्रजासत्ताक देश असलेने इंग्लंडचे वर्चस्व नष्ट झाले. केवळ स्वतंत्र आणि समान दर्जाच्या राष्ट्रांची सहकार्यासाठी निर्माण झालेली संघटना केवळ इतकेच या संघटनेचे महत्व राहिले.

**१४) अणुबॉम्ब युगाचा आरंभ व शस्त्र निर्मितीवर मर्यादा :** दुसऱ्या महायुद्धात प्रथमच अणुबॉम्बचा वापर झाला. त्याची भयानक संहारकता संपूर्ण जगाने पाहिली. भविष्यात याहूनही अतिभयंकर शस्त्रे निर्माण झाली. ज्या देशांकडे अणुबॉम्बचा साठा अधिक ते देश संपन्न आणि सामर्थ्यशाली मानले जावू लागले. त्यामुळे रशिया, फ्रान्स, चीन या राष्ट्रातही अणुबॉम्ब निर्मितीचे प्रयत्न सुरू झाले. परंतु दुसऱ्या महायुद्धाची संहारकता पाहून शस्त्र निर्मितीवर मर्यादा घालण्यासाठी नि:शस्त्रीकरण कल्पनेस पाठींबा प्राप्त होवू लागला. अनिर्बंध अण्वस्त्रांच्या निर्मितीवर बंधने घालण्याचे प्रयत्न युनो मार्फत सुरू झाले. परंतु त्यास अद्यापही फारसे यश प्राप्त झाले नाही.

**१५) संयुक्त राष्ट्रसंघ** (UNO) **ची स्थापना :** पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रसंघ स्थापन झाला परंतु याची व्हर्साय तहाशी सांगड घातलेने आणि राष्ट्रसंघामधील त्रुटीमुळे राष्ट्रसंघ अयशस्वी झाला. या दुसऱ्या महायुद्धाची संहारकता संपूर्ण जगाला समजलेने आंतरराष्ट्रीय शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची (United Nations Organization-UNO) ची स्थापना झाली. जग पुन्हा तिसऱ्या महायुद्धाच्या मार्गाने जावू नये म्हणून मूळ राष्ट्रसंघातील दोष दूर करून आंतरराष्ट्रीय स्वरुपाची भक्कम संघटना निर्माण करण्यासाठी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी सॅनफ्रेन्सीको येथे संघाच्या सनदेवर ५० राष्ट्रांनी स्वाक्षरी करून अधिकृतपणे संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन झाला.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१) दुसऱ्या महायुद्धाचा युद्धात सामील असूनही कोणत्या देशास युद्धाचा फायदा झाला?

२) दुसऱ्या महायुद्धानंतर निर्मित संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे नेतृत्व कोणत्या देशाने केले?

३) दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात कोणत्या दोन महासत्ता उदयास आला?

४) शीतयुद्ध म्हणजे काय?

५) कॉमनवेल्थ संघटना म्हणजे काय?

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) दुसऱ्या महायुद्धात सुमारे ...... देश प्रत्यक्ष सहभागी होते.

अ) ५१ ब) ५४ क) ५७ ड) ५९

२) दुसऱ्या महायुद्धातील पराभवानंतर जपानमधील ...... मंत्रिमंडळाने राजीनामा दिला.

अ) क्योटो ब) टोजो क) चेन ड) व्हेन

३) इ.स १९४४ मध्ये अमेरिकेच्या बंधनामधून ..... देश स्वतंत्र्य झाला.

अ) ब्राझील ब) कॅमेरून क) पेरू ड) स्पेन

४) दुसऱ्या महायुद्धानंतर २४ ऑक्टोबर १९४५ रोजी ...... संघटना निर्माण झाली.

अ) राष्ट्र समूह ब) संयुक्त राष्ट्रसमूह क) संयुक्त राष्ट्रसंघ ड) राष्ट्रसंघ

५) युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेसोबत इ.स १९४९ मध्ये हा संरक्षणात्मक करार केला.

अ) वॉर्सा ब) बुक्तो क) सीटो ड) नाटो

## ३.३ सारांश :

पहिल्या महायुद्धानंतर केवळ वीस वर्षामध्ये दुसरे महायुद्ध झाले. युद्द टाळण्यासाठी आणि आपापसातील मतभेद, वादग्रस्त प्रश्न सामंजस्याने सोडवण्यासाठी पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ ही जागतिक संघटना निर्माण झाली. परंतु युरोपात आणि जागतिक स्तरावर शांतता फार काळ टिकू शकली नाही. या कार्यामध्ये राष्ट्रसंघास अपयश आले. वास्तविक पहिल्या महायुद्धानंतर भयानक युद्धे होवू नयेत म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी १४ तत्वे जाहीर केली. परंतु त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली नाही. युरोपात जर्मनी व इटलीमध्ये अनुक्रमे ॲडॉल्फ हिटलर आणि बेनिटो मुसोलिनी या हुकुमशहाचा उदय झाला. आशियामध्ये जपानने आक्रमक धोरण स्वीकारले. यादरम्यान आधुनिक आणि ज्यादा संहारक हत्यारांचा शोध लागला. हुकुमशहांनी केलेल्या या प्रचंड लष्करी तयारीमुळे युद्ध किती विनाशकारी बनू शकेल याची सर्वच राष्ट्रांना जाणीव झाली. त्यामुळे अनेक युरोपीय देशांनी महायुद्ध टाळण्याचा प्रयत्न केला परंतु ते टळले नाही. युरोपात जर्मनीने पोलंडवर केलेल्या हल्ल्या नंतर पोलंडच्या मदतीस इंग्लंड-फ्रास आले आणि पॅसिपिक महासागरामधील वर्चस्वावरून जपान आणि अमेरिकेत संघर्ष निर्माण झाला परिणामी अमेरिकेच्या पर्ल हार्बर या नाविक तळावर हल्ल्यानंतर दुसऱ्या महायुद्धात अमेरिका उतरली आणि खऱ्या अर्थाने हे युद्ध सर्वंकष बनले. पुढे रशियाशी केलेला अनाक्रमनाचा करार मोडून जर्मनीने रशियाविरोधी युद्ध आघाडी उघडली आणि इंग्लंडवर हवाई हल्ले सुरू केले परंतु एकाचवेळी पूर्व, पश्चिम आघाडी आणि आफ्रिका खंडामधील युद्धआघाडीवर लढणे जर्मनीस अशक्य झालेने त्यातच

दोस्त राष्ट्रांनी केलेल्या एकसंध आघाडीमुळे जर्मनीची पीछेहाट होऊ लागली त्यातच इटलीचा दोस्त राष्ट्रांनी पराभव केलेने अक्ष राष्ट्र गटाचे नेतृत्व जर्मनीकडे आले परंतु रशिया, इंग्लंड, फ्रांस, अमेरिका यांनी केलेल्या एकाचवेळी हल्ल्यामुळे जर्मनीची ताकत विभागली परिणामी जर्मनीचा पराभव झाला व ॲडोल्फ हिटलरने आत्महत्या केली.आशिया विभागात जपान लढत राहिले परंतु अमेरिकेने निर्वाणीचा इशारा देऊनही जपानने माघार न घेतलेने अमेरिकेने जगाच्या इतिहासात पहिल्यांदा अणुबॉम्बचा वापर केला. जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉम्ब हल्ला केला. परिणामी जपानने शरणागती पत्करली आणि संहारक दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.

खऱ्या अर्थाने जगाच्या सर्व भागात लढले गेलेले ह्या महायुद्धामुळे मानव जातीच्या इतिहासात सर्वात जास्त संहार घडवून आणला मानवी मुल्यांचा ऱ्हास झाला. जग पुन्हा दोन गटात विभागले गेले. अमेरिका आणि रशिया या दोन महाशक्तीमध्ये शीतयुद्ध सुरू झाले. आशिया, आफ्रिका खंडामधील भारतासहित अनेक पारतंत्र्यात असलेले देश स्वतंत्र झाले. महायुद्धाच्या संहारकतेची जाणीव सर्व जगात झालेने भक्कम संयुक्त राष्ट्रसंघ निर्माण झाला. जगातील बहुतांश देशात लोकशाहीवादी राजवटी अस्तित्वात आल्या. महायुद्धामुळे जगाची नव्याने उभारणी झाली.

## ३.४ पारिभाषिक शब्द :

- संहारक : विनाशक, हानिकारक
- हुकुमशाही : सर्व सत्तेचे केंद्रीकरण एकाच व्यक्ती / संघटनेकडे होणे
- नाविकतळ : युद्ध, व्यापारी जहाजे समुद्र किनारी एकत्रित थांबण्याचे ठिकाण
- नि:शस्त्रीकरण परिषद : संहारक, घातक शस्त्रास्त्रे न वापरण्याविषयी चर्चेसाठी परिषद
- अनाक्रमण करार : परस्परांवर न हल्ला करण्याविषयी केलेला करार, तह

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) व्हर्सायचा तह जर्मनी विरुद्ध दोस्त राष्ट्रे यांच्यात घडून आला.

२) पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी, इटली, तुर्कस्थान, स्पेन, जपान या राष्ट्रांमध्ये हुकूमशाही राजवट निर्माण झाली.

३. जर्मनीमध्ये पहिल्या महायुद्धानंतर नाझी पक्ष सत्तेवर आला.

४. 'आशिया आशियाईसाठी' अशी घोषणा जपानने केली.

५. अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर अणुबाँबचे हल्ले केले.

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) ब) राष्ट्रसंघ २) अ) निशस्त्रीकरण ३) ड) चौदा ४) क) बेनिटो मुसोलीनी

५) क) पोलंड

स्वयं अध्ययन प्रश्न २ ची उत्तरे

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१) शत्रुराष्ट्रांपासून बचावासाठी फ्रांसने सरहद्दीवर मॅझिनी तटबंदी उभारली होती.

२) इ.स. १९४१ मध्ये चर्चिल-रूझवेल्ट यांच्यात अटलांटिक महासागरात एका बोटीवर गुप्त भेट झाली.

३) पॅसिपीक महासागरातील वर्चस्वावरून अमेरिका आणि जपान यांच्यात संघर्ष होता.

४) इ.स. १९३९ मध्ये जर्मनीचा रशियाशी अनाक्रमणाचा करार झाला होता.

५) १४ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या शरणगती नंतर दुसरे महायुद्ध समाप्त झाले.

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) अ) पोलंड २) क) जर्मनी ३) क) विल्स्टन चर्चिल ४) ब) पर्ल हार्बर

५) ड) हिटलर

स्वयं अध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे

अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) दुसऱ्या महायुद्धात सामील होऊनही अमेरिकेचा फायदा झाला.

२) दुसऱ्या महायुद्धानंतर निर्मीत संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे नेतृत्व इजिप्तने केले.

३) दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या दोन महाशक्तींचा उदय घडून आला.

४) शीतयुद्ध म्हणजे प्रत्यक्ष युद्धभूमीवरील युद्धाऐवजी वैचारिक व राजकीय तणाव निर्माण झाला. परंतु प्रत्यक्ष युद्धाची परिस्थिती निर्माण झाली नाही.

५) इंग्लडकडून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचा गट जो स्वतंत्र व समान दर्जाच्या राष्ट्राच्या सहकार्यासाठी निर्माण झालेला गट होय.

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) क) ५७ २) ब) टोजो ३) अ) ब्राझील ४) क) संयुक्त राष्ट्रसंघ

५) ड) नाटो

### ३.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न : अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) दुसऱ्या महायुद्धाची कारणमीमांसा स्पष्ट करा.

२) दुसरे महायुद्धाची सुरवात आणि घटनाक्रम सांगा.

३) दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामांची विस्तृत चर्चा करा.

ब) टिपा लिहा.

१) राष्ट्रसंघाचे अपयश

२) जर्मनीतील हुकुमशाही

३) व्हर्सायचा तह

४) पर्ल हर्बरवर जपानचा हल्ला

५) जर्मनीचा इंग्लंडवरील हल्ला

६) जपानवरील अणुबॉम्ब हल्ला

७)अटलांटिक सनद

८) संयुक्त राष्ट्रसंघ

### ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) आधुनिक जग : डॉ सुमन वैद्य

२) आधुनिक जग भाग २ : गायकवाड, कदम, थोरात

३) द्वितीय महायुद्धोत्तर जग : य.ना. कदम

४) विसाव्या शतकातील जगाचा इतिहास : प्राचार्य कदम य. ना.

५) आधुनिक युरोपचा इतिहास (१७८९ ते १९४५ ) : प्राचार्य कदम य. ना., डॉ अकलूजकर लता

६) History of Modern World : H K Chhabra

७) Modern Europe Up to १९४५ : C D Hazew

८) The Second World War : A J P Tayler

९) World History : R S Chaurasia

१०) A Simple History of the World : K L Khurana


❑❑❑

## घटक ४
# संयुक्त राष्ट्र संघटना (१९४५)
## (United Nations Organisation UNO)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ स्थापना आणि उद्दिष्टे

 ४.२.२ संघटना संरचना आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाखा

 ४.२.३ जागतिक शांतता राखण्यामधील संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला;

- संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्व सांगता येईल.
- आधुनिक जगाच्या इतिहासातील संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका लक्षात येईल.
- जागतिक शांतता निर्माण करण्यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचे योगदान समजून घेता येईल.
- जागतिक शांततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघाची असणारी गरज विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल.
- संयुक्त राष्ट्रसंघाची संरचना आणि शाखांचा अभ्यास करता येईल.
- जागतिक शांततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघाने केलेले कार्य समजून घेता येईल.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या अपयशांच्या कारणांचे आकलन करता येईल.
- जागतिक शांततेच्या दृष्टिकोनातून संयुक्त राष्ट्रसंघाने घेतलेल्या भूमिकेचा अन्वयार्थ स्पष्ट करता येईल.
- विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय प्रश्न समस्या आणि करार विद्यार्थ्यांना समजून येतील.
- जागतिक मानवी एकात्मतेचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांच्या निर्माण करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक:

आधुनिक काळातील साम्राज्यवाद, वसाहतवाद, लष्करवाद यामधून युरोपमध्ये सत्ता स्पर्धा निर्माण झाली. विशेषत: नेपोलियनच्या बोनापार्टच्या अत्यंतिक महत्त्वकांक्षापोटी युरोपमध्ये युद्धास सुरुवात झाली. अनेक देश हे नेपोलियनचे भक्ष बनले. शेवटी नेपोलियनच्या या महत्त्वकांक्षेस इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, रशिया आणि प्रशिया यांनी संघटित होऊन इसवी सन १८१५ मध्ये नेपोलियनचा पराभव केला. त्यामुळे युद्धास कंटाळलेल्या सर्वच लोकांना शांततेची गरज भासू लागली. शांतता, सुव्यवस्था टिकवण्यासाठी आणि शांततेचा भंग करू पाहणाऱ्या राष्ट्राला शासन करण्यासाठी एखाद्या प्रबळ संघटनेची नितांत आवश्यकता होती. या भूमिकेतून विविध संघ आणि संघटना या काळात अस्तित्वात आल्या. उदा. रशियाच्या झारने स्थापन केलेला पवित्र संघ, ऑस्ट्रेलिया, रशिया, फ्रान्स, इंग्लंड यांचा चतु:संघ तसेच कन्सेप्ट ऑफ युरोप वरील सर्व संघटनांना म्हणावे तसे यश प्राप्त झाले नाही. त्याचा परिणाम म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीस घडून आलेली दोन जागतिक महायुद्धे होत. विशेषत: या युद्धामध्ये वापरलेली महाभयंकर सहांरकशस्त्रे यांनी मानवी जीवनावर आणि संस्कृतीवर जबरदस्त आघात केलेला होता. ज्यामुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. या युद्धांनी लष्कराचाच नाही तर अनेक निष्पाप लोकांचा बळी घेतला. युद्धामध्ये वापरण्यात आलेली अणुबॉम्बसारखी संहारक शक्ती जगाने प्रथमच पाहिली होती. तसेच अमेरिका आणि रशिया यांच्यातील सुरू असलेले शीतयुद्ध आणि शस्त्रास्त्र स्पर्धा यामुळे संपूर्ण जागतिक परिस्थिती ही स्फोटक बनली होती. या काळात मानवी जीवनातील सुख, समृद्धी, शाश्वती आणि शांती नाहीशी होऊन त्यांची जागा भीती, अस्थिरता, अस्वस्थता आणि ताण-तणाव यांनी घेतली होती. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय शांतता निर्माण करणारी एखादी तरी संघटना असावी या दृष्टिकोनातून विचार विनिमय सुरू झाले होते. कारण युद्धपूर्व काळातील राष्ट्रगट, लष्करी सामर्थ्य, तह, करारनामे इत्यादी गोष्टी या शांतता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून निष्क्रिय ठरल्या होत्या. म्हणून एखादी आंतरराष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रा-राष्ट्रातील प्रश्न समंज्यसपूर्वक आणि तडजोडीने सोडवून सलोखा निर्माण करणाऱ्या एखाद्या संघटनेची किंवा यंत्रणेची गरज राष्ट्रांना भासू लागली. त्यामधूनच १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाचा अर्थात युनोचा जन्म झाला.

सदर घटकांमध्ये जागतिक शांतता आणि सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून झालेली संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना, तिची उद्दिष्टे, संयुक्त राष्ट्रसंघाची संरचना, जागतिक स्तरावरील तिच्या शाखा आणि संयुक्त राष्ट्रसंघाची जागतिक शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्यामध्ये असणारी भूमिका तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या अपयशांची आणि उणीवांची चर्चा या घटकांमध्ये करण्यात आलेली आहे.

## ४.२ विषय विवेचन:

पहिल्या जागतिक महायुद्धानंतर जगामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी विड्रो विल्सन यांच्या पुढाकाराने राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात करण्यात आली. पण राष्ट्रसंघाकडे बंडखोर राष्ट्रांना नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा नव्हती. शिवाय राष्ट्रसंघातील निर्णय हे सर्वानुमते घ्यावे लागत

असल्याकारणाने राष्ट्रसंघ सर्वच आघाड्यावरती अपयशी ठरलेला होता. ज्यामुळे दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला आणि जागतिक शांततेचा व मानवी सहजीवनाचा प्रश्न निर्माण झाला. दुसऱ्या महायुद्धाची तीव्रता ही पहिल्या महायुद्धापेक्षा कितीतरी पटीने अधिक होती. तसेच या युद्धामध्ये वापरण्यात आलेली महाभयंकर संहारक शस्त्रांनी लष्करी शक्ती बरोबरच मानवी जीवनातील मूल्ये ही नष्ट केली. हजारो निष्पाप लोकांचा यामध्ये बळी गेला. अशा परिस्थितीत जगातील लोकशाही टिकवण्यासाठी लोकशाहीवादी विचारांचे देश एकत्र आले व त्यांनी जागतिक शांततेच्या अनुषंगाने विचार करण्यास सुरुवात केली. त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा विचार मांडला तसेच संयुक्त राष्ट्रसंघ हा पूर्वीच्या राष्ट्रसंघाप्रमाणे अल्पजीवी ठरणार नाही याची खबरदारी घेतली. त्याचबरोबर एक तृतीयांश बहुमताने संयुक्त राष्ट्रसंघाचे निर्णय घेण्याची व्यवस्था करण्यात आली. बंडखोर राष्ट्रांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये निर्माण झालेली अशांतता, अस्वस्थता, अस्थिरता कमी करून चर्चेच्या आणि तडजोडीच्या मार्गाने राष्ट्र-राष्ट्रातील प्रश्न सोडवण्याची भूमिका पुढील काळात संयुक्त राष्ट्रसंघाने घेतलेली दिसून येते. ज्याचा परिणाम म्हणजे पुढील काळामध्ये अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न सोडवण्यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. तसेच आपली स्वतःची स्वतंत्र संरचना निर्माण केली. नवीन शाखांची निर्मिती करुन जागतिक समतोल राखण्याचा प्रयत्न केला. असे असले तरी काही बाबतीमध्ये संयुक्त राष्ट्रसंघास अपयश आले. त्याच्याकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही.

### ४.२.१ स्थापना आणि उद्दिष्ट्ये:

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाच्या अपयशामुळे दुसरे जागतिक महायुद्ध घडून आले. दुसऱ्या महायुद्धातील जीवित आणि वित्तीय हानी पहाता लोकशाही राष्ट्रांना एका सक्षम संघटनेची गरज भासू लागली. त्यातूनच इंग्लंड, रशिया आणि अमेरिका या राष्ट्रांनी युद्धोत्तर जगाची पुनर्रचना करण्याच्या दृष्टीने तसेच जगात शांतता टिकवण्यासाठी प्रयत्न सुरू केला होता. यामधूनच अटलांटिक महासागरातील एका आगबोटीवर एका गुप्त बैठकीतून संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा जन्म झाला. या बैठकीसाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट आणि इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी सहभाग घेऊन या बैठकीला अटलांटिक सनद म्हणून जाहीर केले व शांतता आणि सुरक्षिततेच्या दिशेने प्रयत्न सुरू ठेवले.

अटलांटिक सनद याचा स्वीकार प्रथमता अमेरिका, रशिया, इंग्लंड, चीन या दोस्त राष्ट्रांनी केला. त्याचबरोबर इतर बावीस राष्ट्रांनी सुद्धा तिचा स्वीकार केला. पुढे दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा पराभव निश्चित झाला असताना विस्टन चर्चिल, फ्रँकलिन डी. रुझवेल्ट आणि स्टॅलिन या तीन प्रमुख नेत्यांनी फेब्रुवारी, १९४६ मध्ये याल्टा परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाची रूपरेषा निश्चित केली. २६ जून, १९४५ रोजी जगातील ५१ राष्ट्रांचे सुमारे चौदाशे प्रतिनिधी अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को या ठिकाणी एकत्र जमले व त्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेवर सह्या केल्या आणि परिषदेत घेतलेल्या निर्णयाच्या आधारे २४ ऑक्टोबर, १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघटनेचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क या ठिकाणी आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे:**

संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

- जगामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता निर्माण करणे.
- समान हक्क आणि स्वयंम तत्त्वांचा स्वीकार केलेल्या देशांमधील मैत्री संबंध वाढवणे.
- देशा-देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक तसेच मानवी कल्याणाच्या दृष्टिकोनातून आवश्यक त्या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करणे.
- जगातील राष्ट्रांना एकमेकांच्या हक्क आणि स्वातंत्र्याचा आदर करण्यास मदत करणे.
- गरीब लोकांचे जीवनमान सुधारणे.
- भूक, रोगराई व निरक्षरता कमी करण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एकमेकांना सहकार्य करणे.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर सुलभ कायदा सुव्यवस्था निर्माण करणे.
- दुष्काळ, नैसर्गिक संकट आणि युद्धाच्या काळात मानवतेच्या भूमिकेतून सहकार्य करणे.
- सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी प्रोत्साहन देणे.
- पर्यावरणाचे संवर्धन करणे.
- मानव अधिकाराचे संरक्षण करणे इत्यादी.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्यासमोर सात महत्वपूर्ण तत्त्वे ठेवली आहेत. ती खालील प्रमाणे

- सर्व सभासद राष्ट्रांचे सार्वभौमत्व एकसमान असेल.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेची बंधने सर्व सभासद राष्ट्रांनी प्रामाणिकपणे पालन करणे.
- सभासद राष्ट्रांनी स्वतःचे आंतरराष्ट्रीय प्रश्न, तंटे समोपचारच्या मार्गाने सोडवणे.
- सर्व सभासद राष्ट्रांनी विघातक आणि विसंगत अशा मार्गापासून दूर राहणे.
- संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यात सर्वांनी सहकार्य करणे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाचे आदेश न मानणाऱ्या किंवा ज्याच्याविरुद्ध कृती केली जाईल अशा राष्ट्रांना सहकार्य न देणे.
- संयुक्त राष्ट्राचे सभासद नसणारी राष्ट्रे शांतता सुरक्षितेला धोका पोहोचवणार नाहीत यावर लक्ष ठेवणे.
- कोणत्याही देशाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करणे इत्यादी.

संयुक्त राष्ट्रसंघाची वरील उद्दिष्टे म्हणजे शांततामय सह-जीवनावर दिलेला भर असून यासाठी राष्ट्रा-राष्ट्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्य महत्त्वाचे होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील समस्या सोडवण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आलेली होती. जगातील सर्वच राष्ट्रांनी या संस्थेचे सदस्यत्व स्वीकारावे व वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहकार्य करावे हे अपेक्षित होते. तथापि काही सभासद राष्ट्रे स्वतःच्या स्वार्थाला मुरड घालण्यात अपयशी ठरलेली दिसून येतात. संयुक्त राष्ट्रसंघातील महत्त्वाची बाब म्हणजे अणुशक्तीवरती

नियंत्रण प्रस्थापित करणे होय. यासाठी राष्ट्रा-राष्ट्रांतर्गत अण्वस्त्रबंदी करार होणे गरजेचे होते. या दृष्टिकोनातून अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये झालेला अणुशक्ती नियंत्रण करार म्हणजेच दोन राष्ट्रांमधील अण्वस्त्रबंदी संदर्भात केला गेलेला 'मास्को करार' हा अत्यंत महत्वपूर्ण आणि उल्लेखनीय असा आहे. अमेरिका-रशिया यांचे अपवादात्मक उदाहरण सोडले तर जगातील इतर देश अणवस्त्रबंदी करार करतील हे आज तरी ठामपणे सांगता येत नाही. त्यामुळे भविष्य काळात तिसरे जागतिक महायुद्ध होऊ शकणार नाही. याविषयी आजच्या घडीला भाष्य करता येणार नाही.

- **स्वयं अध्यनासाठी प्रश्न: १**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) अटलांटिक सनदेचा स्वीकार प्रथम अमेरिका, रशिया, इंग्लंड आणि ............. या देशाने केला.

अ) चीन ब) जपान क) भारत ड) फ्रान्स

२) ............. रोजी संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली.

अ) २५ एप्रिल, १९४५ ब) २६ ऑक्टोबर क) १९४५ २५ जून ड) २४ ऑक्टोबर, १९४५

३) संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्यालय ............. या ठिकाणी आहे.

अ) न्यूयॉर्क ब) पॅरिस क) हेग ड) लंडन

४) मास्को करार .............या दोन देशांच्या दरम्यान झाला.

अ) अमेरिका-रशिया ब) अमेरिका-फ्रान्स क) रशिया-चीन ड) इंग्लंड-चीन

५) ..........परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

अ) याल्टा ब) माल्टा क) सॅनफ्रान्सिस्को ड) जिनेव्हा

## ४.२.२ संघटना संरचना आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाखा:

**सदस्यत्व:**

संयुक्त राष्ट्रसंघाची सनद तयार करणार्या राष्ट्रांच्यावर महत्वपूर्ण जबाबदारी होती. जागतिक शांतता आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सर्वच सभासद देशांना समान पातळीवरती आणणे तसेच सर्व राष्ट्रांचे सार्वभौमत्व अबाधित राखून समानता प्रस्थापित करणे गरजेचे होते. त्यादृष्टीने सर्वच राष्ट्रांनी समानता या तत्त्वाचा स्वीकार केला असला तरी प्रत्यक्षात लष्करीदृष्ट्या सर्वच देश एकाच पातळीवर येऊ शकत नव्हते. म्हणून जागतिक समस्या सोडवण्यासाठी तसेच युनोवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठ्या राष्ट्रांचे सहकार्य आवश्यक होते. या दृष्टीने ११ राष्ट्रांचे एक सुरक्षा मंडळ स्थापन करण्यात आले. तसेच यासाठी महत्वपूर्ण पाच मोठ्या राष्ट्रांचे सहकार्य व अनुकूलता प्राप्त होणे गरजेचे मानले गेले. त्यामुळे बड्या राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. उदाहरणार्थ अमेरिका, रशिया, इंग्लंड, चीन इ. सर्व सभासद

राष्ट्रांना समान अधिकार देण्यासाठी आमसभेची निर्मिती करण्यात येऊन आमसभेमध्ये सर्वच लहान मोठ्या राष्ट्रांना समान प्रतिनिधित्व व अधिकार देण्यात आले.

संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व हे ऐच्छिक स्वरूपाचे आहे. सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी काही अटींची पूर्तता करावी लागते. ज्या राष्ट्रांनी इसवी सन १९४५ साली भरलेल्या सॅनफ्रान्सिस्को परिषदेमध्ये भाग घेतला होता. किंवा ज्यांनी इसवी सन १९४२ च्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेस मान्यता दिली होती. अशा राष्ट्रांना संस्थापक सदस्यत्वाचा हक्क प्राप्त झाला होता. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेमधील अटी पूर्ण करू शकणाऱ्या व सुरक्षा समितीला खात्री वाटणाऱ्या एखाद्या राष्ट्राच्या सदस्यत्वाबद्दलचा निर्णय घेण्यासंदर्भात आमसभेकडे शिफारस केली जाते. आमसभेतील सदस्यांनी दोन-तृतीयांश बहुमताने त्यास मान्यता दिल्यास, त्या राष्ट्राला संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व प्राप्त होते. प्रत्येक सदस्य राष्ट्राला आमसभेत एक जागा असते. युनोचे सदस्यत्व केवळ सार्वभौमत्व असणाऱ्या देशालाच मिळू शकते. आजच्या घडीला व्हॅटिकन सिटी हा छोटासा देश युनोचा सदस्य नाही. वरील पद्धतीनुसार जसे एखाद्या राष्ट्राला सदस्यत्व प्राप्त होते. तसेच ते रद्द देखील करता येते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अर्थात युनोच्या स्थापनेच्या वेळी सभासद राष्ट्रांची संख्या ही ५० इतकी होती. आज ही संख्या १९३ इतकी झालेली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख घटक:

१) आमसभा

२) सुरक्षा समिती

३) आर्थिक आणि सामाजिक समिती

४) विश्वस्त समिती

५) आंतरराष्ट्रीय न्यायालय

६) सचिवालय

**१) आमसभा (General Assembly):**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या वरील सहा प्रमुख घटकांपैकी आमसभा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कारण आमसभेमध्ये प्रत्येक राष्ट्राला समान दर्जा देण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक राष्ट्राला पाच प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार असून प्रत्येक सदस्याला एका मताचा अधिकार देण्यात आलेला आहे. यामुळे कोणतेही राष्ट्र लहान असो अथवा मोठे आमसभेमध्ये प्रत्येकाला समान प्रतिनिधित्व देऊन समानता प्रस्थापित करण्यात आलेली आहे. आमसभेचे अधिवेशन वर्षातून एकदाच होत असते. विशेषत: सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी आमसभेच्या अधिवेशनास प्रारंभ होतो आणि ते डिसेंबरमध्ये पूर्ण होते. सुरक्षा मंडळाच्या विनंतीनुसार सेक्रेटरी जनरल आमसभेचे खास अधिवेशन बोलवू शकतात. तसेच बहुसंख्य सभासदांनी मागणी केल्यास आमसभेचे खास अधिवेशन बोलवण्यात येते. सर्व साधारणपणे बहुमताच्या

जोरावर निर्णय घेतले जातात. एखाद्या राष्ट्राच्या विरोधात शस्त्रबळाचा वापर करायचा की, नाही या संदर्भातील निर्णय मात्र दोन तृतीयांश बहुमताने घेतले जातात.

**आमसभेची कामे:**

१) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी उपाययोजना सुचविणे.

२) आर्थिक सामाजिक सहकार्य करणे.

३) संयुक्त राष्ट्रसंघाचा अर्थसंकल्प सांभाळणे.

४) विश्वस्त समितीच्या कामकाजावर देखरेख ठेवणे.

५) संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्यत्व देणे, सभासदत्व रद्द करणे अथवा एखाद्या राष्ट्राला राष्ट्रसंघातून काढून टाकणे इत्यादी.

६) आंतरराष्ट्रीय कायद्यांची अंमलबजावणी करणे.

७) निशस्त्रीकरण तसेच शस्त्रास्त्र वापरावरती नियंत्रण ठेवणे.

८) संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याचा आराखडा तयार करणे.

९) सुरक्षा मंडळातील अस्थायी सदस्यांची निवड करणे.

१०) संयुक्त राष्ट्रसंघाशी संलग्नित संस्थांचे अहवाल तपासणे.

११) संयुक्त राष्ट्रसंघाच्या घटनेमध्ये बदल अथवा दुरुस्ती सुचवणे इत्यादी.

वरील प्रमाणे आमसभेची महत्त्वपूर्ण कर्तव्य आहेत. युनोचे मुख्य कार्यालय न्यूयॉर्क येथे असून उपकार्यालय जिनेव्हा येथे आहे. या कार्यालयांच्यावरती युनोचे नियंत्रण आहे. नॉर्वेचे ट्रीग्वेली हे युनोचे पहिले जनरल सेक्रेटरी होते. त्यांच्यानंतर डाग हॅमरशील्ड, उ. थांट यांनी जनरल सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. सध्या १ जानेवारी, २०२२ पासून पोर्तुगालचे अँटोनिया गुटेरेस हे जनरल सेक्रेटरी (महासचिव) म्हणून काम पाहत आहेत.

### २) सुरक्षा समिती (Security Council):

सुरक्षा समिती म्हणजे युनोचे कार्यकारी मंडळ होय. आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता, सुव्यवस्था राखण्याची प्रथम जबाबदारी या मंडळाची आहे. जागतिक शांततेचा विचार करण्यासाठी १९४४ मध्ये डंबर्टन ओक्स या ठिकाणी भरलेल्या परिषदेत जगातील प्रमुख राष्ट्रांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. त्यानुसार अमेरिका, रशिया, इंग्लंड, चीन राष्ट्रांना कायमचे सदस्यत्व प्राप्त झाले. तसेच पुढे जाऊन १९४५ मध्ये फ्रान्सला कायमचे सदस्यत्व देण्यात आल्याने कायमस्वरूपी सदस्य संख्या ही पाच इतकी झाली असून इतर दहा सदस्य हे हंगामी स्वरूपाचे आहेत. यामध्ये आजच्या घडीला अल्जेरिया, इक्विडोर, गयाना, जपान, माल्टा, मोझांबिक, सिएरा सिलोन, स्लोव्हेनिया, दक्षिण कोरिया आणि स्वित्झर्लंड यांचा समावेश आहे. असे एकूण सुरक्षा समितीमध्ये १५ सदस्य आहेत. यापैकी हंगामी सदस्यांची निवड ही दर दोन वर्षासाठी केली जाते.

भौगोलिकदृष्ट्या सुरक्षा समितीमध्ये वेगवेगळ्या भागातील देशांना प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे. त्यानुसार आफ्रिकन देश (३) आशिया-पॅसिफिक देश (४) पूर्व युरोपियन देश (२), लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन देश (२), पश्चिम युरोपियन आणि इतर देश (५) याप्रमाणे सदस्यत्व देण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

सुरक्षा समितीची आठवड्यातून एकदा बैठक होत असते. त्यामुळे सुरक्षा समितीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. याव्यतिरिक्त सुरक्षा समितीमध्ये एखाद्या निर्णयासाठी किमान ८ मतांची आवश्यकता असते. यातील प्रमुख कायमस्वरूपी सदस्यत्व असणाऱ्या ५ राष्ट्रांचे मत निर्णायक मानले जाते. कारण यातील एखाद्या राष्ट्राने जरी स्वतःचा व्हेटो (Veto) म्हणजेच नकाराधिकार वापरला तर तो विषय किंवा ठराव तहकूब केला जातो. अशा तऱ्हेने आतापर्यंत स्वतःचा नकाराधिकार वापरून सुरक्षा मंडळांकडून एकूण ९९८ ठराव फेटाळून लावण्यात आले आहेत. रशियाने आतापर्यंत सर्वात जास्त वेळा नकाराधिकार वापरला आहे. विशेषतः भारताच्या काश्मीर प्रश्नाबाबत हा अधिकार वापरून रशियाने भारताची बाजू उचलून धरली होती. तर १८ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत सुरक्षा समितीने २,७५२ ठराव पारित केले आहेत. सुरक्षा परिषदेचे हे ठराव कायदेशीर बंधनकारक असतात. भारत सुरक्षा परिषदेचा आत्तापर्यंत आठ वेळा सदस्य राहिलेला आहे.

**सुरक्षा समितीची कामे (Security Council):**

संयुक्त राष्ट्रसंघाची सुरक्षा समिती ही महत्त्वपूर्ण समिती असून तिची कामे खालील प्रमाणे आहेत.

१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितेची जबाबदारी या समितीवर असते. त्यामुळे योग्य त्या उपाय-योजनांची शिफारस आमसभेस करणे.

२) युनोच्या सदस्य राष्ट्रांच्या शस्त्रास्त्रवाढीवर नियंत्रण अथवा निर्बंध घालण्यासंदर्भात आमसभेस सुचविणे.

३) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेला धोका पोहोचवणाऱ्या कृत्यांचे निर्धारण करणे.

४) आंतरराष्ट्रीय संघटना तसेच आंतरराष्ट्रीय संधी-करार यांच्यामध्ये मध्यस्थीची भूमिका पार पाडणे.

५) आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग करणाऱ्या राष्ट्राला समज देणे. अथवा शस्त्रबळाचा वापर करून नियंत्रण प्रस्थापित करणे.

६) बंडखोर राष्ट्रास आर्थिक नाकेबंदी तसेच बहिष्कार व प्रसंगी लष्करी कारवाईच्याद्वारे नियंत्रणात आणणे.

७) विश्वस्त राष्ट्रांच्या ताब्यातील प्रदेशावर नियंत्रण मिळवणे.

८) आंतरराष्ट्रीय विवादांचे निराकरण करणे. त्यासाठी प्रसंगी बळाचा वापर करणे.

९) शांतता मोहिमेची स्थापना करणे. तसेच त्यासंदर्भात सदस्य राष्ट्रांना शिफारशी करणे.

१०) आपल्या समितीच्या कार्याचा अहवाल आमसभेस सादर करणे इत्यादी.

### ३) आर्थिक व सामाजिक समिती (Economic and Social Council):

संयुक्त राष्ट्रसंघाची ही समिती आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि आरोग्य विषयक तसेच मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्याशी संबंधित आहे. समितीचे मुख्यालय न्यूयॉर्क या ठिकाणी असून या समितीची सभा दरवर्षी जुलै महिन्यामध्ये होते. तिचे कामकाज चार आठवडे चालते. सुरुवातीस या समितीतील सदस्यांची संख्या ही १८ इतकी होती. १९६३ मध्ये ती २७ झाली तर आज घडीला सदस्य संख्या ही ६४ इतकी असलेली दिसून येते. या समितीची निवड ही तीन वर्षासाठी आमसभेकडून केली जाते. त्यापैकी एक तृतीयांश सभासद हे दरवर्षी निवृत्त होत असतात.

जागतिक आर्थिक, सामाजिक विषमता कमी करणे हा या समितीचा मुख्य उद्देश आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर विविध देशांच्यामध्ये आर्थिक तसेच सामाजिक, राजकीय विषमता हा एक गंभीर प्रश्न निर्माण झालेला होता. या विषमतेचे निर्मूलन करून सामाजिक संतुलन निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय स्तरावरती युनोची ही समिती काम करत असते. मानवी आरोग्य, शिक्षण कामगारांचे प्रश्न, व्यापार, उद्योग, व्यवसाय इत्यादी प्रश्नांच्यावरती विचार-विनिमय करून त्या संदर्भात असणाऱ्या अडचणी किंवा समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करते. या समितीच्या अंतर्गत अनेक उपसमित्या नेमलेल्या असतात. त्यामध्ये शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संस्था या महत्त्वपूर्ण आहेत. या समितीलाच युनेस्को (UNESCO) असेही म्हटले जाते.

**सामाजिक व आर्थिक समितीची कामे:**

१) शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आराखडा तयार करणे.

२) आंतरराष्ट्रीय सहकार, सद्भावना या संदर्भात अनुकूल वातावरण निर्माण करणे.

३) संयुक्त राष्ट्रसंघाच्या इतर १४ समित्यांच्या आर्थिक, सामाजिक कामकाजांचे नियोजन करणे.

४) संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समस्यावर शिफारस करणे.

५) आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी काम करणे इत्यादी.

### ४) विश्वस्त समिती (Trusteeship Council):

ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक प्रमुख समिती असून या समितीची स्थापना 'विश्वस्त' प्रदेशातील रहिवाशांच्या हितासाठी तसेच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्यासाठी ही समिती तयार केली आहे. या समितीला ट्रस्टीशिप कौन्सिल (UNTC) असेही म्हणतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रमुख सहा घटकांपैकी ही एक प्रमुख समिती म्हणून काम करते. विश्वस्त प्रदेशांच्या प्रशासनावर देखरेख ठेवणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे. या समितीच्या स्थापनेपाठीमागील मुख्य उद्देश म्हणजे पहिल्या महायुद्धानंतर जे देश पराभूत झाले अशा राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या वसाहती 'विश्वस्त' म्हणून विजय राष्ट्रांच्याकडे सोपवण्यात आल्या होत्या. विजयी राष्ट्रांनी या वसतींच्यावरती आपले वर्चस्व निर्माण न करता केवळ 'विश्वस्त' म्हणून काम पहावे एवढीच अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात ही गोष्ट अमलात आणत असताना

विश्वस्त देशांनी आपल्या वर्चस्वाखाली असणाऱ्या वसाहतींचे शोषण केले. तसेच त्यांनी राष्ट्रसंघाला जुमानले नाही. राष्ट्रसंघाच्या बाबतीतील हा अनुभव लक्षात घेता दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने मात्र या कामासाठी आपली स्वतःचीच 'विश्वस्त समिती' नेमली आहे. कारण जगामध्ये बरीच राष्ट्रे आणि बऱ्याच मानवी जाती या मागासलेल्या अवस्थेमध्ये आहेत. त्यांना प्रगत राष्ट्रांच्या पातळीवरती आणण्याची जबाबदारी ही युनोने विश्वस्त समितीकडे सोपवली आहे. तसेच या कार्याची जबाबदारी वेगवेगळ्या देशांच्याकडे या समितीने दिलेली आहे.

**विश्वस्त समितीमध्ये तीन प्रकारचे सदस्य असतात.**

१) विश्वस्त म्हणून ज्यांच्याकडे वसाहती सोपवलेल्या आहेत ते या समितीचे पदसिद्ध सदस्य असतात. उदाहरणार्थ ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, फ्रान्स, न्यूझीलंड, अमेरिका आणि इटली.

२) ज्यांच्याकडे या योजनेखाली वसाहती नाहीत परंतु जे सुरक्षा समितीचे कायम सदस्य आहेत असे सदस्य उदाहरणार्थ चीन आणि रशिया.

३) आमसभा काही सदस्यांची निवड ही तीन वर्षासाठी करते असे पाच सभासद या मंडळावर असतात.

**विश्वस्त समितीची कामे:**

१) विश्वस्त प्रदेशांचा कारभार ज्या सभासद राष्ट्रांच्याकडे सोपवलेला आहे त्यांच्याकडून आलेल्या अहवालावरती चर्चा करणे.

२) विश्वस्त प्रदेशास भेटी देऊन तेथील विकासाची आणि प्रगतीची पाहणी करणे.

३) विश्वस्त प्रदेशातील राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा अहवाल आल्यानंतर त्या अनुषंगाने प्रश्नावली तयार करणे.

४) तसेच विश्वस्त प्रदेशातून आलेल्या अर्जांचा विचार करून त्यावर उपाययोजना करणे इत्यादी.

### ५) आंतरराष्ट्रीय न्यायालय (International Court of Justice):

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सहा घटकांच्या पैकी एक प्रमुख घटक म्हणजे आंतरराष्ट्रीय न्यायालय होय. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना जून १९४५ मध्ये करण्यात आली. तर एप्रिल १९४६ पासून कामकाजाला सुरुवात झाली. या न्यायालयाच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार राज्यांनी सादर केलेल्या कायदेशीर बाबी किंवा तंटे यांचे निराकरण करणे. हे या न्यायालयाचे मुख्य काम आहे. तसेच कायदेशीर प्रश्नावर सल्लागार मत देणे हे ही या न्यायालयाचे काम आहे. या न्यायालयाची मुख्य कचेरी नेदरलँड मधील हेग या शहरात पीस पॅलेस येथे आहे. या न्यायालयात एकूण १५ न्यायाधीश असून त्यांची निवड सुरक्षा समितीच्या शिफारसी ने आमसभेकडून नऊ वर्षासाठी केली जाते. न्यायालयाच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड न्यायालयातील १५ न्यायाधीश मिळून करतात. त्यांची मुदत तीन वर्षासाठी असते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कामकाज चालवण्यासाठी १५ पैकी किमान नऊ न्यायाधीश उपस्थित

असणे आवश्यक आहे. भारताचे नागेंद्र सिंह आणि दलवीर भंडारी यांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्य केले आहे. सध्या ६ फेब्रुवारी, २०२४ पासून आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अध्यक्ष म्हणून नवाफ सलाम (लेबनॉन) तर उपाध्यक्ष म्हणून ज्युलिया सेबुटिंडे (युगांडा) हे काम पाहत आहेत.

**आंतरराष्ट्रीय न्यायालयाची कामे:**

१) राष्ट्रा-राष्ट्रामधील असणारा संघर्ष आणि वाद सोडवणे.

२) आंतरराष्ट्रीय कायदा तसेच प्रचलित रूढी आणि कायद्याची मूलभूत तत्वे यांच्या सहाय्याने एखाद्या तंट्याबाबत निर्णय घेणे.

३) संयुक्त राष्ट्रसंघ तसेच तिच्याशी संलग्नित संस्थांना कायदेशीर सल्ला देणे इत्यादी.

प्रत्येक सभासद राष्ट्रावर युनोच्या सनदेचे पालन करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे न्यायालयाचे निर्णय सुद्धा बंधनकारक आहेत. एखाद्या राष्ट्राने न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी केली नाही तर दुसऱ्या पक्षाला सुरक्षा मंडळाकडे न्यायासाठी धाव घेता येते. अशाप्रसंगी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा समितीला यामध्ये लक्ष घालणे भाग पडते.

**६) सचिवालय (Secretariat):**

युनोचे सचिवालय म्हणजे कार्यकारी शाखा असून ते अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरात आहे. येथील चार हजार नोकरवर्ग युनोचा कारभार पाहत असतो. त्यांच्या प्रमुखास महासचिव (जनरल सेक्रेटरी) असे म्हटले जाते. त्यांचा कार्यकाळ हा पाच वर्षांचा असून आमसभेच्या विशेष बहुमताची आवश्यकता नसते. त्याची निवड सुरक्षा समिती करते. क्वचित प्रसंगी एखादे नाव नामंजूर केले असता सुरक्षा समितीला दुसरे नाव सुचवावे लागते. सध्या युनोचे सरचिटणीस म्हणून पोर्तुगालचे अँटोनियो गुटेरेस (Antonio Guterres) हे काम पाहत आहेत. युनोची आमसभा, सुरक्षा समिती तसेच आर्थिक व सामाजिक समितींच्या बैठकींना उपस्थित राहण्याचा त्यांना अधिकार असतो. सचिवालय हे खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असते. कारण त्यातील नोकरवर्ग हा सर्व राष्ट्रातून निवडला जातो. हा नोकरवर्ग पूर्णपणे संयुक्त राष्ट्रसंघाला जबाबदार असतो. सचिवालयाच्या सरचिटणीसाची कामे खालील प्रमाणे असतात.

१) आंतरराष्ट्रीय शांततेस व सुरक्षतेस धोका निर्माण होणारी परिस्थिती सुरक्षा मंडळाच्या निदर्शनास आणून देणे.

२) वार्षिक अहवाल तयार करणे.

३) सभासदांच्या मागणीनुसार खास अधिवेशनाचे आयोजन करणे.

४) न्यायाधीशांच्या नेमणुकीसाठी सभासद राष्ट्राकडून नावांची मागणी करणे.

५) आमसभेने सोपवलेली कामे वेळेत पार पाडणे.

६) विविध शाखांच्या बैठका तसेच परिषदा आयोजित करणे.

७) आवश्यक नोकर वर्गाची नेमणूक करणे.

८) कर्मचारी आणि सभासद यांच्यातील दुवा म्हणून काम पाहणे.

८) सभासद राष्ट्रांची वर्गणी ठरवणे तसेच ती वसूल करणे इत्यादी.

**युनोच्या इतर महत्त्वपूर्ण समित्या: (Special Agencies)**

युनोच्या कार्यात मदत करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या काही खास समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. विशेषत: आर्थिक आणि सामाजिक समितीच्या नियंत्रणाखाली या समित्या काम करत असतात. त्यामध्ये खालील समितींचा प्रमुख्याने समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय मजूर संघटना (I.L.O.), अन्न व शेती संघटना (F.A.O.), आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना (UNESCO), आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटना (I.C.A.D.), आंतरराष्ट्रीय आर्थिक निधी (I.M.F.), जागतिक आरोग्य संघटना (W.H.O.), आंतरराष्ट्रीय टपाल संघटना (I.P.U.), आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (I.T.O.), आंतरराष्ट्रीय बालक निधी (UNICEF), आंतरराष्ट्रीय निर्वासित समिती (U.N.R.), संयुक्त राष्ट्र औद्योगिक विकास संघटना (U.N.I.D.O.), कृषी विकासासाठी आंतरराष्ट्रीय निधी (I.F.A.D.), आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना (I.C.A.D.), आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी (I.A.E.A.), आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालय (I.C.C.), आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (I.T.U.), समावेशक अणुचाचणी बंदी करार संघटना (C.N.T.B.T.O.), जागतिक बौद्धिक संपदा संघटना (W.I.P.O.), जागतिक हवामान संघटना (W.M.O.), आंतरराष्ट्रीय समुद्रतल प्राधिकरण (I.S.A.) इत्यादी.

- **स्वयं अध्यनासाठी प्रश्न: २**

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याचा आराखडा ............. तयार करते.

अ) सुरक्षा समिती     ब) विश्वस्त समिती,

क) सामाजिक व आर्थिक समिती     ड) आमसभा

२) संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव अँटोनिया गुटेरेस हे ............. देशाचे आहेत.

अ) पोर्तुगाल     ब) स्पेन     क) डेन्मार्क.     ड) इंग्लंड

३) ............. साली फ्रान्सला युनोचे कायमचे सदस्यत्व देण्यात आले.

अ) १९४५     ब) १९४६     क) १९४७     ड) १९४८

४) विश्वस्त समितीला ............. असेही म्हणतात.

अ) कायदेशीर समिती     ब) सुरक्षा समिती,

क) ट्रस्टीशिप                                    ड) मेंबरशिप

५) संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव यांचा कार्यकाळ.............वर्षांचा असतो.

अ) पाच          ब) दहा          क) तीन          ड) चार

## ४.२.३ जागतिक शांतता राखण्यामधील संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका

**संयुक्त राष्ट्रसंघाचे राजकीय क्षेत्रातील कार्य:**

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघास आलेले अपयश तसेच राष्ट्रसंघामध्ये असलेल्या उणिवा लक्षात घेऊन दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता व सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून इसवी सन १९४५ मध्ये सॅनफ्रान्सिस्को परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाची म्हणजेच (युनोची) स्थापना करण्यात आली. पूर्वीच्या राष्ट्रसंघापेक्षा संयुक्त राष्ट्रसंघ अधिक कार्यक्षम बनवला गेल्याने या संघटनेला भरीव कामगिरी करता आली. आंतरराष्ट्रीय वाद, संघर्ष, तंटे, समोपचाराच्या मार्गाने सोडवून जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्यात राष्ट्रसंघास बरेच यश प्राप्त झाले. ज्यामुळे तिसऱ्या जागतिक महायुद्धास आळा घालण्यात संयुक्त राष्ट्रसंघास अद्याप तरी यश प्राप्त झाले आहे.

**१) इराणचा – रशिया प्रश्न:**

इराणने संयुक्त राष्ट्रसंघाकडे जानेवारी, १९४६ मध्ये रशियाच्या विरोधात तक्रार केली. युद्धकाळात इराण मध्ये असणारे रशियाचे सैन्य युद्ध संपले तरी अद्याप काढून घेतले नाही. याउलट रशियाने इराणच्या अंतर्गत कारभार हस्तक्षेप करत असल्याच्या तक्रारीची नोंद केली. तेव्हा युनोच्या मध्यस्थीने रशियाने इराणमधून स्वतःच्या सैनिकी फौजा माघारी बोलावल्या. युनोचा हा पहिला विजय होता. परंतु त्यानंतर रशिया व अमेरिका यांच्यामध्ये शीत-युद्ध सुरू झाल्याचे दिसून येते.

**२) इंडोनेशिया:**

जानेवारी, १९४६ मध्ये इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुरक्षा समितीसमोर उपस्थित करण्यात आला. पण प्रत्यक्षात त्यावरती कोणतीही चर्चा घडून आली नाही. पुढे हॉलंडने इंडोनेशियामध्ये सशस्त्र कारवाईस सुरुवात केली. तेव्हा भारत आणि ऑस्ट्रेलिया ने पुन्हा हा प्रश्न सुरक्षा समितीत उपस्थित केला. त्यावेळी हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे अशा पद्धतीची सारवासारव हॉलंडने केली. तेव्हा युनोने दोन्ही पक्षांना ताबडतोब युद्धबंदी करण्याचे आदेश जारी केले. दोघांनीही तो आदेश मान्य केला. परंतु प्रत्यक्षात लढा सुरूच होता. तेव्हा त्यासंदर्भात सखोल चौकशीसाठी समितीची स्थापना करण्यात आली. इंडोनेशियाने याकरिता आपल्या बाजूने ऑस्ट्रेलियाची निवड केली तर हॉलंडने बेल्जियमला पसंती दिली. दोन्ही राष्ट्रांनी त्रयस्थ व्यक्ती म्हणून अमेरिकेची निवड केली. परंतु ज्यावेळी हॉलंडने म्हणजेच डचांनी हा करार मोडला. त्यावेळी त्यांच्या विरोधात सुरक्षा समितीने कठोर कारवाई करून वाटाघाटीने हा प्रश्न सोडवण्यास भाग पाडले. शेवटी इसवी सन १९४९ मध्ये इंडोनेशियाला स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले.

**३) सिरिया लेबनॉन प्रश्नः**

फेब्रुवारी, १९४६ मध्ये सीरिया आणि लेबनॉन यांच्यामध्ये सुरू झालेला संघर्ष युनोच्या मध्यस्थीने तात्काळ मिटवण्यात आला.

**४) पॅलेस्टाईनचा प्रश्नः**

पॅलेस्टाईनचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होता. पॅलेस्टाईनच्या प्रदेशाचे विश्वस्त म्हणून इंग्लंड व्यवस्था पाहत होते. इसवी सन १९४७ पासून पॅलेस्टाईनचा प्रदेश 'मॅनडेट' म्हणून हा इंग्लंडच्या ताब्यात होता. विशेषतः युद्धकाळात ज्यू (यहूद्दी) लोकांनी मायभूमीसाठी मदरलँड लढा सुरू केला होता. त्यास प्रतिसाद म्हणून जगातील सर्व ज्यू लोकांकरीता पॅलेस्टाईनची भूमी दिली जाईल अशा स्वरूपाची युद्धकाळात घोषणा केली होती. त्यानुसार युद्ध समाप्तीनंतर इंग्लंडने ही जबाबदारी घेऊन १९४८ मध्ये ज्यू लोकांच्यासाठी इस्राईल या स्वतंत्र राष्ट्राच्या निर्मितीची घोषणा केली. यावरती प्रतिक्रिया म्हणून अरबांनी आपले सैन्य पॅलेस्टाईनमध्ये पाठवून युद्धास सुरुवात केली. तेव्हा सुरक्षा समितीने युद्ध थांबवण्याचे आवाहन केले. चार आठवड्या करता युद्धबंदी अमलात आणली. परंतु युद्धबंदीचे पालन दोन्ही पक्षाकडून होत नव्हते. अशातच युनोचे मध्यस्थ म्हणून गेलेल्या काउंट बर्नाडोट यांचा इसवी सन १९४९ मध्ये ज्यू अतिरेक्यांच्याकडून खून करण्यात आला. तरीसुद्धा त्यांचे सहाय्यक राल्फ बुंच यांनी इजिप्त, इस्राईल व अरब यांच्याबरोबर युद्धबंदी करार घडवून आणले. शेवटी संबंधित राज्यांनी आपापसात वाटाघाटीने आपले सर्व प्रदेश सोडवून घ्यावेत असे सांगितले. तरीसुद्धा या प्रदेशात अजूनही चिरस्थायी शांतता प्रस्थापित झालेली नाही. त्यामुळे हा प्रश्न सोडण्यात युनोला पूर्णपणे यश प्राप्त झाले असे म्हणता येणार नाही.

**५) ग्रीक प्रश्नः**

डिसेंबर, १९४५ मध्ये ग्रीक ने आपल्या देशाच्या उत्तरेकडील राज्ये ही ग्रीकमधील गनिमी युद्धाला मदत करत आहेत अशा स्वरूपाची तक्रार सुरक्षा समितीकडे केली होती. तेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाने (युनोने) या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यासाठी एक खास समिती नेमली. या समितीने सखोल चौकशी करून लवकरात-लवकर अहवाल सादर करावा अशा स्वरूपाच्या त्यांना सूचना देण्यात आल्या. त्यानुसार समितीने अल्बेनिया, बुल्गेरिया आणि युगोसल्हाव्हिया ही राष्ट्रे ग्रीकमधील गनिमी युद्धास मदत करत आहेत. अशा स्वरूपाचा निर्णय बहुमताने दिला. परंतु रशियाने या प्रकरणात स्वतःचा व्हेटो म्हणजेच नकाराधिकार वापरला. त्यामुळे हे प्रकरण युनोच्या जनरल बॉडीकडे सोपवण्यात आले. तेव्हा युनोने ११ राष्ट्रांची एक समिती नेमली व या समितीवर रशिया आणि पोलंड या दोन राष्ट्रांची सुद्धा नेमणूक करण्यात आली होती. परंतु या दोन्ही राष्ट्रांनी समितीवर कार्य करण्यास नकार दिला. इतकेच नाही तर अल्बेनिया, बुल्गेरिया आणि युगोसल्हाव्हिया यांनी ही समितीत काम करण्यास स्पष्ट नकार दिला. तरीसुद्धा सुरक्षा समितीने ग्रीक गनिमांना उत्तरेकडील राज्ये मदत करत आहेत असा पुरावा सादर केला. व तो सर्वसाधारण सभेपुढे विचारासाठी ठेवला. परंतु रशियाने याला कडाडून विरोध केला. त्यामुळे युनोची जनरल सभा या प्रश्नात विशेष काही करू शकली नाही.

### ६) इराण-इंग्लंड प्रश्न:

इसवी सन १९५१ मध्ये इराणने आपल्या देशातील तेल उद्योगांचे राष्ट्रीयकरण केले. त्यामुळे 'अँग्लोइरणियन' हा तेल शुद्धीकरण कारखाना बंद करण्यात आला. ज्यामुळे इंग्लंड हे प्रकरण सुरक्षा समिती व आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर नेले. परंतु याबाबतीत निर्णय होऊ शकला नाही. अमेरिकेने दोघांच्यामध्ये समजूतीचा प्रयत्न केला. परंतु त्यास यश आले नाही. शेवटी इंग्लंडने इराणशी असणारे आपले राजनैतिक संबंध कायमचे तोडून टाकले.

### ७) सुएझ कालवा प्रश्न:

इसवी सन १९५६ मध्ये इजिप्तच्या नसिरने सुएझ कालव्याचे राष्ट्रीयकरण केले. यातून अनेक प्रश्न निर्माण झाले. विशेषत: अरब-इस्राईल संघर्ष सुरू झाला. यामध्ये फ्रान्स व इंग्लंडने इस्राईलला पाठिंबा दिला. इस्रायलने सुएझ कालवा प्रदेशातील इजिप्तशियन ठाण्यावर हल्ले चढवले. याचवेळी इंग्लंड आणि फ्रान्स या दोन्ही राष्ट्रांनी सुद्धा सुएझ कालव्याच्या उत्तरेकडील प्रदेशावर आक्रमण केले. या दोन्ही हल्ल्यामुळे सुएझ कालव्याचा प्रश्न अतिशय व्यापक बनला. त्यामुळे अमेरिकेने या आक्रमणाचा बंदोबस्त करण्याची सूचना सुरक्षा समितीला केली. त्यानुसार युनोच्या सर्वसाधारणसभेने तीन ठराव पारित करून हे आक्रमण थांबविले. तसेच शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून गाझा प्रदेशात युनोचे सैन्य पाठवले. शेवटी मे, १९५७ मध्ये सुएझ कालव्यातील सर्व वाहतूक सुरळीत चालू करण्यात संयुक्त राष्ट्रसंघाला यश आले.

### ८) दक्षिण आफ्रिकेतील-भारत प्रश्न:

जून, १९४६ मध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेमध्ये भारतीय लोकांना मिळणाऱ्या वर्णद्वेषाच्या वागणुकी विरोधात युनोच्या सर्वसाधारण सभेत प्रश्न उपस्थित केला. यासंदर्भात हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे त्यामुळे राष्ट्रसंघ या संदर्भात कोणतीही कायदेशीर भूमिका घेऊ शकत नाही अशी दक्षिण आफ्रिकेची धारणा होती. परंतु अमेरिकेने दक्षिण आफ्रिकेचा हा युक्तिवाद फेटाळून लावला व दोन्ही राष्ट्रानी आपापसात वाटाघाटी करून हा प्रश्न समोपचाराने सोडवावा अशा पद्धतीचा सल्ला दिला. त्यानुसार फेब्रुवारी, १९५० मध्ये केपटाऊन या ठिकाणी विचारविनिमय करण्यासाठी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु दक्षिण आफ्रिका सरकारने अन्याय करणारे कायदे अधिकच कठोर केल्याने ही परिषद होऊ शकली नाही. तेव्हा भारताने दक्षिण आफ्रिका युनोच्या ठरावाला जुमानत नाही. अशी तक्रार केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. दक्षिण आफ्रिकेच्या या भूमिकेबद्दल युनोला प्रभावी उपाय योजना करता आली नाही असे दिसून येते. पुढे १९९०-९१ मध्ये नेल्सन मंडेला हे सत्तेवर आले आणि त्यानंतर हा प्रश्न सुटला.

### ९) भारत पाकिस्तान काश्मीर प्रश्न:

भारत पाकिस्तान फाळणी नंतर पाकिस्तानने काश्मीरमधील मोक्याच्या ठिकाणी आपल्या सहाय्यक टोळ्या घुसवल्या होत्या. तेव्हा काश्मीरमधील महाराज हरीसिंग यांनी भारतात सामील होण्याचा करार केला व या टोळी वाल्यांच्या आक्रमणापासून आपला बचाव करावा अशी विनंती भारताकडे केली. तेव्हा भारताने

त्या ठिकाणी स्वतःचे लष्कर पाठवले. तसेच २ जानेवारी, १९४८ मध्ये भारताने पाकिस्तान विरोधात संयुक्त राष्ट्रसंघाकडे तक्रार नोंद केली. त्यावेळी पाकिस्तानने मोठा कांगावा केला. सुरक्षा समितीने काश्मिरमध्ये युद्धबंदी घडवून आणली. परंतु काश्मीरबाबत सार्वमत घेण्यात मात्र संयुक्त राष्ट्रसंघाला यश मिळाले नाही. आज ही काश्मीरचा प्रश्न तसाच भिजत पडलेला आहे.

**१०) बर्लिनचा प्रश्न:**

बर्लिनचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आणि गुंतागुंतीचा होता. हा प्रश्न इंग्लंड, फ्रान्स, रशिया आणि अमेरिका यांच्याशी संबंधित होता. या संदर्भात इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांनी बर्लिन बरोबर दळणवळण संदर्भात जी नियंत्रणे घातली आहेत. त्यामुळे जगामध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते अशी तक्रार संयुक्त राष्ट्रसंघाकडे त्यांनी केली. सुरक्षा समितीने यामध्ये लक्ष घालून बर्लिनमधील आपल्या अधिकारांचे रक्षण करावे अशी त्यांची मागणी होती. या प्रश्नाच्या संदर्भात रशियाने मात्र विरोधी भूमिका घेऊन बर्लिनचा प्रश्न हा युनोच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. त्यामुळे हस्तक्षेप केल्यास तो कलम १०७ चा भंग ठरेल असे सांगितले. इतकेच नाही तर रशियाने या प्रश्नात भाग घेतला नाही. शेवटी संयुक्त राष्ट्रसंघातील तटस्थ राष्ट्रांनी या प्रश्नात लक्ष घालून संबंधित इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका आणि रशिया या राष्ट्रांनी बर्लिनमधील आपल्या क्षेत्रातील दळणवळणाच्या साधनावर जी नियंत्रणे घातली आहेत ती २ मार्च, १९४८ नंतर काढून घ्यावीत अशी विनंती केली. तसेच संबंधित राष्ट्रांनी स्वतंत्रपणे आपापसात वाटाघाटी कराव्यात असे निर्देश दिले. युनोच्या सुरक्षा मंडळाने हा प्रश्न सोडवण्यात बरीच मेहनत घेतलेली होती.

**११) हंगेरीचा प्रश्न:**

२८ ऑक्टोबर, १९५६ रोजी फ्रान्स, अमेरिका आणि इंग्लंड यांनी सुरक्षा समिती समोर हंगेरीचा प्रश्न उपस्थित केला. हंगेरीमधून रशियन फौजा काढून घेण्यात अशा स्वरूपाची हंगेरीयन नागरिकांची मागणी होती. त्याकरता त्यांनी मोठ्या प्रमाणावर निदर्शने केली. त्यावर पोलिसांनी गोळीबार केल्याने परिस्थिती गंभीर बनली म्हणून रशियाने हंगेरीतील ही बंडाळी मोडून काढण्यासाठी तेथे स्वतःचे सैन्य पाठवले. त्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट बनली. तेव्हा फ्रान्स, अमेरिका आणि इंग्लंड यांनी सुरक्षा समितीकडे रशियाच्या हस्तक्षेपासंदर्भात तक्रार केली. पुढे हंगेरीच्या पंतप्रधानांनी सुद्धा रशियन सैन्य हंगेरीतील लोकशाही सरकार उलथून टाकण्यासाठी प्रयत्न करत आहे. अशा स्वरूपाची तक्रार सुरक्षा समितीकडे केल्याने सुरक्षा समितीने या प्रश्नावर विचार-विनिमय करण्यास प्रारंभ केला. त्यानुसार रशियाने पूर्णपणे आपले सैन्य काढून घ्यावे असा ठराव झाला. रशिया वगळता सर्व राष्ट्रांनी या ठरावाच्या बाजूने मतदान केले.

त्यानंतर हंगेरीच्या प्रश्नसंदर्भात ४ नोव्हेंबर, १९५६ च्या युनोच्या सर्वसाधारणसभेने रशियाने हंगरीतून आपले सैन्य काढून घ्यावे. तसेच हंगेरीत निपक्ष:पणे निवडणूका होण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करावे असे आदेश दिले होते. पण रशियाने हे सर्व आदेश झिडकारून लावले. हंगेरीचा प्रश्न हा अंतर्गत असल्याचा दावा केला. त्यामुळे सुरक्षा समितीने पाच सदस्यांची एक समिती नेमली. त्यामध्ये ऑस्ट्रेलिया, सिलोन, डेन्मार्क, ट्युनिशिया आणि उरुग्वे यांचा समावेश होता. या समितीने सखोल चौकशी करून जून, १९५७

मध्ये जो रिपोर्ट सादर केला त्या रिपोर्टनुसार हंगेरीतील मानवी अधिकारांची पायमल्ली रशियन सैन्याकडून केली गेली असल्याचा रिपोर्ट देण्यात आला. त्यानुसार युनोच्या सर्वसाधारणसभेने रशियाला सैन्य माघारीचे निर्देश दिले. पण रशियाने या निर्देशाला जुमानले नाही. त्याचा परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात हंगेरीला सहानुभूती मिळत गेली.

**१२) सायप्रसचा प्रश्न:**

इसवी सन १९५५ मध्ये सायप्रसचा प्रश्न सुरक्षा समिती समोर आला. या बेटावर तुर्की व ग्रीक वंशाचे लोक राहात होते. सायप्रसचा ताबा आपल्याला मिळावा अशी ग्रीसने मागणी केली होती. १९२५ पासून सायप्रसचा ताबा इंग्लंडकडे होता. साहजिकच इंग्लंडने त्यास विरोध केला तेव्हा हा प्रश्न युनो समोर उपस्थित झाला. यावेळी सायप्रसला आपण अंतर्गत स्वायत्त देऊ असे इंग्लंडने जाहीर केले. तेव्हा वाटाघाटीने हा प्रश्न सोडवावा असे संयुक्त राष्ट्रसंघाने सुचवले. अंततः १९६० मध्ये सायप्रसला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. तथापि या बेटावरील मिश्रवस्ती लक्षात घेता येथे शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ग्रीस, तुर्कस्तान आणि इंग्लंड यांच्यावर सोपवण्यात आली. परंतु १९८३ मध्ये ग्रीक आणि तुर्कस्तानच्या गनिमांच्यामध्ये मोठा संघर्ष होऊन दंगली घडून आल्या. शेवटी १९८४ च्या फेब्रुवारी महिन्यात लंडन या ठिकाणी संबंधित राष्ट्रांची परिषद बोलवण्यात आली. पण काही निष्पन्न झाले नाही. अंतता हा प्रश्न सुरक्षा समिती समोर आला. सुरक्षा समितीने सायप्रसमध्ये आंतरराष्ट्रीय शांतता फौजा ठेवण्यात याव्यात आणि या फौजेचा खर्च सायप्रस सरकारने करावा असा आदेश दिला. असे असले तरीसुद्धा तुर्की विमानांनी हल्ले करण्याचे थांबवले नाही. थोडक्यात, हा प्रश्न सोडवण्यात युनोला पूर्ण यश आले नाही.

**१३) क्युबा प्रश्न:**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या दृष्टिकोनातून क्युबाचा प्रश्न हा अतिशय गंभीर मानला गेलेला आहे. कारण क्युबामध्ये रशियाने स्वतःची क्षेपणास्त्र केंद्रे निर्माण केली होती. आणि क्युबा हा प्रादेशिकदृष्ट्या अमेरिकेला अतिशय जवळ असल्याने ही घटना अत्यंत गंभीर होती. रशियाची ही कृती म्हणजे अमेरिकेच्या संरक्षण व्यवस्थेला धोका निर्माण करणारी आहे. त्यामुळे तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी २२ ऑक्टोबर, १९६२ रोजी क्यूबाची नाविक नाकेबंदी करण्याचा आदेश दिला. तसेच या प्रदेशात लष्करी मदत पोचू नये याची खबरदारी घेतली. ज्यामुळे रशिया दुखावला गेला. रशियाने सुद्धा ही नाकेबंदी न जुमानता क्युबात शस्त्रास्त्रे पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यातून युद्धाचा प्रसंग निर्माण झाला. अशा परिस्थितीत संयुक्त राष्ट्रसंघाचे जनरल सेक्रेटरी ऊथांट यांनी मध्यस्थी करुन तोडगा काढला व संयुक्त राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली क्युबातील क्षेपणास्त्रे काढून घेण्यात आली. ज्यामुळे मोठा अनर्थ टळला.

**१४) झेकोस्लव्हीयाचा प्रश्न:**

२२ ऑगस्ट, १९६८ मध्ये झेकोस्लव्हीयाचा प्रश्न सुरक्षा समिती समोर आला होता. कारण मागणी नसताना रशियाने झेकोस्लव्हीयात स्वतःचे सैन्य पाठवले होते. रशियाच्या या आक्रमणाचा अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि इतर राष्ट्रांनी निषेध केला. व सैन्य काढून घेण्याची मागणी केली. यावेळी रशियाने आपला

नकाराधिकार वापरला. त्यामुळे हा प्रश्न सोडवण्यात युनोला अपयश आले. शेवटी रशियन पुढारी आणि झेक पुढारी यांच्यात वाटाघाटी होऊन एका करारावर सह्या झाल्या. आणि रशियाने आपले सैन्य काढून घेतले.

थोडक्यात, संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना ही युद्ध संपवून जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण करण्याच्या हेतूने १९४५ मध्ये झाली होती. त्यामुळे सुरुवातीपासूनच शस्त्रकपात, शस्त्रबंदी घडवून आणण्याचा संयुक्त राष्ट्रसंघाने प्रयत्न केलेला दिसून येतो. संयुक्त राष्ट्रसंघाला काही प्रश्न सोडवण्यात शंभर टक्के यश मिळाले असले तरी काही प्रश्नांच्या बाबतीत अपयश देखील आलेले दिसून येते. विशेषत: कोरियातील शस्त्रसंधी, पॅलेस्टाईनची फाळणी, सुएझ कालवा प्रश्न, आफ्रिकेतील भारतीयांचा प्रश्न सोडवण्यात यश आले. तर जर्मनीचे एकीकरण, कोरियाचे एकीकीकरण, काश्मीर प्रश्न, व्हिएतनामाचा प्रश्न इत्यादी सारख्या प्रश्नांच्या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघाला म्हणावी तशी कामगिरी करता आलेली नाही. असे असले तरी संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक परिस्थिती हाताच्या बाहेर जाऊ दिली नाही. ज्यामुळे तिसऱ्या महायुद्धापासून जग अलिप्त राहिले. हे मान्य करावे लागेल. अलीकडेच संयुक्त राष्ट्रसंघाने वर्ष २०२५ हे आंतरराष्ट्रीय शांती व विश्वास वर्ष म्हणून घोषित केलेले आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाचे अराजकीय क्षेत्रातले कार्य :**

जगाच्या इतिहासात संयुक्त राष्ट्रसंघाचा उल्लेख राजकीय क्षेत्रापेक्षा अराजकीय क्षेत्रातील कार्यासाठी अधिक ठळकपणे केला जातो. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानवतावादी क्षेत्रातील कार्य आदर्शवत ठरले आहे. काही महत्त्वपूर्ण कार्ये पुढीलप्रमाणे–

**१) आपदग्रस्तांना मदत :**

मानवजातीला दुष्काळ, अतिवर्षण, युद्ध अशा अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. विशेषतः सर्वसामान्य लोकांना याचा खूप फटका बसतो. आमसभेने १९७१ मध्ये जिनिव्हात आपत्ती निवारण कार्यालय सुरू केले. यामार्फत जगभरात गरजेप्रमाणे अन्न पुरवठा, आरोग्य सेवा पुरवून मदत केली. उदा. १९६० च्या दशकात मध्य आफ्रिकेतील अनेक देशांना अवर्षण व दुष्काळ या संकटाने ग्रासले. संयुक्त राष्ट्रसंघाने या भागात विशेष कार्यालय स्थापन करून इथियोपिया, सोमालिया, सुदाम इ. राष्ट्रातील नागरिकांना अन्न-धान्य व इतर सुविधा पुरविल्या. गरज भासेल तेथे छावण्या उभ्या करून तेथील निर्वासितांना मदत केली.

**२) विविध राष्ट्रांना कार्यक्रम नियोजनासाठी मदत :**

विविध समस्यांचा अभ्यास करण्यासाठी व उपाय सुचविण्यासाठी तज्ज्ञ लोकांचे अभ्यास गट संयुक्त राष्ट्रसंघाने नियुक्त केले. या गटांनी दिलेल्या अहवालाचा उपयोग अनेक राष्ट्रांना आपल्या कार्यक्रम नियोजनासाठी झाला. विशेषतः आर्थिक समस्याचे निवारण करण्यासाठी हे उपयुक्त ठरले.

**३) आर्थिक मदत :**

विकसनशील राष्ट्रांना आर्थिक मदतीची गरज आहे. अशा राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघाने अनुदान अथवा देणग्यांच्या माध्यमातून मदत केली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विशेष शाखा उदा. जागतिक बँक (IBRD),

आंतरराष्ट्रीय विकास महामंडळ (IDA) इ. मार्फत मदत पुरवली. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांना याचा फायदा झाला.

**४) सामाजिक क्षेत्रातील कार्य :**

संयुक्त राष्ट्रसंघाने अनेक सामाजिक समस्यांच्या निवारणासाठी प्रयत्न केले. यासाठी विशेष समित्यांची निर्मिती केली. युनेस्को, युनिसेफ, आरोग्य संघटना इ. समित्या यासाठी सतत प्रयत्न करत असतात. स्त्रिया व बालकांच्या हक्कांचे रक्षण, अपंगाचे पुनर्वसन, निर्वासिताचे पुनर्वसन, युवा कल्याण, साथीच्या रोगांपासून मानवी समाजाची सुटका, लोकसंख्या नियंत्रण इ. अनेक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य महत्त्वपूर्ण ठरले आहे.

**५) आरोग्य क्षेत्रातील कार्य :**

जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) माध्यमातून मानवाचे आरोग्य सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले गेले. उदा. टी.बी., पोलीओ, देवी, कुष्ठरोग, साथीचे रोग आटोक्यात आणण्यासाठी विशेष आरोग्य कार्यक्रमाचे आयोजन, सामुदायिक लसीकरणाचा कार्यक्रम तर एडस् सारख्या रोगाबद्दल जनतेत जागृती निर्माण व्हावी, यासाठी संपूर्ण जगभर कार्यक्रम, त्यासाठी आर्थिक अनुदान देणे, औषधे उपलब्ध करून देणे, माहितीपत्रक देणे इ. गोष्टी केल्या गेल्या आहेत. यामुळे देवी सारख्या काही रोगाचे समूळ उच्चाटनही झाले आहे. आरोग्य क्षेत्रातले हे कार्य मानवासाठी कल्याणकारी ठरले आहे.

**६) स्त्रिया व बालके यांच्यासाठीचे कार्य :**

जगभरात सर्वत्र स्त्रियांना राजकीय, सामाजिक हक्क नाकारले जात होते. पुरुषांच्या तुलनेत तिचा दर्जा दुय्यम होता. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने स्त्रियांना राजकीय हक्क मिळावेत, यासाठी स्त्री हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. स्त्रियांना पुरुषासारखेच सर्व हक्क, समान कामासाठी समान वेतन, समान संधी इ. मार्गदर्शक तत्वे जाहीर केली व सर्व सभासद राष्ट्रांना यासाठी स्वतंत्र कायदे करण्याचे आव्हान केले. ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून घोषित केला. स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जागृती आणण्यासाठी या सर्व गोष्टी उपयुक्त ठरल्या. बालकांच्या विकासासाठीही असेच प्रयत्न केले. विशेषतः युनिसेफच्या माध्यमातून मागासलेल्या देशातील बालकासाठी पोषक आहार योजना, रोगनियंत्रण व आरोग्य सुधारणेसाठी कार्यक्रम, शैक्षणिक विकासासाठी कार्यक्रम राबविले.

**७) शैक्षणिक क्षेत्रातील कार्य :**

निरक्षरता हा मानवी विकासातील मोठा अडथळा आहे हे लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने यासाठी काही विशेष उपक्रम युनेस्कोच्या माध्यमातून राबविले. प्रौढ साक्षरता वर्ग, शिक्षक प्रशिक्षण, क्रमिक पुस्तके तयार करणे, संशोधनास उत्तेजन, शैक्षणिक परिसंवादाचे आयोजन व त्या मार्फत शैक्षणिक विचाराची देवाण घेवाण, आंतरराष्ट्रीय विज्ञान उपक्रम, सांस्कृतिक इतिहासाची देवाण-घेवाण इ. अनेक उपक्रमांच्या

माध्यमातून मानवाचा शिक्षणस्तर वाढविण्याचा प्रयत्न केला. यासाठी आर्थिक मदतही दिली. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठीही संयुक्त राष्ट्रसंघ सातत्याने प्रयत्न करीत राहिला.

**८) मानवाधिकाराबाबतचे कार्य :**

प्रत्येक मानवाचे मुलभूत हक्क व अधिकार यांच्या संरक्षणासाठी सयुक्त राष्ट्रसंघाने नेहमी प्रयत्न केले १० डिसेंबर हा दिवस 'मानवाधिकार दिवस' म्हणून पाळण्यात येतो. १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने ''आंतरराष्ट्रीय मानवी हक्काचा कायदा'' पारीत केला. यामध्ये प्रत्येक मानवाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, नागरी व राजकीय हक्कांचा उल्लेख होता. मानवाचे संरक्षण याला यात महत्त्व दिले गेले.

या प्रमुख कार्याशिवाय कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी, अंमली पदार्थांवर नियंत्रण आणण्यासाठी, वृत्तपत्रे, माध्यमे, बंधनमुक्त असावीत यासाठी त्याप्रमाणे प्रत्येक राष्ट्रातील लोकांना स्वतःचे भवितव्य ठरविण्याचा स्वयंनिर्णयाचा हक्क मिळावा यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने प्रयत्न केले. थोडक्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रयत्नामुळे समाजाला त्याचे हक्क व कर्तव्ये याची जाणीव झाली. संयुक्त राष्ट्रसंघाची वेगवेगळ्या क्षेत्रातली विधायक कार्य अखंडपणे सुरू आहेत.

- **संयुक्त राष्ट्रसंघाच्या उणिवा:**

जागतिक शांतता आणि सुरक्षितता अबाधित राखण्याच्या दृष्टिकोनातून दुसऱ्या महायुद्धानंतर इसवी सन १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रसंघापेक्षा संयुक्त राष्ट्रसंघ अर्थातच अधिक कार्यक्षम आणि प्रभावी ठरलेला दिसून येतो. याचे कारण म्हणजे आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात युनोने केलेली कामगिरी होय. संयुक्त राष्ट्रसंघाने काही प्रश्न यशस्वीपणे हाताळले असले तरी भारताचा काश्मीर प्रश्न असो किंवा इस्राईलचा प्रश्न यामध्ये तोडगा काढण्यास अपयश आले आहे. आज संपूर्ण जगामध्ये चाललेली शस्त्रास्त्र स्पर्धा, शस्त्रास्त्रांचा वाढता साठा त्याचबरोबर दिवसागणिक वाढत जाणारी अण्वस्त्रधारी राष्ट्रांची संख्या एक प्रकारे युनोचे अपयशच म्हणता येईल. त्यामुळे वरील घटना या संयुक्त राष्ट्रसंघाच्या उणिवा आणि मर्यादा स्पष्ट करतात.

- **संयुक्त राष्ट्रसंघाच्या उणिवा खालील प्रमाणे.**

१) संयुक्त राष्ट्रसंघ हा दुसऱ्या महायुद्धातील विजेत्या राष्ट्रांचा संघ आहे त्यामुळे त्यात पराभूत राष्ट्रांना स्थान दिले नाही.

२) संयुक्त राष्ट्रसंघाला सभासद असणाऱ्या राष्ट्रांनी सार्वभौमत्व न दिल्याने काही बाबतीत ठाम निर्णय घेता येत नाहीत.

३) संयुक्त राष्ट्रसंघातील इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, चीन आणि रशिया यांना नकाराधिकार (व्हेटो) मिळाल्याने त्यांनी तो स्वतःच्या स्वार्थासाठी वापरला. विशेषत: रशियाने स्वतःच्या स्वार्थासाठी आतापर्यंत सर्वाधिक नकाराधिकार वापर केला आहे.

४) संयुक्त राष्ट्रसंघातील सर्वात महत्त्वाची उणीव किंवा दोष म्हणजे प्रमुख पाच राष्ट्रांपैकी एका राष्ट्राने जरी नकाराधिकार वापरला तरी संयुक्त राष्ट्रसंघ त्याबाबतीत काहीही करू शकत नाही.

५) संयुक्त राष्ट्रसंघामध्ये एकमत नसल्याचे अनेक प्रसंगात दिसून आले आहे. विशेषत: रशिया हा नेहमीच विरोधी भूमिका घेत आलेला आहे.

६) संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजात लहान राष्ट्रांच्या मतांना विचारात घेतले जात नाही.

७) संयुक्त राष्ट्रसंघातील सभासद राष्ट्रांनी एखादा आदेश पाळला नाही तरी त्याच्या विरोधात ठामपणे लष्करी कारवाई करण्यासाठी सुरक्षा मंडळाकडे स्वतःची व्यवस्था नाही.

८) संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन करत असताना पक्षपातीपणा केला गेला. ज्यामुळे अनेक राष्ट्रांना बऱ्याच काळापर्यंत संयुक्त राष्ट्रसंघापासून दूर ठेवण्यात आले. विशेषत: अशिया आणि आफ्रिकन देशांना आत्तापर्यंत संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद प्रतिनिधित्व देण्यात आले नव्हते.

९) विश्वस्त समितीच्या माध्यमातून मोठ्या राष्ट्रांनी अनेक प्रदेश स्वतःच्या ताब्यात ठेवले. हा एक प्रकारचा साम्राज्यवादच आहे.

१०) आंतरराष्ट्रीय प्रश्न तसेच राष्ट्रीय प्रश्न अशा पद्धतीची विभागणी संयुक्त राष्ट्रसंघाने न केल्यामुळे बऱ्याचदा हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे असे म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाला डावलले जाते.

११) नकाराधिकार(व्हेटो) किती वेळा आणि केव्हा वापरावा या संदर्भात निश्चित नियम नसल्याने मोठ्या राष्ट्रांनी त्याचा गैरवापर केला.

१२) संयुक्त राष्ट्रसंघाच्या एकंदरीतच कार्यपद्धतीवर अमेरिकेचा विशेष प्रभाव असल्याचे दिसून येते.

१३) संयुक्त राष्ट्रसंघात एकमताचा अभाव दिसून येतो. त्यामुळे आत्तापर्यंत केवळ फक्त दोन वेळेलाच (१९५० आणि १९९१) सामूहिक सुरक्षा यंत्रणेअंतर्गत निर्णय घेण्यात आला आहे.

१४) संयुक्त राष्ट्रसंघात त्रयस्थ किंवा तटस्थ राष्ट्रांना कोणत्याही प्रकारचे स्थान नाही.

१५) सामूहिक सुरक्षिता यंत्रणेमुळे एखाद्या स्थानिक युद्धास, वैश्विक युद्धाचे स्वरूप प्राप्त होऊन तो प्रश्न सुटण्यापेक्षा अधिक गुंतागुंतीचा बनून जातो.

वरील प्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघातील उणिवा दिसून येतात. असे असले तरी केवळ १९६३ मध्ये झालेल्या मास्को कराराचे जर पालन केले गेले तर शांतता, सुरक्षितता आणि बंधुता इत्यादी तत्वांना खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप प्राप्त होईल. असे म्हणता येईल.

- **स्वयं अध्यनासाठी प्रश्न: ३**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) ............. राष्ट्रात शीत-युद्ध सुरू झाले होते.

अ) अमेरिका-रशिया ब) अमेरिका-इंग्लंड क) रशिया-चीन ड) इंग्लंड-चीन

२) ज्यु लोकांनी माय भूमीसाठी ............. लढा सुरू केला होता.

अ) ग्रीनलँड ब) मॅनलँड क) मदरलँड ड) आइसलँड

३) सुएझ कालव्याचे राष्ट्रीयकरण .......... साली करण्यात आले.

अ) १९५६ ब) १९५५ क) १९५८ ड) १९५७

४) ..........राष्ट्राने आतापर्यंत सर्वात जास्त नकाराधिकाराचा वापर केला आहे.

अ) रशिया ब) अमेरिका क) इंग्लंड ड) चीन

५) पॅलेस्टाईनच्या प्रदेशाचे विश्वस्त म्हणून........... हे राष्ट्र व्यवस्था पाहत होते.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) रशिया ड) अमेरिका

## ४.३ सारांश :

जागतिक शांतता आणि सुरक्षिततेच्या विचारातून राष्ट्रसंघाचा जन्म झाला होता. पण राष्ट्रसंघास आलेले अपयश आणि राष्ट्रसंघाच्या उणिवामुळे दुसरे जागतिक महायुद्ध घडून आले. त्यामुळे संपूर्ण जगासमोर अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्न निर्माण झाले होते. या परिस्थितीत राष्ट्रा-राष्ट्रात संघर्षाचा धोका अधिकच वाढला होता. अशावेळी सामंजस्य व सहकार्य निर्माण व्हावे, संघर्ष-युद्धे टाळली जावीत यासाठी आंतरराष्ट्रीय सुसंवादाचे व्यासपीठ म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट आणि इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल यांच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. उद्दिष्ट प्राप्तीसाठी संयुक्त राष्ट्रसंघाने सातत्याने प्रयत्न केले. अनेक राजकीय प्रश्नावर तोडगा काढून युद्ध टाळण्यात यश मिळविले. पूर्वीच्या राष्ट्रसंघाच्या उणिवा लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाचा कारभार पाहण्यासाठी तसेच नियंत्रण ठेवण्यासाठी संघटनेने महत्त्वपूर्ण सहा घटकांची एक संरचना तयार केली. ज्यामध्ये आमसभा, सुरक्षा समिती, आर्थिक व सामाजिक समिती, विश्वस्त समिती, आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि सचिवालय यांचा समावेश असून याव्यतिरिक्त संयुक्त राष्ट्रसंघाला अनेक संस्था, संघटना वेळोवेळी मदत आणि सहकार्य करतात असतात. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाला अपेक्षित कामगिरी करता आली. विशेषत: मुख्यत्वेकरून इराण-रशिया प्रश्न, सीरिया-लेबनॉन यांच्यातील संघर्ष, पॅलेस्टाईनचा मॅनडेट प्रदेश, भारत-पाकिस्तान यांच्यातील काश्मीर प्रश्न, इराणमधील तेलविहिरींचे केलेले राष्ट्रीयीकरण आणि त्यानंतर निर्माण झालेले प्रश्न, १९५६ चे सुएझ कालवा प्रकरण, अरब-इस्रायल संघर्ष तसेच १९५५ पासून संयुक्त राष्ट्रसंघाने शस्त्रकपात व शस्त्रास्त्रबंदीच्या अनुषंगाने केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. संयुक्त राष्ट्रसंघासमोर आलेल्या सर्व प्रश्नाच्या सोडवणूकीत म्हणावे तितके यश आले नसले तरी त्या प्रश्नांची व्याप्ती वाढू दिली नाही. जागतिक पातळीवरील शीतयुद्धाचे वातावरण, प्रादेशिक प्रश्नांतून वाढलेले संघर्ष, बड्या राष्ट्रांना मिळालेला नकाराधिकार (व्हेटो) यामुळे निर्णय घेताना पडणाऱ्या मर्यादा या सर्व अडचणींवर मात करत संयुक्त राष्ट्रसंघाची आज वाटचाल सुरू आहे. संयुक्त राष्ट्रसंघास अधिक अधिकार, पूर्ण निर्णय स्वातंत्र्य दिले गेले तर भविष्यातील चित्र अधिकच आशादायी बनेल. अराजकीय क्षेत्रात मानवाच्या कल्याणासाठी

संयुक्त राष्ट्रसंघाने केलेली कार्ये आज आदर्शवत बनली आहेत. सामान्यातील सामान्य व्यक्तीलाही जगण्याचे बळ मिळावे यासाठीचे संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे आहेत.

## ४.४ पारिभाषिक शब्द शब्दार्थ:

१) **सनद :** अधिनियम

२) **सार्वभौमत्व :** सर्वेसर्वा किंवा कोणत्याही बाह्य शक्तीचा प्रभाव नसणे.

३) **विषमता :** असमानता

४) **प्रमाद :** अपराध, गुन्हा इत्यादी.

५) **निर्मूलन :** एखाद्या गोष्टी पासून मुक्त होण्याची प्रक्रिया.

### ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्नः १

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) चीन २) २४ ऑक्टोबर, १९४६ ३) न्यूयॉर्क

४) अमेरिका-रशिया ५) याल्टा

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्नः २

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) आमसभा २) पोर्तुगाल ३) १९४६. ४) ट्रस्टीशीप ५) पाच

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्नः ३

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

२) अमेरिका-रशिया २) मदरलँड ३) १९५६ ४) रशिया ५) इंग्लंड

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय:

अ) टीपा लिहा.

१) संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्टे

२) सुरक्षा समिती

३) आमसमितीची कामे

४) आर्थिक आणि सामाजिक समितीची कामे

५) विश्वस्त समिती

६) आंतरराष्ट्रीय न्यायालय

७) संयुक्त राष्ट्रसंघाच्या उणिवा

८) बर्लिन प्रश्न

९) सचिवालय

१०) दक्षिण आफ्रिका-भारत वर्णद्वेष प्रश्न

ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) संयुक्त राष्ट्रसंघाची प्रमुख तत्वे कोणती?

२) संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभा व सुरक्षा समितीची कामे सविस्तर लिहा.

३) संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

४) संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्दिष्टांची सविस्तर चर्चा करा.

५) संयुक्त राष्ट्रसंघाचे जागतिक शांतता आणि सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून योगदान सांगा.

६) संयुक्त राष्ट्रसंघाचे अराजकीय कार्य सांगा.

७) संयुक्त राष्ट्रसंघाच्या उणीवांची चर्चा करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


१) गायकवाड आर.डी., थोरात डी.डी., आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

२) वैद्य सुमन, आधुनिक जग भाग: एक, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००२.

३) गायकवाड आर.डी., कदम वाय. एन., थोरात डी.डी., आधुनिक जगाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८.

४) कोठेकर शांता, अमेरिकन संघराज्याचा इतिहास, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१०.

५) बोर्जेस जॉन्सन, संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

६) कोलारकर श. गो., आधुनिक भारत आणि आधुनिक युरोप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००१.

७) देवळाणकर शैलेंद्र, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.


❑❑❑